॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सूक्तिरत्नावलि

## सप्तम यष्टी.

॥ श्रीगुलाबरायमहाराजकृत ॥

# उपदेशामृत ( पत्रें )

हें पुस्तक

प्रकाशक

श्रीनिवास रामचंद्र हरिदास यांनी

नागपूरयेथें

" श्रीज्ञानेश्वर " छा० छ०

आवृत्ति १ ली

शके १८३५.

All rights reserved

# प्रस्तावना.

श्रीगुलाबराव महाराज यांचे सूक्तिरत्नावली नामक ग्रंथाव-ळीची ही सप्तम यष्टी आज आह्मी वाचकांस सादर करीत आहोंत. या यष्टींत श्रीमहाराजानीं निर निराळ्या वृत्तीच्या माणसास निर निराळ्या प्रसंगीं लिहिलेली अशीं ३८ पत्रें आहेत. यांत अनेक प्रकारचे गहन विषय साधारण मनुष्यास देखील समजतील अश्या सोप्या व सरळ भाषेंत लिहिण्यांत आले असून व्यावहारिक माणसांचा व्यव-हारांतील वांरवार येणाऱ्या अडचणी मुळें परमार्थ पराङ्मुख होण्याचा फारच संभव असल्या मुळें अशा प्रसंगांत त्यांनीं कोण्या तऱ्हेनें वागून आपली मानसिक स्थिती कशी बिघडूं देऊंनये याचें दिग्दर्शन ठिकठिकणीं फारच सुंदर रीतीनें केलें आहे. वरून प्रबल झालीशी दिसणारी एखादी उदासीन वृत्ति असून तिच्या मुळाशीं एखादी भलतीच रागद्वेषात्मक वृत्ति असते व जेथ पर्यंत त्या वृत्तिचा उत्तम तऱ्हेनें बाध होत नाहीं तेथ पर्यंत ती उदासीनवृत्ति देखील तशीच कायम राहून परमार्थमार्गात आलस्य उत्पन्न करीत असते व अशा वेळेसच खरी खरी सद्गुरूची आवश्यकता आहे. मनांतील ती गुप्त वृत्ति उदासीनतेचें मुळ आहे हें पूर्ण पणें पटवून देऊन त्या वृत्तीचा रागद्वेषांत अंतर्भाव कसा होतो व त्यापासून पुढें कसे कसें दुष्प रिणाम होत असतात अश्या तऱ्हेचें उच्च वृत्ति निरीक्षणाचें शिक्षण यांत ओत प्रोत भरलें आहे. तसेंच साहजिक उत्पन्न होणाऱ्या वृत्तींचा परिणाम पुढें कोणतीचा कसा होत असतो व तो तसा न होऊं देण्या विषयीं खबरदारी घेण्या करितां चित्ताची परिस्थिती कशी असावी व तशी येण्या करितां आपण कसें वागलें पाहिजे वगैरे गोष्टी ही प्रसंगा नुसार फार चांगल्या सांगितल्या आहेत. मनुष्यांच्या अंतः करणांत

जेव्हां जेव्हां विकाराचा आवेश होत असतो तेव्हां त्याचा अतिरेक असतांनां अमुक विकार माझ्या अंतः करणांत उत्पन्न झाला आहे ही त्याची स्मृति नष्ट होत असते ह्मणजे त्या विकाराहून तो आपल्याला भिन्न समजत नसतो. बहुतेक विकारोत्पत्तिकाळीं ही ही स्मृति नसते परंतु विकार निघून गेल्यावर मात्र मला अमुक विकार उत्पन्न झाला होता अशी स्मृति साधारण विचारी माणसास देखील येत असते ह्मणजे यावेळेस विकार माझ्याहून भिन्न असून तो व मी एक नाहीं असें पक्कें वाटत असते. विकारोत्पत्ति जरी अदृष्टकारणजन्य असली तरी अतिरेक व अतिरेकावधिदीर्घता शुद्धविरोधीसंस्कारांच्या कमतरते-पणामुळेंच असते हा नियम आहे कारण ज्या विकारी माणसांस आपला विकार जावा किंवा कमी व्हावा अशी इच्छा असते त्यांनें त्या विकाराचे वेळेस त्या विकाराच्या विरोधी अशी कांहीं स्मृति ठेवण्याचा अभ्यास केल्यास त्याचा तो विकार कमी होतो हा सार्वत्रिक अनुभव आहे. व दुसरें संस्कारादिकांनीं किंवा कृतसंस्कारजन्यपुण्यमयफलो न्मुख अदृष्टानीं जर विकारांचा बाध होतांच ना तर मग विकारांनां आळा घालावा, ते नाहींसे करावेत इत्यादि प्रकारचा उपदेशच संभवला नसता व असा उपदेश करणारी योगादि साधनशास्त्रें व निर्विकार स्थितींत पर्यवसान मागणारे वेदपुराणादि सर्वच ग्रंथ निरर्थक झाले असते. व आपले विकार दवणें व कमी होणें हें जर कोणत्याही कारणानें शक्यच नसेल तर मग अश्या चिर विकारी माणसांनां सुखाची आशा ती काय असणार ? कारण राग व द्वेष हेंच सर्व विकारांचे मूळ आहें व हे जेथपर्यंत विद्यमान आहेत तेथ पर्यंत सुखाची आशाच करणें व्यर्थ होय. अशा विचारांनें विकार दवणें शक्य नसल्यामुळें सुखाशारूप जीवनतंतु पार तुटून जाऊन उन्नतिचा मार्ग बंद होतो. परंतु असें फारच थोड्याचे होत असेल. आज सुख न मिळालें तरीं अमुक केलें ह्मणजे उद्यां मिळेल असें प्रत्येकास वाटत असते व या

आशेनेंच प्रत्येक मनुष्यास जोर दिला असतो. इच्या जोरावरच मनुष्य वाटेल तशीं धाडसाचीं कामें करीत असतो. ही आशा नाहींशी होण्याची दोनच कारणें आहेत. एकतर इचें साफल्य व दुसरा नैराश्याचा निश्चय. हें दोन्हीही परस्पर अत्यंत विरुद्ध आहेत. तरी दुसरा पक्ष स्वीकारल्यास भविष्यकालीन दुःख आजच आणून घेऊन उद्यांचे मरण आतांवर आणण्यासारखें कसें आहे हें वर दाखविलेंच आहे आतां प्रथम पक्ष घेतल्यास आपली मुख्य आशा काय तिचे साफल्य म्हणजे काय ? ती सफल न होण्यास काय काय प्रतिबंध आहेत, ते कसें कसें दूर करावेंत वगैरे संबंधी विचार पाहणें अत्यंत अवश्य आहे. आपल्यास चिरकाल पर्यंत टिकणारें कधीं न नाश पावेल असें सर्वतोपरी सुख पाहिजे आहे व त्या सुखाच्या प्राप्ती करितां आपले विकारावर आपला ताबा असणें अत्यंत अवश्य आहे व हा ताबा मिळविण्या करितां आपल्या मनोवृत्तीचे उत्तम तऱ्हेनें आपल्याला निरीक्षण करावें लागत असते परंतु विकारा बरोबर वाहून जाण्याची आपली नेहमीची सवंय असल्यामुळें त्या विकारांचें व्हावे तसें परिज्ञान आपल्याला होत नाहीं करितां याठिकाणीं उत्तम अनुभविक व अधिकारी अश्या सत्पुरुषांच्या उपदेशाचीच अवश्यकता आहे व श्रीगुलाबराव महाराजांनीं अश्या तऱ्हेच्याच प्रसंग विशेषीं कांहीं माणसांना व बायांनां पाठविलेले हें पत्ररूप उपदेशामृत आहे. यांत श्रीगुलाबराव महाराजांनीं साधकांच्याहांतून अवश्य व नेहमी होणाऱ्या पण न दिसणाऱ्या अशा पुष्कळश्या चुका दाखवून त्यांच्या दुरुस्तीचे उपायही सांगितले आहेत. साधक नेहमीं एकाच वृत्तिकडे लक्ष देतो व तितक्यांतच दुसरी एकादी वृत्ति उत्पन्न होऊन तिनें साधकास आपले बरोबर वहावत नेलें तरी देखील त्याला फक्त पूर्ववृत्तिनिरोधाचीच स्मृति राहून दुसरीकडे त्याचें दुर्लक्ष कसें होते व अशा वेळेस साधकानें कसें वागलें पाहिजें याचेंही

श्रीमहाराजांनीं या पत्रांत मार्मिक तऱ्हेनें विवेचन केले आहे. कांहीं पत्रात आधुनिकशास्त्रीय वादही फारच मनोरम आहेत.

या पत्रसमूहांत प्रश्नकदंब ह्मणून कांहीं प्रश्नात्मक भाग छापला आहे व त्याचें उत्तर देण्यास सर्व वेदांती लोकांना व योगी लोकांनां आव्हान केलें आहे. याचा आशय असा कीं प्रत्येक वेदांती किंवा योगी ज्याच्या आंगीं आचार्यत्व किंवा अध्यापकत्व घेण्याची योग्यता असेल त्याला या प्रश्न कदंबांतील प्रश्नांचा उलगडा करितांच आला पाहिजे. कारण आज जगामध्यें साधूंच्या ऐवजी भोंदूच जास्त झाले आहेत व अशया भोंदूच्या जाळ्यांत सांपडून, फसून नंतर त्यांचा परित्याग करून दुसरीकडे पुन: आपले कांहीं जमेल तर पाहावें ह्मणून भटकणारी मंडळीं आजकाल फार झालीं आहेत. अशयांची स्थिती बहुतेक "इदंच नास्ति परंचन लाभ्यते" अशीच आहे ह्मणून ज्यांची कोणाची असल्या खोड्यांत पटकून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं वरील प्रश्न कदंबाचा उपयोग केल्यास त्यांनां वर प्रमाणें भटकण्याचा प्रसंग क्वचितच येईल असो. कांहीं पत्रांत प्राचीन व अर्वाचीन पदार्थविज्ञान व रसायनशास्त्रा विषयींचे कांहीं तुलनात्मक लेख आहेत त्यांत महाराजांनीं आपले कडेस पदार्थविज्ञान व रसायनशास्त्रांतील नवीन निघालेले विमान विद्या वगैरेचे शोध भापातराचे मूळ प्रमाणें न्यायांच्या वगैरे ग्रंथांतून काढून देतां येतात असें सोपपत्तिक व सोदाहरण सिद्ध करून खोटें ह्मणणारास खोटें सिद्ध करण्याविषयींही आव्हान केले आहे. प्राचीन पौर्वात्य न्यायादि शास्त्र शिकलेले व अर्वाचीन पदार्थ विज्ञान व रसायनशास्त्र शिकलेले या दोघांसही यांतील माहीती मननीय आहे.

श्रीमहाराजांच्या ग्रंथा संबंधानें जितकी माहिती लिहावी तितकी अपुरीच होणार आहे. त्याचा अनुभव वाचकांनीं प्रत्यक्ष वाचूनच

त्यावा श्रीगुलाबराव महाराजांच्या प्रासादिक ग्रंथांचा महाराष्ट्रीयास होणारा लाभ खरो खरच अमूल्य आहे. हें वाचकांस आम्ही नव्याने सांगावयास नकोच.

श्रीगुलाबराव महाराजांच्या संस्कृत कवितेंतील अशुद्धासंबंधानें कित्येकांची टीका ऐकली आहे परंतु सिद्धांत कौमुदी वरून मला संस्कृत येत नांहीं असें श्रीमहाराजांनीं त्यावर स्वतःच उत्तर दिलें आहे. व त्यांतही केवळ व्याकरणरीत्या किंवा शब्दसौष्ठवरीत्याच जर ग्रंथांचें परीक्षण करावयाचें असेल तर त्यांच्या करीतां अनेक व्युत्पन्न ग्रंथ असतील परंतु श्रीगुलाबराव महाराजांचे ग्रंथ मात्र शब्दकिटाकिटीस फंटाळून जाऊन केवळ अनुभवाचीच अपेक्षा ठेवणाऱ्यां करितां आहेत एवढें आम्हीं येथें म्हणून ठेवतां. व्याकरण रीत्याच जर कसून पाहिलें तर श्रीमच्छांकरभाष्यासुद्धां पुराणा टिकांची ही अशीच स्थिती आढळते. तरी मुमुक्षूंनी इकडे लक्ष न देतां अर्थावर अनुसंधान ठेऊनच आपले काम करून घ्यावें लागते अर्थात जर कांहीं विवाद उत्पन्न असेल तर त्याचा मात्र बरोबर निवाडा होईल यांत संशय नांहीं.

**प्रकाशक**

ता. क. या पत्रातील कांहीं भाग खाजगी असल्यामुळें छापण्यात गाळला आहे

प्रकाशक.



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# पत्र नंबर १.

प्रणम्य करुणामूर्तिमलकावति-वल्लभम् ॥
लिखितं स्वाशयं किंचित् प्रवक्ष्येऽहं यथाधिया ॥ १ ॥

करुणामूर्ति अलकावतिपति श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनां वंदन करून आपल्या मनांतला आशय यथामति लिहितो.

नत्वा पुनः पुनर्धीरां जननीं यमुनाम्मुदा ॥
या मदर्थे तनोत्यस्याम स्वतनौ गिरिजामतिः ॥ २ ॥

जिनें माझ्या विषयीं आपल्या ठिकाणीं अंबाबुद्धि धारण केली आहे अशी धैर्यशालिनी माझी माता यमुना हिला पुन्हा आनंदानें नमस्कार करतो.

मन्येत यदि पुत्रं माम् रुक्मिणीचेन्नमाम्यहम् ॥
चिरं जीवन्तु मत्पुत्रा विठ्ठलाद्या महाशयाः ॥ ३ ॥

तुह्मी सांगितल्या वरून सौ० रुक्मिणी मला पुत्र मानीत असेल तर तिला ही माझा नमस्कार असो. व माझेही विठ्ठलादि महाशय पुत्र चिरजीवी होवोत.

भवद्भिर्याचिता यासीत् मंगेशस्य सुधारणा ॥
सा तस्य मातृसेवायाः करणेन भविष्यति ॥ ४ ॥

आपण चिरं० मंगेशाची सुधारणा विचारली आहे. तर ती त्यानीं मातृसेवा केल्यास होईल.

धर्मोऽयमेव पुत्राणाम् मातृपितृ-निषेवणम् ॥
स्वधर्मे निधनं श्रेय एवमाहमम प्रियः ॥ ५ ॥

आईबापांची सेवा करणें हाच पुत्रांचा मुख्यधर्म होय. आपला धर्म आचरण करीत असतांनां मरण जरी आलें तरी तें कल्याणकारकच आहे, असें भगवंतांनीं प्रत्यक्ष गीतेंत सांगितलें आहे.

प्रक्षाल्य मातृपादौतु तज्जलं मूर्ध्नि धारयेत् ॥
पूजयेज्जठरं पीत्वा पूजयेद्भक्ति-योगतः ॥ ६ ॥

आईचे पाय धुवून तें पाणी आपल्या मस्तकावर धारण करावें व भक्तिभावानें त्या आईच्या चरणाची पूजा करावी.

यदा माता तु क्रुद्धास्यात्सान्त्वयेन्नम्रभाषणैः ॥
मातैवैका गतिर्नान्यत् मातृदेवो भव श्रुतेः ॥ ७ ॥

आई रागावली असतां आपल्या नम्र व सविनय भाषणानें तिचें सांत्वन करावें. आईवांचून बाळकाला अन्य गति नाहीं. माता हीच तुझें परम दैवत मान. अशी वेदाची आज्ञा आहे.

नवमासं कृतं पूर्णमुदरे पालनं यया ॥
ताम् ये न नमस्यन्ति जन्तवस्ते न वै सुताः ॥ ८ ॥

ज्या आईनें पूर्ण नऊ महिने पर्यंत आपल्या पोटांत वागवून पालन केलें त्या आईप्रत जे नमून राहत नाहींत ते पुत्र नसून जीवंत कीटकच होत.

मातृविरोधिनो मूढा बंधु-भार्या-सुतादयः ॥
मातरं परि निंदंति तांस्त्यजेदन्त्यजान्यथा ॥ ९ ॥

आपल्या आईशीं विरोध करणारे अविचारी मूर्ख ते मग आपले भाऊ असोत बायका असोत अगर मुलें असोत जर ते आईची निंदा करतील तर अंत्यजा प्रमाणें त्यांचा त्याग करावा.

संसारे पतिता पुत्रा मातृ-पितृ-विदूषकाः ॥
कर्तयेच्छस्त्रधाराभिस्तान्मूढान्नरपालकैः ॥ १० ॥

आईबापांचा द्वेष करणारे असे जर कोणी व्यवहारांत असतील तर राजांनीं त्या मूर्खांनां तीक्ष्ण खड्गांनीं कापून काढलें पाहिजे.

मंगेशोऽयं मातृसेवां भक्त्या यदि करिष्यति ॥
भविष्यति महात्माऽयं सत्यं स्याद्वचनं मम ॥ ११ ॥

हा मंगेश परम प्रेमपूर्वक जर मातृसेवा करील तर हा उत्तम महात्मा होईल हें माझें सत्यवचन आहे.

मातृसेवां विना तस्य सम्यङ्मति-वितारणे ॥
अस्माकं नच सामर्थ्यं न वा कस्यापि वर्तते ॥ १२ ॥

मातृसेवेवांचून याची बुद्धि सरळ व शुद्ध करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं; येवढेंच नव्हे तर कोणांतच ( ब्रह्मदेवांतही ) नाहीं.

मातुरेवानुकूल्येन पालनीया सुतादयः ॥
आहारं मातरं दत्वा भोजयेदनुशांतधीः ॥ १३ ॥

पुत्रादिकांचें देखील पालन आईच्याच अनुकूलतेनें केलें पाहिजे. आईला प्रथम ( साखर किंवा कांहींतरी ) आहार देऊन नंतर शांत चित्तानें आपण भोजन करावें.

सेवया मातृ-पादानां पुंडरीको द्विजोत्तमः ॥
आनीतवान्गृहे देवं इति लोके सुविश्रुतम् ॥ १४ ॥

मातृ-चरणाच्या सेवेनेंच पुंडरीक नांवाच्या द्विजश्रेष्ठानें देवाला देखील आपल्या घरीं आणलें अशी कथा इतिहासांत प्रसिद्धच आहे.

तस्मात्सर्व-प्रयत्नेन सेवनीया जनिप्रदा ॥
यावत्तीव्रा मुमुक्षा न स्वधर्मस्तावदाचरेत् ॥ १५ ॥

म्हणून हरएक प्रयत्नानें जन्मदात्या आईची सेवा केली पाहिजे. जेथपर्यंत तीव्र मुमुक्षा उत्पन्न होत नाहीं तेथपर्यंत स्वधर्माचरण केलेंच पाहिजे.

यदि मन्मंडलिस्थौ स्थः पाल्यतां वचनं मम ॥
ज्ञानेश्वराज्ञया सर्वं लिखितमेव युक्तितः ॥ १६ ॥

ज्या अर्थीं आपण ( दोघे ) माझ्या मंडळींत आहांत त्या अर्थीं माझें वचन आपल्यास ऐकिलें पाहिजे. हें सर्व मी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आज्ञेनेच लिहिलेलें असून यांत स्वतःचें मुळींच नाहीं.

मंगेश नीलकंठार्थं उपदेशोऽयमेषहि ॥
मातुरर्थं त्वदीयार्थं ज्ञानं किंचित्समुच्यते ॥ १७ ॥

मंगेश व नीलकंठ यांच्या करितां हाच उपदेश आहे; आतां आई करतां ( म्हणजे तुमच्या व माझ्या आई करतां ) व तुझ्या करितां थोडेंसें ज्ञान सांगतो:—

दुःखं स्वभावतो द्वेष्यं देहसंगाद्धि जायते ॥
गुरुशास्त्र-प्रयुक्तेन ब्रह्मज्ञानेन नश्यति ॥ १८ ॥

दुःख हें आपल्यास स्वभावतःच अप्रिय आहे व तें शरीराशीं

आपला अत्यंत संग असल्यामुळेंच उत्पन्न होतें. या दु:खाचा शास्त्राच्या समालोचनानें व गुरूपदेशामृतानें झालेल्या ब्रह्मज्ञानानें नाश होतो.

ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या इत्येवं चिंतयेत्सदा ॥
देहबुद्धिः सदा त्याज्या सर्वनाशेप्युपस्थिते ॥ १९ ॥

एक ब्रह्मच सत्य आहे जगदादि इतर सर्व खोटें आहे असेंच निरंतर चिंतन करावें. व ज्या अर्थी जगदादि सर्वच खोटें आहे, त्या अर्थी देहबुद्धि देखील खोटी आहे म्हणून सर्व नाश होण्याचा जरी प्रसंग आला तरी ती सोडलीच पाहिजे.

सांख्यं योगश्च वेदान्तं साधनानि भवन्ति हि ॥
तत्र सांख्यं विवेकाय योगो वृत्ति-निरोधने ॥ २० ॥

सांख्य योग व वेदान्त अशीं तीन साधनें आहेत त्या पैकीं सांख्यशास्त्र विचार करण्या करितां व योगशास्त्र आपल्या मनांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या वासनांचा रोध करण्याकरितां आहे.

वेदान्तेन परंब्रह्म विश्वं पश्येदभेदतः ॥
आत्माऽलिप्तो जगन्माया सांख्यमेतदुदीरितम् ॥ २१ ॥

वेदान्तानें परब्रह्म व इतर सर्व विश्व यांच्यात अभेद पहावा. आत्मा सर्व विकाराहून रहित आहे व हें सर्व जगत् मायामय आहे हें सांख्यशास्त्राचें रहस्य आहे.

अहंतां ममतां त्यक्त्वा योगो ध्यानं परात्मनः ॥
अधिष्ठानं विना भ्रांतिर्नैति वेदान्त भाषितम् ॥ २२ ॥

आपलेपणा व माझेपणा सोडून एकाग्रतेनें परमेश्वराचें ध्यान करणें हेंच योगाचें रहस्य आहे. अधिष्ठानाच्या ज्ञानावांचून भ्रांतिनाश होत नाहीं असें वेदान्तांत सांगितलें आहे.

विश्वं सर्वं भ्रांतिरूपमधिष्ठाने प्रकल्पितम् ॥
रज्जौ यथा भ्रमात्सर्पः सूर्येऽपि मरीचिका ॥ २३ ॥

हें सर्व जगदादि विश्व अधिष्ठानावर [ ब्रह्मावर ] भ्रमानें कल्पिलेलें आहे. उदाहरणार्थ रज्जुवर सर्पभ्रम अथवा उन्हावर मृगजळाचा आरोप कल्पित असतो त्या प्रमाणें.

रज्जुज्ञानाद्यथा सर्पो निवृत्तिमुपगच्छति ॥
ब्रह्मज्ञानात्तथा माया निवृत्तिमधिगच्छति ॥ २४ ॥

ज्या प्रमाणें दोरीचें ज्ञान झाल्याबरोबर कल्पनाजनित सर्पाचा नाश होतो त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान झालें असतां या मायेचाही शेवट होतो.

त्याज्यः श्रुतिविरुद्धोंशो पूर्वयोस्सांख्ययोगयोः ॥
वेदान्ते न विरोधोऽस्ति तस्मात्तद्धि समाश्रयेत् ॥ २५ ॥

पूर्वी सांगितलेले सांख्य व योग यांच्यांत जो श्रुतिविरुद्ध भाग असेल तो टाकून द्यावा. व वेदान्ताचाच आश्रय करावा. कारण त्याचा कोठेंच विरोध नाहीं.

श्रीमज्ज्ञानेश्वरं देवं दयार्द्रं दीनबांधवम् ॥
नत्वा साष्टांगयोगेन ह्यलमेष प्रविस्तरः ॥ २६ ॥

दीनबांधव करुणार्णव श्रीमत्सद्गुरुनाथ ज्ञानेश्वरमहाराज यांनां साष्टांग प्रणिपात करून हा पत्रविस्तार पूर्ण असो. पूर्वी जसें संसार सोडून मी तुमच्याच जवळ राहतों असें लक्ष्मणानें किंवा कोणी मला म्हटलें होतें त्याप्रमाणेंच बळवंतरावचीही स्थिति दिसते. कांहीं झालें तरी कृष्णार्पण. पण हें माझ्या मतानें बरें नाहीं. संसाराला कंटाळून किंवा एखाद्या विकाराच्या झपाट्यांत घर सोडून निघण्या इतका परमार्थ सोपा नव्हे. तो करण्याकरितां संसाराच्या ठिकाणीं अलंबुद्धीच झाली पाहिजे. नाहींतर "वनांत राहुनी घराचें चिंतन । तेथें नारायण नाहीं नाहीं ॥" अशी स्थिति होण्याचा संभव आहे. बळवंतरावचें उद्दीरशांतिसंपन्न पत्र पाहून मी ही गोष्ट आपणाला कळविली आहे. त्याला काय लिहावें हेंच मला सुचत नाहीं. लक्ष्मण वगैरेलाही हें माझें पत्र समजावून सांगावें 'ज्यांचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें संसारासी त्यागूं नये ॥' (तुकाराममहाराज.) चित्तशुद्धि झाल्यावांचून परमार्थ म्हणजे वटवट करणेंच होय. तात म्हणतातः— 'तोंड भरो कां विचारा । आणि अंतरीं विषयांसी थारा । तरी कोटिवर्षे धनुर्धरा । न पविजेचि मातें ॥' भगवान् वसिष्ठ म्हणतातः— 'सांसारिक क्रियासक्तं ब्रह्मज्ञोऽस्मीति वादिनम् । कर्मब्रह्मोभयोर्भ्रष्टं तं त्यजेदंत्यजं यथा ॥' आणि 'न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।'

असें कान्तवचन ही आहे. ( पुढें काहीं स्त्रीपुरुषचातुर्याविषयीं ओव्या लिहिल्या आहेत त्या सूक्तिरत्नावलि द्वितीय यष्टि उत्तरार्ध पत्र नंबर २० पान ४८ मध्यें पाहणें. )

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्र नंबर २.

प्रपद्य परमानंदं श्रीमत् ज्ञानेश्वराभिधम् ॥
कुर्वेहं लेखनं किंचित् तत्प्रसादात् यथाधिया ॥ १ ॥

श्रीज्ञानेश्वरसंज्ञक परमानंद अशा श्रीगुरूस नमस्कार करून त्यांच्या प्रसादानें यथामती कांहीं लिहितों.

जननीति समाहूतमुमाभावनया मुतम् ॥
उत्संगे ग्रहणायाशु वंदे तद्यामुनं पदम् ॥ २ ॥

जिला मी उमा समजून आई आई म्हणून हाका मारीत होतों त्या यमुना जननीच्या चरणकमळाला मला लवकर उचलून घ्यावें म्हणून नमस्कार करतों.

अपशब्दभयान्नाहं त्वां सुतं मंतु मुत्सहे ॥
मातरं परिमंस्यामीत्येवं रुक्मिणि भाषणम् ॥ ३ ॥
मात्रा दुर्गाख्यया प्रोक्तं तत्सर्वं संश्रुतं मया ॥
यथेच्छा स्यात्तया तस्याः कल्याणं भवतु द्रुतम् ॥ ४ ॥

मी रुक्माबाईला आपल्या विषयीं पुत्र भावना ठेवण्यास सांगितलें होतें; पण त्या म्हणाल्या कीं माझ्या तोंडातून एकादे वेळीं शिव्या निघण्याचा संभव असल्यामुळें मी महाराजांना माता समजतें पुत्र मानूं इच्छित नाहीं. असें दुर्गाआईनें सांगितलें तें सर्व समजलें.

असो त्यांची जशी भक्ती असेल तीच त्यांना लवकर कल्याणप्रद होवो.

चिरंजीवन्तु मत्पुत्रा विठ्ठलाद्या महाशयाः ॥
यथाधिकार योगेन ध्यायन्तु परमेश्वरम् ॥ ५ ॥

माझे विठ्ठलादि महाशय पुत्र चिरजीवी होवोत व त्यांच्या कडून यथाधिकार ईश्वराचें चिंतन घडो.

मदेतत्प्रार्थनं तात भवन्मातरमुच्यताम् ॥
कर्तव्या भावना शुद्धा मयि नंदनरूपिणी ॥ ६ ॥

हे तात! आपण आपल्या आईला ( अन्नपूर्णा आईला ) माझी प्रार्थना सांगावी कीं आपण माझे ठिकाणीं निव्वळ पुत्रभावना करावी.

" या देवी सर्व भूतेषु मातृरूपेण संस्थिता " ॥
इति सप्तशतीवाक्यात् सर्वमंबामयं जगत् ॥ ७ ॥

" जी देवी सर्व भूतांचे ठिकाणीं आईरूपानें वास करीत आहे" या सप्तशतींतील वाक्यावरून सर्व जगत् मला अंबारूप असल्यामुळें कोणतीही स्त्री अंबारूपच वाटते.

गद्य:— सर्वांनाच पुत्रभावना ठेवण्यास सांगण्याचें काय रहस्य आहे? या प्रश्नाचें उत्तर भगवान् रामकृष्ण परमहंस कोणत्याही स्त्रीला अंबा समजून जे उद्गार काढीत असत त्यांत आहे. नीच पुरुष व सत्पुरुष हे दोघेही स्त्रियांना पूज्य मानतात. पण नीच पुरुष स्त्रियांच्या सौंदर्यामुळें व आपल्या भोगार्थ मान देतात; व सत्पुरुष अंबा समजून मान देतात. याविषयीं पाश्चिमात्य लोकांनां उद्देशून व आपल्या गुरूला वंदन करून स्वामी विवेकानंदानें जे उद्गार काढले आहेत ते येथें देतो:-

We hear in the west about worshipping woman, but this usually for youth and beauty. This man ( रामकृष्ण परमहंस ) meant by worshipping woman, that to him every woman's face was that of Blissful mother and nothing but that. I ( विवेकानंद ) myself have seen this man standing before those women whom society would not touch, and falling at their feet bathed in tears, saying " Mother, in one form thou art in the street and in another form thou art the universe. I salute thee; mother I salute thee. "

भाषांतरः– युरोपीय देशांत स्त्रियांनां पूज्य मानतात, असें आपण नेहमीं ऐकत असतो. पण हें पूजन ह्मणजे नेहमीं तारुण्याचें व सौंदर्याचेंच असते. परंतु ह्या पुरूषाला ( भगवान रामकृष्ण परमहंसाला ) स्त्री पाहिल्याबरोबर ती आपली अखंड सुखदात्री अंबाच आहे, ह्याशिवाय दुसरें कांहींच वाटत नसे. ज्यांनां लोक स्पर्श ही करीत नसत, अशा स्त्रियांच्यापुढें उभे राहून त्यांच्या पाया पडतांनां, व डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहात आहेत, अशा स्थितींत , हे अंबे, जननी! ह्या रूपानें तूं रस्त्यांत दिसते आहेस; परंतु दुसऱ्या रूपानें, तूंच विश्व झाली आहेस. हे आईग! मी तुला नमस्कार करतो, मी तुला नमस्कार करतो! असें ह्मणतांना ह्या सत्पुरुषाला मी स्वत: पाहिलें आहे. हे उद्गार स्वामी विवेकानंदांनीं इंग्लिश मध्यें ' My Master ' नामक ग्रंथांत लिहिलें आहेत. अशा प्रकारें कोणतीही स्त्री भगवान रामकृष्ण परमहंसाला अंबारूप वाटत असे. पुन: ते ह्मणत असत:–' One day is gone, mother and thou dost not come आई! एक दिवस गेला, अजून तूं येत नाहींस.' यावरून त्यांची भक्ति दिसून येते. " One day of my short life has gone and I have not known the truth. " या माझ्या क्षणिक आयुष्यांतील एक दिवस व्यर्थ गेला पण अजून मला सत्य समजलें नाहीं. ' यावरून त्यांची जिज्ञासा दिसून येते. या पत्रांत वास्तविक निरभिमानपूर्वक परंतु अभिमानाभासाचीं कांहीं वाक्यें आहेत खरी; व त्यांवरून इतर लोकांनां मज विषयीं शंका येणे साहजिक आहे हें ही खरें. परंतु दीनापुढें अभिमान धरावा, व समर्थांपुढें धरूं नये. या प्राचीन वचना वरून व ' तुका ह्मणे आह्मां भय काय यांचें । मारूं ब्रह्मयाचें तोंडावरी' ॥ या तुकाराम महाराजांच्या अभिमान प्रचुर वाक्यावरून वरील शंकेचें निराकरण होतें.

कथमेकोहि सर्वासां पुत्रो भवितु मर्हति? ॥
नैषा शंका प्रकर्त्तव्या जगतोभावरूपत: ॥ ८ ॥

परंतु आई कदाचित् अशी शंका करतील कीं एकच पुरूष सर्व स्त्रियांचा पुत्र कसा होवूं शकतो पण ही शंका करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण सर्व जगतच भावनारूप आहे.

परब्रह्मण्यधिष्ठाने मायया गुणयुक्तया ॥
कल्पयंत्यऽबुधाऽत्मानो विश्वं सदसदात्मकं ॥ ९ ॥

परब्रह्म एकच असतां त्रिगुणात्मक मायेमध्यें फसून मूर्खलोक त्या ब्रह्माचे ठिकाणीं जगाची कल्पना करितात. ह्या जगाला खरें ह्मणतां येत नाहीं, व खोटेंही ह्मणतां येत नाहीं. कारण खरें ह्मटल्यास त्याचा नाश होऊं नये, आणि तो तर आपण पाहातों, व ज्ञानानेंही त्याचा बाध होतो. बरें खोटें म्हणावें तर सशाचें शृंग जसें कधींच दिसत नाहीं तसें जगही कधींच न दिसलें पाहिजे. परंतु दिसतें. म्हणून हें जग खऱ्या खोट्याहून निराळें असें अनिर्वचनीय आहे.

भावनातीव्रसंवेगादनृतमृततामियात् ।
संकल्पमात्रमेवैतत्प्रतिजीवं विभिद्यते ॥ १० ॥

तसें हें जग कल्पित असून ही आपल्याला जें खरें वाटतें याचें कारण असें आहे कीं जसी जसी आपली भावना दृढ होत जाते, तसी तसी खोटी ही वस्तू खरी भासते. उदाहरणार्थः-- कांटा रुतला असतां मला सर्पदंश झाला, अशा भावनेनें विष चढून पुष्कळ लोक मरण पावतात. ( सर्पाच्या खोट्या भीतीनें मिरची तिखट लागली नाहीं असा अनुभव तुमच्या यमुनाचा ही आहे. महामारीच्या रोगांत भीतीनें पुष्कळ लोक मरतात; व खरा सर्पदंश होऊन ही हा कांटा आहे अशी भावना झाल्यास सर्पाचें विष चढत नाहीं. अशा प्रकारची गोष्ट तर हल्लीं घडली आहे. ती केरळकोकिळांत आली होती. ह्या विषयीं एकनाथ महाराज असें ह्मणतातः--- " आपुलेनि हातें आपण । पठाडे खोविला दाभण । रात्रीं रूपतांचि तें जाण । सर्पभयें प्राण सांडिला ॥ त्यासी सर्प नाहीं लागला । मा विखें केवीं तो घावरला । परी निजशंकें स्वयें निमाला । तैसा काळ लागला जनासी ॥ एकासी सर्प झोंवला पाठीसी। काय रूतलें ह्मणे सांग यासी । तो ह्मणे कांटी लागली कैसी। ते म्यां अनायासी उपडिली ॥ तो नव्हे सर्पा साशंक । याल्रागीं त्यासी न चढेचि विख । निज व्यापारी देख । यथासुख वर्तता" ॥ एक० भा० अ०२३ श्लोक ४३ ओंवी ९६ ते ९९

सारांशः--- हें सगळें जगत् भावनाकल्पित असल्यामुळें वस्तु

एकच असून प्रत्येकाची निरनिराळी असते. उदाहरणार्थः— एका आईचे पोटीं तिघे पुत्र जन्मले आहेत; व त्यांत दोघांचा तंटा लागला आहे आतां राहिलेला तिसरा भाऊ ज्याला साह्य करीत नाहीं त्याला तो शत्रु वाटतो; व ज्याला साह्य करतो त्याला तो मित्र वाटतो. मित्रपणा व शत्रुपणा हे दोन्ही धर्म आंधारा उजेडाप्रमाणें विरोधी असून एकाच माणसाचे ठिकाणीं ते ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें राहिले आहेत. कर्ण कुंतीचाच पुत्र असून पांडव त्याला शत्रु समजत होते व कौरवांकडे मिळाल्यामुळें कौरव त्याला मित्र समजत होते अमुक आपला पति आहे, किंवा अमुक आपली स्त्री आहे असें मानण्याला भावनेशिवाय दुसरा काय आधार आहे? कारण लग्न झालें असतां दोघांनांही शारीरिक चिन्ह कोणते उत्पन्न झालें? अशीच गोष्ट मातापितरांची व भाऊबहिणी वगैरेची आहे. सारांशः— सारें जगत् आपआपल्या भावने प्रमाणें निरनिराळें असतें.

जीवानेकत्ववादेतु प्रतिजीवभिदा मता ॥
एकजीवत्ववादेतु जीवाभासभिदा मता ॥ ११ ॥

वेदान्तांत ज्या ठिकाणीं जीवबहुत्व सांगितलें आहे त्या ठिकाणीं त्या जीवांच्या भावनेनें एकच वस्तु निरनिराळी असते असें सांगितलें आहे. व जेथें वेदान्तांत जीव एक आहे असें म्हटलें आहे, तेथें अंतःकरणामध्यें एका जीवाचींच पुष्कळ प्रतिबिंबें होऊन त्या प्रतिबिंबांच्या भावनेप्रमाणें एकच वस्तु निरनिराळी सांगितली आहे. उदाहरणार्थः— स्वप्नामध्यें आपण एकच असून आपल्या कल्पनेनें अनेकरूप होतो; व शत्रुमित्र आपल्या कल्पनेनेंच निरनिराळे उत्पन्न करतों. तात्पर्यः— हें सगळें जगत् जशी ज्याची भावना असेल तसेंच त्याला दिसतें. याविषयीं हरिविजयांत एक कथा आहे. धर्माच्या घरीं यज्ञ चालला असतां धर्माच्या येथील पैसा पाहून दुर्योधनाला फार वाईट वाटलें. तेव्हां दुर्योधनानें श्रीकृष्णाला असा प्रश्न केला कीं, देवा तूं धर्माकडे कृपादृष्टीनें व मजकडे वाईट दृष्टीनें कां पहातोस? यावर श्रीकृष्णानें कांहीं उत्तर न देतां दुर्योधनाला सांगितलें, बा दुर्योधना येथें जमलेल्या ब्राह्मण समाजांतून एक चांगला ब्राह्मण बोलावून आण. तेव्हां दुर्योधन

ह्मणाला:- श्रीकृष्णा मला येथें कोणीच चांगला ब्राम्हण दिसत नाहीं. नंतर श्रीकृष्णानें धर्मराजाला बोलावून सांगितलें, बा! धर्मा या ब्राह्मण समाजांतून एक वाईट ब्राह्मण निवडून आण. तेव्हां धर्म ह्मणाले, नारायणा मला या ब्रह्मवृंदांत वाईट ब्राह्मण कोणीच दिसत नाहीं. यावर देव म्हणाले, दुर्योधना जशी ज्याची भावना असते तसा मी त्याला असतों. तातही ह्मणतात:— ' तैसा समस्ता या भजना । मी साक्षीभूत पैं अर्जुना । येथ प्रतिफळे भावना । आपुलाली ॥' ज्ञानेश्वरी.

सत्तात्रयविवादेपीश्वरसंरचितं जगत् ॥
जीवमानससंकल्पात् भोगरूपेण भिद्यते ॥ १२ ॥

जे वेदान्ती असून तीन सत्ता मानतात त्यांच्या मतें हें जग आपल्या मनानें कल्पिलेलें नसून ईश्वरनिर्मित आहे असें सांगितलें आहे खरें, परंतु त्यांच्याही मतें जगापासून होणारीं सुखदु:खें आपल्याच भावनेपासून होतात असें आहे. उदाहरणार्थ: एकाच स्त्रीपासून पतिला सुख होतें व सवतीला दु:ख होतें. आतां सुख व दु:ख परस्पर विरोधी असतां तीं एकाच वस्तूपासून कशीं उत्पन्न होतात? सारांश— जगांत भावनाच मुख्य आहे हें सत्तात्रयवाद्यांच्याही मतें सिद्ध झालें.

अत: सर्वं ब्रह्मरूपे भावनापरिकल्पितम् ॥
दृष्टिसृष्टिविवादेन द्रुतं सिध्यति नान्यथा ॥ १३ ॥

म्हणून एका परब्रह्माचे ठिकाणीं हें जगत् भावनेनें कल्पित आहे, हें प्रत्यक्ष सिद्ध असल्यामुळें तीन सत्ता मानणाऱ्या वेदान्त्यांच्या मतापेक्षां दृष्टिसृष्टिवादच सम्यक् आहे. कारण त्यावांचून भावनामय जगत् आहे हें दुसऱ्या रीतीनें चांगलें समजत नाहीं.

दृष्टिसृष्टिविवादोऽयं सर्ववेदान्तसंमत: ॥
श्रुत्या युक्त्या स्वानुभूत्या ज्ञात्वा त्वं सुखिनी भव ॥ १४ ॥

सर्व वेदान्तामध्यें हा दृष्टिसृष्टिवादच श्रेष्ठ आहे; व योगवासिष्ठादि ग्रंथांत तोच उत्तम सांगितला आहे. या विषयीं वासिष्ठांत एक विपश्चितआख्यान आहे. त्या विपश्चितानें अविद्या केवढी आहे हें पाहण्याकरितां आपल्या भावनेनें अग्निपासून चार शरीरें निर्माण करून चार दिशेनें शोध केला. [ व तुमच्या येथें बळवंतरावा-

ला मी दोन रूपांनीं प्रत्यक्ष दर्शन दिल्याचें आपणास आठवत असेलच.]
परंतु असें चमत्कारावर दृष्टि देणें उपयोगाचें नाहीं. कारण चमत्कारांत सांपडलेला मनुष्य ब्रह्मवस्तूला सोडून आश्चर्यानें वाहत जातो. असो. सर्व जगत् भावनामय आहे हें आपल्या तर्कानें, वेदवाक्यानें व अनुभवानें जाणून सुखरूप हो. आतां भावनामय जर जगत् आहे, तर वाईट भावना करून दुःखांत कां पडावें? चांगली भावना करणेंच श्रेयस्कर आहे.

भावोयं त्रिविधः प्रोक्तो रुद्रयामलतंत्रके ।
दिव्यो भावः पशोर्भावो नरभावस्तथैवच ॥ १५ ॥

भावना तीन प्रकारच्या आहेत असें रुद्रयामलतंत्रांत सांगितलें आहे. त्या दिव्य भावना नरभावना व पशुभावना ह्या होत.

पशोर्भावात्पतंत्याशु नरके मूढबुद्धयः ।
देहं ब्रह्म मन्यमाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १६ ॥

पैकीं पशुभावना म्हणजे आपल्या देहाकरितांच सर्व कांहीं आहे; मेल्यावर आत्मा वगैरे कांहीं नाहीं. म्हणून धर्माधर्मात कांहीं अर्थ नाहीं. या करितां खावें प्यावें व चैन करावी, मग दुसऱ्याला आपल्यापासून कितीही त्रास झाला तरी हरकत नाहीं. अशा मताचे राक्षसी लोक पशुभावनेचे समजावेत. ते मूर्ख लवकरच नरकांत जाऊन पडतात.

स्वर्मर्त्यं नरभावेन भुंजन्ते कर्मवादिनः ।
दिव्यभावात् भवंत्याशु ह्यारूढा योगपत्तने ॥ १७ ॥

दुसरी नरभावना, हिच्या योगानें मनुष्य पुण्यकर्मे करूं लागतों. व स्वर्गांत जाऊन पुण्य संपलें कीं खालीं येतो. व तिसरी जी दिव्यभावना आहे ती साधूंच्या ठिकाणीं व ईश्वराचे ठिकाणीं करितां येते. कारण साधू व परमेश्वर ह्यांच्यामध्यें भेद नाहीं असें 'तस्मिन्स्तज्जने भेदाभावात्' ह्या नारदसूत्रांत सांगितलें आहे. ही दिव्यभावना केली असतां जीव ब्रह्मविद्येच्या राज्यावर लवकर वसतात.

यावद्बुद्धिर्विमग्नास्यात् संसारे बांधवान्विते ।
तावन्न दिव्यभावोऽतो ज्ञानिनं भावयेत्सुतम् ॥ १८ ॥

मुलें, सुना, भाऊ इत्यादिकांनीं पूर्ण संसारामध्यें जोंपर्यंत चित्त गुंतलें असतें तोंपर्यंत दिव्यभावना करतां येत नाहीं. म्हणून ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणीं पुत्र भावना करावी. ह्मणजे दिव्यभावना आपो-आप साधते. ज्याप्रमाणें भ्रमराचें ध्यान करून भ्रमरच होतो.

असन्तः पातयंत्याशु तनुजा नरकार्णवे ।
सत्पुत्रस्य स्वर्गदत्वात् ज्ञानिनं भावयेत् सुतम् ॥ १९ ॥

आतां कुपुत्र जे असतात ते आईला लवकर नरकांत पाडतात. आणि सुपुत्र जे असतात ते आईला श्राद्धादि कर्मानीं स्वर्गांत पाठवितात. परंतु स्वर्गांतूनही पुण्य संपलें ह्मणजे पुनः खालीं पडावें लागतें. ' ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ' भगवद्गीता अ० ९ श्लोक १८. असें भगवंतानीं म्हटलें आहे. म्हणून संसारांतील पुत्र कुपुत्र असोत किंवा सुपुत्र असोत मोक्ष देणारे होत नाहींत. येवढ्याकरितां ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं पुत्रभावना करावी.

' आत्मावै पुत्र नामासी ' त्येवं निगमसंमतिः ॥
आत्मज्ञाता ब्रह्मनिष्ठस्ततस्तं भावयेत् सुतम् ॥ २० ॥

' पुत्र हा आत्माच आहे ' असें श्रुति ह्मणते म्हणून आत्म्याचें ज्ञान ज्याला झालें आहे अशा ब्रह्मनिष्ठालाच पुत्र समजावें.

एकोऽपि भावनाभेदात्सर्वासां गर्भतामियात् ॥
एकोऽहं पंचधा जातो इति वाक्यात्समुह्यताम् ॥ २१ ॥

म्हणून वर सांगितलेल्या विपश्चिताप्रमाणें एकही पुरुष भावना-बलानें सर्वांच्या गर्भांत जाऊं शकतो. परंतु भावना मात्र तीव्र पाहिजे. ' मी एकच पांच प्रकारचा झालों आहें ' या गणेश पुराणांतील वाक्यावरून हें युक्तीनें समजून घ्यावें.

प्रतिजीवविभिन्नत्वात्सृष्टेःशंकामपाकुरु ॥
मृत्युक्षणे रक्षणाय सुतं मामाशु भावय ॥ २२ ॥

आतां अशी शंका येईल कीं जीव असून ईश्वरधर्म सांगणें ह्मणजे आसुरकोटींतच जाणें होय. कारण देहबुद्धि ठेवून आपल्याला ईश्वर मानणाऱ्या पुरुषांचा भगवंतानें निषेध केला आहे.

ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥

भगवद्गीता.

पण ही शंका बरोबर नाहीं. कारण जीवानें ईश्वरधर्म आंगीं घेऊन संसार वाढविला असतां तो आसुर होतो, पण परमार्थ वाढविला असतां जीवानें आपल्या ठिकाणीं ईश्वरधर्म घेऊन सांगण्यास प्रत्यवाय नाहीं. महात्म्या वामदेवाला गर्भांतच ज्ञान झालें; तेव्हां त्यानें आपल्या ठिकाणीं ईश्वरधर्म घेऊन सर्वांस बोध केला अशी कथा वेदांत आहे. ह्याप्रमाणें कोणीही ईश्वरधर्म घेऊन परमार्थ वाढविण्यास हरकत नाहीं. असें ब्रह्मसूत्रकार भगवान व्यास म्हणतात:— ' शास्त्रदृष्ट्यातूपदेशो वामदेववत् । ' ब्रह्ममीमांसा अ० १ पाद १ सूत्र ३०.

सूत्रार्थ:— वामदेवाप्रमाणें शास्त्रदृष्टीनें उपदेश होतो.

' आतां तुह्माला असें वाटेल कीं मला ज्ञानाचा अभिमान आहे परंतु आपल्या जवळ दोन पैसे असल्यास आहे म्हणणें अभिमान नव्हे, तर नसून आहे म्हणण्यांत अभिमान आहे. दुसरें, चांगला अभिमान असणें ह्याची तातांनीं ( ज्ञानेश्वरमहाराजांनीं ) प्रशंसा केली आहे. ' जे अभिमान वाहती आंगीं । आम्ही हरीचे भूपावया लागीं ' परंतु ही सृष्टि प्रत्येकाला आपआपल्या भावनेप्रमाणें निरनिराळी आहे असें समजून आलेल्या संशयाचा नाश करा. व मरणाचे वेळीं सांभाळ करण्याकरितां मला आपण पुत्र समजावें. परंतु केवळ व्यावहारिक पुत्राप्रमाणें न समजतां माहात्म्यज्ञानानें ईश्वरभावनाही जागृत ठेवावी. कारण वसुदेव देवकींनीं श्रीकृष्णाचे ठिकाणीं पुत्रभावना व ब्रह्मभावना ठेवल्या होत्या. या विषयीं भागवतांतील दोन श्लोक पुढें लिहितों.

भगवानपि विश्वात्मा भक्तानामभयंकरः ॥
आविवेशांशभागेन मन आनकदुंदुभेः ॥
नतेऽभवस्येश भवस्य कारणं विना विनोदं बत तर्कयामहे ।
भवो निरोधः स्थितिरप्यविद्यया कृतायतस्त्वय्यभयाश्रयात्मनि ॥

भागवत.

भूतांवर अनुग्रह करणारा सर्वांचा आत्मा परमेश्वरही वसुदेवाच्या मनांत ब्रह्मानंदकिरणरूपानें प्रगट झाला. हा श्लोक भागवतांतील आहे. व यावर टीका करतांनां भगवान् श्रीधर म्हणतात:— जीवानामिव न धातुसंबंध इत्यर्थः ' म्हणजे परमात्मा जीवाप्रमाणें गर्भांत जन्म घेत नसतो. तर भावनेनेंच त्याला पुत्र समजावें लागतें. मग देवकीला आठवा गर्भ राहिला इत्यादिकांचा काय अर्थ ? असा संशय येण्याचा संभव आहे परंतु त्याच अध्यायांत पुढें देवांनीं स्तुति करतांनां असें म्हटलें आहे कीं— हे भगवन् ! तूं असंसारी आहेस. तुझे ठिकाणीं हें जगच मुळीं उत्पन्न झालें नसल्यामुळें आणि जन्म मरण किंवा पालन हें सर्व अविद्येनेंच होत असल्यामुळें तुझ्या भक्तांचेही ठिकाणीं ती अविद्या नाहीं. कारण तुझ्यांत आणि तुझ्या भक्तांत भेद नाहीं. यास्तव हे महाराज आपलें गर्भांत येणें किंवा जन्म घेणें हा प्रकार आम्हांला विनोद वाटतो. कारण खरें काय असेल तर असो येथें आमचा मुळींच विचार चालत नाहीं. तुझे ठिकाणीं भावना ठेवून तुझी उपासना मात्र करावी येवढें आह्मांस समजतें. या देवांच्या वाक्यावरून भगवंताचें गर्भांत येणें केवळ थट्टेचें असून भावनेनेंच त्यांना पुत्र मानावें लागतें. याविषयीं पुढील श्लोक दिलाच आहे.

युवां मां पुत्रभावेन ब्रह्मभावेन चासकृत् ।
चिंतयंतौ कृतस्नेहौ यास्येथे मद्गतिं पराम् ॥ भागवत.

जन्म झाल्यावर भगवान् वसुदेव देवकी यांनां ह्मणाले त्या वेळचें हें वाक्य आहे. भगवान् म्हणाले:— तुह्मी दोघेही पुष्कळ जन्मापासून माझें पुत्रभावानें व ब्रह्मभावानें चिंतन करीत आलां आहांत. नुसत्या पुत्रभावनेनें चिंतन केलें असतें तर मी पुत्र झालों असतों पण मुक्ति मिळाली नसती. व केवळ ब्रह्मभावानें चिंतन केलें असतें तर मुक्ति मिळाली असती पण भक्तिसुख मात्र मिळालें नसतें. बरें पुत्रभावना व ब्रह्मभावना ठेवल्या असत्या पण प्रेम नसतें तर दोन्हीही भावनांचा कांहींच फायदा झाला नसता. परंतु तुह्मी प्रेमपूर्वक माझे ठिकाणीं दोन्हीही भावना ठेवल्यामुळें माझ्या उत्कृष्ट गतीप्रत प्राप्त व्हाल.

इति श्लोकद्वयं सम्यक् प्रोक्तं भागवते हितम् ॥
ममापि कृष्णपत्नीत्वादधिकारस्तथाऽस्तिहि ॥ २३ ॥

याप्रमाणें हे दोन श्लोक भागवतामध्यें कल्याणप्रद सांगितले आहेत. आतां हे श्लोक देवाविषयीं आहेत अशी शंका करूं नये; कारण मी श्रीकृष्णाची पत्नी असल्यामुळें माझेही ठिकाणीं तो अधिकार सहजच येतो.

दम्पत्योरेकरूपत्वं प्रोक्तं चानुभवामृते ॥
' यतस्तदीयेति ' सूत्रं प्रमाणं नारदस्यहि ॥ २४ ॥
[ संधिः—छांदसः ]

परंतु तूं जरी श्रीकृष्णाची पत्नी आहेस तरी पतीपेक्षां पत्नीचा अधिकार कमी असतो, अशी शंका मात्र करूं नये; कारण इतर लोकांप्रमाणें आमचा पतिपत्नीसंबंध संसाराकरितां नाहीं तर तो ज्ञानमय आहे. श्रीमत्सद्गुरू ज्ञानेश्वरमहाराज अमृतानुभवांत म्हणतातः— ' जो प्रियूचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी । चारुस्थळी एकाहारी । एकांगाचा ॥ ' आणि ज्या अर्थी साधू ईश्वराचेच असतात त्या अर्थी त्यांच्यांत व ईश्वरांत भेद नाहीं असें नारदसूत्रही प्रमाण आहे.

अतो मां नंदनं मत्वा तीर्त्वैर्जन्ममरणार्णवम् ।
ब्रह्मज्ञानं परं प्राप्य व्रजस्व परमां गतिम् ॥ २५ ॥

आतां तुला पुष्कळ माता असल्यामुळें कितीकांचे ठिकाणीं प्रेम ठेवूं शकशील अशी शंका करूं नये; कारण मी जें तुह्मां सर्व स्त्रियांना माता ह्मणतों तें कांहीं मी आपल्या करितां ह्मणत नाहीं तर तुमच्या सर्वांच्याच हिताकरितां ह्मणतो. कारण मला तुम्हांला माता म्हणून तुमच्या जवळून कांहीं मिळवावयाचें नसतें; तर उलटें तुह्मांलाच ब्रह्मज्ञान करून द्यावें लागतें. दुसरें पुष्कळ आया आहेत हा भेद तुमचेच ठिकाणीं आहे; पण मला सर्व स्त्रियांचे ठिकाणीं भगवती अंबाच भरली आहे असें वाटतें; निरनिराळेपणा हा देहबुद्धीनें वाटत असल्यामुळें देहबुद्धी राखून माझे ठिकाणीं पुत्रभावना ठेवणें अशक्य आहे. माझे ठिकाणीं पुत्रभावना ठेवल्यावर माझ्या ज्या दुसऱ्या आया आहेत, त्या व मी एकच हीं ही भावना त्या बरोबरच वाढत गेली पाहिजे.

सास म्हणतात:– ' मी झालिया संभवे। भक्ति माझी ॥ १ ॥ ' आतां हा मार्ग दुस्तर आहे खरा; परंतु यावांचून तुम्हांसारख्या साध्वी स्त्रियांनां दुसरा तरणोपायच नाहीं. जेव्हां तुह्मी माझे ठिकाणीं पुत्रभावना ठेवून माझ्या ज्या दुसऱ्या आया आहेत त्या व मी एकच आहें असें मानीत जाल तेव्हां तुम्हीं अंबेस जाऊन मिळाल. व अंबेस जाऊन मिळाल्यावर जीवब्रह्मैक्य सहजच झालें. हा मार्ग जरी कठिण आहे तरी येथें निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. हळू हळू अभ्यास मात्र करीत जावा. ह्मणजे अधिकारानुरूप लवकरच फलसिद्धी होईल. ह्मणून हे आई मला पुत्र मानून व ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन या जन्ममरणरूपी सागरांतून पार होऊन परमगतीला प्राप्त हो.

यमुनायास्त्वधीकार: पुत्रभावे महानसौ ॥
बहुजन्मकृतप्रेम्णेत्येवं जानीहि विठ्ठल ॥ २६ ॥

हे विठ्ठलराव, वर लिहिल्याप्रमाणें हें तुह्मी आपल्या आईला सांगा. व तसेंच यमुनालाही चांगलें समजावून द्या- एकवेळ समजणार नाहीं तर तुह्मी हजारवेळ वाचा, व त्या दोघींनांहीं समजावून द्या हे विठ्ठलराव, पुष्कळ जन्मापासून केलेल्या प्रेमामुळें पुत्रभावना करण्यामध्यें यमुना आईचा अधिकार मोठा आहे. जिचें जिचें प्रेम अधिक उत्पन्न होत जाईल, तिचा तिचा अधिकार पुष्कळ जन्मापासून आहे असें समजावें. परंतु आपला अधिकार कमी आहे असें समजून दुसऱ्याचा द्वेष मात्र करूं नये. तर आपला अधिकार मात्र अधिक अधिक वाढवीत जावा.

मंगेशं प्रति यत्प्रोक्तं प्राक्पत्रे मातृसेवनम् ॥
कर्तव्यं तन्मातुराज्ञा पालनेन समन्वितम् ॥ २७ ॥

असो. पूर्व पत्रांत मंगेशाला जी मी आईची सेवा करण्यास सांगितली होती ती तो करीत असल्यास आज्ञा पालन पूर्वक करण्यास सांगावी.

मातुराज्ञां परित्यज्य कुर्वते मातृसेवनम ॥
न सा सेवा भवेत्सेवा यथा कारागृहं गृहम् ॥ २८ ॥

आईने आज्ञा केली असतां ती मात्र पाळन करावयाची नाहीं;

पण रोज पूजा करून चरणतीर्थ घेणें ह्मणजे ती सेवा नसून तिला कारागृहांत टाकणेंच होय. कारण आज्ञा सांगितली असतां पाळावयाची नाहीं; पण उलटपक्षीं ती कामांत असली तरी पूजा करूं दे, व चरण-तीर्थ दे; म्हणून तिला उलटी आपणच आज्ञा करणें या पेक्षां दुसरी कैद ती कोणती ?

अस्त्वेतत्पूर्व पत्रे यत्प्रोक्तं ज्ञानं यथाधिया ।
मातुरर्थं त्वदीयार्थं पुनः किंचित्तदुच्यते ॥ २९ ॥

पण ही गोष्ट व्यावहारिक पुत्रालाच लागू आहे पारमार्थिक पुत्राला लागू नाहीं; कारण पारमार्थिक पुत्राची आज्ञा वेदान्तांत आईनें एकावी. भगवान् कपिलमुनि हे देवहुतीचे प्रत्यक्ष पुत्र असून ही तिनें परमार्थांत त्यांचीच आज्ञा पाळली. असो तुझ्या करितां व दोधी आयां करितां मागल्यां पत्रांत जें ज्ञान लिहिलें होतें तेंच पुनः येथें थोडा विस्तर करून सांगतों.

प्रायः संकलिता सांख्य प्रक्रिया कारिका गणे ।
साऽतोत्र वर्ण्यते लेशात् बुद्ध्यारूढा यथा भवेत् ॥३०॥

बहुतेक सांख्य प्रक्रिया सांख्य कारिकेंत सांगितली आहे. तीच समजेल अशा रीतीनें थोडक्यांत सांगतों.

दुःखत्रया भिघाताद्धि तन्नाशेच्छा प्रजायते ।
दुःखं तु त्रिविधं ह्यमधिदैवादिसंज्ञकम् ॥ ३१ ॥

तीन प्रकारच्या दुःखाच्या योगानें आपल्याला पीडा होत असल्यामुळें त्या दुःखांच्या नाशाची इच्छा उत्पन्न होते व तें आधिदैवादि नावानें प्रसिद्ध असलेलें तिन्ही प्रकारचें दुःख दूर केलें पाहिजे.

आध्यात्मिकंचाधिभूत माधिदैवं तथैवच ।
एतद्धि त्रिविधं दुःख मीरितं ताप संज्ञया ॥ ३२ ॥

आपल्यापासून होणारें, दुसऱ्या पासून होणारें, व देवापासून होणारें असें तीन प्रकारचें दुःख आहे व यालाच तापही ह्मणतात

देहेंद्रिय मनः प्राणै दुःखं यत्सम्यगाप्यते ।
इमं आध्यात्मिकं तापं विजानीयाद्धि देहिनाम् ॥ ३३ ॥

सर्व प्राण्यांनां आपल्याच देह इंद्रिय मन व प्राण यांच्या योगानें जें दुःख होतें त्याला आध्यात्मिक दुःख किंवा ताप ह्मणतात.

सर्वं भूतै र्देहयोगात् यद्दुःखं सम्यगाप्यते ।
द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ ३४ ॥

आपल्याहुन भिन्न जे व्याघ्र चोर सर्प कंटक पाषणादि दुसरें पदार्थ त्यां पासून जें दुःख होतें त्याला आधिभौतिक ताप ह्मणतात. परंतु हें सर्व दुःख देहाच्या संगतीनेंच जीवाला उत्पन्न होत असतें. ह्मणून श्लोकांत 'देहिनाम्' 'देहयोगात्' इत्यादिशब्द घातले आहेत.

शुभाशुभैः कर्मभिस्तै र्देहान्ते यमयातना ।
यं चापि ग्रहपीडादि दुःखं विद्धयाधिदैविकम् ॥ ३५ ॥

जिवंतपणीं ग्रह पीडादिक व मेल्यावर चांगल्या व वाईट कर्मांनें जी यमाची यातना होते त्याला आधिदैविक दुःख असें ह्मणतात.

शारीरं मानसं चैव दुःखं सर्वं प्रवर्तते ।
मनोधर्मा देह बुद्धिस्त्वविवेक वशादिह ॥ ३६ ॥

हें तिन्ही प्रकारचें दुःख शरीर आणि मन यांचा आश्रय करून उत्पन्न होत असतें. आतां मेल्यावर यमलोकांत दुःख कसें भोगलें जातें असें ह्मणशील तर यमलोकांत गेल्यावर तेथें त्या लोकांतील देह प्राप्त होतो. व त्या शरीरांच्या योगानें दुःख भोगतो. सारांश मनाचे संकल्प विकल्पादि धर्म, व देह मी आहें अशी बुद्धि अविवेकाच्या योगानें उत्पन्न होते. तो अविवेक कसा हें सांगतों.

प्रकृतिं पुरुषं चापि परस्पर विधर्मिणम् ।
एकीकृत्याविवेकेन कामं कामयतेऽबुधः ॥ ३७ ॥

पुरुष चेतन व प्रकृति जड अशीं परस्पर निरनिराळ्या धर्मांचीं असून हीं त्या दोघांनांही वेगळी न समजतां अविचाराच्या योगानें अज्ञानी पुरुष हें मला असावें, हें मला पाहिजे, अशा प्रकारच्या वासना करीत असतो.

कामात्कर्म ततो दुःखं विवेकोऽतस्समाश्रयेत् ।
स्वं विविच्य दुरासाद्यं कामं त्यक्त्वा सुखी भवेत् ॥३८॥

वासने पासून कर्म होतें व कर्मा पासून दुःख होतें. हें सर्वच अविवेका पासून होतें. ह्मणून विचाराचा आश्रय करावा. व नंतर प्रकृती पासून आपल्याला निराळें करून जिंकण्याला कठिण ज्या वासना त्यांचा त्याग करून आनंदरूप व्हावें.

एतावत्सांख्यमेवात्र विवेकाय समाश्रयेत् ।
यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामायेस्य श्रुतेर्बलात् ॥३९॥

येथ पर्यंतच मनुष्यानें सांख्याचा आश्रय केला पाहिजे. कारण " जेव्हां या पुरुषाच्या सर्व वासना नाहींशा होतील तेव्हांच तो मुक्त होतो. " ही श्रुतीही विवेकालाच बल देणारी आहे.

पुनः पुनर्विवेकेपि कामोत्थानं भवेद्यदि ।
मनोनिग्रहवान्भूत्वा योगशास्त्रं समाश्रयेत् ॥ ४० ॥

आणि सांख्याप्रमाणें पुनः पुनः विचार करून ही जर वासना जोरानें पुनः उठतात; अशी स्थिती असेल तर अतिशय हठानें मनाचा जय करीत असावें. व योगशास्त्राचा आश्रय करावा.

चित्तवृत्ति निरोधोहि योगः पातंजले मतः ।
ईश्वर प्रणिधानेन निरोधोऽपि प्रजायते ॥ ४१ ॥

चित्ताच्या वृत्ति रोधून प्रवाहरहित करणें यालाच पातंजलशास्त्रांत योग ह्मटलें आहे. आणि तो चित्तवृत्तीचा निरोध ही परमेश्वर प्रणिधानानें ह्मणजे भक्तिविशेषानें प्राप्त होतो.

ईश्वर प्रणिधानंतु प्रणवस्य जपादिह ।
तदर्थ स्मरणाद्वापि साधुचित्त निषेवणात् ॥ ४२ ॥

तें ईश्वराचें प्रणिधान ॐकाराचा किंवा ॐकाराच्याच अर्थाचीं रामकृष्णदिक नांवें यांचा सगुण परमेश्वराचे ध्यानपूर्वक जप केल्यानें होतें अथवा संतांच्या मनोगता प्रमाणें आचारण केल्यानें किंवा त्यांच्या चित्ता प्रमाणें चित केल्यानें होतें.

प्रच्छर्दिधारणाभ्यांवा प्राणस्यपिहि संभवेत् ।
अभ्यास योगयुक्तेन वैराग्येणान्वितेनच ॥ ४३ ॥

अथवा ज्यांनां ध्यानाची शक्ति थोडी कमी असेल त्यानें गुरु आज्ञेनें रेचक पूरक कुंभकादि प्राणायाम हळुहळु वाढवीत असावें.

परंतु सर्व साध्य होण्याला अभ्यास व वैराग्य हें पाहिजे. अभ्यासा वांचून साध्य होत नाहीं म्हणून निराश होणारें मूर्ख समजावे. तात म्हणतात:—

" योगशास्त्र जितुकें । ते आचवेचि काय लटिकें ।
परी काय करावें आपणया नटकें । अभ्यासूचि । ज्ञाने० ।
योगेन वासना रोधेऽप्युत्थाने स्त्रियें सत्यता । ~ लिखे
निरासाय महच्छस्त्रं वेदान्तं श्रुतिशासनम् ॥ ४४ ॥

आतां योगानें वृत्तींचा निरोध होऊन समाधि प्राप्त झाली म्हणजे दु:ख शांत होतें; व पुन: समाधींतून वृत्ति उठली म्हणजे जग खरें वाटून दु:ख प्राप्त होतें. जगत् खरें वाटल्यावर कितीही दिवस समाधि लावून बसलें तरी पुन: समाधींतून वृत्ति उठली कीं जगत् खरें आहे असेंच वाटतें. म्हणून जगन्मिथ्या आहे असें पटवून देण्याचें काम सांख्य व योग यांच्याकडून होत नाहीं. या जगताच्या खरे-पणाचा नाश करण्याचा नाश करण्याकरितां श्रुतिमातेनें शिकविलेलें वेदान्तशास्त्रच मोठें भयंकर शस्त्र आहे.

आदावन्तेच यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ।
जगन्मिथ्येति बोधेन सत्यंब्रह्म विचिंतयेत् ॥ ४५ ॥

आतां वेदान्ताची प्रक्रिया थोडक्यांत सांगतों. जी गोष्ट पूर्वी नव्हती पुढें राहणार नाहीं ती मध्यें जरी भासली तरी खरी नाहीं असेंच म्हटलें पाहिजे जसा रज्जूवर भासलेला सर्प पूर्वी त्या रज्जूवर नव्हता व ज्ञान झाल्यावर ही रहात नाहीं तर मध्येंच भ्रमानें भासतो, त्याप्रमाणें हें देहादिक दृश्य जरी पूर्वजन्मीं नव्हतें व मरणानंतर ही रहात नाहींत तर नवेंनवें उत्पन्न होतें व आत्मा सर्व जगांत सारखाच राहतो म्हणून तोच एक ब्रह्मरूप सत्य आहे. शिवाय जगाचा निद्रेंत प्रलयांत व समाधींत बाध होतो म्हणून जगन्मिथ्या आहे. एवढ्या करितांच जगत् खोटें आहे व ब्रह्मच सत्य आहे असें चिंतन करावें.

चिंतनाचिंतनाश्चिंतं यदा चेतनतामियात् ।
ब्रह्माहमिति बोधेन न किंचिदपि चिंतयेत् ॥ ४६ ॥

नंतर चिंतन करितां करितां जेव्हां चित्त खोट्या जगाला

मोडून चित्त चैतन्य अशा ब्रह्माचे आकाराचें होऊन जाईल तेव्हां मीच ब्रह्म आहे असें समजून चिंतन करणेंही सोडून द्यावें. आणि दृश्याचेंही चिंतन करूं नये परन्तु हें ब्रह्माकार चित्त ध्यानानें न होतां ज्ञानानें झालें पाहिजे. म्हणून श्लोकांत "बोधेन" असा शब्द घातला आहे. ध्यानानें ब्रह्माकार चित्तकरणें हा योग व ज्ञानानें ब्रह्माकार चित्त करणें तो वेदान्त असा भाव समजवा.

श्रीमज्ज्ञानेश्वराख्यस्य गुरोः पाद निषेवणात् ।
(तदविस्तरेण) लिखितोयं महानर्थोह्यलं ~~तस्य प्रविस्तरः~~ ॥ ४७ ॥

ज्यांची कीर्ती सर्वत्र पसरली आहे अशा श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणकमलाच्या सेवेनें हा उत्तम मोक्षरूपी पुरुषार्थ लिहिला आहे त्याचा विस्तार आतां पुरे असो.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्र नंबर ३.

श्रीमज्ज्ञानेश्वरं देवं गुरुन्नत्वा कृपार्णवम् ।
१ (माधुर्योक्तं प्रवक्ष्येहं यथाज्ञानं यथाधिया) ॥ १ ॥

श्रीमत्सद्गुरुनाथ करुणासागर श्रीज्ञानेश्वर महाराज यांना वंदन करून अत्यंत मधुर यथामती ज्ञान सांगतों.

(जननी मोक्ष) ~~अन्नपूर्णा~~पूर्णाख्या यद्यपाकृतसंशया ।
सुतं मां मन्यतेचेत्तां प्रणमामि पुनः पुनः ॥ २ ॥

माता अन्नपूर्णा इचा सर्व संशय नष्ट होऊन माझे ठिकाणी पुत्र भाव असल्यास तिला माझें वारंवार वंदन असो.

सुतं भवंतं मन्ये हं मातृरुक्मिणिभाषणम् ।
लक्ष्मणेनैव निर्दिष्टं तामतः प्रणमाम्यहम् ॥ ३ ॥

लक्ष्मणानें मातारुक्मिणीचां मी तुला पुत्र मानलें असा निरोप आणला तस्मात् तिला माझा नमस्कार असो.

वंदेऽबाभावसंपन्नां जननीं यमुनां मुदा ।
कदा मातः क्षुधार्तं मां स्तनं पाययसे वद ॥ ४ ॥

जिनें मजकरितां आपले मनांत अंबाबुद्धि धारण केली आहे अशा यमुना आईला माझा सानंद नमस्कार आहे. आई ! आपल्या भुकेल्या बालकास आतां केव्हां स्तन देशील सांग बरें ?

चिरंजीवन्तु मे पुत्रा विठ्ठलाद्या महाशयाः ।
यथाधिकारयंत्मेन चिंतयंत्वात्मनः पदम् ॥ ५ ॥

महाशय विठ्ठलादिक माझे पुत्र चिरजीवी होऊन आपल्या अधिकारानुरूप आत्मपदाचें चिंतन करोत.

पूर्वपत्रतु यत्प्रोक्तं सांख्यादि ज्ञान मुत्तमम् ।
मातुरर्थं त्वदीयार्थं पुनर्विस्तरशो ब्रुवे ॥ ६ ॥

पूर्व पत्रांत सांगितलेलें सांख्यादि उत्तम ज्ञान तुझ्या व आईच्या हिता करितां पुनः सविस्तर सांगतों.

दुःखं यत् त्रिविधं प्रोक्तं यन्निवृत्तिरपेक्षिता ।
दृष्टानुश्राविकाभ्यां तन्न क्वापि विनिवर्तते ॥ ७ ॥

आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशीं जीं तीन प्रकारचीं दुःखें आहेत त्यांची अत्यंत निवृत्ति अपेक्षित आहे. ह्मणजे ह्या दुःखांची एकवेळ निवृत्ति झाल्यानंतर फिरून कधींही त्यापासून त्रास न झाला पाहिजे. ह्या अत्यंत निवृत्ति करितां सृष्टींतील दृश्य औषधादि उपाय किंवा वेदांत सांगितलेलीं यज्ञादि साधनें कुठें कधींही समर्थ होत नाहींत. कारणः—

दृष्टोपायोह्यौषधादिर्देशकालादिभिर्हतः ।
उत्तमो योजितोवापि न नैयत्येन दुःखहा ॥ ८ ॥

औषधांचे गुण नेहमीं देशकालानुरूप असतात. एका देशांत उत्पन्न झालेलें औषध त्या देशांत ज्या रोगावर चालतें त्या रोगावर

दुसऱ्या देशांत तें चालत नाहीं. त्याच प्रमाणें हिंवाळ्यांत उत्पन्न होणारें औषध उन्हाळ्यांत उपयोगीं पडत नाहीं व उन्हाळ्यांत उत्पन्न होणारें औषध हिंवाळ्यांत उपयोगी पडत नाहीं. त्याचप्रमाणें एका प्रकृतीस उत्तम मानवणारें औषध दुसऱ्या प्रकृतीस मुळींच मानवत नाहीं. याप्रमाणें औषधांचा जोर देशकाल प्रकृत्यादिकांनीं अभिहत आहे. व औषधांची कितीही जरी उत्तम योजना झाली तरी ती निश्चयानें दुःखांची अत्यंत निवृत्ति करण्याकरितां समर्थ नाहींत.

१ यज्ञादिर्वेद वाक्येषु कथितोनुश्रुतस्तुयः ।
क्षयातिशयमालिन्यन्यायानुग्रहणैर्हतः ॥ ९ ॥

वेदांत सांगितलेले व परंपरेनें आलेले असे जे यज्ञादि उपाय हेही या दुःखांची अत्यंत निवृति करण्यास समर्थ नाहींत; कारण यज्ञादि कर्मापासून उत्पन्न झालेल्या पुण्याचा नाश होत असतो. व त्या पुण्यनाशानंतर फिरून पुनः दुःखांत पडावें लागतें. शिवाय यांत पशुमारणादि अत्यंत निंद्यकर्मेंही करावीं लागतात. न्यायानुग्रहणेत्यादि श्रुतीवरून इथें ज्याप्रमाणें सांठविलेल्या धान्य वगैरेचा भोगानें क्षय होतो त्याच प्रमाणें यज्ञादि कर्मानें उत्पन्न झालेल्या पुण्याचा त्यापुण्यानें मिळालेले स्वर्गादि भोग भोगिल्यानें क्षय होतो.

अतस्तदतिरिक्तं तु ह्युपायं श्रयते बुधः ।
मायाब्रह्म विवेकेन ह्यात्मनो बंधमोचनम् ॥ १० ॥

करितां बुद्धिमान व ज्ञानी पुरुष दृष्ट औषधादि किंवा आनुश्रविक वेदांत सांगितलेल्या यज्ञादि कर्मांची कास सोडून माया काय आहे व ब्रह्म काय आहे या गोष्टीचा विचार करून आपला बंध मोकळा करितात.

मायांतु प्रकृतिं विद्यात् पुरुषं ब्रह्म एवच ।
सत्वं रजस्तमइति प्रकृतेरभवन्गुणाः ॥ ११ ॥

मायेलाच प्रकृति म्हणतात; व ब्रह्मासच पुरुष ही संज्ञा आहे. सत्व, रज आणि तम हे तीन्ही गुण प्रकृतीचेच आहेत.

निबघ्नन्ति पुमांसन्ते सर्वेऽपि स्वस्य वृत्तितः ।
अविवेकवशात्तात विशुद्धं परमेश्वरम् ॥ १२ ॥

हे पुत्र नित्य, शुद्ध, सच्चिदानंद स्वरूप जो पुरुष त्याला अज्ञान-मूलक प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या सत्वादि गुणांच्या वृत्तींनीं अविचारामुळें लटकेंच बांधलें आहे.

विस्मृत्यपरसंरूप मकर्ताख्य मगोचरम् ।
स्वप्रकृत्यविवेकेन कर्ताऽहमिति मन्यते ॥ १३ ॥

अकर्ता, अगोचर अशा आपल्या सच्चिदानंद स्वरूपास विसरून मी प्रकृतीच आहे या अविचारानें प्रवृत्त होऊन व्यर्थ स्वतः कर्ता नसून हा आपल्यास कर्ता समजतो.

यंचे कर्ता भवे भोक्ता सुखी दुःखीचवै पुनः ।
जातः स्थितो मरिष्यामीत्येवं विप्रतिपद्यते ॥ १४ ॥

हाच आपल्यास कर्ता समजतो, भोक्ता ही समजतो, क्षणिक विषय सुखास भुलून सुखी समजतो, फिरून स्वतःसच दुःखी समजतो, हा व्यर्थच मी उत्पन्न झालों, मी मोठा झालों, मी आतां मरेन वगैरे अशा विरूद्ध समजुती करून घेतो.

अहं ज्ञानी सुखी साधुर्मन्यते सत्वसंश्रयात् ।
दुःखी रोगी चंचलोऽहं जानाति रजसो वशात् ॥ १५ ॥

हाच ज्या वेळेस सत्वगुणाचा आश्रय करितो त्या वेळेस मी मोठा समजुतदार माणूस आहे, मी सुखी आहें, मी एक कोणी चांगला आहें, असें समजतो. तोच हा रजोगुणाश्रित होऊन एकावर प्रीति करितो एकाचा द्वेष करतो. मी फार चंचलस्वभावाचा आहें, मला दुःख होतें वगैरे व्यर्थच मानून घेतो.

मूढोऽहं जडबुद्धिर्वै मन्यते तमसो वशात् ।
गुणेषु स्वीयधर्मांश्च तद्वत्स्वे गुणधर्मता ॥ १६ ॥

मला कांहीं समजत नाहीं, माझी बुद्धि फार मंद आहे असें तमोगुणाचा आश्रय करून ह्मणतो. या प्रमाणें आपले ठिकाणीं गुणांचे धर्म घेऊन आपलें गुणांचे ठिकाणीं देतो.

स्वधर्माथे चित्सुखाद्या गुणेषु स्थापयत्यहो ।
स्वास्मिन्धर्मा गुणानांच विरूद्धा अपि मन्यते ॥ १७ ॥

काय आश्चर्य आहे ? सच्चिदानंद स्वरूप नित्यशुद्ध असा हा

चेतन सुखादि असे जे आत्मधर्म ते लटकेच या गुणांचे ठिकाणीं देऊन त्या गुणांचे परस्पर विरूद्ध असे क्षणिक सुखदुःखादि जडधर्म आपले ठिकाणीं आरोपित करतो.

देहादौ यदहंत्वं तत्स्वधर्मस्थापनं जडे ।
सुखदुःखविमोहानां स्वस्मिन्विप्रतिपादनम् ॥ १८ ॥

अचेतन जड अशा शरीरावर मी तूं ह्मणून आत्मधर्म आरोपित करून व्यर्थच सुख दुःख मोह इत्यादि आपले ठिकाणीं मानतो.

शमाद्या सात्विका धर्माः स्वस्मिन्नेवहि मन्येते ।
शुद्धोऽपि सत्वयोगेन सुकृतानि तनोत्यहो ॥ १९ ॥

शम दमादि सत्व गुणविशिष्ट धर्म नसतानांच आपले ठिकाणीं कल्पून नित्य शुद्ध व निर्लेप अशा स्वतःचा त्या कर्मापासून उत्पन्न झालेल्या नश्वर अशा पुण्याशीं संबंध घालतो. हें आश्चर्य नव्हे काय ?

चांचल्याद्या रजोधर्माः स्वस्मिन्नेवहिमन्यते ।
रागद्वेषादिसंसर्गात्पातकानि तनोत्यहो ॥ २० ॥

चंचलपणा रागद्वेषादि रजोगुण विशिष्ट धर्म हे ही याच प्रमाणें आपले ठिकाणीं मानून कोणावर अनुराग करतांनां अथवा कोणाचा द्वेष करतांनां विणाकारण अनन्वित पातकें करून त्याशींही आपला संबंध ठेवतो हेंही आश्चर्यच आहे.

निद्राद्या तामसा धर्माः स्वस्मिन्नेवहि मन्यते ।
जीवितं पारतंत्रेण नयत्यहह संक्षयं ॥ २१ ॥

अरेरे ! बिचारा व्यर्थच निद्रादितामस गुण विशिष्ट धर्मांचा आपल्यावर आरोप करून घेऊन पारतंत्र्यानें आपल्या संबंध जीविताचा नाश करून घेतो.

सात्विकः पुण्य योगेन स्वर्गाशावधिगच्छति ।
पतति क्षीणपुण्येन पुनर्याति यथाक्रमः ॥ २२ ॥

ह्या सत्वगुणविशिष्ट धर्मांचा आपलेवर व्यर्थ आरोप करून केलेल्या कर्माच्या पुण्यानें स्वर्गादि लोकांस जाऊन पुण्यक्षीण झाल्यानंतर पुनः खाली पडून फिरून ज्या प्रमाणें पापपुण्य करील त्या ठिकाणीं जातो.

राजसः पापयोगेन नरकंप्रति गच्छति ।
क्षीणे पापे जनिं प्राप्य पुनर्याति यथाक्रमः ॥ २३ ॥

त्याचप्रमाणें हा राजस आपल्या पापाच्या योगानें नरकांत जाऊन पाप क्षीण झाल्यानंतर पुनः जन्म घेऊन फिरून जसजशीं कर्में करील तसतशा ठिकाणीं जातो.

तामसोऽप्यत्वर स्पर्शान्मृतो याति यथाक्रमः ।
मूर्च्छां सप्राप्य विस्पर्शाद्गुणानां रंहति द्रुतं ॥ २४ ॥

तामस देखील इतर रज आणि सत्व, गुणांच्या साह्यानें मेला असतांना अनेक जन्मपर्यंत दगडादिकांच्या योनींत मूर्छा पाऊन नंतर पापांचा भोग देऊन शीघ्र पुनः पूर्ववत् फेऱ्यांत पडतो.

स्वानंदविस्मृते र्भावात् गुणधर्म मनुसृतः ।
अनादि अविवेकत्वं न जानामीति प्रत्ययात् ॥ २५ ॥

सच्चिदानंदरूप असें जे आपलें स्वरूप व त्याची विस्मृति हेंच जिचें अस्तित्व आहे अशा प्रकृतिमुळें गुणाच्या धर्मांना अनुसरणारा असा हा अविचार "मी स्वतःला जाणत नाहीं" ह्या अनादि काळापासून चालत आलेल्या प्रतीती वरून अनादि आहे.

शुद्धः कर्ता निर्गुणोऽपि मायायोगान्निबध्यते ।
कारणं गुणसंगोस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २६ ॥

नित्य शुद्ध अकर्ता गुणरहित असा जरी हा आहे तरी मायेच्या योगानें याला बंधन पडतें, व चांगल्या वाईट योनींचे ठिकाणीं जन्म येण्यास ह्याला सत्वादि गुणांचा संगच कारणीभूत आहे.

अविवेकाद्यतो बंधो विवेकेन विनश्यति ।
तमोरुद्धा यथादृष्टि प्रकाशेन विमुंचति ॥ २७ ॥

ज्याअर्थी अविचारामुळें हा बंध आहे त्या अर्थी विचारानें ह्याचा नाश झालाच पाहिजे. ज्या प्रमाणें अंधारानें अंध झालेली दृष्टि प्रकाश येण्याबरोबर स्वच्छ होते.

गुण धर्मास्तिरस्कृत्य ज्ञानात्स्वंचेतनं भजेत् ।
सच्चिदानंदरूपत्वमनुभाव्यं विचारतः ॥ २८ ॥

करितां सत्वादि तिन्ही धर्मांचा तिरस्कार करून ज्ञानानें व

विचारानें सच्चिदानंदरूप असें जें चेतन आत्मस्वरूप त्याचा अनुभव घेऊन त्यांतच रममाण व्हावें.

अनुभुतेरभावेपि चिंत्यतामेतदेवहि ।
ब्रह्मैवाहं न संसारी मुक्तोऽहमिति भावयेन् ॥ २९ ॥

ही प्रक्रिया कठिण आहे म्हणून अनुभव नसला तरी मी ब्रह्म आहें, मी संसारी नसून मुक्त आहे, हीच निरंतर भावना ठेऊन असेंच चिंतन करावें.

किटको भ्रमरध्यानाद्यथा भ्रमरतामियात् ।
ब्रह्मध्यानात्तथा योगी ब्रह्मत्वं यात्यसंशयः ॥ ३० ॥

ज्याप्रमाणें भिंगोटीच्या भावनेनें किडा देखील स्वतः भिंगोटी होतो; त्याचप्रमाणें निरंतर ब्रह्माचें ध्यान करून योगीही असंशय होत्साते ब्रह्मपदाप्रत पावतात.

एवं सांख्यं समाश्रित्य विचारात्प्रकृतेः परम् ।
विनिश्चित्य परात्मानमभ्यसेद्योगशास्त्रतः ॥ ३१ ॥

याप्रमाणें सांख्य शास्त्राच्या आश्रयानें प्रकृतीहून निराळें होऊन परमात्म स्वरूपाचा निश्चय करावा. व नंतर योगशास्त्रा प्रमाणें अभ्यास करावा.

विषयांस्तु तिरस्कृत्य बलात्संकृष्य चेतसम् ॥
निर्धारिते स्वकेरूपे स्थापयेत्तदनु क्षणम् ॥ ३२ ॥

विषयांचा तिरस्कार करून हठानें चित्ताला ओढून पूर्वी ठरविलेलें असें जें आत्मस्वरूप त्या ठिकाणीं क्षणोक्षणीं लावीत असावें.

पुनः पुनः समुत्थाने पुनः संस्थापयेद्बुधः ।
यावत्सुखं नावतिष्ठेत्तावदेवं समाचरेत् ॥ ३३ ॥

जर चित्त त्या ठिकाणाहून वारंवार उत्थान पावत असेल तर बुद्धिमान् मनुष्यानें सुखानें परिश्रमावांचून चित्त निरंतर त्या ठिकाणीं राही पर्यंत पुनः पुनः तेथेंच नेऊन स्थापावें.

चित्तं विना प्रयत्नेन ब्रह्मणि स्थिरतामियात् ।
तदा ब्रह्मसमाधि स्याद्व्यतिरेकोऽयमीरितः ॥ ३४ ॥

प्रयत्नावांचून सुखानें जेव्हां चित्त ब्रह्माचे ठिकाणीं स्थिर होतें तेव्हां याला ब्रह्मसमाधि ह्मणतात. याप्रमाणें सर्व जगताहून निराळें असें आत्मस्वरूप जाणून त्या ठिकाणीं रममाण होणें याला व्यतिरेक ह्मणतात.

श्रौताभ्यां सांख्ययोगाभ्यां व्यतिरेकः स्फुटो भवेत् ।
वेदान्तज्ञानमात्रेणान्वयोऽप्येवं प्रजायते ॥ ३५ ॥

असा हा व्यतिरेक वेदसम्मत सांख्य व योगशास्त्रानें समजतो. व वेदान्तशास्त्राच्या ज्ञानानें अन्वय समजतो. ह्मणजे माझ्या सुद्धां सर्व जगत् ब्रह्ममयच आहे असें होतें.

एकस्मिन्यदि सत्तास्यादसत्ता तद्विरोधिनि ।
यदा सत्ता ब्रह्मणिस्यान्माया मिथ्या तदैवहि ॥ ३६ ॥

एका वस्तुचे ठिकाणीं जर खरेपणा आहे तर त्याच्या विरोधी सर्वच वस्तु खोट्या असतात. ब्रह्माचे ठिकाणीं जेव्हां खरेपणा ठरतो तेव्हांच ' माया ' खोटी ठरते.

मिथ्यैतद्वस्तुनः सत्वे सत्ताहानिर्न जायते ।
यथा मृगांबुसत्वेऽपि सूर्यहानिर्नदृश्यते ॥ ३७ ॥

या प्रमाणें माया मिथ्या जरी आहे तरी ब्रह्माच्या खरेपणाला त्या योगानें कोणताही बाध येत नाहीं. जसें मृगजल खोटें आहे तरी सूर्यास कांहीं बाध येत नाहीं. समसत्तेत परस्पर विरुद्ध वस्तु एके-ठिकाणीं राहूं शकत नाहींत, विषमसत्तेत राहूं शकतात. ब्रह्माची पारमार्थिकी सत्ता व मायेची व्यावहारिकी सत्ता असल्यामुळें ब्रह्माधि-ष्ठानावर माया राहूं शकून ब्रह्माची हानी होत नाहीं.

अधिष्ठानं विना सत्ता नमिथ्यावस्तुनः क्वचित् ।
अतो मिथ्या जगद्वस्तु ब्रह्मण्येवहि कल्पितम् ॥ ३८ ॥

खोटी जरी गोष्ट असली तरी सत्य अधिष्ठान असल्याशिवाय ती संभवत नाहीं. उदाहरणार्थः— रज्जू असल्याशिवाय सर्पाभास संभवत नाहीं. याप्रमाणें सत्यब्रह्माचे ठिकाणीं लटकेंच हें जगत् कल्पिलेलें आहे.

ब्रह्मसत्तां विना सत्ता जगतोनैव विद्यते ।
तदा सर्वं हि ब्रह्म स्यात्केन किं विनिवर्तयेत् ॥ ३९ ॥

यावरून ब्रह्माचे खरेपणावाचून जगांत दुसरें कांहींच नाहीं उदाहरणार्थः—सर्पाभास जरी होतो तरी दोरीवांचून त्या ठिकाणीं कांहींच नसते. अशा वेळेस सर्वच ब्रह्म झाल्यावर कोणी कोणास काढावें किंवा कशानें कशाचा नाश करावा. ह्मणजे सर्व ब्रह्मच असल्यामुळें कशानेंच कशाचा नाश संभवत नाहीं.

सर्वं खल्विदं ब्रह्म श्रुतियुक्तिप्रतीतितः ।
यदि सिध्येत्तदा कोऽयं समाधिस्तु किमर्थकः ॥ ४० ॥

"हें सर्व ब्रह्ममय आहे" अशा अर्थाच्या "सर्वंखल्विदंब्रह्म" या श्रुतीवरून व वर सांगितलेल्या युक्तीवरून व अनुभवानेंही जर सर्व जगत् ब्रह्ममय आहे असेंच सिद्ध होते तर हा समाधि तरी काय व यांत अर्थ तरी काय ?

अज्ञानिनां विबोधार्थं समाधिः कल्पितो बुधैः ।
ज्ञानिनो ब्रह्मरूपत्वात्समाधिर्जगदेवहि ॥ ४१ ॥

अज्ञानी असे जे पुरुष आहेत त्यांना समजण्या करितां शहाण्या लोकांनीं हा समाधि कल्पिलेला आहे. वास्तविक जे ज्ञानी आहेत त्यांना सर्व जगच ब्रह्मरूप असल्यामुळें जगतच त्यांचा समाधि असतो.

तदप्येप महानर्थो लिखितः प्रेमसंश्रयात् ।
अनारूढोहि बुद्धौचेत्समाधौ यत्नवान्भव ॥ ४२ ॥

हा जरी फार गूढ असा अर्थ आहे तरी प्रेमाच्या भरांत येऊन मी येथें बोलून गेलों आहे. हा अर्थ समजण्याची जर तुझे बुद्धीची तयारी नसेल तर समाधिचेच ठिकाणीं यत्नकर.

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यपादपद्म निषेवणात् ।
निरूपणं यथाज्ञानं तस्मिन्नैव समर्पितम् ॥ ४३ ॥

श्रीमत्सद्गुरुनाथज्ञानेश्वराचार्य यांच्या चरणपंकजाच्या संसेवनानें जें कांहीं ज्ञान लिहिलें आहे तें तच्चरणारविंदींच समर्पण असो.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्र नंबर ४.

ज्ञानेश्वरं कृपामूर्ति नत्वा ज्ञानप्रदं गुरुम् ।
प्रवक्ष्ये लिखितं युग्मं धर्मब्रह्मप्रवुद्धये ॥ १ ॥

अर्थः—ज्ञानदायक करुणामूर्ति सद्गुरुनाथ श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनां नमस्कार करून धर्म आणि ब्रह्म यांचें ज्ञान होण्याकरितां मी हें जोडपत्र लिहितों. ( जोडपत्र ह्मणजे रुक्मिणी आईच्या पत्राचें उत्तर यांत लिहिलें असून आपलें कडे नित्य पाठविण्यांत येणारें मामुली पत्रही यांत आहे. )

जनन्यप्यन्नपूर्णाख्या सुतं मां यदि मन्यते ।
तर्हितां प्रणम्यात्र स्वीयप्रेममतेर्वशात् ॥ २ ॥

माता अन्नपूर्णा हिची माझे ठिकाणीं पुत्रभावना असल्यास मी आपल्या साहजीक मातृप्रेमानें तिला नमस्कार करितो.

जननीं रुक्मिणीं नत्वा संबोध्य इदमुच्यते ।
त्वया यत्प्रेषितं पत्रं उत्तरं तस्य वै शृणु ॥ ३ ॥

माता रुक्मिणीला मी नमस्कार करितो. आई ! तूं मला जें पत्र पाठविलेंस त्याचें उत्तर ऐक.

नाहं पुत्रोऽज्ञानमात्रो व्यावहारिकपुत्रवत् ।
वांछसि यदि मां पुत्रं परमार्थेन भावय ॥ ४ ॥

आईग ! व्यावहारिक पुत्राप्रमाणें तूं माझे ठिकाणीं अज्ञानानें पुत्रभावना ठेवूं नकोस. माझे ठिकाणीं तुला पुत्रभाव ठेवावयाचा असल्यास तो पारमार्थिकच ( ज्ञानमात्र ) ठेव.

संसारेऽस्मिन्महाघोरे स्वधर्मोहि महान्सखा ।
स्वधर्मस्य परित्यागाद्युज्यते पापकर्मणि ॥ ५ ॥

या दुःखमय घोर संसारामध्यें स्वधर्म हाच एक आपला खरा मित्र आहे. कारण स्वधर्माचा त्याग केला असतां पापकर्माकडे प्रवृत्ति होते.

सुखदुःखानुमानेनानुमेये पुण्यपातके ।
न पुण्यं यदि वा पापं सुखं दुःखं कथं भवेत् ॥ ६ ॥

आपल्याला सुखदुःखें होतात याचें पुण्यपापात्मक कांहीं कारण असलेंच पाहिजे. हें अनुमानानें सिद्ध आहे. पुण्य आणि पाप हीं दोन्ही जर नाहींत, तर सुखदुःख कां व्हावें?

पुण्यपापे विना कोऽपि युज्यते सुखदुःखयोः ।
ईश्वरोऽपि भवेन्मूढो निर्दयो विषमः कुधीः ॥ ७ ॥

आतां पुण्यपापावांचून जर तूं सुखदुःखाचा भोग मिळतो असें मानशील तर तें कोण देतो? ईश्वर देतो म्हणशील तर त्याचे ठिकाणीं वैषम्य नैर्घृण्यादि दोष येऊन तो मूर्ख निर्दय व मंदबुद्धि ठरेल. पण सर्वज्ञ व दयाळु अशा परमेश्वराचे ठिकाणीं हे दोष संभवतच नाहींत.

स्वभावाज्जगदुत्पत्तिस्तदानस्याद्विचित्रता ।
विचित्रोऽपिस्वभावश्चेद्भावतोऽभावतोऽथवा ? ॥ ८ ॥

सृष्टिनियमानेंच जगाच्या उत्पत्तीबरोबर हें सुखदुःखही उत्पन्न झालें म्हणशील तर त्यांत वैचित्र्य असूं नये. सर्वच गोष्टी नियमानें बद्ध असल्या पाहिजेत. परंतु नियमविरुद्ध वैचित्र्य दृष्टीस पडतें. बरें, सृष्टींतील पदार्थांचे ठिकाणींच जर विचित्रता मानली तर ती त्या पदार्थांच्या भावकाळीं म्हणजे पदार्थ आहेत तेव्हां मानतोस कीं अभाव काळीं? ( म्हणजे पदार्थ नसतात तेव्हांही मानतोस? असा भाव.

भावत श्चेत्कथं सत्ता तज्ज्ञानं कस्य वा भवेत् ।
अभावतश्चेद्व्याघात स्तृप्तिः स्याद्भोजनं विना ॥ ९ ॥

भावकालीं मानीत असल्यास त्याला सत्ता कोणती ? व त्या सत्तेचें ज्ञान कोणाला होतें ? बरें, अभावकालीं जर तें वैचित्र्य मानीत असशील, तर व्याघात दोष येतो. म्हणजे भोजनावांचूनच तृप्ति मानण्याचा प्रसंग येतो.

तस्मादस्ति परंकर्म पुण्यपापाख्यमेवहि ।
विहितेन भवेत्पुण्यं पापं वेदनिषिद्धतः ॥ १० ॥

या वरून सुखदुःख हें स्वभावतः उत्पन्न होत नसून किंवा

ईश्वर ही देत नसून, तें पापपुण्यात्मक कर्मांच्या योगानेंच होतें, असें मानलें पाहिजे. विहित कर्माचरणापासून पुण्य होतें व निषिद्धकर्म केल्यापासून पाप होतें.

विहितं यस्य यत्प्रोक्तं वेदे तदनुसारिणि ।
सकामं तच्च स्वर्गाय निष्कामं चित्तशुद्धये ॥ ११ ॥

वेदांत सांगितल्याप्रमाणें ज्याचा त्यानें स्वधर्म सकाम रीतीनें केल्यास स्वर्गादि भोग मिळतात व तोच निष्काम रीतीनें केल्यास चित्तशुद्धि होतें.

सीमंतिनी पातिव्रत्याद्याता शैवं परंपदम् ।
वेश्याप्येवं महानंदा स्थानं प्राप्ता तदेवहि ॥ १२ ॥

शिवलीलामृतांत अशी कथा आहे कीं, आपल्या पातिव्रत्य धर्मानें सीमंतिनी परम शिवपदाला गेली. व त्याचप्रमाणें महानंदाही आपल्या वेश्याधर्मानें त्याच शिवपदाला जाऊन पोंहचली. याप्रमाणें दोघींही एकाच पदाप्रत पावल्या तरी वेश्याही वेश्याधर्मानेंच गेली व पतिव्रताही पतिव्रताधर्मानेंच गेली. या ठिकाणीं पतिव्रतेला पतिव्रता-धर्मच योग्य आहे. व वेश्येला वेश्याधर्मच योग्य आहे. पतिव्रतेनें वेश्याधर्म व वेश्येनें पतिव्रताधर्म करून चालत नाहीं. तर ज्याचा त्यानें स्वधर्मच केला पाहिजे.

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।
इति कांतोक्तितो धर्मः स्वीयनिश्रेयसाप्तये ॥ १३ ॥

स्वधर्म करीत असतांना मरण जरी आलें तरी तें कल्याण कारकच आहे. परंतु परधर्मस्वीकार दुःखप्रद आहे, या श्रीकृष्णवचनावरून ही आपल्याला मोक्ष मिळण्याकरितां आपला धर्मच कारण आहे.

भर्तुःशुश्रूषणं स्त्रीणां परोधर्मो ह्यमायया ।
तद्बंधूनांच कल्याणमिति भागवते स्फुटम् ॥ १४ ॥

निष्कपट रीतीनें पतिसेवा करणें व पतीच्या कुटुंबांतील माणसांचें कल्याण इच्छिणें, हाच स्त्रियांचा उत्तम धर्म आहे असें श्रीमद्भागवतांत स्पष्ट सांगितलें आहे.

ब्रह्मदृष्टिरुत्कर्षाच्च सूत्रप्रामाण्यत: स्वयम् ।
ईशबुद्धि: पतौ कुर्यात्पतिबुद्धिर्न चेश्वरे ॥ १५ ॥

" ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् " ह्मणजे कनिष्ठ पदार्थांचे ठिकाणीं सर्वांत श्रेष्ठ अशी ब्रह्मभावना करणेंच उत्तम आहे; या ब्रह्मसूत्रावरून पतीचे ठिकाणीं ईश्वरभावना करणेंच इष्ट असून ईश्वराचे ठिकाणीं पत्यादिकांची भावना करणें हितावह नाहीं. कारण कनिष्ठ वस्तूचे ठिकाणीं उत्कृष्ट वस्तूची भावना करावी. परंतु उत्कृष्ट वस्तूचे ठिकाणीं निकृष्ट वस्तूची भावना कधींही करूं नये. या प्रमाणें पतीचे ठिकाणीं ईश्वरभावना करून,

पत्यु:पादोदकं पीत्वा नित्यं शिरसि धारयेत् ।
कृत्वा पत्यु: पादपूजां दद्यान्नैवेद्यमुत्तमम् ॥ १६ ॥

पतिचरणारविंदाचें दररोज पूजन करून उत्तम प्रकारचा नैवेद्य समर्पण करावा व पतीचें चरणतीर्थ प्राशन करून मस्तकावर धारण करावें.

धनाद्याशां परित्यज्य पत्यु: पादौ विभावयेत् ।
पालनीया पत्युराज्ञा तदप्युत्तमकर्मणि ॥ १७ ॥

पतीपासून वस्त्रालंकारादि धनाची आशा न करितां सद्भावानें पतिचरणारविंदाचें ध्यान करावें. व त्याची आज्ञा निरंतर मान्य करावी. परंतु ती सत्कर्माबद्दल मात्र असली पाहिजे.

पातके कर्मणिनैव कस्याप्याज्ञाऽनुपालनम् ।
पतिर्माता पितावाऽपि बंधुर्वापि भवत्वथ ॥ १८ ॥

पापकर्मासंबंधीं मात्र कोणाचीही आज्ञा पालन करूं नये. मग तो पति, माता, पिता, किंवा बंधु कोणीही असो.

निर्विद्यो दुर्भगोवृद्धो जडोरोग्यधनोऽपिवा ।
पति: स्त्रीभिर्नहातव्यो लोकेप्सुभिरपातकी ॥ १९ ॥

उत्तम लोकांची इच्छा करणाऱ्या स्त्रीनें तिचा पती विद्याहीन, दुर्दैवी, वृद्ध, मंदबुद्धि रोगी, दरिद्री असा जरी असला, आणि तो पापाचरण करीत नसला तर त्याला कधींही सोडून देऊं नये.

सत्पत्याज्ञां विना नास्ति वनितानां व्रतादिकं ।
यावत्तीव्रा नो मुमुक्षा तावदेव समाचरेत् ॥ २० ॥

विहित धर्मानुसार वागणाऱ्या पतीच्या आज्ञेचें परिपालन करण्यावांचून पतिव्रता स्त्रियांनां अन्य धर्म नाहीं. जोंपर्यंत मुक्तीची इच्छा उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत असेंच करीत असावें.

पुत्रीकृत्य त्वया मातर्यद्यहं स्त्रीकृत स्ततः ।
कुरुष्व कथितं सर्वं हठो मे पूरणाय वै ॥ २१ ॥

आई! ज्याअर्थीं तूं मला पुत्र समजतेस त्याअर्थीं आपल्या लेंकराचा हठ पुरविण्याकरितां तरी मी सांगितल्याप्रमाणें तुला केलेंच पाहिजे.

एतद्धि लिखितं तात यस्यास्तस्यै निरूप्यताम् ।
चिरंजीवन्तु मत्पुत्रा विठ्ठलाद्या महाशयाः ॥ २२ ॥

विठ्ठलराव, हें जिच्या करितां मी लिहून पाठविलें आहे तें तिला नीट समजावून सांग. माझे विठ्ठलरावादि महाशय पुत्र चिरजीवी असोत.

गद्य— ननु सर्वासु स्त्रीष्वंबाबुद्धिकरणे नहि ब्रह्मनिष्ठानां प्रयोजनं तस्यच ज्ञानेन सर्वत्र ब्रह्मबुद्धित्वात् अम्बाबुद्धेरुपासनाकांडे निविष्टत्वादिति माशंक्यं । उपासनेंऽबाबुद्धिस्सर्वासु स्त्रीपु कर्तव्या 'ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्' इति ब्रह्मसूत्रात् । कथं तर्हि श्रीकृष्णे पतिदृष्टिर्गोपिकानां इत्यपि न शंकनीयं । नहि माहात्म्यज्ञानसहिताया निकृष्टदृष्टेर्निवारणं अस्या स्वसामानाधिकरणत्वात् । 'सएवाहं' भक्तिसिद्धेश्च । श्रीकृष्णे ब्रह्मणि यदि पतिदृष्टिर्गोपिकानां निकृष्टाचेत् भवतु जाराणामिव । तथा न चेत् त्वन्मतक्षतिः । 'तत्रापिनमाहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः' । 'तद्विहीनं जाराणामिव' ( नारदभक्तिसूत्र २२-२३. ) भक्तिसूत्र द्वयमपि अस्मन्मते प्रमाणम् । एवं भगवति पुत्रदृष्टिरपि यशोमतिनंदयो- 'ममैवासौ' भक्तिसिद्धय एव भवति । एवमस्तु । अंबायां स्त्रीबुद्धिकरणे कामादिवृद्धिसंभवात् पातित्यं स्यात् ।ततो नारीष्वंबाबुद्धिकरणमेव श्रेयः। तदप्युपासनयैव । तस्याविक्षेपविरोधात् । विक्षेपा अविद्या कार्याख्याः कामाद्या वासनाः । तासां ज्ञानानंतरमपि क्षुतृड्वत् यावत्प्रारब्धसंस्थान-संभवात् । 'ग्रंथिभेदेऽपि संभाव्या इच्छाः प्रारब्धदोषतः । बुध्वापि

पापबाहुल्यादसंतोषो यथा तव ' । इत्यादि विद्यारण्यवचनात् ज्ञानंत्वविद्याविरोधि । नतत्कार्यविरोधिदग्धपटाभासस्य वन्हेरिव । ततो ज्ञानेन सर्वत्रब्रह्मबुध्यापि अन्नदर्शनक्षुदुद्भववत् स्त्रीषु कामस्संभावितुं शक्यते । मातृबुद्धिस्तु कामविरोधिनी । अतः सर्वासु स्त्रीषु मातृबुद्धिर्विधीयते । तदपि तस्या जीवकोटिनिविष्टत्वात् जीवोपासनायाश्च वेदे निषिद्धत्वात् । योषित्समष्ट्युपहितचैतन्यतयाऽम्बाबुद्धिरेव सर्वासु स्त्रीषु विधीयते । यद्यपि सर्वदेवसमन्वयस्य गुरोः शिष्यस्य परमाराध्यत्वादितराराधनानपेक्षा, तदपि साधकानां गुरोरभिगमनात् प्रागेव कामाद्युपहत्यै स्त्रीष्वंबाबुद्धेः सप्रयोजकत्वात् । सिद्धानांच गुर्वसन्निहिते स्त्रीणांच सन्निहिते मोहसंभवात् । तन्निवृत्तयेऽम्बाबुद्धिर्विधीयत एव । ' पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामह'इति भ्रियवचनात्सिद्धम् ।

अर्थः—सर्व स्त्रियांचे ठिकाणीं अंबाभावना करणें हा उपासनेचा भाग असल्यामुळें व ब्रह्मनिष्ठांची सर्वत्र ब्रह्मबुद्धि झाली असल्यामुळें त्यांना उपासनेची आवश्यकता नाहीं. ह्मणून ब्रह्मनिष्ठांना सर्व स्त्रियांचे ठायीं अंबाबुद्धि करण्याचे प्रयोजन नाहीं, अशी जर तुझ्या मनांत शंका येत असेल तर ती करूं नको. आतां "ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्" ह्मणजे ज्या अर्थी ब्रह्मदृष्टिच उत्कृष्ट आहे, त्या अर्थी कोणतीही उपासना करतांनां त्या ठिकाणीं ब्रह्मदृष्टि ठेवणें श्रेयस्कर आहे. कारण उत्कृष्ट वस्तूचे ठिकाणीं निकृष्ट भावना केल्यास दोष येतात. उदाहरणार्थ :—एखादा क्षत्रिय पाहिला तर त्याचे ठिकाणीं निकृष्ट भावनारोप केल्यास कदाचित् तो राजा टरून त्यापासून वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. परंतु तेंच त्यांचे टिकाणीं राजाचा उत्कृष्ट भावनारोप केल्यास तो शिपाई जरी असला तरी त्यापासून वाईट परिणाम होण्याचा मुळींच संभव नाहीं. ह्मणून उपासनामार्गानें सर्व स्त्रियांचे ठिकाणीं निकृष्ट अशी अंबाबुद्धि ठेवणेंच श्रेयस्कर आहे. आतां ब्रह्मबुद्धि सर्वांहून उत्कृष्ट असल्यामुळें प्रतीकाचे ठिकाणीं ती करणें इष्ट आहे. परंतु ब्रह्माचे ठिकाणीं प्रतीकभावना करणें मात्र इष्ट नाहीं. परंतु परमेश्वराचे ठिकाणीं मातृबुद्धि संभवत नाहीं. असें असतां व्रजगोपिकांनीं अनध्यस्तविवर्तरूप श्रीकृष्ण परमात्म्याचे ठिकाणीं

पतिभावना कशी केली, अशी जर शंका करशील, तर ती करूं नकोस. कारण एकवेळ महात्म्याज्ञान झाल्यानंतर मग निकृष्ट बुद्धि असली तरी बाध येत नाहीं व्रजगोपिकांची " सएवाहं " ह्मणजे श्रीकृष्ण परमात्मा व आह्मी दोन नसून एकच आहोंत, अशी अद्वैत-भक्ति सिद्ध असल्यामुळें त्याना महात्म्यज्ञान होतें हें सिद्ध आहे. ह्मणून गोपिकांची श्रीकृष्णाचे ठिकाणीं असलेली पतिबुद्धि व्यवहारिक श्रीकृष्ण हा एक सुंदर पुरुष आहे अशी भोगासक्तिमूलक नसून स्वसमानाधिकरण्याकरितां, ह्मणजे आह्मी स्त्रिया आहोंत, म्हणून परमात्म रूपानेंच परंतु श्रीकृष्ण परमात्मा हा आमचा पति आहे, अशाप्रकाचा श्रीकृष्ण व गोपिकांचा पतिपत्नीसंबंध होता. बरें, परब्रह्म-रूप अशा श्रीकृष्णाचे ठिकाणीं गोपिकांची पतिबुद्धिही निकृष्टभावना-त्मक आहे असें तूं मानशील तर ती जाराप्रमाणें होईल. आणि त्यांची भक्ति जाराप्रमाणें नव्हती असें ह्मणशील तर तुझें बोलणेंच खुंटतें. आणि " तत्राऽपि न माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः " " तद्विहीनं जाराणामिव " हीं भक्त्याचार्य श्रीनारदमहाराजांची दोन सूत्रें आम-च्याच ह्मणण्याला पुष्टि देतात. याच प्रमाणें नंदयशोदेची परमात्मा श्रीकृष्णाचे ठिकाणीं पुत्र भावना " ममैवासौ " ह्मणजे हा परमात्मा माझा आहे या भक्तिसिद्धि करितांच होती. असो. अंबेचे ठिकाणीं स्त्रीबुद्धि केल्यास कामादि विकार उत्पन्न होण्याचा संभव आहे व त्या मुळें मनुष्य पतित होतो. ह्मणून स्त्रियांचे ठिकाणीं अंबाबुद्धिच करणें इष्ट आहे. ती अंबाबुद्धि उपासनामार्गानेंच करावी लागते. कारण उपासना विक्षेपाचे विरोधी आहे. विक्षेप ह्मणजे अविद्येपासून उत्पन्न झालेल्या कामादि वासना. व त्या वासना ज्ञान झाल्यानंतर ही प्रारब्धानें क्षुधातृषा लागते त्याप्रमाणें उत्पन्न होण्याचा संभव आहे. ज्ञान झालें तरी प्रारब्धानें वासना उत्पन्न होतात. जसें ताप जास्त असल्यामुळें तुला ज्ञान होऊनही तूं असंतुष्टच आहेस. याप्रमाणें स्वामी विद्यारण्योक्ति आहे. ज्ञान हें अविद्येचा नाश करितें. परंतु अविद्याकार्य ज्या वासना त्यांचा करीत नाहीं. अग्नीनें पट ( वस्त्र ) जळून गेल्यानंतरही जसें वस्त्र भासमात्र राहतें त्या प्रमाणें

ज्ञान झाल्यानंतरही प्रारब्ध आहे तो पर्यंत वासना राहतात. ह्मणून ज्ञानानें सर्वत्र ब्रह्मदृष्टि झाल्यानंतरही अन्न पाहिलें असतां भूक लागते, त्याप्रमाणेंच स्त्रीदर्शनानें काम उत्पन्न होण्याचा संभव आहे. व स्त्रियांचे ठिकाणीं अंबाबुद्धि ठेवल्यास ती काम विकारांचा नाश करणारी आहे. ह्मणून सर्व स्त्रियांचे ठिकाणीं सर्वांनीं मातृबुद्धिच करणें इष्ट आहे. आतां स्त्रियांचे ठिकाणीं मातृभावना ही जीवोपासना होते व जीवोपासना ही वेदांत निषिद्ध सांगितली आहे ह्मणून सर्व स्त्रियांनां आश्रय असणाऱ्या चैतन्याचे ठिकाणीं लक्ष ठेऊन त्यांचे ठिकाणीं अंबाबुद्धि धारण करावी. शिष्याला सर्व देवतारूप श्रीगुरूच असतात. ह्मणून त्याला श्रीगुरूवांचून अन्य उपासना नाहीं. तथापि साधक दशेंत श्रीगुरूकडे जाण्यापूर्वीच कामादिविकारांचे निर्दलन करण्याकरितां स्त्रियांचे ठिकाणीं अंबाबुद्धि करण्याची आवश्यकता असते. व शिष्य सिद्ध झाला तरी गुरू जवळ नसले व स्त्रिया जवळ असल्या ह्मणजे मोह होण्याचा संभव आहे. तो होऊं नये ह्मणून सर्व स्त्रियांचे ठिकाणीं अंबाबुद्धि ठेवावी. "पिताऽहमस्य जगतो माताधाता पितामहः" या गीतेतील श्लोकांत माता शब्दानें मी सर्व जगाची आई आहें असें दर्शविल्यावरून सर्व स्त्रियांचे ठिकाणीं मातृबुद्धि केल्यास ईश्वराची उपासना होते. असें श्रीकृष्ण वचनावरून ही सिद्ध आहे.

एवमेतत्परानंदाद्भिर्व्यंजित: स्वाशय: स्फुट: ।
मातुर्भवद्‌र्थे विज्ञानंतूच्यते पुन: ॥ २३ ॥

या प्रमाणें आनंदाच्या भरांत मनांतील भाव स्पष्ट केला. आतां आईकरितां व तुमचे करितां पुन: ज्ञान सांगतों.

॥ वसंततिलकाश्लोक ॥

दैवीगुणत्रयमयीयमनाद्यविद्या ।
तत्क्षोभतोमहदहंकृतिरेवतस्मात् ।
तन्मातृकाण्युभयमिंद्रियमाभिमान्यात् ।
तन्मातृकाद्भवति पंचकभूतसर्ग: ॥ २४ ॥

न घडून येणाऱ्या गोष्टी घडवून आणण्यामध्यें कुशल व सत्व, रज, तम हे तीन गुण जिच्यांत सारखे आहेत अशी व कोणाचे

कार्य नसल्यामुळें जी कोणापासून उत्पन्न झाली नाहीं म्हणून अनादि, आणि ब्रह्मज्ञानानें जिचा नाश होतो अशी अविद्या असून तिच्या मध्यें गुणांचा न्यूनाधिकपणा होतो तेव्हां महत् म्हणजे बुद्धि उत्पन्न होते व पुढें बुद्धि पासून अहंकार उत्पन्न होतो. अहंकारापासून शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादि पंचतन्मात्रा, मन व पांच ज्ञानेंद्रियें ( श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण ) आणि पांच कर्मेंद्रियें ( वाक्, पाणि, पाद, पायु, उपस्थ, ) हीं उत्पन्न होतात. आणि पंचतन्मात्रांपासून पंचमहाभूतें पृथिव्यादि पांच स्थूलभूतें उत्पन्न होतात,

**वसंततिलकाश्लोक**–गंधाद्धरांबुरसतोऽग्निजानिर्हि रूपात् ।
स्पर्शान्मरुद्भवति पुष्करजन्म शब्दात् ॥
तेभ्यो हरीक्षणवशात्प्रभवन्तिलोकाः ।
कर्मानुगगृहसमाः सुरमानवाद्याः ॥ २५ ॥

गंधापासून पृथ्वि, रसापसून जल, रूपापासून अग्नि, स्पर्शापासून वायु, व शब्दापासून आकाश उत्पन्न झालें. व या पंचमहाभूतांपासून ईश्वराच्या ईक्षणमात्रेंकरून सर्व लोकांची उत्पत्ति झाली व आपआपल्या कर्मानुसार भोग भोगणाऱ्या जीवांनां राहण्याकरितां घराप्रमाणें देव, मानव, पशु इत्यादि देह उत्पन्न झालें.

**वसंततिलकाश्लोक**–सत्वप्रधानविबुधा रजसो मनुष्याः ।
पश्वादयस्तमस उन्नतभावबद्धाः ॥
सर्वेऽविवेकवशतो निजकप्रमत्ताः ।
आयान्ति यान्ति विषयांधदृशो भवाब्धौ ॥ २६ ॥

त्यांत सत्वगुण जास्त असलेले देव झाले, रजोगुण जास्त असलेले मनुष्य झाले, व तमोगुण जास्त असलेले पशु, पक्षी, वृक्ष, पाषाणादि झाले. व हे सर्वच बद्ध आहेत. कारण यांनां विवेक नसल्यामुळें आपआपल्या आत्मसुखास चुकून विषयानें आंधळे झाल्यामुळें या जन्ममरणरूप संसार समुद्रांत पुनः पुनः मरतात व जन्मतात.

**गद्यः**—अत्रहि सूत्रं भवति । सत्वरजस्तमसो साम्यावस्था प्रकृतिः । प्रकृतेर्महान । महतोऽहंकारः । अहंकारात् पंचतन्मात्राण्युभयमिंद्रियंच । पंचतन्मात्रेभ्यःस्थूलानि भूतानि । पुरुषइति पंचविंशति-

र्गण: । तत्रप्रधानमकार्यम् । बुध्यहंकारपंचतन्मात्राणि कार्यं कारणंच । यथा प्रधानस्य कार्यं बुद्धि:अहंकारस्य कारणम् । एवंअहंकारोऽपि बुद्धे:कार्यं, पंचतन्मात्रोभयेंद्रियाणां कारणम् । स्थूलभूतान्युभयमिंद्रियंच । षोडशकोगण: कार्यमेव । पुरुषस्तु कार्यं नवा कारणमितिविवेक: सांख्यानाम् । असंगोहीत्यादि श्रुते: । अत्रच ईश्वरोमिलित्वा षड्विंशतिर्गणो योगशास्त्रे । अत्रचयो विरूद्धांशोऽस्तिस इत्थं । सांख्यशास्त्रे निरीश्वरत्वं पुरुषस्य बहुत्वं श्रुतिविरुद्धं । कुत: नहुत्वसंख्यायां द्वयोर्द्वयो: पुरुषयोर्मध्येदेशोऽपेक्ष्यते । नहिदेशं विनासंख्या संभवति । आकाशं विना देशोऽपि न सिध्यति । आकाशस्यच प्रकृतिकार्यत्वं । तेन पुरुषस्य कार्योपजीवित्वंस्यात् । पुरुषबहुत्वनित्यत्वविवक्षायां तदवकाशदातुराकाशस्य नित्यत्वापत्ति: । नित्यत्वेऽकार्यत्वापत्ति: । अकार्यत्वे कापिल प्रतिज्ञाहानि: । तस्मान्नह्येतत्सम्यक् कल्पनम् । एवं योगशास्त्रेऽपि कल्पित: परमेश्वर: वेदान्तवच्चेन्नविरुध्यते । सांख्यवच्चेत् पूर्वोक्तदोषैरभिभूतो विरुद्धयते । ईश्वरप्रकृत्योर्मध्ये देशोऽस्ति नास्तिवा ? अस्तिचेदीश्वरस्य परिच्छिन्नत्वं । नास्तिचेदेकस्मिन्देशे समानपदार्थानेकत्वाभवात्प्रकृते: स्थूलत्वं महत्वीयं । स्थूलत्वे अवयवित्वं । अवयवित्वे संयोगविभागवत्वं तथात्वेच उत्पत्तिनाशापत्ति: एवंईश्वरपुरुषयोर्मध्येऽपि दोषा: । एतन श्रुतियुक्त्यनुभवविरुद्धं सांख्यं, योगशास्त्रंच यस्मिन्नंशे तत्तत्र अनादरणीयमेव ।

**अर्थ:**—याविषयीं सूत्र प्रमाण सांगतों. सत्व, रज, तम या तीन गुणांची समानावस्था प्रकृति आहे. प्रकृतीपासून बुद्धि उत्पन्न होते; बुद्धिपासून अहंकार, व अहंकारापासून शद्ब, स्पर्श, रूप, रस, गंध ह्या पंचतन्मात्रा व वाक् पाणि, पाद, पायु, उपस्थहीं पांचकर्मेंद्रिये व श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें असा उभय इंद्रियगण व मन उत्पन्न होतें. व शद्बादि पंचतन्मात्रांपासून आकाशादि पंचमहाभूतांची उत्पत्ति होते. याप्रमाणें एक प्रकृति, एक बुद्धि, एक अहंकार व त्यापासून उत्पन्न होणारीं पंचतन्मात्रा, दहा इंद्रियें, एक मन व पंचतन्मात्रापासून उत्पन्न होणारीं

पांच स्थूलभूतें अशीं एकंदर चोवीस व एक पुरुष या प्रमाणें पंचवीस तत्वांचा समुदाय आहे. येथें प्रधान ह्मणजे प्रकृति, ही कोणाचेंच कार्य नाहीं. बुद्धि, अहंकार व पंचतन्मात्रा हें पुढच्याचें कारण असून माग-च्याचें कार्य आहे. जसें बुद्धि प्रधानाचें कार्य असून अहंकाराचें कारण आहे, त्याप्रमाणें अहंकार हा बुद्धीचें कार्य असून पंचतन्मात्रा व उभय इंद्रियें यांचें कारण आहे व पांच स्थूलभूतें दहा इंद्रियें व एक मन अशीं सोळा फक्त कार्यरूप असून हीं कोणाचें कारण नाहींत. पुरुष हा कोणाचें कार्यही नाहीं व कारणही नाहीं. याप्रमाणें सांख्यशास्त्रोक्त विचार आहे. यांत पुरुष असंग आहे अशा अर्थाची श्रुति प्रमाण आहे. या वरील पंचविसांत एक ईश्वर मिळविला ह्मणजे योग शास्त्रांतील २६ तत्वांचा समुदाय होतो. सांख्य व योगशास्त्रांत जो श्रुतिविरुद्ध भाग आहे तो असा. सांख्यशास्त्री पुरुष अनेक मानतात व ईश्वर मानीत नाहींत हें त्यांचें मत वेदविरुद्ध आहे, कारण पुरुष अनेक मानल्यामुळें व्यक्ति मानावी लागते. व दोन व्यक्तीमध्यें जागा असलीच पाहिजे. कारण जागा असल्याशिवाय व्यक्ति मोजतां येणें शक्य नाहीं व आकाशाशिवाय जागा राहूं शकत नाहीं. आकाश हें प्रकृतीपासून उत्पन्न झालें आहे. त्यामुळें पुरुषास कार्यावलं-बित्व येतें. पुरुष नित्य अनेक असल्यामुळें त्यांची नित्य–अनेकता राखण्याकरितां आकाशही नित्यच मानलें पाहिजे, व आकाश नित्य मानलें तर त्याची उत्पत्ति संभवत नाहीं. परंतु शद्बगुण तन्मात्रेपासून आकाशाची उत्पत्ति कपिलाचार्यांनीं मानली आहे ह्मणजे या ठिकाणीं त्यांचेंच बोलणें त्यांनीं खोडलें आहे. ह्मणून ही नित्यपुरुषबहुत्वाची कल्पना बरोबर नाहीं. याप्रमाणें योगशास्त्रांतील ईश्वर जर वेदांतांतील ईश्वराप्रमाणें असेल तर वेदांताशीं कांहीं विरोध नाहीं. परंतु सांख्या-प्रमाणें ते मानीत असतील तर पूर्वोक्त दोष येऊन विरोध येतो. कारण त्यांना आह्मी असें विचारितों कीं ईश्वर व त्याहून भिन्न प्रकृति हीं जर नित्य भिन्न आहेत तर त्यांच्या मध्यें देश आहे किंवा नाहीं ? जर देश आहे असें ह्मणाल तर प्रकृतिकार्य-आकाशानें तो मर्यादित होईल; देश मानित नसाल तर, समान आकाराचे दोन पदार्थ एकाच वेळीं एकाच

ठिकाणीं राहूं शकत नाहींत. ह्मणून प्रकृति स्थूल मानावी लागेल, व प्रकृति स्थूल मानली ह्मणजे तिला अवयव मानावे लागतील, व अवयव मानले ह्मणजे त्यांचा संयोग व विभाग मानावा लागेल, व तसें मानलें ह्मणजे तिला उत्पत्ति व नाश मानावे लागतील. याप्रमाणें ईश्वर व पुरुष यांचा नित्य भेद मानल्यास हेच दोष येतात. याप्रमाणें सांख्य व योगशास्त्रांत श्रुति, युक्ति, व अनुभव यांच्या विरुद्ध जे भाग आहेत ते त्यांतून अवश्य वगळले पाहिजेत.

पृथ्वी श्लोकः—श्रुतेःपदसमाश्रित प्रबलपक्ष विक्षिप्तभा ।
विमूढयति योगिनः कपिलकाः कणादादयः ।
पतन्ति भवसागरे भवयथार्थताजल्पिनो ।
वृथा तदुपघोपणं समपहाय वेदं भज ॥ २७ ॥

श्रुतींच्या चरणाचा आश्रय ज्यांनीं केलेला आहे अशा बलवंतांनीं ज्यामूर्खांचें तुटपुंजें ज्ञान नष्ट केलें ते मूढमति न्याय, वैशेषिक, सांख्य, व्याकरण, योग हा संसारच खरा आहे असें ह्मणणारे या संसारांतच पडतात; ह्मणून तूं त्यांच्या ह्या मिथ्या बडबडण्याकडे लक्ष न देऊन वेदाचाच आश्रय कर.

गद्यः—वेदान्तेतु इयं योजना । पुरुषः एकः ब्रह्मरूपः । प्रकृति मृगजलवत् विषमसत्तात्मिका अनादिरविद्या । तदुपहितं ब्रह्म ईश्वरः । तत्प्रतिबिंबितं ब्रह्म जीवः । प्रकृतिश्च सकार्या ईश्वराधीना । यावज्ज्ञान-नित्या । अन्यत्सर्वं समंजसं । सांख्यं योगंच यथोपयोगितया प्रदृश्यते ।

अर्थ—वेदांतांतील योजना अशी आहे. वेदान्तांत ब्रह्मरूप एकच पुरुष आहे. अनादि अविद्यारूप त्रिगुणात्मक प्रकृति सूर्याचे ठिकाणीं मृगजलाप्रमाणें विषमसत्तात्मक आहे. कोणत्याही वस्तूस सत्ता असलीच पाहिजे. ह्या सत्ता तीन आहेत. पारमार्थिकी सत्ता, व्यावहारिकी सत्ता, व प्रातिभासिकी सत्ता. समसत्तेंतील कोणतेही परस्पर विरोधी दोन पदार्थ एका ठिकाणीं राहूं शकत नाहींत. उदाहरणार्थ अग्नि व जल, या दोहोंची व्यावहारिकी सत्ता असल्यामुळें ते एकाच वेळीं एकाच ठिकाणीं राहूं शकत नाहींत. परंतु तेच विषम सत्तेंतील असले तर एके ठिकाणीं राहूं शकतात. उदा० सूर्य व मृगजल. सूर्याची व्यावहारिकी

सत्ता, व मृगजलाची प्रातिभासिकीसत्ता आहे; ह्मणून हे एकाच वेळीं एके ठिकाणीं राहूं शकतात. ब्रह्माची पारमार्थिकी सत्ता असून अनादि अविद्येची व्यावहारिकी सत्ता आहे. या अनादि अविद्येस आश्रयभूत ब्रह्मास ईश्वर ह्मणतात, व इच्या ठिकाणीं पडलेल्या प्रतिबिंबरूप ब्रह्मास जीव ह्मणतात. प्रकृतिही आपल्या कार्यासह ईश्वराधीन आहे व ब्रह्मज्ञान होईपर्यंत ही प्रकृति नित्य आहे. इतर सर्व सांख्याप्रमाणेंच समजावें. श्रुत्यनुकूल सांख्य व योग उपयोगानुसार पुनः सांगतों.

आत्मभेदोजगत्सत्यमीशोन्य इतिचेत् त्रयम् ।
त्यज्यते तैस्तदा सांख्ययोगवेदान्तसम्मतिः ॥

इति विद्यारण्योक्तेः ।

पुरुष अनेक आहेत, जग खरें आहे व ईश्वर सर्वांहून निराळा आहे हे तीन भाग जर सांख्य व योग यांतून काढून टाकले तर सांख्य व योग वेदान्ताशीं बरोबर जुळतात असें विद्यारण्य स्वामींनी पंचदशींत सांगितलें आहे.

माया कार्यानुमेयास्यात्सा जडैव प्रकीर्त्यते ।
पुरुषश्चेतनो ज्ञेयस्तद्विवेकोऽपवर्गदः ॥ २८ ॥

प्रकृति ही कार्यावरून कळणारी असून ती जड आहे, पुरुष चेतन आहे आणि प्रकृति व पुरुष या दोहोंचा विवेक केला असतां मोक्ष होतो.

विकारान्प्रति जानाति बुध्यन्तान्कार्यकारणान् ।
प्रसिद्धोऽतो विवेकोसावल्पोक्तेः फलवान्भवेत् ॥ २९ ॥

या सर्व विकारांचा कार्यकारणसंबंध बुद्धीपर्यंत थोड्या शद्बानें ह्मणजे सर्व शास्त्राध्ययनानें कळतो.

मायापुंसोरविवेको नाल्पशब्दान्निवर्त्तते ।
अतस्तदर्थमेवाऽत्र शास्त्रं शास्त्रविनिर्मितं ॥ ३० ॥

परंतु प्रकृति व पुरुष यांचा झालेला अविवेक मात्र अल्पशद्बानें ह्मणजे सर्व शास्त्रांच्या अध्ययनानें जात नसून त्याकरितां गुरूपदिष्ट शास्त्रांचीच आवश्यकता आहे.

इच्छाक्रियादिकं सर्वं प्रकृतेर्न नरस्यहि ।
तस्य तु ज्ञानमात्रत्वादकर्तृत्वंहि सिद्ध्यति ॥ ३१ ॥

इच्छा, क्रिया इत्यादि सर्व प्रकृतीचेच ठिकाणीं असून पुरुषास नाहींत. कारण त्या पुरुषाचें ज्ञान झालें असतां तो अकर्ता आहे असें कळतें.

व० ति० श्लोकः—कर्ता क्रियासमय एव विपद्यतेऽयं ।
भोक्तापि भोगसमयेऽहमिति प्रपन्नः ॥
धर्माविमौ प्रकृतिकौ न विरोधतोऽस्यै—
कात्मत्वतस्त्विति विविच्य विमोक्ष्यसेऽकात् ॥ ३२ ॥

क्रिया करण्याचे वेळीं हा जीवात्मा स्वतःस कर्ता समजतो व भोगकालीं मी भोक्ता आहें असें समजतो. प्रकाश व अंधकाराप्रमाणें कर्तृत्व व भोक्तृत्व हे दोन्ही धर्म परस्पर विरोधी आहेत. परस्पर विरोधी धर्म एकाच वस्तूचे ठिकाणीं नसतात. म्हणून ते प्रकृतीचेच आहेत पुरुषाच्या ठिकाणीं नाहींत. कारण पुरुष हा सत्य व सर्वत्र एकच असल्यामुळें परस्पर विरोधी धर्म त्याचे ठिकाणीं राहूं शकत नाहींत. असा विचार केल्यानें तूं दुःखापासून मुक्त होशील.

न यः कर्त्ता स नो भोक्ता मुक्तः साक्षी चिदन्वयः ।
एतावन्मात्रमेवात्र सांख्यशास्त्रात्समाश्रयेत् ॥ ३३ ॥

जो कर्त्ता नसतो तो भोक्ताही असूं शकत नाहीं. म्हणून हा परमात्मा कर्त्ता व भोक्ता नसून नित्यमुक्त साक्षिरूप चैतन्यघन व अक्षय असा आहे. येवढ्या पुरताच सांख्य शास्त्राचा आश्रय करावा.

योगशास्त्रेतु चित्तस्य ब्रह्मणि स्थापनायच ।
कथितं भूमिकानांहि पंचकं अवधीच्छया ॥ ३४ ॥

योग शास्त्रामध्यें ब्रह्माचे ठिकाणीं चित्त स्थिर करण्याकरितां चित्ताच्या पांच भूमिका सांगितल्या आहेत. त्या अशा——

गद्यः——मूढक्षिप्तविक्षिप्तैकाग्रनिरुद्धाःपंच चित्तभूमयः । मूढ भूमौ तमोतिशयाज्जडवच्चित्तं तिष्ठति । तच्च मनुष्याणां निद्रामूर्छामरण कालेषु । प्रस्तरादिस्थावराणां तु सर्वदैव । क्षिप्तायां रजोविशेषात् चित्तमितस्ततो भ्रमति । तच्च मनुष्याणां स्त्र्यादिचिंतनसमये । पशुप-

क्षिकीटकादीनां सर्वदैव । एतयोर्मूढक्षिप्तयोर्मध्ये योगस्य गंधोऽपि न स्यात् । विक्षिप्तायां रजःप्रधानसत्वोपसर्जनायां कस्मिंश्चित् काले स्थैर्यदर्शनाद्योगगंधो दृश्यते । तथापि तस्या अनधीनत्वाद्विवेकिनो विक्षेप पक्षे निक्षिपन्ति । एतद्विक्षिप्तं चित्तं मनुष्याणां प्रमोदसमये । यक्षगंधर्वादीनां सर्वदैव । एकाग्रभूमौ चित्तं सर्वविषयरहितं अस्मितामात्रेण तिष्ठति । तच्च ब्रह्मलोकस्थानां मुनीनां सर्वदैव । मनुष्याणां संप्रज्ञातसमाधिसमये । निरुद्धं चित्तं सर्वसंस्कारापेक्षारूपेण प्रत्ययैकमात्रतया सत्वादि गुणानामपि वैराग्यभावेनावस्थीयते । तदा विवेकख्यातेः पुरुषः स्वंभिन्नमभिजानाति । एषा स्थितिः सर्वेषामसंप्रज्ञातसमाधिसमये । तथापि विवेकजागृतेर्वृत्तित्वात् वृत्तिसत्वे द्वैतापत्तिः । तथात्वेच परिच्छिन्नत्वम् । अतऊर्ध्वं मिथ्यावस्तुषु प्रकृत्यादिषु ब्रह्मैकान्वयबोधनाय वेदान्ताश्रयणं श्रेयः । तदपि विवेकोपसर्जनज्ञानमुख्यत्वेन निरूप्यते ।

**अर्थ:—** मूढ, क्षिप्त, विक्षिप्त, एकाग्र, निरुद्ध. मूढ भूमिकेचे ठिकाणीं तमोगुण प्रबल असल्यामुळें येथें चित्त जडाप्रमाणें राहतें. ही मूढावस्था मनुष्यांचे ठिकाणीं निद्रा, मूर्छा व मरणकालीं रहात असून पाषाणादिकांचे ठिकाणीं नेहमीं असते. क्षिप्तभूमीचे ठिकाणीं रजोगुण विशेष असल्यामुळें चित्त चंचल असून इकडे तिकडे भटकत असतें. ही क्षिप्तावस्था मनुष्यांचे ठिकाणीं स्त्र्यादि विषय चिंतनकालीं रहात असून पशु, पक्षी, कीटकादिकांचे ठिकाणीं नेहमीं असते. या मूढ व क्षिप्त भूमिकेमध्यें योगाचा गंधही नसतो. विक्षिप्त भूमीचे ठिकाणीं रजोगुण विशेष असून सत्वगुणाकडे वृत्ति असल्यामुळें कधीं कधीं चित्त स्थिर होत असतें. त्यामुळें या ठिकाणीं योगाचा संस्कार क्वचित् वेळीं दृष्टीस पडतो. तथापि ती भूमिका रजोगुणविशिष्ट असल्यामुळें चंचल आहे. ह्मणून विचारी पुरुष या भूमिकेस वेडेपणांतच वालतात. ही अवस्था मनुष्याचे ठिकाणीं आनंदाचे वेळीं रहात असून यक्षगंधर्वादिकांचे ठिकाणीं नेहमीं असते. एकाग्र भूमिकेचे ठिकाणीं चित्त सर्वविषयरहित होऊन केवळ "मी आहें" याच अनुभवानें असतें. ही अवस्था ब्रह्मलोकांत राहणाऱ्यांनां व मुनींनां सर्वदा रहात असून मनुष्यांनां संप्रज्ञातसमाधिकालीं असते. निरुद्ध

भूमिकेचे ठिकाणीं चित्त सर्व-संस्कारावद्दल उदासीन असून व सत्वगुण देखील आवडत नसल्यामुळें केवळ प्रतीतिमात्रच असतें. अशावेळीं विवेकानें पुरुष, "मी सर्वांहून निराळा आहें" हें जाणतो. संप्रज्ञातसमाधीमध्यें सर्वांनां ही स्थिति असते. परंतु या ठिकाणीं मी चेतन असल्यामुळें सर्वांहून भिन्न आहें असा विचार जागृत असल्यामुळें वृत्ति असते. व वृत्ति आहे तोंपर्यंत द्वैत आहे, व द्वैत मानलें ह्मणजे आत्म्याला मर्यादा येते. ह्मणून यापुढें मिथ्या प्रकृत्यादिकांचे ठिकाणीं देखील ब्रह्मच ओतप्रोत भरून राहिलें आहे असें ज्ञान होण्याकरितां वेदांताचा आश्रय करणें हितावह आहे. परंतु तो वेदान्त देखील असा पाहिजे कीं ज्यांत ज्ञान मुख्यत: सांगितलें असून जरूरी पुरता विवेक आहे. आतां मी अशा प्रकारचेंच निरूपण सांगतों.

**पृथ्वी श्लोकः**—अलंदिपतिपादगांगजलमज्जना: सज्जना: ।
भवांबुधिपरांतगाम्परमशान्तिमायान्ति ते ॥
तदीयपदपांसुनामहमहर्निशं रागवान् ।
उपात्तमतियोग्यतालिखितमेतदुत्कृष्टखे ॥ ३५ ॥

आळंदीचे राजे श्रीज्ञानेश्वर महाराज त्यांचे पाय हीच भागीरथी तिच्यामध्यें स्नान करून पुनीत झालेले संत हा संसारसमुद्र तरून जाऊन त्याच्या पलीकडे असणाऱ्या मोक्ष सुखाला मिळाले. त्यांच्या पायांच्या धुळीचे ठिकाणीं अत्यंत प्रीती करणारा असा मी त्यांच्या पासूनच मिळालेल्या ज्ञानाधिकारानें हें उत्कृष्ट पुढील पत्र लिहितों.

**पृथ्वी श्लोकः**—नमोऽस्तु यमुनामतिप्रणत वत्सलां मातरं ।
मदर्थमनुरागतो हृदि पयो यया धार्यते ॥
उमे तव पदाम्बुजे मम भवत्वनन्या मति- ।
र्यथात्वयितथास्तुमे युवतिजातिमायांचितौ ॥ ३६ ॥

अत्यंत करुणावत्सल अशा माझ्या यमुनाआईला नमस्कार असो. केवळ मजवर असलेल्या पुत्रवात्सल्यप्रेमामुळेंच आईनें माझ्या करितां हृदयांत दूध धारण केलें आहे. अंबिग ! तुझ्या ठिकाणीं असलेली माझी अंबाबुद्धि मला ज्ञानप्रद होवो. व ज्याप्रमाणें तुझ्या ठिकाणीं

माझी अंबाबुद्धि आहे तशीच सर्व स्त्रीजातीचे ठिकाणीं माझी अंबाबुद्धि होवो.

**शालिनी श्लोकः–** ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानि र्नान्यः पन्थाश्चेति भूयो वचोभिः । बंधोऽज्ञानाद्वासनाकर्मयोगाज्ज्ञानान्मुक्तिः कर्मणः कुत्र चिन्नो ॥ ३७ ॥

परमात्म्याचें एकवेळ ज्ञान झालें ह्मणजे सर्व बंध निवृत्त होतात. यावांचून दुसरा मार्ग बंधनिवृत्ति होण्याकरितां नाहीं. अशा अर्थाच्या अनेक श्रुति आहेत. हा संसाररूपी बंध, वासना, कर्म व अज्ञान ह्यांपासून उत्पन्न झाला आहे. ह्मणून ज्ञानानेंच मुक्ति होते, कर्मानें कधींही होत नाहीं. कारण कर्म अज्ञानाचें कार्य असल्यामुळें त्याच्याशीं विरोधी नाहीं. ज्ञान अज्ञानाच्या विरोधी असल्यामुळें त्यानेंच अज्ञानाची निवृत्ति होते. धर्मादिकहि कर्मांतच येतात.

**शालिनी–** श्रुत्या युक्त्या स्वानुभूत्या गुरूक्त्या ।
ब्रह्मज्ञानं जायते शुद्धबुद्धौ ॥
कृष्णप्रीत्या युक्तनीत्या विरक्त्या ।
जीवन्मुक्त्यै रक्षितव्यं बुधैस्तत् ॥ ३८ ॥

**अर्थ–** श्रुतींनीं, युक्तींनीं, आपल्या अनुभवानें व सद्गुरूपदेशांनीं शुद्धबुद्धीचे ठिकाणीं ब्रह्मज्ञान उत्पन्न होतें. ज्ञानी पुरुषानें श्रीकृष्णभक्तिकरून व योग्य नीतीच्या मार्गानें वागून व विरक्ति धारण करून जीवन्मुक्ति मिळविण्याकरितां त्या ज्ञानाचें संरक्षण केलें पाहिजे. ( या श्लोकांतील विरक्त्या ह्मणजे विषयांची तृष्णा नाहींशी होणें या शब्दानें अपर वैराग्य सांगितलें आहे. )

**इंद्रवज्रा**–भक्त्यैकया माधवसात्म्य योगाद्विक्षेपनिर्वृत्तिपराद्विरागात् । गुरोरुपास्त्या निगमांतवाक्यात्संचिन्तयेद्ब्रह्मतयात्मरूपम् ॥ ३९ ॥

श्रीकृष्ण परमात्म्याचे ठिकाणीं "तो व मी भिन्न नाहीं" अशी एकात्मता भक्ति केल्यानें व सद्गुरूच्या उपासनेनें मनांतील सर्व विक्षेप नाहींसे झाल्यावर उत्पन्न झालेल्या परवैराग्यानें व वेदांत सांगितलेल्या महावाक्यानें 'मी ब्रह्मच आहें' असें चिंतन करावें.

[ या श्लोकांतील परांद्विरागात् ह्मणजे सत्वादि गुणांचीही आवडी नाहींशी होणें या शब्दानें परवैराग्य सांगितलें आहे. ]

भुजंगप्रयात– विवेकात्पृथक्कृत्य चिज्जाड्यसंगात् ।
जडं सर्वमेतत्परित्यज्य मातः ॥
अखंडैकतत्वं चिदेवाश्रयेत ।
तमेतं[1] विवेकप्रकारं[2] प्रवक्ष्ये ॥ ४० ॥

विचारानें जडापासून चेतन भिन्न करून आई ! या सर्व जडाचा त्याग करावा. आणि अखंडैकरसरूप असें जें सच्चिदानंदपद त्याचाच आश्रय करावा. आतां हा विचार कसा करावा तें सांगतों.

पृथ्वी श्लोकः—भवोऽयमविबोधजस्त्वहिरबुद्धरज्जाविव ।
प्रयाति शयनं परं निगमसिद्धबोधाद्वयात् ॥
यतो जनिलयादयो जगतिमायायाऽऽत्तस्य तत् ।
चिदस्ति न जडं भवेत्परमपारतंत्र्यत्वतः ॥ ४१ ॥

न दिसलेल्या दोरीवर ज्याप्रमाणें सर्पाभास होतो त्याचप्रमाणें ब्रह्म न दिसल्यामुळें हा संसार भासतो. वेदांत सिद्ध असलेल्या अद्वैतज्ञानानें ह्या अज्ञानमूलक संसाराचा नाश होतो. मायेनें भासणाऱ्या जगाचे उत्पत्ति, स्थिति, लयादि ज्यापासून होतात तें चेतनच असलें पाहिजे. दगडाप्रमाणें जड असूं शकत नाहीं. कारण जड हें सर्वदा परतंत्र असतें. त्याला चैतन्यावांचून कांहींच करतां येत नाहीं. आणि म्हणूनच सांख्यादिकांप्रमाणें जगाचें कारण जी अविद्या ती वेदान्तांत खरी घेतली नाहीं; मिथ्याच घेतली आहे. या ठिकाणीं हें रहस्य आहे कीं ज्याप्रमाणें रज्जूवर भासणारा सर्प रज्जूचे ठिकाणीं मुळींच नसतो व आपल्या भ्रांतीनेंच तो उत्पन्न होतो, त्या प्रमाणें संसार जरी ब्रम्हाचे ठिकाणीं भासतो तरी तो मायेनेंच उत्पन्नच होतो. परंतु रज्जु आधार असल्याशिवाय ज्याप्रमाणें आपल्या भ्रांतींत सर्प उत्पन्न होत नाहीं त्याप्रमाणें ब्रह्माचा आधार घेतल्याशिवाय नुसत्या मायेला हें जगत् करतां येत नाहीं.

---

१–तं परोक्षं तत्पद गोचरम् । २–एतम् अपरोक्षत्वंपदगोचरम् ।

पृथ्वी श्लोकः—तदेव हरिरीश्वरः शिवशिवा गणेशा रवि ।
स्तदेव निगमस्तुतं मुनिधियाऽपि संसेवितम् ॥
तदेव हृदि राजते सुखमखंडमेकं महत् ।
त्वमप्ययि तदात्मिका निजमनस्तमस्ताडय ॥ ४२ ॥

त्या चैतन्यालाच वैष्णव हरि ह्मणतात व वैदिक ईश्वर ह्मणतात, शैव शिव ह्मणतात, शाक्त शक्ति ह्मणतात, गाणपत्य गणपति ह्मणतात, व सौर सूर्य ह्मणतात. वेदांनीं ज्याची स्तुति केली आहे व ज्याचें लोक नित्य ध्यान करितात असा एकच परमात्मा सच्चित्सुखस्वरूप असून सर्वांच्या हृदयांत वास करितो; व आई तूंही सच्चिदानंदस्वरूपच आहेस असें समजून तुझ्या मनांत वास करणारा अज्ञानांधःकार नाहींसा कर.

मालिनीः—जननिजनकबंधुकान्तकान्तादिभावो ।
न भवति जडदेहे प्रेततायामदृष्टेः ॥
न पवनसमुदाये वायुमात्रेऽप्यदृष्टे-
र्यदि मनसि भवेत्कल्पितत्वाद्वृथासौ ॥ ४३ ॥

आई, बाप, भाऊ, नवरा, बायको इत्यादि संबंध आपल्या जड शरीराचे ठिकाणीं राहूं शकत नाहींत कारण मृत झाल्यावर हें शरीर कायमच असतें. पण मृत शरीरांत हे संबंध लावतांनां आपण कोणासही पाहत नाहीं. बरें हा संबंध प्राणाच्या ठिकाणीं आहे असें ह्मणशील तर प्राण हा वायु असून वायूचे ठिकाणीं हा संबंध लावतांनांही आपण कोणास पहात नाहीं. कारण वायु बाहेर दिसतो व आत्यांत ही असतो. त्याला आपण आई, बाप, भाऊ इत्यादि ह्मणत नाहीं. आतां मनाशीं हा संबंध आहे असें ह्मणशील तर मन कल्पनात्मक असल्यामुळें हा संबंधही कल्पिलेलाच असला पाहिजे. व कल्पित वस्तु खोटी असते. ह्मणून मनाशीं मानलेला हा पतिपत्न्यादि संबंधही खोटाच असला पाहिजे असें सिद्ध होतें.

मालिनीः—इह न भवति जीवेप्यन्यजन्मन्यदृष्टे
र्न भवति परमार्थे सर्वदैकात्मतायाम् ॥
वद वद जननि त्वं स्थानमप्यस्ति कुत्र ।
इति मनसि विचार्य त्यक्तचिन्ता भव त्वम्॥ ४४ ॥

याप्रमाणें या जन्मांतही जीवाचे ठिकाणीं हा संबंध लागूं शकत नाहीं व दुसऱ्या जन्मांतील आपणास कांहींच दिसत नसल्यामुळें तेथें-लागू होत नाहीं, आणि परमार्थांत तर सर्वत्र सर्वदा एक सच्चिदानंद-स्वरूप ब्रह्मच असल्यामुळें तेथें तर मुळींच संभवत नाहीं तर मग आई ! सांग सांग बरें हा संबंध कोठें आहे तो ? याचा मनानें चांगला विचार करून आई ! सर्व चिन्ता सोडून देऊन समाधानरूप शांत रहा.

कल्पितत्वे नवस्थानमनवस्थानतो मृषा ।
अतोऽस्यानादरेणैवमात्मानंपरिपालय ॥ ४५ ॥

आई, बाप, भाऊ, नवरा, बायको इत्यादि संबंध कल्पनामात्र असल्या कारणानें याला कांहींएक आधार नाहीं. व याला आधार नसल्यामुळें याचें अस्तित्व खोटें आहे. कारण ज्याला आधार नाहीं तें आहे कशावरून ? ह्मणून याचा त्याग करून आत्मचिंतन करून रहावें.

आत्मार्थं हि परप्रेम नैव चान्यार्थमात्मनि ।
तस्मादात्मा परानंदः परप्रेमास्पदं यतः ॥ ४६ ॥

दुसऱ्यावर जी आपण प्रीति करतों ती देखील आपण आपल्या सुखाकरितांच करितों. दुसऱ्याच्या सुखाकरितां करीत नाहीं. ह्मणून आपला आत्माच सुखरूप असून दुसऱ्यावर प्रेमकरण्यासही तोच कारणीभूत आहे, कारण ज्याअर्थी आपली त्याचे ठिकाणीं अतिशय प्रीति आहे, त्या अर्थी तोच परमानंदाचें स्थान आहे.

आत्मानंचेद्विजानीयास्सच्चिदानंदरूपतः ।
रागद्वेषविनिर्मुक्ता न शोचसि न कांक्षसि ॥ ४७ ॥

आपलें सच्चिदानंद स्वरूप कळून आत्मज्ञान झालें ह्मणजे राग द्वेषापासून तूं मुक्त होऊन तुला शोक होणार नाहीं, व तूं कशाची इच्छाही करणार नाहींस.

---

१ संसारांतील विषयांचे ठिकाणीं प्रीति. २ संसारांतील दुःखें मला न व्हावींत ही इच्छा.

यस्मिन्सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक इत्याह जननी श्रुतिः ॥ ४८ ॥

सच्चिदानंदस्वरूप सर्वत्र एकच ब्रह्म आहे असें ज्ञान झाल्यामुळें भूतादिक हें त्याहून पृथक् नाहीं, ह्मणून शोक व मोह होणार तरी कोणाला ? व कोणाचा ?

स्रग्धरा—धर्मात्संसिद्धसत्वे हरिहरभजनाच्चित्तचांचल्यहाने- ।
राप्ताद्युक्त्यानुवृत्त्या श्रुतिमननिदिध्यासनैः सत्समाधेः ॥
ज्ञानाद्ब्रह्माऽहमस्मीत्यनुभवबलकात्संचितागामिमुक्ता ।
धैर्यायारब्धभुक्तौ तनु मयि चशुभे नंदनानंदभावम् ॥४९॥

स्वधर्मांत सांगितल्या प्रमाणें कामनारहित कर्म केल्यापासून सत्व वाढून चित्तशुद्धि झाली असतां, व हरिहरभजनाच्या योगानें चित्ताची चंचलता नष्ट झाली असतां, गुरुमुखापासून महावाक्य श्रवण करून व युक्तीनें त्याचें मनन करून, आणि श्रवण केलेल्या व मनन करून केलेल्या अर्थाचे निरंतर चिंतनानें निदिध्यासन केलें असतां त्यावेळीं उत्तम प्रकारचा समाधि सिद्ध होतो. व हा समाधि सिद्ध झाला ह्मणजे "मी ब्रह्म आहें" असें उत्तम प्रकारचें ज्ञान होऊन संचित व क्रियमाण कर्मांचा नाश होतो. परंतु प्रारब्ध कर्माचा भोगावांचून क्षय होत नसल्यामुळें तें भोगतांना धैर्य यावें ह्मणून आईग ! तूं माझे ठिकाणीं असलेल्या पुत्रप्रेमाची वृद्धि कर.

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यपादपद्मनिषेवणात् ।
लिखितोऽयंमहानर्थोह्यलंतस्य प्रविस्तरः ॥ ५० ॥

श्रीमत्सद्गुरुनाथ ज्ञानेश्वराचार्य यांचे चरणारविंदीं नमन करून त्यांच्या प्रसादानेंच हा महान् अर्थ (गूढार्थ) लिहिला आहे. आतां याचा विस्तार पुरे; असो.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्र नंबर ५.

## सौ० दुर्गा आईला पाठविलेलें पत्र १ लें

सद्गुरुं करुणामूर्ति श्रीमदालंदिवल्लभम् ।
निष्कलं परमानंदं प्रणमामि पुनःपुनः ॥ १ ॥

ज्यांचे ठिकाणीं मायेचा स्पर्श देखील नाहीं व जे करुणेचे केवळ निधि आहेत अशा परमानंदरूपी आलंदिपति श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजांनां मी वारंवार प्रणाम करितों.

पुनः प्रणम्य दुर्गाख्यां जननीं किंचिदुच्यते ।
ज्ञानं मातुर्विबोधाय श्रीकृष्णैककृपालवात् ॥ २ ॥

पुनः जननी दुर्गाआईला नमस्कार करून तिला ज्ञान करून द्यावें ह्मणून श्रीकृष्णकृपालेशें करून किंचित् ज्ञान येथें सांगतों.

मातरेतज्जगत्सर्वं सुखदुःखमयं वृथा ।
कार्यं यदप्यविद्यायाः निबद्धं पुण्यपापतः ॥ ३ ॥

आई ! हें जगत् अविद्येचें कार्य असल्यामुळें मिथ्या आहे तथापि पुण्यपापानें बद्ध असल्यामुळें सुखदुःखरूप आहे.

धर्माधर्माविहस्यातां जनकौ पुण्यपापयोः ।
यस्य यद्विहितं वेदैस्सधर्म इति कथ्यते ॥ ४ ॥

या लोकांत पुण्यपापाला उत्पन्न करणारे धर्म व अधर्म आहेत. या मनुष्य शरीरांत जें आपण कर्म करितों तें पुण्य किंवा पाप असतें त्या वर्णाला जें कर्म वेदानें सांगितलें असेल, तें त्या वर्णाचें विहित कर्म समजावें. व तें करणें ह्मणजे धर्म व त्याहून इतर कोणतेंही कर्म करणें ह्मणजे अधर्म; उदाहरणार्थ "सत्यं वद धर्मं चर" ही वेदाची आज्ञा सर्व वर्णाला लागू आहे. ही पाळणें ह्मणजे धर्म होतो व ती मोडल्यास अधर्म होतो.

यद्वेदे प्रतिषिद्धं तद्ध्यधर्म इति शब्दितम् ।
अधर्मान्नरको ज्ञेयो तिर्यक्षु जननं तथा ॥ ५ ॥

वेदामध्यें "करूं नये" ह्मणून जें कर्म सांगितलें असेल तें निषिद्ध कर्म समजावें व तें कर्म करणें ह्मणजे अधर्म होतो. "ब्राह्मणो न हंतव्य: " येथें ब्राह्मणाला मारण्याचा निषेध केला आहे ह्मणून ब्राह्मण मारणें हें निषिद्ध कर्म आहे व तें केल्यास अधर्म होतो. अधर्माच्या योगानें नरक-दु:ख भोगावें लागतें व पशु पक्ष्यादि योनींचा जन्मही अधर्मानेंच मिळतो.

पुण्येन स्वर्गसंप्राप्तौ जननं देवयोनिषु ।
पुण्यपापविमिश्रेण नरयोनौ हि जायते ॥ ६ ॥

पुण्य कर्माच्या योगानें स्वर्ग प्राप्ति होते व त्याचप्रमाणें देवादिक योनींत जन्म ही पुण्यानेंच होतो. कांहीं पुण्य व कांहीं पाप असलें तर मनुष्ययोनींत जन्म होतो.

पुण्येन सत्कुले जन्म दुष्कुले पापकर्मणा ।
नारकीया न जानन्ति तत्वं दु:खातिरेकत: ॥ ७ ॥

त्या मनुष्य योनींतही पुन: पुण्य अधिक असून पाप कमी असल्यास उत्तम कुळांत जन्म येतो. व पाप जास्त असून पुण्य कमी असल्यास वाईट कुळांत जन्म होतो. जे पापी लोक नरकाला जातात त्यांना दु:ख अतिशय असल्यामुळें ते आत्मज्ञानाला अधिकारी होत नाहींत.

तद्वत्पुण्यान्विता देवाअपि भोगान्धदृष्टय: ।
न जानन्ति परं तत्वं लब्ध्वा सत्ववपुर्यत ॥ ८ ॥

ही पापी लोकांची गोष्ट झाली. पण जननि ! ही खेदाची गोष्ट आहे कीं, पुण्याच्या योगानें देव योनींत जन्म पावून व सत्वगुण शरीर मिळालें असूनही विषयभोगाच्या योगानें दृष्टि आंधळी झाल्यामुळें देव देखील परब्रह्मतत्वाला जाणत नाहींत.

बहुशो मानुषं जन्म स्वीकृतं ज्ञानहेतवे ।
अत्राअपि यत्नवान् योनौ दु:खमुक्त: स नो कथं ॥ ९ ॥

आतां पापी जे असतात ते नरकाला जात असल्यामुळें किंवा पशुपक्ष्यादि योनींत त्यांचा जन्म होत असल्यामुळें त्या योनींत त्यांना ज्ञान होणें शक्य नाहीं व पुण्याच्या योगानें देवयोनींत जन्म झाल्यास उत्तम प्रकारच्या विषय भोगांत मग्न असल्यामुळें त्याही योनींत ज्ञान

होणें शक्य नसतें; बाकी राहिली मानव योनि. ही योनि पापपुण्याच्या मिश्रणापासून मिळालेली असते. ह्मणून येथें सुखदुःख दोन्ही असतात व हीच बहुशः पुष्कळानां ज्ञान करून देण्याला समर्थ आहे असें ह्मटलें आहे. येथेंही जो प्रयत्न करून ज्ञान प्राप्त करून घेत नाहीं त्याचें दुःख कधींच नष्ट व्हावयाचें नाहीं.

यत्नो धर्मानुसारेण ज्ञातव्यो गुरुशास्त्रतः ।
अयं स्त्रीणां परोधर्मो भर्तुः पादनिषेवणम् ॥ १० ॥

ज्ञान प्राप्तिसाठीं यत्न करावयाचा तो गुरु आणि शास्त्र यांच्या योगानें समजावून घेऊन धर्माला अनुसरून करावा; व त्यांत स्त्रियांचा मुख्य धर्म ह्मटला ह्मणजे पतीची मनोभावानें सेवा करणें हा होय.

बुद्धौ संति त्रयो दोषाः मलो विक्षेप आवृतिः ।
तत्र निष्कामधर्मेण मलो दोषो निवर्तते ॥ ११ ॥
मलो नाम पापप्रवृत्तिः । निषिद्धकर्मासक्तिरिति यावत् ।

बुद्धीचे ठिकाणीं तीन दोष असतात. १ मल ह्मणजे पापकर्म करण्याकडे प्रवृत्ति असणें; किंवा निषिद्ध कर्मांचे ठिकाणीं आसक्ति असणें. २ विक्षेप ह्मणजे पापकर्म तर करण्याची प्रवृत्ति नसणें; पण हजारों पुण्यकर्मांतच मन फिरत राहणें. व ३ आवरण ह्मणजे आत्मविस्मृति, यापैकीं प्रथम मलदोष निष्कामधर्म आचरण केल्यानें दूर होतो.

त्यक्तत्वादनुपायस्ते तर्हि नारायणं स्मर ।
न दीनशरणं भूमौ गोविन्दचरणांविना ॥ १२ ॥

परंतु पतिकृपेवांचून तुझा निरुपाय आहे असें ह्मणूं नकोस तर सर्व धर्मांनीं प्राप्य जो परमेश्वर, त्याचें स्मरण कर. दीनजनांचा सांभाळ करण्याकरितां गोविंदाच्या चरणारविंदांवांचून या जगांत दुसरें कांहींच नाहीं.

धर्माभावे भक्त्यभावे भक्तैश्चातिक्रमे कृते ।
अशक्ये वा सुशक्ये वा सर्वथा शरणं हरिः ॥ १३ ॥

धर्माची सामग्री असो, धर्माची सामग्री नसो, भक्तीची सामग्री नसो, सज्जनानीं टाकून दिलें असो, शक्य गोष्टी असोत, किंवा

अशक्य गोष्टी असोत, सर्वच ठिकाणीं दीनांचा सांभाळ करणारा पर-मेश्वरच आहे.

दीनाया नयनान्धाया: श्रीकृष्ण: शरणं मम ।
तत्राप्यस्तु तथा मातर्भगवान् गोपवल्लभ: ॥ १४ ॥

माझ्या आंधळ्या दीन अबलेचा त्राता श्रीकृष्णच आहेत व आई तेच भगवान् श्रीकृष्ण गोपिपति तुझाही सांभाळ करोत.

यद्पीशावास्यभाष्ये सकर्मोपासनेरिता ।
तथापि दैन्यं त्यक्ताया स्तत्र जानाति केशव: ॥ १५ ॥

जरी ईशावास्यभाष्यामध्यें कर्मासहित उपासना सांगितली आहे व कर्म सोडून नुसत्या उपासनेनें पतन सांगितलें तथापि त्याला तुझी निरुपायस्थिति व दीनता ठाऊक आहे.

तावद्वेदादिकं शास्त्रं धर्मस्तावत्समाचेरत् ।
यावन्न जायते प्रीति:कृष्णे योगेश्वरेश्वरे ॥ १६ ॥

योगेश्वरांचा ही ईश्वर अशा श्रीकृष्ण परमात्म्याचे ठिकाणीं जों-पर्यंत प्रीति उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंतच वेदादिक शास्त्रांची व धर्माची जरूर आहे.

दासार्थं सततुर्देवो भगवान् दीनवत्सल: ।
मनोबुद्धी विनिक्षिप्य तत्र चिन्तां परित्यजेत् ॥ १७ ॥
अत्र चिन्ताशब्देन मलविक्षेपौ व्याख्यातौ ।
विक्षेपो नाम चांचल्यम् ।

दीनाचा कनवाळू भगवान् श्रीकृष्ण आपल्या दासांचा सांभाळ करण्याकरितां अवतरतो. त्याचे चरणीं मन व बुद्धि दोन्हीं अर्पण करून चिन्ता सोडून दे. या श्लोकांत 'भगवान्' या पदानें तो षड्-गुणैश्वर्यसंपन्न असून, 'वत्सले' या पदानें सर्व पुरविण्यास समर्थ आहे हें दाखविलें. 'चिंता' या शब्दानें मल व विक्षेप सोडून देण्याला सांगि-तलें. विक्षेप ह्मणजे चंचलता.

किन्तु भक्तेरहंकाराद्बुद्धिभेदं न साधयेत् ।
भक्त्यहंकारमात्रेण दीनता हि प्रणश्यति ॥ १८ ॥

पण आणखी येथें एक रहस्य असलें पाहिजे कीं, आपण भक्ति

करितों ह्मणून दुसऱ्या कोणाचा धर्माविषयींचा कल मात्र मोडूं नये. मी भक्ति करितें, असा अहंकार उत्पन्न झाल्या बरोबर दीनता नाश पावते. (सानन्य दीनतेचें लक्षण निदिध्यासन प्रकाश समास ८ प्रथम यष्टि)

यावज्ज्ञानं न तावद्धि हितं दैन्यं जनिप्रदे ।
आत्मज्ञानं विना दैन्यनाशे देहमतिर्भवेत् ॥ १९ ॥

कोणी असें ह्मणेल कीं दीनता नाहींशी होणें हें पूर्णाचें लक्षण आहे पण ज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत दीनताच उत्तम आहे. आत्माज्ञान झालें नाहीं व दीनता नष्ट झाली तर देहाभिमान दृढ होतो.

देहमत्युत्थानमात्रात्तिरोभवति माधवः ।
तस्माद्गुणवती भूता भगवद्भक्तिमाश्रय ॥ २० ॥

देहबुद्धि झाली असतां भगवान् गुप्त होतो ह्मणून अंगीं उत्तम गुण आणून भगवद्भक्ति कर.

चमत्कारान् परित्यज्य सर्वान् संसारदायकान् ।
शिवकृष्णाविष्टचित्ता सद्गुणान् परिपालय ॥ २१ ॥

चमत्कार कितीही जरी अद्भुत असले तरी ते भवरोगांनाच दृढ करीत असतात. कारण सर्वव्यापक परमेश्वराचें ठिकाणीं चमत्कार दाखविणारा कोण व पाहणारा कोण ? तेथें कोणीच उरत नाहीं. जेथें भेद आहे तेथेंच चमत्काराची अपेक्षा असते ह्मणून हे सर्व सोडून देऊन श्रीकृष्ण व शिव यांचे ठिकाणीं चित्त अर्पण करून उत्तम गुण आपले ठिकाणीं स्थिर राहतील असा यत्न कर.

अक्रोधत्वमकामत्वमद्वेष्टृत्वमगर्वता ।
अचांचल्यं चित्तशुद्धिः साधुसंगसमाश्रयः ॥ २२ ॥

आतां सद्गुण कोणते ते ऐक. कधीं व्यर्थ न रागावणें, दिवसें दिवस वासना सोडीत जाणें, कोणाचें वाईट न चिंतणें, गर्व न करणें, स्थिरबुद्धि असणें, मनाला वाईट मार्गानें न जाऊं देणें, नेहमीं सत्पुरुषाचे संगतींत राहणें.

प्राप्यैतान्सुगुणानादौ गुरुदत्तं मनुं जपेत् ॥
जपकाले चिंतनं स्याद्धृदये शिवकृष्णयोः ॥ २३ ॥

सद्गुण आंगीं आणून श्रीगुरूनीं उपदेशिलेल्या मंत्राचा जप करीत असावें व जपाचे वेळेला श्रीकृष्ण व शिव या दोघांचें ही हृदयांत ध्यान करावें.

तीव्रवाणिजपावेशाद्भवेत्प्राणात्मको मनुः ॥
प्रणवेनाचितो हंसस्तदायमजपाजपः ॥ २४

वाणीनें तो जप जेव्हां तीव्र होतो तेव्हां तो मंत्र वायुरूप होतो व श्वासांत राहतो व त्या मंत्रांत ॐ असा नाद उठत असतो. तो मंत्र व हा हंस श्वास दोन्ही मिळून मग अजपाजप होतो.

प्राणं मनसि निक्षिप्य मनो बुद्धौ विलापयेत् ॥
जीवं विविच्य सांख्येन योगेनाजे निवेशयेत् ॥ २५ ॥

प्राणास मनांत मिळवावें, मनास बुद्धींत मिळवावें, इतकें सर्व झाल्यावर सांख्य शास्त्रांत सांगितल्या प्रमाणें जीवाला बुद्धीपासून निराळें करावें, व नंतर योगशास्त्रांत सांगितलेल्या रीतीनें त्या जीवाचा ईश्वरांत लय करावा.

एतज्जीवेशयोरैक्यं धीमनोवागगोचरम् ॥
द्वैतमिथ्यापूर्वकत्वाद्वेदान्तेनानुभावयेत् ॥ २६ ॥
द्वैतमिथ्यापूर्वकत्वादित्यनेन आवरणनिवृत्तिरुक्ता ।
आवरणं नाम कोऽयमात्मेत्यनिर्णयः ।

वाणि, मन व बुद्धि यांना न कळणारें असें जीवेश्वरांचें ऐक्य भावनामूलक झाल्यामुळें जगत् सत्य वाटल्यास मोडून जाण्याचा संभव आहे म्हणून वेदान्तशास्त्रांतील रीतीनें जगत् मिथ्या समजून घेऊन ज्ञानानें तें दृढ करावें. " द्वैत मिथ्यापूर्वकत्वात् " या पदानें आपल्या स्वरूपाविषयीं जें स्वतःला आवरण होतें तें नाहींसें कर असें सुचविलें आवरण म्हणजे आपण कोण आहों हें न जाणणें.

पुनः संव्युत्थिते चित्तेप्यन्तर्ज्ञानात्तयाधिया ।
आदराद्गोपिकानाथपदद्वंद्वसुधां पिबेत् ॥ २७ ॥
अनेन प्रारब्धं सुखरूपं भवति ।

ज्ञानानंतर भक्तीची आवश्यकता ऐक. पुनः चित्त देहावर आलें असतां समाधींतल्या ज्ञानाचा विसर न पडूं देतां वृत्तिसंधींतील

चैतन्याकडे अनुसंधान ठेऊन गोविंदाच्या चरणाचें चिंतन करावें. या-योगानें प्रारब्ध सुखरूप होतें.

यथा ज्ञानाद्यथाबुद्ध्या लिखितं बालभाषया ।
सत्यं समर्पितं सर्वं प्रेम्णा तातपदाम्बुजे ॥ २८ ॥

यथाज्ञान व यथाबुद्धि जे कांहीं बोबडे शब्द लिहिले ते सर्व प्रेमपुरःसर सत्यश्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणीं समर्पण असोत.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुगुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर ६.

## रा० रा० रघुनाथराव यांस पाठविलेलें पत्र १ लें

श्रुतिस्मृतिपुराणैर्यद्गीयेत ब्रह्म निर्मलं ॥
वंदे तं यत्प्रसादेन तदस्मि परमं महः ॥ १ ॥

ज्या श्रीमत्सद्गुरुनाथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपाप्रसादानें सकल श्रुतिस्मृतिपुराणांनीं वर्णिलेलें निर्मल अखंड तेजोरूप परब्रह्म तें मीच आहें असें कळलें त्यांनां वंदन करितों.

चेतनाश्रयतः सर्वान् मंडलिस्थान्नमाम्यहम् ॥
वृत्तिदृष्ट्याशिषः संतु परमार्थाऽभिवृद्धये ॥ २ ॥

चैतन्य ज्यानां अधिष्ठान आहे अशा माझ्या मंडळींत असणाऱ्यांनां मी नमस्कार करितों. व त्यांची परमार्थांत प्रगति होण्याकरितां वृत्तिदृष्टीनें त्यांनां अनेक आशिर्वाद असोत.

रघुनाथ त्वमप्यत्र निविष्टो मननान्वितः ।
स्मृत्वा ज्ञानेश्वरं पत्रं सर्वान्स्वाननुदर्शय ॥ ३ ॥

रघुनाथराव आपणही मंडळींत आहांच तेव्हां ज्ञानपूर्ण असें हें पत्र मननपूर्वक वाचून व आठवण ठेवून फक्त आपल्या मंडळींतील सर्वांनां दाखवावें.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयंत्यजेत् ॥ ४ ॥

काम, क्रोध, आणि लोभ हे तिन्ही प्रत्येक आपला नाश करणारे असून केवळ नरकाचे द्वार आहेत, ह्मणून ह्या तिघांचाही त्याग करावा.

वनितास्वंबिकां दृष्टिं कृत्वा काममतिं जहि ।
विषादहर्षदं कर्म मत्वा क्रोधमतिं जहि ॥ ५ ॥

सर्व स्त्रियांचे ठिकाणीं अंबाबुद्धि ठेवून कामवासना सोडावी. व सुखदुःख देणारें कर्म आहे असें जाणून, क्रोध सोडावा.

धर्मोत्सवादियोगेन वित्तलोभमतिं जहि ।
न वित्तेनापवर्गोऽस्तीति वेदानुशासनात् ॥ ६ ॥

धर्मा करितां उत्सव वगैरे करून धनाचा लोभ सोडावा. द्रव्यानें मोक्ष मिळत नाहीं असें वेदांत सांगितलें आहे.

गृहस्थोक्तं नतद्दानं येन वृत्तिर्विपद्यते ।
विनादानं न गार्हस्थं विषयासक्तिवर्धकम् ॥ ७ ॥

ज्या दानानें आपल्या चरितार्थाला बाध येतो तें गृहस्थाश्रमियाला सांगितलें नाहीं. ह्मणून दान मुळींच करूं नये असें नाहीं. कारण दान मुळींच न केलें तर वित्तादिकांची आशाच जास्त वाढते. व नंतर गृहस्थाश्रमांत कांहींच अर्थ न राहून गृहस्थाश्रम ह्मणजे विषयासक्तिच वाढविणें होईल.

तस्माद्द्रव्यं यथा शक्त्या सत्पात्रे विनियोजयेत् ।
अन्नदानं तु सर्वत्र विना कौटुंबलंघनम् ॥ ८ ॥

ह्मणून यथाशक्ति द्रव्यदान सत्पात्र पाहून करावें. परंतु अन्नदानाविषयीं मात्र तसें नाहीं. कुटुंबास लंघन न पडूं देतां अन्नदान सर्व ठिकाणीं करावें.

येथें पात्राऽपात्रविचार नाहीं.

**पाडोनि कुटुंबांसी लंघन । समस्त द्रव्य वेचोनि जाण ॥**
**करों नये यज्ञाचरण । अधर्मपण तें पाहीं ॥ १ ॥**

**( नाथ. )**

कुटुंबश्चेदसत्तात ! सर्वमेव परित्यजेत् ।
धार्मिकश्चेत्र सन्यासस्तच्छ्रेष्ठ इति मे मतिः ॥ ९ ॥

कुटुंबांतील माणसें जर चांगलीं नसतील, तर अजिबात सर्व सोडून द्यावें. परंतु तीं जर चांगलीं धार्मिक असतील, तर त्यापेक्षां कांहीं सन्यास श्रेष्ठ नाहीं, असें माझें मत आहे.

कृत्वा सामाजिकं कार्यं देहासक्तिं विनाशयेत् ।
स्नानसंध्यादिभिर्नित्यैरिंद्रियालस्यमुत्सृजेत् ॥ १० ॥

समाजास कल्याणप्रद अशीं कार्यें केलीं असतां देहासक्ति कमी होते. व स्नानसंध्यादि नित्यकर्में केलीं असतां देहासक्ति कमी होते. व स्नानसंध्यादि नित्यकर्में करून इंद्रियांचें आलस्य घालवावें.

निस्तरेद्देवपितॄणां दर्शाद्यैःसनिमित्तकैः ।
उपवासव्रतं कृत्वा प्राणासक्तिं परित्यजेत् ॥ ११ ॥

श्राद्धादिक व नैमित्तिक देवकर्में करून पितर व देव यांचें ऋण फेडीत असावें. आणि उपवासादि व्रतें करून प्राणासक्ति कमी करावी.

सद्धर्मान्वितयोपास्त्या मनश्चांचल्यमुत्सृजेत् ।
सद्धर्मरहितं नाम वृथा स्यादिति मेमतिः ॥ १२ ॥

आपल्या विहित कर्मासह परमेश्वराची उपासना करून मनाचें चांचल्य दूर करावें. स्वधर्माचरणावांचून नामस्मरण व्यर्थ आहे, असें मला वाटतें.

विपरीतं प्रशंसन्ति भोगसौलभ्यवादिनः ॥
शारीरान्मानसं कर्म सुलभं न कदापिहि ॥ १३ ॥

केवळ विषयभोगच जास्त सुलभ करण्याकारितां नाम सुलभ आहे, असें कर्मरहित भक्तिवादी गाणत असतात. परंतु शारिरिक कर्मापेक्षां मानसीक कर्म आपणास कधीं तरी सुलभ वाटतें काय ? मला तर वाटत नाहीं.

तथापि सुलभा भक्तिः प्रवदंत्यंधदृष्टयः ।
बत ! तेषां कुतो धैर्यं जनतादुःखदायकम् ॥ १४ ॥

तथापि प्रेमादि मानस भागच जिच्यांत जास्त आहेत, अशी

मानसिक शारिरिक कर्मापेक्षां जास्त सुलभ आहे, असें कित्येक मूर्ख लोक सांगत फिरत असतात.

कुमारं मातृभुंजानं यथा तातोऽप्युपेक्षति ।
भक्तिवादिनमुन्मत्तं तद्वदीशोऽप्युपेक्षति ॥ १५ ॥

मातृगामी मुलाची ज्याप्रमाणें बाप उपेक्षा करितो तद्वतच ईश्वर देखील भक्तीच्या पांघरुणाखालीं वाटेल तसें करणाराची उपेक्षा करितो.

भोगानां सुलभत्वार्थं भक्तिर्यद्युपदिश्यते ।
किमीशेन तदा कार्यं वनितावयवं भजेत् ॥ १६ ॥

केवळ विषयभोग वाढविण्याकरितांच जर भक्तीचा उपदेश असेल, तरमग ईश्वराशीं काय करावयाचें ? त्यानें खुशाल वेश्येच्या घरीं जाऊन तिच्या अवयवांचें पूजन करित पडावें.

सद्धर्मानारब्धभूता भक्तिर्येनोपदिश्यते ।
पाचयेत्तप्ततैलेन मूढं तं भोगवर्धकम् ॥ १७ ॥

उत्तम प्रकारच्या वर्णाश्रम धर्मानें जिचा आरंभ नाहीं अशी भक्ति सांगून केवळ विषयभोगप्रवृत्ति वाढविणाऱ्या मूर्खांनां तापलेल्या तेलाच्या कढईत टाकून शिजवावें.

अतःसुकर्मी सद्भक्तो मोक्षेच्छुः साधनान्वितः ।
मध्वशास्त्रेण भगवद्दासभावं प्रकल्पयेत् ॥ १८ ॥

करितां उत्तम प्रकारचे विहित वर्णाश्रमधर्म करणारा साधन चतुष्टयसंपन्न, सद्भक्त व ज्याला मोक्षाची इच्छा उत्पन्न झाली आहे अशानें माध्वमतांत सांगितल्याप्रमाणें, आपण ईश्वराचे दास आहों व ईश्वर आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे अशी भावना धरावी. इतक्यापुरतेंच द्वैतशास्त्र उपयोगी आहे.

पश्चाद्द्विजातिं सन्त्यज्य परमेशांशतामियात् ।
विशिष्टाद्वैतशास्त्रेण रामानुजमतेनवै ॥ १९ ॥

नंतर रामानुजाच्या विशिष्टाद्वैतांत सांगितल्याप्रमाणें "विशिष्टाद्वैतन्नाम जीवेशयोर्भेदाभेदौ वास्तविकाविति बुद्धिः" ह्मणजे जीव व ईश्वर याच्यांत खरोखरच भेदही आहे व अभेदही आहे. कारण दोन्ही प्रकारच्या श्रुति वेदांत आहेत.) आपण त्या परमेश्वराचाच अंश

आहेत असें जाणावें ही पहिल्या द्वैत भक्त्यपेक्षां अधिक प्रतीची आहे.

निष्कामाय शिवे सर्वं शुद्धाद्वैतेनचार्पयेत् ।
शांकराद्वैतशास्त्रेणद्वयोरैक्यं प्रसाधयेत् ॥ २० ॥

नंतर वल्लभाचार्यांनीं शुद्धाद्वैत मतांत ( एकमेव ब्रह्म सच्चिदानंदलक्षणं जगदाकारेण भवति तत्रच पाषाणादौ सदंशाविर्भावः । जीवे चिदंशाविर्भावः । श्रीकृष्णश्च सच्चिदानंदः संपूर्णः । आनंदाविर्भावस्य तस्य नित्यसर्वत्र भजयत्वात्सर्वं श्रीकृष्णे निवेदयेत् । अत्र च आविर्भावाधिक्याद्भेदभानं । ह्मणजे एकब्रह्मच सच्चिदानंद स्वरूप जगदाकार झालें आहे, पाषाणांत त्याचा सदंशाविर्भाव आहे, जीवांत चिदंशाविर्भाव आहे, व श्रीकृष्ण पूर्ण सच्चिदानंद स्वरूप आहे. श्रीकृष्णाचे ठिकाणीं नित्यानंदाविर्भाव असल्यामुळें सर्वदा तोच भजनीय आहे; ह्मणून त्याचेच ठिकाणीं सर्व समर्पण करावें. येथें एका ठिकाणीं कमी आविर्भाव व एका ठिकाणीं जास्त आविर्भाव असल्यामुळें भेद प्रतीति होते. सांगितल्याप्रमाणें निष्काम अशा परमेश्वराच्या ठिकाणीं सर्व समर्पण करावें. नंतर श्रीमच्छंकराचार्यांनीं सांगितलेल्या केवलाद्वैत वेदांतशास्त्रानुसार दोघांचें (जीव व ईश्वर) ऐक्य साधावें. " केवलाद्वैतन्नाम जीवेशयोर्वस्तुतोऽभेदः । भेदस्तु वाचारंभणमात्रौपचारिकः । श्रुतिरप्यत्र वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् " । ह्मणजे केवलाद्वैत मतांत जीव व ईश्वर यांच्यांत वास्तविक भेद नाहीं. भेद भासतो तो केवळ वाचारंभणमात्र औपचारिक आहे. जसें मृत्तिकेच्या घटादिकांत मृत्तिकाच एक सत्य असून घटशरावत्व वाचारंभमणमात्र असतें. याच अर्थाची श्रुतिही आहे.

देहबुद्ध्या तु दासोहं जीव बुद्ध्या त्वदंशकः ।
आत्मबुद्ध्यात्वमेवाहमिति मारुतजोक्तितः ॥ २१ ॥

" शरीरबुद्धीनें परमेश्वरा ! मी तुझा दास आहें, जीवबुद्धीनें तुझा अंश आहें, व आत्मबुद्धीनें तर तूं व मी एकच आहों. " असें हनुमन्नाटकांत मारुतीनें श्रीरामास ह्मटलें आहें.

**तदर्थं यत्नवान् भूत्वा साधुसंगं समाश्रयेत् ।**
**गुरुं वेदान्तवेत्तारं ब्रह्मनिष्ठमनुव्रजेत् ॥ २२ ॥**

त्याकरितां प्रयत्नशाली होऊन सत्समागम करावा. व वेदान्त-शास्त्र जाणणारा, श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशा सद्गुरूस शरण जावें.

विवेकादियुतं शिष्यं श्रीगुरुः संपरीक्षयेत् ।
न लोभाद्बोधयेज्ज्ञानमबुद्धमजितेंद्रियम् ॥ २३ ॥

श्रीगुरूनीं विचारसंपन्न शिष्याची नीट परीक्षा करावी. लोभांत पडून मूर्ख व विषयलंपट अशानां ज्ञान सांगू नये.

दुश्चरित्रं तथा शिष्यो गुरोरपि निवारयेत ।
मत्स्येंद्रप्रेमलासंगो गोरक्षेण हतो यथा ॥ २४ ॥

ज्याप्रमाणें श्रीगोरक्षनाथानें मत्स्येंद्रनाथास प्रेमलेच्या संगती-पासून काढून घेतलें, त्याप्रमाणें सच्छिष्यानें आपल्याही गुरूचें आच-रण विरुद्ध दिसल्यास तें सुधरून घ्यावें.

कर्म ब्राह्मणतोग्राह्यमन्यत्कस्माद्गुरोरपि ।
न जातिर्भजनादौ स्याद्भोजनादौतुपालयेत् ॥ २५ ॥

कर्म ब्राह्मणापासूनच शिकावें व तदितर कोणाही पासून शिकावें. जात्यादि वर्णाश्रमाचा विचार भजनाच्या वेळीं जरीं नसला, तरी भोजनादिकांच्या वेळेस पाळलाच पाहिजे.

आरंभे श्रवणं कृत्वा मनसा च विचारणम् ।
निदिध्यासनमभ्यासात्साक्षात्कारस्तदाभवेत् ॥ २६ ॥

प्रथम वेदांत श्रवण करावा. नंतर मनानें त्याचा विचार करावा व नंतर अभ्यासानें त्याचा निदिध्यास केला ह्मणजे आत्मसाक्षात्कार होतो.

श्रवणं गुरुशास्त्राभ्यां मननं च स्वयुक्तिभिः ।
विज्ञानं स्वानुभूत्येति श्रवणादेरसंकरः ॥ २७ ॥

गुरु व शास्त्र यांचेपासून श्रवण करावें, त्याचेच आपल्या युक्तीनें मनन करावें. व त्याचेंच निरंतर ज्ञान जागृत ठेवून स्वात्मानु-भव घ्यावा. याप्रमाणें श्रवण मननादिकांचा पृथगुपयोग आहे.

श्रुतिर्निगमवाक्येभ्यो सांख्यन्यायांशकैर्मतिः ।
निदिध्यासस्तु योगेनाप्येवंवेदाविरोधता ॥ २८ ॥

वेदांतून श्रवण करून, सांख्य व न्यायशास्त्रांतील वेदाला अनु-

कूल अशा तर्कांनीं त्याचें मनन करावें. व योगशास्त्रानें निदिध्यासन करावें. ह्मणजेही विरोध राहत नाहीं.

आद्यशारीरकाध्यायाच्छ्रवणं विहितं भवेत् ।
द्वितीयान्मननंचापि द्वाभ्यां ज्ञानं भवेदिति ॥ २९ ॥

अथवा ब्रह्मसूत्रावरील आचार्यभाष्याच्या प्रथमाध्यायानें श्रवण करावें, दुसऱ्यानें मनन करावें, व शेवटील दोन अध्यायांनीं ज्ञान करून घ्यावें.

एवं श्रुते मते ज्ञाते तत्वेऽज्ञानं विनश्यति ।
जीवन्मुक्तिसुखार्थंतु शिवं नारायणं स्मरेत् ॥ ३० ॥

याप्रमाणें श्रवण, मनन, निदिध्यासनादिकांनीं ज्ञान झालें ह्मणजे मग कांहींच राहत नाहीं. परंतु जीवन्मुक्तिसुख मिळविण्याकरितां सगुण हरिहरात्मक परमेश्वराची भक्ति करावी.

श्लोकेन श्लोकपादेन कस्य ज्ञानं भवेद्यदि ।
न तदर्थं क्रमोह्येष क्षीणं तस्य प्रयोजनम् ॥ ३१ ॥

एका श्लोकानें होवो, किंवा त्याच्या एका चरणानें होवो, एखाद्या उत्तमाधिकाऱ्याला जर लौकर ज्ञान झालें तर त्याच्या करितां "श्रवणं गुरुशास्त्राभ्यां पासून द्वाभ्यां ज्ञानं भवेदिति" येथपर्यंत सांगितलेला क्रम नाहीं. इतरांस आहे. कारण ज्ञान झाल्यानंतर त्याला कांहीं मिळवावयाचें नसते. परंतु लोक सुधरण्याकरितां त्या गोष्टी पाहिजे असतात.

संक्षेपोऽयं मया प्रोक्तो वदिष्येऽग्रे सविस्तरम् ।
किंत्वेतद्वाचनानंदोत्तरमादौ प्रदीयताम् ॥ ३२ ॥

हें हल्लीं संक्षेपरीतीनें लिहिलें आहे, पुढें सविस्तर लिहीन. पत्र वांचून आनंदानें उत्तर मात्र अगोदर पाठवा.

सद्गुरुःकरुणामूर्तिरलकावतिवल्लभः ।
तत्पादयुगुले सर्वं लिखितांबुजमर्पितम् ॥ ३३ ॥

श्रीकरुणामूर्ति आळंदीपति सद्गुरुनाथ ज्ञानेश्वरमहाराज यांचे चरणयुगुलावर लिहिलेलें हें पत्ररूपी कमल पुष्प अर्पण असो.

इत्यनेनालम् ।

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

वे० शा० सं० श्रीनिवास शास्त्री यानां पाठविलेलें पत्र १ लें.

# पत्र नंबर ७.

सद्गुरोःकरुणालेशात् त्रिषु लोकेषु मे सदा ।
मंडनं ब्रह्मरूपेण तं ज्ञानेश्वरमाश्रये ॥ १ ॥

ज्या सद्गुरूकृपेच्या लेशानें मी तीन्ही लोकांत [illegible] शोभत आहे त्या ज्ञानेश्वरमहाराजांचाच मी आश्रय करितों.

श्रीनिवासं गुरुं वंदे पाणिनीयोपदेशकं ।
आशिषो बह्वःसन्तु तं कृष्णान्मम पुत्रतः ॥ २ ॥

सिद्धांत कौमुदी सांगणारे गुरुजी श्रीनिवासमहाराज यांना नमस्कार असो. व तसेंच ते श्रीकृष्णापासून जन्मलेले माझे पुत्र असल्यामुळें त्यांना पुष्कळ आशिर्वादही असोत.

वक्ष्येत्र बालबोधाय साध्ववतारलक्षणम् ।
श्रुत्वामत्वात्विदं सम्यगुत्तरंच प्रदीयताम् ॥ ३ ॥

बालबोधा साठीं मी येथें साधूंची व अवतारांची लक्षणें स्पष्ट करून सांगतो. ह्या पत्रांचें श्रवणमनन करून उत्तरद्वारा तृप्तीचा आनंद कळवावा.

सत्वंरजस्तमइति गुणाबुद्धेर्नचात्मनः ।
सत्वेनान्यतमौ हन्याद्धरि राहोद्धवं प्रति ॥ ४ ॥

सत्व, रज, व तम हें तीन बुद्धीचें गुण असून आत्म्याचे नाहींत पैकीं सत्वानें दोन गुणाला नाहींसें करावें असें भगवंतानें उद्धवाला सांगितलें.

सत्वात्संजायते ज्ञानमेवमाहार्जुनं प्रति ।
सत्वाद्धर्मो भवेद्वृद्धा तस्मात्सत्वं समाश्रयेत् ॥ ५ ॥

सत्वापासून ज्ञान उत्पन्न होते असें त्याच भगवंतानें अर्जुनाला सांगितलें आहे. सत्व वाढल्यानें धर्म उत्पन्न होतो म्हणून इतर दोन गुणांनां टाकून देऊन सत्वाचाच आश्रय करावा.

आत्मा गुणत्रयातीतो लक्ष्यते सत्ववृत्तित: ।
सर्वोतीतो यथा सूर्य: सूर्यकांतेन लक्ष्यते ॥ ६ ॥

सर्वोरहित सूर्याचें प्रतिबिंब सूर्य कांतावर घेऊन त्याची ती उष्णता जशी स्पष्ट करितां येते तसा तीन्ही गुणारहित आत्मा सत्व-गुणात्मक वृत्तीच्या योगानें व्यक्त सारखा करिता येतो. कसा तें सांगतो·

सत्यंज्ञानंसुखं चेतित्रयस्यैक्यं परात्मनि ॥
भिन्नमिवावभासन्ते सत्ववृत्तिविभेदत: ॥ ७ ॥

तत्रबाधाभावविसिष्टंसत् वृत्यवच्छिन्नंचित् प्रीत्यादिवृत्यवच्छिन्न मानंद: विस्तरो निदिध्यासन प्रकाशादवगंतव्य:

सच्चिदानंद आत्मरूपीं तीन्ही एकच असून वृत्तीच्या योगानें ते भिन्न असल्यासारखे भासतात. बाधाभावविसिष्टसत् वृत्यवच्छिन्न चित् आणि प्रीत्यादिवृत्यवच्छिन्न आनंद ह्याचा विशेष विस्तार निदि-ध्यासन प्रकाशावरून समजून घ्यावा.

गुणद्वयानभिभूतं सत्वंसाक्षात्परेश्वरे ।
सात्विको भगवद्देह: पंचदशिकृतां मतम् ॥ ८ ॥

यथोक्तंतत्व विवेके "निमित्तं शुद्ध सत्वांतां उच्यते ब्रह्म तद्गिरा" परमेश्वराचें अवतार शरीर सात्विक असते व ते सत्व, शुद्ध ह्मणजे इतर दोन गुणांनी गढूळ न झालेले परमेश्वराचें ठायीं असते. असे पंचदशिकारांचें मत आहे. जसें तत्व विवेक प्रकरणांत सांगितलें आहे कीं शुद्धसत्व प्रकृतीला ग्रहण करून जें ब्रह्म निमित्त कारण झालें आहे ते तत् शब्दानें बोलिल्या जाते.

तदभिध्यानतो सत्वं वर्धते सन्नृणामिह ।
धर्मोविज्ञानमैश्वर्यं वैराग्यं सत्वलक्षणम् ॥ ९ ॥

ते भगवत् शरीर सत्वरूप असल्यामुळें त्याच्या ध्यानानें अर्थातच सत्पुरुषांच्या अंत:करणांतील सत्व वाढते. त्या सत्वाचें मुख्यलक्षण ह्मणजे धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य हे चौकडी असणें होय.

धर्मोयं द्विविध: प्रोक्तो बाह्याभ्यंतर भेदत: ।
प्रवृत्तिसंज्ञको बाह्योंतर्विनिवृत्ति लक्षण: ॥ १० ॥

धर्म दोन प्रकारचा. बाह्य व आभ्यंतर. पैकीं प्रवृत्ति लक्षण बाह्य व निवृत्ति लक्षण अभ्यंतर ह्मणावा. प्रवृत्ति ह्मणजे वृत्तीची बाहेर धांव व निवृत्ति ह्मणजे तिची आत्म्याचे ठिकाणीं शांती.

प्रवृत्तिसंज्ञके धर्मे फलमभ्युदयो मतः ।
निवृत्तिसंज्ञके धर्मे फलं निश्रेयसं मतम् ॥ ११ ॥

अभ्युदय ह्मणजे सांसारिक सुख व स्वर्ग इत्यादि विषय सुखाचा परमावधी, प्रवृत्तिसंज्ञकधर्माचें फळ असून, तीन्ही दुःखांची निवृत्ति व परमानंदाची प्राप्ती असा जो मोक्ष तो निवृत्ति संज्ञक धर्माचें फळ आहे.

तथा ज्ञानंद्विधाज्ञेयं बाह्याभ्यंतरभेदतः ।
धर्मज्ञानंभवेद्बाह्यं विवेकज्ञानमांतरं ॥ १२ ॥

तसें ज्ञानही दोन प्रकारचे आहे. बाह्य आणि अंतर. वेद, छंद, ज्योतिष्य, व्याकरण, निघंट, निरुक्त, शिक्षा, कल्प, पुराण, न्याय, मिमांसा, धर्मशास्त्र इत्यादि १४ विद्या व ६४ कळा बाह्यज्ञान असून देहाहून आत्मा निराळा आहे व माया ब्रह्माचें विवेक ज्ञान अंतर समजावें.

ननु मोक्षस्य नित्यत्वात् ज्ञानाधीनत्वाच ज्ञानस्याप्यावश्यक नित्यत्वांगीकर्त्तव्ये तत्सत्वधर्मे निवेषणमयुक्तं "सत्वंसत्वेनचैवहि" इतिभगवद्वचनादेव मोक्षेगुणत्रयाबाधात् सत्वबाधवशात् ज्ञानस्यबाधापत्तिस्त तस्तदधीनस्य मोक्षस्यापि बधापत्तेः इतिचेत् सत्यं अस्तुतवसंशयेण सांख्यसिद्धांतहानिःअस्माकंवेदांतिनांतु, ब्रह्मणित्रैकालिकोऽज्ञानाभावस्वीकारात् रज्जुसर्पमिथ्यात्वे तन्नाशमिथ्यात्ववत् बंधमिथ्यात्वे मोक्षस्यापि मिथ्यात्वं अन्यथातवमते "नासतो विद्यते भाव" इति भगवद्वचनानुसारेणैव पतिते बंधभावाभावे मोक्षाभावप्रसंगः एवंचेन् मूढ ! सर्वथा सुखेच्छां परित्यज अग्निभक्षणादि दुःखेच्छांकुरु वस्तुतस्तु व्याधिना शानंतरंयथौषधोपयोगोनदृश्यते तथाज्ञाननाशानंतरंज्ञानस्यापि उपयोगोनास्ति यदपि ज्ञानस्वरूपमेव ब्रह्म चेतनत्वात् तथापि न तदस्मन्मते जडचेतनविवेकज्ञानस्वरूपमास्ति किन्तु सकार्याविद्यात्यंताभावावच्छिन्नचेतनज्ञानरूपं यथासूर्ये प्रकाशो न तमोविवेकात् दृश्यते किन्तु

सर्वथा तमोऽभावावच्छिन्नःप्रसिद्धः तस्मादाभ्यंतरविवेकज्ञानं सत्वे निविष्टमस्माभिः यथा इदं तमः इतिसूर्ये न प्रतीतिः किन्तुतमः प्रकाशयोः पश्यतश्चक्षुष्येव । तथैतेत् जडमेतत् चेतनमित्येतत् चेतनस्य न प्रतीतिः किन्तु जडचेतनयोर्निर्धारस्थापितायावृत्तेरेव । सिद्धमतः सत्वात्मकं विवेकज्ञानं । अत्रवेदांतमताश्रयेण सम्यक् समाधानं सांख्यमताश्रये पादे प्रस्तरपतनमिति ।

पूर्वपक्षः—अहो ! मोक्षनित्य आहे आणि तो ज्ञानाच्या स्वाधीन आहे ह्मणून ज्ञानाच्या अविनाशपणाचा अंगीकार करणें आपल्याला भाग पडत असल्यामुळें अंतर ज्ञानाचा सत्व गुणांत समावेश करणें बरोबर होत नाहीं. कारण आत्मसत्तेनें सत्व गुणाचा नाश करावा असें भगवंताचे वचन असल्यामुळें मोक्षांत तिन्ही गुणांचा नाश होतो तेव्हां अर्थातच सत्वाचाही नाश होतो व त्यामुळें सत्वांत अंतर्भूत झालेल्या ज्ञानाचाही नाश होत असून त्याच्या स्वाधीन असलेल्या मोक्षाचाही नाश होतो असें ह्मणावें लागते.

उत्तर पक्षः—अरे ! तुझें असें ह्मणणें बरोबर आहे परंतु एवढी तुझी शक्ति सांख्याच्याच मानेला खाली लववितें. आमच्यावर तिचा जोर मुळींच चालणार नाहीं. कारण आह्मी वेदांती तर बंधाला मिथ्या समजत असल्यामुळें मोक्षालाही मिथ्याच समजत असतो. कल्पित पदार्थाची प्राप्तीच जर खरी नाहीं, तर त्याची निवृत्ति कशी खरी होईल? दोरीवर भासलेला सर्प जर वस्तुतः उत्पन्नच होत नाहीं तर तो मरतो हें ह्मणणें तरी वास्तवीक कसें ? आग्रहानें हें न कबूल करशील तर तुझ्या मतांत बंध सत्य झाल्यामुळें सत्याचा नाश कधींही होत नाहीं असें भगवद्वचनावरून व युक्तिवरूनही दिसत असल्यामुळें तुझ्या मतांत बंधाचा नाश न होऊन कोणालाही मोक्ष होण्याचा प्रसंगच येणार नाहीं असेंही मानशील तर मूर्खा, सर्वथा सुखाची इच्छा सोडून देऊन विस्तव खाणें, अंगाला टोचून घेणें, इत्यादि दुःखाच्याच इच्छा करीत राहा. खरें विचारशील तर रोग नाहींसा झाल्यावर जसें औषधाचाही उपयोग नसतो, तसें अज्ञान नाहींसे झाल्यावर मग ज्ञानाचाही उपयोग राहत नाहीं. जरी ब्रह्म चेतन असल्यामुळें

ज्ञानस्वरूपच आहे, तरी जडचेतनाला निराळें करणारें असें जें ज्ञान तत्स्वरूप ब्रह्म आहे, असें आमचें मत नाहीं तर अविद्या व तिचें कार्य जगत् या दोहोंचाही ज्या ठिकाणीं अत्यंत अभाव ह्मणजे अविद्या व जग हे दोन्हीही कधीं उत्पन्न झालें नाहींत, होत नाहींत व होणार नाहींत असा जो अखंडैकरस अनुभव तत्स्वरूप चेतन आहे. हा वेदांत सिद्धांत समज. जसें सूर्याच्या ठिकाणीं असलेला प्रकाश तमाला निराळे पाहाणारा नाहीं तर सर्वथा तमाचा अभावच त्या प्रकाशाच्या ठिकाणीं आहे. हाच उत्तम दृष्टांत जुळवून घे. व ह्मणून ह्या जडचेतनाची निवड करणाऱ्या ज्ञानाला आह्मीं सत्व गुणांत घातलें. ज्या प्रमाणें हा अंधार आहे असें ज्ञान सूर्याला होत नसून प्रकाश व अंधार दोन्ही पाहाणाऱ्या नेत्राला तें होत असते तसें हें जड व हें चेतन असें निवड करणारें ज्ञानही मुख्य चैतन्याचे ठिकाणीं नसून चैतन्याचा आश्रय केलेल्या सत्वगुणाच्या वृत्तीचें आहे. कारण हें जड आहे व हें चेतन आहे असा निश्चय बुद्धीच करीत असते. तात्पर्य जड चेतनाची निवड करणारें ज्ञान सत्वगुणाचा धर्म आहे, हें सिद्ध झाले. मग तूं ह्मणतोस तसें तें अनित्य होईल तर होईना बापडे. प्रथम त्यांचा उपयोग असला तरी पुढें नाश झाल्यानें आमच्या वेदांत सिद्धांताची हानी मुळींच होत नाहीं. सांख्यमात्र या विवेक ज्ञानालाच नित्य मानून सत्वांत याचा समावेश करीत असल्यामुळें याठिकाणीं आपल्या पायावर धोंडा पाडून घेतात.

वैराग्यंच द्विधा प्रोक्तं बाह्यमाभ्यंतरं तथा ।
दृष्टानुश्रविकेभ्यस्याद्विरागोदोषदर्शनात् ॥ १३ ॥

वैराग्यही दोन प्रकारचें आहे. बाह्य व अंतर. पैकीं पांचाही इंद्रियांना गोचर असणाऱ्या विषयांच्या ठिकाणीं दोष पाहून व वेद पुराणादिकांत ऐकलेल्या स्वर्गादि परलोकांतील रंभानंदनवनादि विषयांचे ठायीं दोष पाहून मनाची पीछेहाट झाल्यानें जें वैराग्य उत्पन्न होतें तें बाह्य समजावें.

बाह्यंतदितिसंप्रोक्तं पुनराभ्यंतरं श्रुणु ।
सर्वं स्वप्न समंव्यर्थं प्रधानादिकमुच्यते ॥१४॥

आतां, अंतर ऐक. प्रकृती देखील स्वप्नेंद्रजालासारखी मिथ्या आहे असें समजणें हें अंतर वैराग्य होय. हें आंतरवैराग्य खरोखर वेदांतांतच होण्यासारखें आहे. सांख्यांत होण्यासारखे नाहीं. कारण सांख्य प्रकृतीला सत्य समजत असतात. तथापि हें वेदांतांतील मुख्य वैराग्य गौडपादाचार्यांनीं सांख्यकारिकेच्याभाष्यांत घुसडून जबरदस्तीनेंच सांख्याला वेदांतावर ओढलें आहे. पण हें आमच्या उत्तम पथ्यावर पडलें.

स्यादैश्वर्यमपिद्वेधा बाह्यमाभ्यंतरंपुनः ।
अणिमादिर्भवेद्बाह्यमूहाद्याभ्यंतरंस्मृतं ॥ १५ ॥
अणिमामहिमाचैवगरिमालघिमातथा ।
प्राप्तिः प्राकाम्यमीशत्वंवशित्वंचाष्टसिद्धयः ॥ १६ ॥

अत्रचकारेण केचित् गरिम्णो महिम्न्यंतर भावंकृत्वा कामावसायितां अष्टमींसिद्धिं कल्पयन्ति तेषामपिमतं गृह्यते । ममत्तेनचकारार्थस्तुअयं–कामावसायितानाम्नी नवमींसिद्धिरितिप्रवच्मि । सर्वासांसिद्धीनां एककालीनमुपयोगकरणं कामावसायित्वं ।

तेषां सर्वेषु लोकेषु कामचारोभवति । सर्वेस्मैदेवा बलिमावहन्ति इत्यादिश्रुतिभ्यः अन्येषांकामावसायित्वव्याख्यानं श्रुतिविरुद्धमेव स्वनिश्चयानुसारेण पदार्थनिर्माणे परारब्धहानिप्रसंगात् तन्नित्यतावति परमेश्वरेर्थादेवनैर्घृण्यवैषम्यदोषप्रसक्तिरिति गरिम्णोमहिम्न्यंतर्भावश्चेत् त्रिविक्रमपादप्रहारेण किमर्थं न जगत्प्रलयोभूत ? सर्वमेतत् बाह्यैश्वर्यं नवविधमपि ज्ञानवैराग्यलब्धपरमानंदं विना व्यर्थमेवेति तातैर्निजमतं प्रदर्शितं हरिपाठप्रकरणे । योगशास्त्रिभिरप्येवं सूत्रितं 'तेसमाधावुपसर्गाव्युत्थाने सिद्धय ' इति । तदपि बाह्यैश्वर्य विषयकमेव । अंतरैश्वर्येदुःखत्रयसिद्धि कथनात् दुःखत्रयनाशस्यच मोक्षे निवेषणात् ।

ऐश्वर्यही दोन प्रकारचें आहे. बाह्य आणि आंतर पैकीं आणिमादि बाह्य व ऊहादि आंतर समजावें.

आणिमा ह्मणजे शरीर परमाणू सारखे होणें. ही सिद्धी प्राप्त झाली असतां योगी शिळेमध्यें देखील प्रवेश करूं शकतो. [illegible] मग ह्मणजे मोठे होणें. ही प्राप्त झाली असतां त्रिविक्रमा सारखे कृ[illegible]त्यामुळें

करूं शकतो. गरिमा ह्मणजे जड होणें हिच्या योगानें पृथ्वीला खालीं दाबू शकतो. लघिमा--हलके होणें. हिच्या योगानें जेवढेचतेवढेंच शरीर असून फुलातील केसर न कुचंबू देतां देखील त्यांच्यावर उभा राहूं शकतो किंवा सूर्य किरणांवर चढून सूर्य मंडलांत जाऊन येतो. ह्या योगियांचें शरीर अर्थातच जडशास्त्रकथित वायूच्या दाबाची अपेक्षा करीत नसल्यामुळें त्याला वर जातां येते. प्राप्ती ही सिद्धी मिळाली ह्मणजे योगियाला सर्व गोष्टी समीप असतात. तो येथूनच आपल्या हाताच्या बोटानें चंद्राला स्पर्श करूं शकतो. प्राकाम्य ही मिळाली असतां मनुष्य कोणत्याही पदार्थाचें रूप घेवूं शकतो. त्याच्या इच्छेला कोठेंच प्रतिबंध नसतो. ईशत्व--ही मिळाली असतां ईश्वरा सारखा मनुष्य सर्व सृष्टीवर अधिकार चालवूं शकतो. व वशित्व ह्मणून जी सिद्धि आहे तिचेंही सामर्थ्य ईशत्व सिद्धी सारखेंच आहे. परंतु हा विशेष आहे कीं ईशत्व सिद्धी प्राप्त झालेल्या योग्याची आज्ञा सर्व पदार्थ भिवून पाळतात व वशित्व सिद्धी प्राप्त झालेल्या योग्याची आज्ञा सर्व पदार्थआनंदानें पाळतात. श्लोकांत जो चकार आहे त्याचा अर्थ असा समजावा कीं, कांहीं लोक गरिमा सिद्धिचा अंतर्भाव महिमा सिद्धींत करितात कारण महिमा ह्मणजे मोठे होणें व गरिमा ह्मणजे जड होणें हे दोन्ही एकच असा ते अर्थ घेतात. त्यांच्या मतांत कामावसायित्व ही आठवी सिद्धी आहे. ही मिळाली असतां योगी सत्यसंकल्पवान होतो ह्मणजे आपण अनुभव घेवून पदार्थांचा जसा निश्चय करितो तसी गोष्ट या योगियांची नसून तो जसा निश्चय करितो तसेंच पदार्थ बनतात. ह्मणजे आमचा निश्चय परतंत्र असतो व त्यांचा निश्चय स्वतंत्र असतो. आतां माझ्या मतानें चकाराचा अर्थ असा आहे कीं, त्या चकारानें कामावसायित्व ह्मणून नवव्या सिद्धीचें ग्रहण करावें.

कामावसायित्व ह्मणजे सर्व सिद्धींचा एकाच वेळीं उपयोग करितां येणे.

योगियांची ब्रह्मादि लोकांचे ठिकाणीं ही इच्छा सफळ देव ह्या योग्यांची पूजा करितात. इत्यादि श्रुती माझ्या ह्मण-

ण्याला प्रमाण आहेत. वर जे आह्मी कामावसायित्वाचें लक्षण सांगितलें आहे. से वाचस्पतिमिश्रादिकांचें असून श्रुती विरुद्ध आहे. कारण आपल्या इच्छेनुसार पदार्थ बनविण्याची जर योगियांमध्यें शक्ति मानली तर कुत्र्याचा इंद्र बनविण्याचीही शक्ति मानणें त्यांचे ठिकाणीं भाग पडेल. व तसें मानलें ह्मणजे कुत्र्याच्या जन्माला कारण होणारे जे पापरूप प्रारब्ध ते नाहींसे होऊन त्याचें ठिकाणीं इंद्रजन्माला कारणीभूत असें पुण्यरूपी प्रारब्ध योगी उत्पन्न करितो असें ह्मणावें लागेल ह्मणजे वैदिक कर्मवादावर फाटा बसून ह्या सिद्धी ज्याच्या ध्यानानें योगियाला उत्पन्न होतात त्या परमेश्वराचें ठिकाणीं अर्थातच सर्व सिद्धि नित्य असल्या पाहिजेत. व त्यांत कामावसायिताही आहेच. ईश्वराच्या ठिकाणच्या कामावसायित्वाचा मिश्रांच्या ह्मणण्याप्रमाणें अर्थ केला ह्मणजे तो परमात्मा आपल्या इच्छेनेंच पापी मनुष्याला स्वर्ग व पुण्यवान मनुष्याला नर्क देतो असें ह्मणावें लागत असून भगवान् वेदताताची अंत्येष्टी करण्याची पाळी येते. ह्मणून आमचाच अर्थ श्रुतिसंमत आहे. आतां गरिमा सिद्धीचा महिमा-अंतर्भाव करण्याचीही आह्माला कांहीं गरज दिसत नाहीं. कारण आकाशाच्या गोटा जरी योगी झाला तरी त्याचें शरीर पूर्वीप्रमाणेंच किंबहुना त्यापेक्षां हलकेही राहूं शकेल असें नाहीं तर आह्मी विचारितो कीं भगवान् त्रिविक्रमानें जेव्हां दोन पायांत सारे ब्रह्मांड आटविलें तेव्हां त्याचे पायातळीं स्वर्गपृथ्व्यादिकांचा चेंदा होऊन पृथ्वीचा प्रळय कां झाला नाहीं ? म्हणून आमचे नऊ सिद्धि मानणेंच बरोबर आहे. हें नवही प्रकारचें ऐश्वर्य ज्ञान व वैराग्यापासून मिळणाऱ्या परमानंदाच्या दृष्टीनें व्यर्थच आहे. असें तातांनी हरिपाठांत आपलें मत स्पष्ट सांगितलें आहे समाधी हरीची सम सूखेंवीण । न साधेल जाण द्वैत बुद्धी ॥ १ ॥

योगशास्त्राचें निर्माते भगवान् पतंजली ह्यांनीं देखील असेंच सुचविलें आहे. ह्या सिद्धि चुकलेल्याकरितांच असून समाधिमध्यें ह्या केवळ विघ्नरूप आहेत. असें योग सूत्र आहे. हें पतंजलीचें ह्मणणें बाह्यैश्वर्याविषयींच आहे कारण आंतर ऐश्वर्यांत तर तिन्ही दुःखाच्या

नाशरूप सिद्धीचें कथन असून दु:खत्रयनाशाला मोक्ष ह्मटलें आहे. मग आंतर ऐश्वर्याविषयीं पतंजलींचें ह्मणणें लागू केलें तर मोक्षही समाधिमध्यें विघ्नरूप आहे असें ह्मणावें लागेल. व तें सर्व मोक्षवादी आस्तिकांना अनिष्ट आहे. आतां अंतरैश्वर्य सांगतों.

आर्या—ऊह:शब्दोध्ययनं दु:खविघातास्त्रय:सुहृत्प्राप्ति:
दानंचेत्यष्टविधमैश्वर्यं प्रोक्तमांतरंसद्भि: ॥ २७ ॥

ऊह ह्मणजे आपल्या तर्कानेंच कोणाची अपेक्षा न करितांना ज्ञान मिळवून मुक्त होणें व ऊहाच्या योगानें मनुष्य सर्वज्ञही होऊं शकतो. असें पतंजलींनीं आपल्या सूत्रांत सांगितलें आहे. शब्द ह्मणजे योगवासिष्ठाच्या निर्वाणप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सिद्धगाथा ऐकून जनक मुक्त झाला तसें थोड्याशा शब्दावरून प्रबल स्फूर्तीच्या योगानें सर्व ज्ञान होणें ही दुसरी सिद्धि होय. गुरुमुखानें शास्त्राध्यन करून सर्व ज्ञान होणें ही तीसरी, व जीवन्मुक्तिदशेंत आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक ही दु:खें प्रारब्धानें प्राप्त झालीं असतां त्यांचा अभिभव करणें ह्या तीन सिद्धि मिळून सहा झाल्या कांहीं खटपट न करितां एखादा महात्मा आपल्यावर प्रसन्न होऊन मित्रपणानें सर्व ज्ञान करून देतो, ही सातवी सिद्धि ( सुहृत् प्राप्ति ) व जानश्रुती राजानें रैक्वमुनीला कन्या देऊन ज्या प्रमाणें ब्रह्मज्ञान करून घेतलें, अशी छांदोग्य उपनिषदांत गाथा आहे, त्या प्रमाणें यथाशक्ति कोणत्याही पदार्थाचें दान करून एखाद्या महात्म्याजवळून जें ज्ञान मिळतें ती आठवी सिद्धि होय. या आठ सिद्धींनां महात्म्यांनीं आंतरैश्वर्य ह्मटलें आहे.

तत्रप्रथममैश्वर्यं 'प्रवृत्तिलक्षणं' धर्मार्थयो: जन्यजनकभाव संबंधात्। तद्वद्वितीयैश्वर्यं 'निवृत्तिलक्षणं' । किंचैवं साधितसत्वत्रत्सु । सिद्धसत्वे-परमेश्वरावतारे जगदुपयोगित्वात् स्वत: सिद्धत्वाच्चाव्यभिचार: ।

हें दोन्ही प्रकारचें जें ऐश्वर्य सांगितलें तें ईश्वरावतारांचे ठिकाणीं स्वत: सिद्ध असून साधनानें सत्व वाढविणाऱ्या सत्पुरुषाचे ठिकाणीं बाह्यैश्वर्य प्रवृत्तिलक्षणधर्मानें उत्पन्न होत असून आंतरैश्वर्य निवृत्तिलक्षणधर्मानें उत्पन्न होत असतें.

प्रोक्तोयं सात्विकोत्कर्षो यस्यसाधनजस्स सन् ।
जन्मनैव भवेद्यस्य सोवतारः प्रकीर्तितः ॥ १८ ॥

असा हा धर्म ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य या चार प्रकारानीं जो सत्वाचा उत्कर्ष सांगितला, तो ज्याचे ठिकाणीं साधनानें उत्पन्न होतो, त्याला साधू म्हणतात व ज्या व्यक्तीचें ठिकाणीं, तो जन्मतः असतो, त्याला अवतार म्हणतात.

केषांचिज्जन्म सिद्धानामेवमस्ति तथापिहि ।
आंतरैश्वर्यसंसक्तिर्मोक्षिच्छावशतः स्थिता ॥ १९ ॥
देवानां सात्विकत्वेपि वैराग्यन्यौन्यतस्सदा ।
बाह्यैश्वर्योपयोगोस्ति सत्कृतेस्तारतम्यतः ॥ २० ॥

आतां कांहीं जन्मसिद्धांचे ठिकाणीं हा सात्विक उत्कर्ष असतो खरा. पण त्यांच्यांत व अवतारांत हा भेद आहे कीं, जन्म सिद्धांचे ठिकाणीं मुमुक्षा असल्यामुळें, त्यांनां आपल्यासाठीं आंतरैश्वर्याची जरूर लागते. हे वादी, हा उत्कर्ष देवांचेही ठिकाणीं असतो; असें म्हणशील तर देव जरी जन्मानें सात्विक आहेत तरी त्यांचे ठिकाणीं वैराग्य न्यून असल्यामुळें बाह्यैश्वर्याचा स्वार्थी उपयोग दिसतो. आतां त्याचा कमीअधिकपणा पुण्याच्या तारतम्यामुळें आहे असें समज.

मुक्ताधिकारिकाणांचेदेवं तदपि धार्मिक ।
प्रारब्धस्योपयोगोस्ति नोवतारे तथा स्थितिः ॥२१॥
एतेषांप्रारब्धनाशेनोत्कर्षस्योदयः पुनः ।
नित्योदयोवतारे स्यान्नित्यमुक्तस्तथाप्यसौ ॥२२॥

आतां मुक्त झालेल्या आधिकारिकांचे ठिकाणीं हा उत्कर्ष असतो खरा. परंतु त्यांना देखील धर्मानें उत्पन्न झालेलें प्रारब्ध भोगून टाकण्याचा, विदेहमुक्तीसाठीं स्वार्थी उपयोग आहे. अवतारांची गोष्ट तशी नाहीं. अवतार नित्यमुक्त असून कशाचीच त्यांना अपेक्षा नसल्यामुळें त्यांचे ठायींच्या सर्व सात्विक उत्कर्षाचा, लोकानुग्रहार्थच उपयोग आहे. पुनः अधिकारिकांचें धार्मिक प्रारब्ध एकदा क्षीण झालें म्हणजे सत्वोत्कर्ष त्यांचे ठिकाणीं पुनः उदय पावत नाहीं. ईश्वराचे मुक्तींतून व्युत्थान न होऊन म्हणजे त्याची स्वतंत्रता व नित्य मुक्तता सारखी कायम राहून-

ही तत्स्थानीय सात्विक उत्कर्षाचा सर्वदाच उदय असतो. हा विशेष आहे. हें ह्मणणें कांहीं आमच्या पदरचें नव्हे तर नाथ व तुकारामांनींही असेंच ह्मटलें आहे. तरी ' ऐकें गा रघुनाथा । तुह्मां अवतारांची सत्ता । नये जीवांचिया हाता । जरी यथार्थता मुक्त झाला' ॥ 'ऐसें काय तुह्मीं जाले रे जाणते । देवाही परते तुका ह्मणे' ॥

साधूनामवताराभिध्यानात् कीटकभृंगध्यानवत् अवतारधर्माकारेणांतःकरणं परिणमति । ततो सतामपि तदनुसारेणैवाचरणं स्यात् । पुनरपि किंचित् विशेषो दृश्यते । योगिनो मानुषे जन्मन्येव सर्वं कर्तुं समर्थाः अन्यस्मिन्जन्मनि जडभरतवत् किंचित्तेषां शक्तिरभिभूयते । परमेश्वरावतारस्यतु मत्स्यकूर्मफणींद्रादितिर्यग्योनिष्वपिसमानमेव सामर्थ्यमिति बोद्धव्यं । अतः पाषाणादि मूर्तिष्वपि ध्यानेनावाहितपरमेश्वरस्य सामर्थ्यलोपो न भवतीति दिक् । योगिनामपि तिर्यक्कायनिर्माणे परकायप्रवेशे वा सामर्थ्यलोपो नास्तीतिचेन्न । प्रथमे विकल्पे मानुषशरीराचित्तनायकत्वात् निर्मितकायस्य प्रारब्धभोगोपयोगित्वाच्च । द्वितीये गौणसिद्धिरूपत्वादैश्वर्योपभोगेन वैराग्यन्यौन्यसंभवाच्च । न योगिनोऽवतारसाम्यम् । अवतारे वैराग्यत्वात् ऐश्वर्यानुपयोगः ऐश्वर्याद्वैराग्यानुपयोगस्तस्माद्वयमपि वृथेतिचेदुच्यते । परमेश्वरावताराणां सर्वथा नित्यतृप्तत्वात् स्वार्थं धर्माद्युपयोगोनास्ति । लोकानुग्रहार्थमेव ते तस्मिंस्तिष्ठन्ति । साधूनां तु मुमुक्षुदशायां स्वार्थमुपयोगः । मुक्तदशायां परार्थमिति एवंचेत् तथापि मुमुक्षुदशायां अणिमादिबाह्यैश्वर्योपयोगस्तु परार्थ एव । मुक्तदशायां जीवन्मुक्तिसुखहेतोरांतरवैराग्योपयोगस्तु स्वार्थोपीति जीवन्मुक्तिविवेकादुपलभ्यते । परमेश्वरावतारस्यतु स्वार्थोपयोगः सर्वथा नास्तीत्यवगंतव्यम् । अयं साध्ववतारभेदोंतःकरण दृष्ट्या । तस्माद्यावदंतःकरणं समाधिगतं भगवदुपरतं न तावत् उक्तानुसारेणैवाचरितव्यम् । समाधिगतमंतःकरणं यदात्मनि लीयते तदा अद्वैतत्वात् आत्मदृष्ट्या अत्यंतभेदहानिस्तथापि जीवन्मुक्तिदशायां लोकानुग्रहार्थमुपर्युक्तमाचरितव्यं । सर्वमेतद्दर्शितमेकेन श्लोकेन हनुमन्नाटके । हनुमानुवाच--

'देहबुद्ध्या तु दासोहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ॥
आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इतिमेनिश्चलामतिः ' ॥ २३ ॥

भिंगोटीच्या ध्यानानें अळी जशी भिंगोटी होते, तसें अवताराचे ध्यानानें सत्पुरुषांचें अंतःकरण अवतारधर्मांच्या आकारानें परिणाम पावतें; ह्मणून अवतारांच्या आचरणाप्रमाणें आपल्यासत्वोत्कर्षांचा लोकांनां उपयोग होईल, असें आचरण सत्पुरुषानेंही करावें. तुकाराम-महाराज ह्मणतात—' वाचे गोविंद गोविंद। मना लागो हाचि छंद॥१॥ मग गोविंद ते काया। भेद नाहीं देवा तया॥ २॥ आनंदलें मन। प्रेमें पाझरती लोचन॥३॥ तुका ह्मणे अळी। झाली भिंगोटी सगळी।४।

पुनः अवतारांमध्यें व योगीयांमध्यें थोडासा विशेष दाखवितां येईल. योगियांचें सर्व सामर्थ्य, मनुष्य जन्मांतच दिसत असून, तीर्यग्योनींत जडभरतादिकाप्रमाणें लोपल्यासारखेंच असतें. परमेश्वरावताराचें सामर्थ्य तर मत्स्यकूर्मादि अवतारामध्यें सारखेंच असतें. ह्मणूनच पाषाणादिकांच्यामूर्तीमध्यें देखील ध्यानानें स्थापित केलेल्या अवतार सामर्थ्याचा लोप होत नाहीं, असें समजावें.

आतां योगी देखील तिर्यगादि प्राण्याचीं जेव्हां रूपें धरितात, किंवा त्यांचे शरीरांत जेव्हां प्रवेश करितात, तेव्हां त्यांचेंही सामर्थ्य क्षीण होत नाहीं, हें ह्मणणें सम्यक् नाहीं. कारण योगी तिर्यगादि प्राण्याचीं रूपें धरोत; किंवा त्यांचे कायेंत प्रवेश करोत; पहिली गोष्ट ते अनेक जन्मांचें प्रारब्ध एकदम भोगून टाकण्याकरितां करीत असल्यामुळें तींत लोकानुग्रहाचा भाग विशेष नसतो. व दुसऱ्या गोष्टीला तर भागवतांत गौणासिद्धि ह्मटली असल्यामुळें ती समाधींत विघ्नरूप आहे. व अशा ऐश्वर्योपभोगानें वैराग्याचा कमीपणा संभवत असल्यामुळें अवतार साम्यता त्याला येणार नाहीं. आतां अवताराला वैराग्यामुळें, ऐश्वर्याचा उपयोग नाहीं व ऐश्वर्यास्तव वैराग्याचा उपयोग नाहीं ह्मणून तीं दोन्ही व्यर्थच आहेत असें ह्मणणें कसें योग्य नाहीं तें सांगतो. परमेश्वरावतार नित्यमुक्त व नित्यतृप्त असल्यामुळें, त्याला आपल्यासाठीं धर्मादि सात्विकोत्कर्षांचा मुळींच उपयोग नाहीं; परंतु दुसऱ्याच्या अनुग्रहासाठींच ते धर्मादिक परमेश्वराचे ठिकाणीं राहतात. सत्पुरुषांनां तर मुमुक्षुदशेमध्यें आपल्या-साठीं ह्या धर्मादिकांचा उपयोग असून मुक्तदशेंत तो दुसऱ्या-

साठीं आहे. असें जरी आहे तरी सत्पुरुषांना देखील मुमुक्षु दशेमध्यें अणिमादि वाह्यैश्वर्याचा उपयोग दुसऱ्यासाठींच आहे. देवाप्रमाणें आपल्यासाठीं नाहीं. आणि मुक्तदशेमध्येंही जीवन्मुक्तिसुखाकरितां आंतर वैराग्याचा आपल्यासाठीं उपयोग आहे असें, जीवन्मुक्तिविवेका वरून दिसतें. आणि परमेश्वरावताराला तर, कोणत्याही सत्वोत्कर्षाचा आपल्यासाठीं उपयोग नाहीं असें समजावें.

या प्रमाणें येथवर जो सत्पुरुषांचा व अवतारांचा आह्मी भेद सांगितला तो अंतःकरणदृष्टीनें असून आत्मदृष्टीनें नाहीं; ह्मणून जों-पर्यंत आत्मज्ञान झालें नाहीं व अंतःकरण समाधींत नाहीं, तोंपर्यंत लोककल्याणोपयोगी सत्पुरुषानें आचरण ठेवावेंच. व जेव्हां अंतःकरण समाधिस्थ होऊन आत्मज्ञानानें आत्म्याचें ठिकाणीं लीन होतें, तेव्हां अद्वैतामुळें भेद मुळींच रहात नाहीं तरी जीवन्मुक्तीचे ठिकाणीं लोकानु-ग्रहांकरितां वर सांगितल्याप्रमाणेंच सत्पुरुषानें आचरण ठेवावें:—

तुकाराम महाराज ह्मणतात—' काय वानूं आतां न पुरे हे वाणी ।। मस्तक चरणीं ठेविलेंसे ।। १ ।। थोरिव सांडिली आपुली परिसें । नेणे शिवों कैसें लोखंडासी ।। २ ।। जगाच्या कल्याणा संता-च्या विभूति । देह कष्टविती उपकारें ।। ३ ।। भूतांची दया हे भांडवल संता । आपुली ममता नाहीं देहीं ।। ४ ।। तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ' ।। ५ ।।

हें सर्वच थोडक्यांत एकाच श्लोकानें हनुमन्नाटकांत सांगितलें आहे मारुती ह्मणतो— रामा, मी देहबुद्धीनें तुझा दास आहें, जीवबुद्धीनें अंश आहें, व आत्मबुद्धीनें जो तूं तोच मी आहें. असें माझे ज्ञान कालत्रयीं न ढळणारें आहे.

एवं ब्रह्मात्मैक्यादपि भगवद्भक्तिर्विहितेवेतिमेमतम् । ' ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति । समस्सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।। इति जागृत् श्रुतेः । आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथाअप्युरुक्रमे । कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणोहरिः' ।। इतिस्मृतेश्च । अनुभवोप्ययम-स्माकम् ।

वयं ब्रह्मज्ञानान्निगमंगदितानंद पटवो ।
धनस्त्रीपुत्रादीन् वमनमिवसन्त्यक्तविषैया: ॥
तथापि स्वाश्चर्यं युवतिकुचचौर्ये पटुरयम् ।
वृथा द्विट् गोविंद: प्रहरतिमनोमन्मथशरै: ॥२४॥

या प्रमाणें ज्ञानानंतरही भगवद्भक्ति पाहिजे असें माझें मत आहे. ब्रह्मानंद प्राप्त झालेल्याला माझी भक्ति मिळते या जागृत श्रुतीमुळें व ग्रंथिभेद झालेल्या आत्म्यांचे ठिकाणीं रममाण होणारे मुनि अपार-पराक्रम परमेश्वराचे ठायीं निष्काम व उगीच प्रीति ठेवितात. कारण, हरीचे गुणच असे आहेत कीं, मुक्तांच्याही मनाचें आकर्षण होतें आमचा अनुभवही हाच आहे. श्लोकार्थ— गोपीकाजातींत आपला समावेश करून घेण्याकरितां वयं ह्मटलें आहे. श्लोकांतील विशेषणावरून जें अंगीं कांहीं पुरुषत्व येऊं पाहतें तें विषयत्यागाचे ठायीं धर्माचें दर्शक आहे. 'वृथा द्विट्' या पदाचा अर्थ द्वेष, आभासमात्र, व राग वास्तविक, असा आहे.'गोविंद'पद एकाकी वनांत सांपडण्याकरितां आहे. 'प्रहरतिमनोमन्मथशरै:' या पदानें मनाच्या पडद्याचें निराकरण करीत असून माझें आत्मरूप आपल्यारूपीं मिळवून एक करूं पाहतों. असा आहे. शेप स्पष्टार्थ:—

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यो योऽलकावतिवल्लभ: ॥
वाग्यज्ञेनार्चितो देवो हृदये सर्वदास्तुन: ॥२५॥

आळंदीचे राजे श्रीगुरु आचार्य ज्ञानेश्वरमहाराज, ज्यांचे वाग्यज्ञानें पूजित झालेले असे ते प्रभु आमच्या हृदयांत अखंड राहोत.

आपण जो मला सिद्धसंतभेद विचारला होता, व सिद्ध हे पूर्व संस्कारानें होतात व संत भक्तीनें होतात, असें कोणाचें ह्मणणें दर्शविलें होतें, तें बरोबर नाहीं; कारण, सिद्ध व संत हे दोन्ही शब्द भक्तांविषयींच असल्यामुळें, ते दोघेही एकच आहेत.

' यल्लब्ध्वापुमान्सीद्धो भवति । अमृतोभवति । तृप्तोभवति । सत्संगो दुर्लभोगम्योऽमोघश्च' । ॥ श्रीमत्ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

---

१ पाठांतर–परमपरमानंदपटवो । २ पाठांतर–मतय: ।

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

रा० रा० बाबुराव यांस पाठविलेलें पत्र १ लें

# पत्र नंबर ८.

सर्वव्यापि निर्गुणं यत् हृदये सगुणं यथा ।
तथालंद्यां स्फुटं भाति तद्ब्रह्मैकं समाश्रये ॥ १ ॥

**अर्थ:**— आतां अधिष्ठानदृष्टीनें निर्गुण व सर्वव्यापी, तेंच ध्यानरूपानें हृदयांचे ठिकाणीं जें सगुण झालें, व तसेंच ध्यानाप्रमाणें व ज्ञानाप्रमाणें आलदींत जें प्रतीत होतें त्या श्रीज्ञानेश्वररुपी ब्रह्माला मी सदैव नमस्कार करितों ॥ १ ॥

विप्रबुद्ध्या नमस्कार: पुत्रबुद्ध्याऽशिष: सदा ।
सन्त्वित्युक्त्वा प्रकुर्वेहं किंचिद्गोविंद लेखनम् ॥ २ ॥

ब्राह्मणदृष्टीनें नमस्कार करून, व पुत्रदृष्टीनें नेहमीं आशिर्वाद देऊन, आतां हे गोविंदराव, कांहीं लिहितों ॥ २ ॥

प्रत्यक्षं न तदल्पत्वात्सामान्यान्नानुमानकम् ।
शाद्बमेव प्रमाणं स्यात्परोक्षमपरोक्षदम् ॥ ३ ॥

तत्रादौ, चार्वाकमतनिराकरणाय प्रत्यक्षं प्रमाणं दूषयति । प्रत्यक्षं खलु प्रमाणमेव न भवति । अल्पत्वात् । यथाहि अयं घट: इत्यत्र किंवा प्रत्यक्षेण घटज्ञानम् । संघातावयवानां परमाणूनां संख्याज्ञानम् आहोस्वित् एकावयवज्ञानं । पक्षद्वयेपि बाधकमनुभवाभावात् दूषितंच प्रत्यक्षम् । तंत्रांतरेपि "अतिदूरात् सामीप्यादिंद्रियघातान्मनोनवस्थानात् । सौक्ष्म्याद्व्यवधानादभिभवात्समानाभिहाराच्च ॥ बौद्धनैय्यायिकांनां मतनिरासाय अनुमानमपि दूषयन्नाह । अनुमानं तावत्प्रमाणमेव नास्ति । तस्य प्रत्यक्षपूर्वकत्वात् प्रत्यक्षखंडितत्वात् । तुष्यतु दुर्जन इति न्यायेन गृहीतमपि सामान्यज्ञानमेव तद्दर्शयति न विशेषम् । अतोस्माकं शाद्बमेव प्रमाणं श्रेयस्करं स्यात् । लोकानां शद्बस्यापि दृष्टपरत्वात् अर्थादेव लौकिकशद्बप्रमाणं निरस्तम् । परिशेषात्

वैदिकमेवप्रमाणम् श्रेष्ठमितिभाव: । तद्विभजतेऽपरोक्षेत्यादिना ॥ ३ ॥

**अर्थ**—आतां चार्वाकादिकांचे नास्तिकमत खंडण करण्याकरितां, प्रत्यक्ष प्रमाण सदोष आहे असें दाखवितात. प्रत्यक्ष, प्रमाणच होऊं शकत नाहीं. कारण तें फारच मर्यादित आहे. जसें हा घट आहे असें जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां त्यांत प्रत्यक्षानें काय समजलें ? ज्या परमाणूंचा तो घट झालेला आहे, त्यांची संख्या समजली, किंवा तो एकच आहे असें समजलें ? दोन्हीही गोष्टी अनुभवाच्या विरुद्ध आहेत. कारण, त्यांची संख्याही आपणास समजत नाहीं; किंवा तो एक आहे असेंही ह्मणवत नाहीं. शास्त्रांतही प्रत्यक्ष प्रमाण सदोषच ठरविलें आहे. जसें अत्यंत दूर असलेलें, किंवा अत्यंत जवळ असलेलें, आपणास समजत नाहीं. तसेंच एखादें इन्द्रिय खराब झालें असतां, तद्विषयज्ञान होऊं शकत नाहीं. मन स्थिर नसलें, किंवा वस्तु फारच सूक्ष्म असली, अथवा ती वस्तु व आपण ह्यांत कांहीं आड आलें, किंवा एखाद्या शक्तीनें ती दाबून टाकली असली, अथवा त्या वस्तूंत त्या सारखी वस्तु आणखी मिळवून दिली, तरीहि त्या वस्तूचें इन्द्रियाच्या योगानें ज्ञान होत नाहीं. या प्रमाणें प्रत्यक्ष प्रमाण खंडण करून बौद्धनैय्यायिकादिकांचें मत खंडण करण्या करितां अनुमानही सदोष ठरवितात. अनुमानही प्रमाण होऊं शकत नाहीं. कारण तें प्रत्यक्षावलंबी असून प्रत्यक्ष तर पूर्वीच खंडण केलें; तथापि तसेंही घेऊन चाललें तरी यानें नेहमीं सामान्य वस्तूंचें ज्ञान होतें; विशेष गोष्टीचें होऊं शकत नाहीं. जसें घट आहे ह्मणून, तो कोण्यातरी कुंभारानें केला असला पाहिजे, हें सामान्य ज्ञान अनुमानानें होतें; परंतु तो अमक्याच कुंभारानें केला हें समजत नाहीं. त्या करितां शब्दप्रमाणच मानावें लागतें. परंतु लौकिक शब्दप्रमाण देखील प्रत्यक्षास अनुसरूनच असतें. व प्रत्यक्ष खंडित असल्यामुळें लौकिक शब्दप्रमाणाचेंही येथें ग्रहण होऊं शकत नाहीं. अर्थात अलौकिक शब्द ह्मणजे वैदिकप्रमाणच श्रेष्ठ आहे. त्याचे दोन प्रकार आहेत. परोक्ष आणि अपरोक्ष.

परोक्षं जगदाधारोऽपरोक्षं हृदये स्थितम् ॥
परोक्षात्तत्पदज्ञानं त्वंपदज्ञापरोक्षतः ॥ ४ ॥

जगत्कारणं ब्रह्म तत्पदार्थः । देहेऽहमिति प्रत्ययावच्छिन्नं चैतन्यं त्वंपदार्थः ॥ ४ ॥

सर्वजगताला आधारभूत जें चैतन्य, त्याला तत्पद म्हणतात. हेंच जगत्कारण ब्रह्म, आपल्या मनांत येऊं शकत नाहीं, म्हणून तें परोक्ष रीतीनें कळतें. व शरीराचे ठिकाणीं "मी" असें वाटणाऱ्या चैतन्याला त्वंपद म्हणतात. तें अपरोक्षानें कळतें.

प्रत्यक्षादि प्रमाणानां प्रमात्वं यस्य बोधतः ॥
तमस्मत्प्रत्ययादिष्टमात्मानं वत्स साधय ॥ ५ ॥

प्रत्यक्षादि प्रमाणें ज्याच्या बोधानें कळतात, अशा पदाचा अर्थ आत्मा आहे असें समजून, हे पुत्र, त्यालाच तूं ओळख.

रूपगंधरसस्पर्शा गुणाह्याम्रफले यथा ॥
मिलिता अपि गृह्यन्ते नेत्राद्यैरिन्द्रियैःपृथक् ॥ ६ ॥
तथा सच्चित्सुखा ब्रह्मण्येकत्वेन स्थिता गुणाः ॥
पृथग्वदवभासन्ते वृत्तिभेदाद्विशेषतः ॥ ७ ॥

निरूप्य विषयं ज्ञापनाय विशेषमाह ।

उदाहरण देऊन विषय समजावून देतात. आंब्याच्या एकाच फळांत रूप, गंध, रस व स्पर्श हे गुण एकत्र असून, जसे ते नेत्रादि इन्द्रियांनीं निरनिराळे ग्रहण केले जातात. तसेंच ब्रह्माचे ठिकाणीं सत्, चित् व सुख हे एकत्वानें असलेले गुण, वृत्ति भेदानें निरनिराळे भासतात.

बाधाभावविशिष्टं सज्ज्ञानं वृत्तियुतं भवेत् ॥
प्रीत्यादिवृत्तिसंयुक्त आनंदो भण्यते बुधैः ॥ ८ ॥

तीन्ही कालीं ज्याचा बाध होणें शक्य नाहीं त्याला सत् म्हण-तात. जें ओळखूं शकतें अथवा जाणूं शकतें, तें ज्ञान [चित्] व प्रेमादि वृत्तींनीं जो स्पष्ट होतो त्याला आनंद असें विद्वान म्हणतात.

विद्याविद्येतिभेदेन द्विधावृत्तिर्निगद्यते ॥
सत्यसंबोधका विद्याऽविद्या मिथ्याप्रबोधका ॥९॥

विद्या व अविद्या या भेदें करून वृत्ति दोन प्रकारची आहे. जिच्या योगानें सत्य ज्ञान होतें तिला विद्या, व खोटें ज्ञान होते तिला अविद्या म्हणतात.

अविद्यावृत्तिमुत्सृज्य विद्यावृत्तिं समाश्रय ॥
तयोः स्पष्टतरं लक्ष्म विवृणोमि द्विज श्रुणु ॥ १० ॥

अविद्यावृत्तीचा त्याग करून विद्यावृत्तीचा आश्रय कर. व या दोघांचेंही मी आणखी स्पष्टीकरण करितों तें ऐक.

अस्ति भाति प्रियं रूपं नामचेत्यंशपंचकम् ॥
आद्यत्रयं ब्रह्मरूपं मायारूपं ततो द्वयम् ॥ ११ ॥

आहे, कळतें, आवडतें, घटपटादि नाम, व वर्तुळादि त्याचे आकार, ह्यांपैकीं प्रत्येक पदार्थांत पहिले तीन गुण ब्रह्माचें असुन बाकीचे दोन, मायेचे आहेत.

नामरूपं परित्यज्य पुरुषार्थे स्थिता मतिः ॥
साविद्यारूपिणी विद्यात् दैवब्रह्मभिदा द्विधा ॥१२॥

नामरूपाचा परित्याग करून, अस्ति, भाति, प्रिय, समजण्या करितां, जी मति स्थित असते तिलाच विद्या ह्मणतात. ती दैवविद्या व ब्रह्मविद्या अशी दोन प्रकारची आहे.

दैवविद्या भवेद्वृत्तिर्याऽज्ञानांशविनाशिनी ॥
ब्रह्मविद्यातु सावृत्तिर्या सर्वाज्ञाननाशिनी ॥ १३ ॥

जी वृत्ति अज्ञानाच्या एका अंशाचा नाश करिते तिला दैवविद्या म्हणतात व जी सर्व अज्ञानाचा नाश करिते तिला ब्रह्मविद्या म्हणतात.

फलव्याप्तिं परित्यज्य वृत्तिव्याप्तिः परे भवेत् ॥
तस्य व्युत्पादने शास्त्रं विचित्रमुपकारकम् ॥ १४ ॥

वृत्तौ प्रतिफलितं कूटस्थप्रतिबिम्बितम् चैतन्यं फलम् । तस्य व्याप्तिः फलव्याप्तिः । वृत्तेर्व्याप्तिर्वृत्तिव्याप्तिः । अयं भावः यदा स्वस्वि-न्द्रियद्वारा निर्गतांतःकरणवृत्तिः विषयाकारा भवति तदा आभासस्तु विषयं प्रकाशयति । यत्तु केषांचिन्मते न भवति वृत्ति विषयाकारा तेषां मते कथं मनोनैकाग्र्येपि ज्ञानं न भवति इत्यस्योत्तरं नास्ति । तद्वत् ब्रह्मणि जडत्वाभावात् प्रकाशस्तु स्वयमेव अतो न तत्र फल व्याप्ति-रुपयुक्ता । वृत्तिव्याप्तिमात्रेणावरणभंगोपयोगः अस्त्येव । यथा नेत्रदी-पकयोरपेक्षान्यपदार्थे भवति न दीपके तत्र नेत्र मात्रेण कार्यनिर्वाहात् तद्वत् सिद्धांतेपि फलव्याप्तिरहिता वृत्तिव्याप्तिः स्वीक्रियते ॥

बुद्धींत प्रतिबिम्बित चैतन्याला फल ह्मणावें, त्याची जी व्याप्ति तिला फलव्याप्ति ह्मणावें व वृत्तीची जी व्याप्ति, तिला वृत्तिव्याप्ति ह्मणावें. ह्याचा स्पष्ट अर्थ असा कीं, ज्ञानेन्द्रियाच्या द्वारानें अंत:करणाची वृत्ति बाहेर निघून, ती प्रथम वस्तूचा आवरणभंग करिते व तिच्यांतील चैतन्यामुळें, ही वस्तु आहे असें ज्ञान होतें. आतां ज्यांच्या मतांत सर्व ज्ञान बाहेरूनच येत असून वृत्ति वस्तूच्या आकाराची होत नसते असें आहे, त्यांना असें विचारावें कीं, मनाची एकाग्रता वस्तूकडे नसली, ह्मणजे तिचें ज्ञान इन्द्रियानें कां होत नाहीं ? त्या प्रश्नाचें ते समाधान कारक उत्तर देत नाहींत. ह्मणून ब्रह्माचे ठिकाणीं ब्रह्म हें स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याला दुसऱ्या पदार्थांची अपेक्षा नाहीं. ह्मणून त्या ठिकाणीं फलव्याप्तीचा स्वीकार नाहीं. आवरणभंगासाठीं वृत्तिव्याप्तीची मात्र अपेक्षा आहे. जसा पदार्थ पहाण्याकरितां दिवा व डोळा ह्या दोन पदार्थांची अपेक्षा आहे. परंतु दिवा पहाण्याकरितां दुसऱ्या पदार्थांची अपेक्षा नाहीं; मात्र डोळाच असला ह्मणजे पुरे; त्याप्रमाणें सिद्धांतांतही फलव्याप्तीचा स्वीकार नसून वृत्तिव्याप्तीचा स्वीकार आहे.

पुमान् नित्यानुमेयोऽत्र सांख्यशास्त्रे प्रकीर्तित: ॥
सामान्यत्वादसौसत्तास्वरूपो हृदि धारय ॥ १५ ॥

संक्षेपेण सांख्यशास्त्रोपयोगं दर्शयति । परं सामान्यं सत्तेति नैय्यायिकस्वीकारादपि एतदुक्तम् । सांख्यशास्त्रे पुरुषस्य ज्ञानं अनुमानेनैवोक्तम् । यथाच कारिकायां "संघात परार्थत्वात् त्रिगुणादि विपर्यया दधिष्ठानात् । पुरुषोऽस्ति भोक्तृभावात् कैवल्यार्थं प्रवृत्तेश्च " ॥

सांख्य शास्त्रांत पुरुषाचें ज्ञान अनुमानानेंच होतें ह्मणून सांगितलें आहे. तें असें, पुरुष हा आहे. कारण देहाचें ठिकाणीं एकत्र झालेला हा भौतिक संघात कोणासाठीं तरी असला पाहिजे. संघात हा संघातासाठीं कधींच नसतो. जसें पान, सुपारी, काथ व चुना मिळून झालेलें तांबूल, तांबुलासाठीं नसून दुसऱ्यासाठीं असतें, दुसरें असें; सत्व रज व तम ह्या गुणांचे संक्रमण नेहमीं आपसांत चाललें असतें. त्याला कांहीं अधिष्ठान पाहिजे. अधिष्ठानावाचून जडत्रिगुणांचें संक्रमण

आपघात होऊं शकत नाहीं ह्मणून पुरुष आहे. तसाच हा संघात भोग्य आहे. ह्मणून याला भागणारा दुसरा कोणी असला पाहिजे. व लोकांची मरणासाठीं प्रवृत्ति नसून मोक्षासाठीं प्रवृत्ति आहे. एवढ्या करितां पुरुष आहे, या प्रकारचीं अनुमानें अनेक सांख्यांत आहेत. व अनुमान नेहमीं सामान्य बोधक असतें. जसें अमुक घट पाहिला ह्मणजे, तो कोण्या तरी कुलालानें केला असला पाहिजे, एवढेंच त्या अनुमानानें ज्ञान होतें व सामान्य ह्मणजे सत्ता किंवा अस्तित्व ह्मणजे अनुमानानें अमुक एक वस्तु आहे, एवढेंच तिचें तिच्या प्रकारावांचून ज्ञान होतें. तात्पर्य, सांख्य शास्त्राचा, सदंश समजण्याकडे उपयोग आहे.

प्रवृत्तिरनुमानस्यकुत:स्यादनुमातरि ।
अत: सर्वप्रमातात्मा चिद्वेदांतेन भावय ॥ १६ ॥

आता अनुमानानें अनुमान करणारा कधींही जाणला जाणें शक्य नसल्यामुळें, सर्व प्रमाणें ज्याच्या जाणिवेवर अवलंबून आहेत असें जे चैतन्य, तें वेदांतानें समजतें.

सर्व प्रियं यदर्थं स्यात् कस्यार्थेऽपि न य: प्रिय: ।
तमानंदस्वरूपं त्वं भक्तिशास्त्रेण लक्षय ॥ १७ ॥

सर्व कांहीं ज्याच्या करितां प्रिय आहे व जो आत्मा कोणत्याही वस्तूकरितां प्रिय नाहीं, अशी नि:सीम प्रेमास्पद जी वस्तु, तोच आनंद होय; आणि तो भक्तिशास्त्रानेंच कळतो; कारण प्रेम मूलकच भक्ति आहे. ( भक्तिविषयीं माहितीं माझ्या इतर ग्रंथांतून पहावी. )

आनंदोऽपि द्विधा ज्ञेयोऽव्यक्ताव्यक्तविभेदत: ।
अव्यक्तो ज्ञानयोगाभ्यां समाधावनुभूयते ॥ १८ ॥

योगो भक्तिप्रधान: ईश्वरप्रणिधानाद्वेति पातंजलात् ।

आनंदही दोन प्रकारचा आहे; अव्यक्त आणि व्यक्त; ह्यापैकीं अव्यक्त आनंद, ज्ञान आणि योग ह्यानें प्रतीत होतो. येथें योग भक्तिप्रधान घ्यावयाचा. कारण ईश्वराच्या भक्तीनें निश्चयानें योग होतो असें पतंजलीचें योगसूत्र आहे.

व्यक्तोपिज्ञानभक्तिभ्यामन्वयास्त्वानुभूयते ।
हार्दगोचरभेदेन पुनःसोऽपि द्विधामतः ॥ १९ ॥
प्रेमैकलक्षणो हार्दो घनवृत्त्या सगोचरः ।
साहित्यशास्त्रयोगेन काव्यबोधेन लक्ष्यते ॥ २० ॥

अत्र भक्तिस्तु भगवदेकाकारतया प्रेमामृतधारा बोध्या । साचोक्ता रसायने " द्रुतस्यभगवद्धर्मधारावाहिकतांगता । " सर्वेशे मनसोवृत्तिर्भक्तिरित्यभिधीयते । उपासनाव्यावृत्त्यर्थं ज्ञानसंयुक्तत्वम् ॥

भक्ती ह्मणजे भगवंताचें ठिकाणीं एक सारखी प्रेमानें वृत्ति लागून राहणें. द्रवीभूत झालेल्या चित्ताची तैलवत् अविच्छिन्नधारा परमेश्वराच्या चरणाकडेच गंगेसारखी वाहत जाणें ह्मणजे भक्ति होते. असें भक्तिरसायनांत सांगितलें आहे. ती ज्ञानसंयुक्त झाली ह्मणजे समाधि नसतांनाही, अन्वयामुळें व्यक्तानंदाचा प्रत्यय येतो. उपासनेहून ही भक्ति निराळी आहे, असें दाखविण्याकरितां ज्ञान संयुक्तत्व पद घातलें आहे. तो व्यक्तानंदही दोन प्रकारचा आहे. हार्द आणि गोचर. हार्द ह्मणजे हृदयांत असणारा व गोचर ह्मणजे बाहेरही प्रगट दिसणारा. हृदयांतल्या हृदयांतच अतिशय प्रेमाचे उमाळे येणें, हाच हार्द असून तोच प्रेम अतिशय तीव्र होऊन, वाचेनें व नाना प्रकारच्या चिन्हानें प्रगट होणें, ह्याला गोचर ह्मणतात. हा गोचर व्यक्तानंद साहित्यशास्त्रानें व काव्यानें समजतो.

काव्यंच द्विविधं ज्ञेयं श्राव्यदृश्यविभेदतः ।
श्राव्यं तु केवलं शाब्दं हार्दो यस्मात् स्फुटीभवेत् ॥ २१ ॥

आतां काव्यही दोन प्रकारचें आहे. ऐकण्याला योग्य व पाहण्याला योग्य. ऐकण्याला जें योग्य काव्य तें केवळ शब्दमय असून, शब्दांनीच बनलेलें असतें. व त्याच्यायोगानें हार्द व्यक्तानंद स्पष्ट होतो. ह्मणजे शब्दात्मक काव्य ऐकून हृदयांतच प्रेम व्यक्त होतो.

श्राव्यं पुनर्द्विधा प्रोक्तं नादवाक्य प्रधानतः ।
नादमुख्यं भवेद्गीतं सार्थं वाक्यप्रधानकम् ॥ २२ ॥

तेंच ऐकण्याला योग्यही काव्य दोन प्रकारचें आहे. नादानेंच गार करून टाकणारें व अर्थानें गार करून टाकणारें. पैकीं पहिल्याचें

नांव गान ( *Music* ) असून दुसऱ्याचें नांव वाक्य प्रधान ह्मणजे काव्य आहे.

दृश्यं चिन्हसमाविष्टं तात स्यात्तदपि द्विधा ।
स्थावरोपहितं त्वाद्यं जंगमोपहितं परम् ॥ २३ ॥

बाळा, गोचरानन्द स्पष्ट करणारें दृश्य काव्यही दोन प्रकारचें आहे. पहिलें काव्य काष्टपाषाण, धातु, रत्न इत्यादि जडपदार्थांच्या योगानेंच गोचर ब्रह्मानंद स्पष्ट करणारें असून दुसरें, पशुपक्षि, मनुष्य इत्यादि सजीव प्राण्यांचें साह्य घेऊन गोचर ब्रह्मानन्द स्पष्ट करितें.

प्रथमं मूर्तिचित्रादिरूपेणैव निगद्यते ।
द्वितीयं नाटकादि स्यात् सजीवाविष्टमेवतत् ॥ २४ ॥

पहिलें दृश्य काव्य मूर्ति चित्र वगैरे रूपांचें असून दुसरें सजीव प्राण्यांच्या रूपांचें ह्मणजे नाटक प्रकरण भाण इत्यादि रूपांचें आहे.

उपपत्तिस्त्विति प्रोक्ताधुनावक्ष्ये प्रयोजनम् ।
क्रमप्राप्तं विजानीहि सावधानतया बुध ॥ २५ ॥

या प्रमाणें सच्चिदानन्द स्पष्ट करणाऱ्या शास्त्राची उपपत्ति सांगून आतां या भक्तिबोधक काव्यशास्त्राचें समयानेंच प्राप्त झालेलें प्रयोजन सांगतों तें सावधानपणानें ऐक.

स्मृतौ तु गदितं प्रोक्तं काव्यालापांश्चवर्जयेत् ।
तद्वाक्यं भगवल्लीलाभिन्नकाव्यनिषेधनम् ॥ २६ ॥

आतां काव्यालाप वर्ज करावे म्हणून जें स्मृतींत सांगितलें आहे, तें शिवविष्णु इत्यादि भगवल्लीला ज्यांत नाहींत अशा जडसृष्टीवर्णनपर काव्याविषयीं किंवा स्त्री, केरसुणी वगैरे वर्णनपर काव्याविषयीं समजावें.

विवक्षितगुणोपपत्तेश्चेति सूत्रप्रमाणतः ।
सर्वोपदेशवाक्यानां विषयो ब्रजवल्लभः ॥ २७ ॥

कारण बोलण्याला योग्य जे सत्य संकल्पादिक गुण ते परमेश्वराचेंच ठिकाणीं सांपडतात. इतर कोणाचेंच ठिकाणीं सांपडत नाहींत. असें ब्रह्मसूत्र प्रमाण आहे. व तुकारामही म्हणतात– " सकलगुण

संपन्न । हे तो देवाचे लक्षण " ॥ " कोठें कांहीं कोठें कांहीं । एक आहे एक नाहीं" ॥ ह्यावरून सर्व वाक्याचा विषय भगवान श्रीकृष्ण-च होऊं शकतात; त्यावांचून इतर उपदेश व्यर्थ आहेत.

भूपमित्रप्रियावत्वेनोपदेशस्त्रिधाभवेत् ॥
आद्योवेदोदितो मुख्यः फले परमसिद्धिदः ॥ २८ ॥
अकृते भयदोपिस्यात् द्वितीयोस्ति पुराणगः ।
फलेऽतीष्टोऽकृते नास्ति भयं मित्रसमोहिसः ॥ २९ ॥
स्वकान्तस्य यथा कान्ता मनोगृण्हाति सद्गुणैः ।
तथाज्ञानं संयुनक्ति काव्यजोन्त्यः सदाकदः ॥ ३० ॥

उपदेश तीन प्रकारचे आहेत. राजा प्रमाणें मित्रा प्रमाणें व कान्ते प्रमाणें राजाप्रमाणें ह्मणजे वेदानें सांगितलेला उपदेश ह्याप्रमाणें वागलें असतां अत्यंत सुख होतें. परंतु न वागलें असतांना अतिशय नरक दुःख होतें. ह्मणून ह्याप्रमाणें सर्वदा वागावेंच. दुसरा उपदेश मित्राप्रमाणें. हा पुराणांतील उपदेश आहे. मित्र ज्याप्रमाणें असें करणें बरें असें सांगतो त्याप्रमाणें अमुक अमुक करणें चांगले असें पुराणें सांगतात. ह्याप्रमाणें आचरिलें असतां अतिशय सौख्य होतें. आचरिलें नसतांना विशेष भय होत नाहीं.

ननुपुराणेष्वपि नित्यकर्मादिकथनात् तदकरणे प्रत्यवायात् अस्या प्यनुष्ठितेभयमेव इतिचेन्न । वेदानुकूलेनैव नित्यादिकर्मणाम् पुराणेपु उक्तत्वात् पुराणविषयश्चान्यः तीर्थादिसोपासननैमित्तिककर्मदर्शकः तदकरणे विशेषप्रत्यवायोनास्ति । अत्र पुराणानि श्रीमद्भागवतरहि-तानि । श्रीमद्भागवतस्य भक्तिशास्त्रे निवेषणात् । 'त्रिवृत् भागवतं तथे'-ति वचनाद्वा तस्य सर्वमयत्वात् ॥

अहो पुराणांतही नित्यकर्में वगैरे सांगितलीं आहेत. व तीं न केलीं असतां पाप होतें. ह्मणून हा मित्रोपदेशही न केला तर भय देणारा आहे. असें ह्मटलें पाहिजे. हें ह्मणणें बरोबर नाहीं कारण कीं नित्यकर्म वगैरे वेदानुसारच पुराणांत सांगितलें आहेत. ह्मणून त्यांचा वेदोपदिष्टांतच अन्तरभाव होतो. व वेदोक्त उपदेश तर राजाप्रमाणें असा वर सांगितला आहे. पुराणाचा विषय तर पंचम्यादि व्रतें तीर्थें व

मातादेवतांची उपासनें इत्यादि नैमित्तिक कर्मे सांगणें हा आहे. ती न केली असतां विशेष प्रत्यवाय नाहीं. ह्या ठिकाणीं जी पुराणें ह्मटलीं आहेत त्यांत भागवत मात्र घ्यावयाचें नाहीं कारण ते भक्तिशास्त्रांत गणल्या जातें. किंवा राजा मित्र कांता ह्या तीन्ही प्रकारचा उपदेश भागवतांत असल्यामुळें तें इतर पुराणापेक्षां श्रेष्ठ आहे. आपल्या पातिव्रत्यादि उत्तम गुणांनीं स्त्री जशी प्रियपतीचे मन आपल्या ताब्यांत ठेविते तद्वत काव्यामध्यें सांगितलेल्या हा तिसरा उपदेश ज्ञान शिकवितो. हा सर्वदा सुखप्रद आहे. ह्मणजे श्रवणकालीं श्रोतृमाधुर्यास्तव, अनुष्ठानकालीं मनोल्हासास्तव व फलकालीं ब्रह्मानंदास्तव सुख देणाराच आहे.

किंभोगवर्णनाच्छ्रेयो सुलभत्वाच्छुनामपि ।
वर्णनीयो सदैवेकश्चमत्कारमणिर्हरिः ॥ ३१ ॥

ह्मणून काव्य उपदेशात्मकच असलें पाहिजे खरेंच आहे. सर्व सामर्थ्यरूप चमत्कारांचा चिंतामणि असा भगवान श्रीकृष्णच एक नित्य वर्णनाला योग्य आहे. एरव्हीं कुत्र्याच्या जन्मामध्यें देखील सुलभ असणारे विषय भोग वर्णन करून काय कल्याण होणार ?

तस्यैव चिन्त्यतांरूपं सानन्दं प्रतिमादितः ।
सम्यक्समाधि पर्यन्तं तस्मिन्नेव भवेत्पुनः ॥ ३२ ॥

ह्मणून त्या श्रीकृष्णाचेंच रूप मूर्त्यादिक दृश्यकाव्यापासून आरंभ करून समाधिपर्यंत चित्तांत ठेवावें. व समाधि सिद्ध झाल्यावरही त्यारूपापासून ढळूं नये.

द्रव्यभावविभेदेन चित्ररूपं द्विधाभवेत् ।
शिलामय्यादिकं द्रव्यं भावाः सुन्दरतादयः ॥ ३३ ॥

आतां दृश्य काव्यामध्यें जें प्रतिमा किंवा चित्र प्रथम सांगितलें त्याचे दोन प्रकार आहेत. द्रव्य व भाव. पैकीं धातुपाषाण मूर्तींचीं द्रव्यें असून शाई, रंग वगैरे चित्रांचीं द्रव्यें आहेत व दोन्ही ठिकाणीं सौन्दर्यादि भाव आहेत. हे भाव मनोज्ञ ह्मणजे (*Ideal*)असें असतात.

द्रव्यात् सिध्यन्ति कर्माणि भावैस्तुष्यति मानसम् ।
तांसानमे समुद्भूते जीवो ब्रह्मसमो भवेत् ॥ ३४ ॥

मूर्तीची सेवा करणें, नमस्कार करणे इत्यादि क्रिया ह्या द्रव्यावर अवलंबून आहेत. ह्मणजे धातुपाषाणादिकांच्या देवाचे पाय पुढें असतांनाच, आपल्याला नमस्कार करितां येतो. पण सौन्दर्यादिक जे भाव आहेत. त्यांच्या योगानें कोणत्याच शारीरिक क्रियेची सिद्धि होत नसून, मनाचा संतोष मात्र वाढतो व त्या संतोषानें रस उत्पन्न झाला असतां जीव ब्रह्मरूप होतो.

अभ्यासमधुना वक्ष्ये लक्षैकान्ततया शृणु ।
आदौ कथागतान् भावान् द्रव्ययोगे निवेशयेत् ॥ ३५ ॥

ह्याप्रमाणें प्रयोजन सांगून आतां अभ्यास सांगतों; तो सावधानानें ऐक. प्रथम सौन्दर्यादिक भाव इतिहासांतून जाणून घेऊन, त्या भावाचें ध्यान करून, धातु, शाई इत्यादि द्रव्यसामग्रीचे ठिकाणीं, त्या भावांची स्थापना करावी; ह्मणजे मूर्ति चित्र आदि चिन्ह करावें.

एतद्धि मूर्तिचित्राख्यं रूपंतस्मिन्मनःस्थितौ ।
तद्रूपं नाटकादीव चेतनत्वेन भावयेत् ॥ ३६ ॥
पुनस्तां भावनां साक्षात् श्राव्यकाव्येन वर्धयेत् ।
एवं कृष्णगुणासक्तो विषयान्दूरतस्त्यजेत् ॥ ३७ ॥

हें मूर्तिचित्रादि, जे दृश्यकाव्य, ह्यांच्या योगानें मन स्थिर झालें असतां, पुढें नाटकादि दृश्यकाव्यानुसार त्या मूर्तिचित्रादिकांचे ठिकाणीं सजीव परमेश्वराची भावना करावी. व ती भावना वर सांगितलेल्या वाक्यप्रधान श्राव्यकाव्यानें भगवद्गुणानुवाद गाऊनगाऊन वाढवावी; ह्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या गुणांत आसक्त होऊन, विषय हे दूर सोडून द्यावे.

मनः काव्यमयं कृत्वा काव्यं कृत्वा मनोमयम् ॥
मध्यसंवेगयोगेन स्वप्नेप्येवं विचिंतयेत् ॥३८॥
तीव्रसंवेगतः साक्षात् समाधिर्जायते दृढः ॥
प्रमाणमप्यत्रास्ते घेरण्डमुनिभाषितम् ॥ ३९ ॥

नंतर मनांतील प्रेम काव्यातील परमेश्वरावर ठेऊन, काव्यांतील परमेश्वराच्या आकाराचेंच मन नेहमीं करावें; व स्वप्नांतही असेंच होऊं लागेल असा मनाचा मध्य संवेग करावा. त्याप्रमाणें उपपत्ति सांगता-

नां, सूक्ष्म तत्वांतून काव्य हें स्थूल कसें झालें हें पूर्वी सांगितलें असून, आतां अभ्यास सांगतांना, स्थूलांतून काव्याच्या साह्यानें सूक्ष्मांत कसें जावें, हें येथवर सांगितलें. आतां ह्या मध्य संवेगाचाच तीव्र संवेग झाला ह्मणजे, भक्तियोगानेंच समाधि होतो. ह्याविषयीं घेरण्डाचार्यांचें वचन प्रमाण आहे. त्यांनीं आपल्या घेरण्डसंहितेंत भक्तियोगसमाधि सांगितला आहे; तो येणें प्रमाणें.

स्वकीयहृदये ध्यायेदिष्टदेवस्वरूपकम् ॥
चिन्तयेद्भक्तियोगेन पुलकाश्रुसमन्वितः ॥४०॥
समाधिः सम्भवेत्तेन सम्भवेच्च मनोन्मनी ॥
इति घेरण्डवाक्येन भव संछिन्नसंशयः ॥४१॥

आंगावर रोमांच व नेत्रांत अश्रु आलेले आहेत अशा प्रेमळ पुरुषानें, आपल्या हृदयामध्यें सर्व प्रेम एकत्र करून, आपल्या आवडत्या देवाच्या स्वरूपाचें ध्यान केलें असतां, समाधि व वासनाक्षय दोन्ही होतात. ह्या घेरण्डाचार्यांच्या वाक्यानें, तुह्मी आपले भक्तीविषयींचे सर्व संशय दूर करा.

व्युत्थानेप्यन्वयं ज्ञात्वा एवमेवं समाचरेत् ।
परप्रेमस्थायिभावं रसताकृतिमानयेत् ॥ ४२ ॥

समाधींतून वृत्ति निघाली असतांही, पुनःपुन्हा असेंच करीत जावें. आतां ह्या विषयाचा थोडक्यांत सारांश सांगतों. आत्मप्रेम ह्या स्थायिभावाला रसरूप करून त्या रसानेंच परमेश्वरानें आपलें रूप बनवून, कृष्णरूप व्हावें अशी त्याला प्रार्थना करावी.

व्युत्थाने वा समाधौ वा श्रीरंगालिंगनं हितम् ।
भक्तः साक्षात्परब्रह्म तस्य ब्रह्ममयी तनुः ॥ ४३ ॥

समाधि असो किंवा व्युत्थान असो, दोन्ही ठिकाणीं ब्रह्मानन्दरूप श्रीकृष्णाचें आलिंगनच हृदयाला हितावह आहे, असें समजून आचरण करणाराच प्रत्यक्ष ब्रह्म असून त्याचें शरीरही ब्रह्ममय आहे असें मी ह्मणतों.

य एतदभिजानाति रहस्यं गुरुशास्त्रतः ।
स कृष्णं यजतेऽन्यस्तु निमज्जति भवार्णवे ॥ ४४ ॥

हें जें मी ललितकलेचें रहस्य सांगितलें आहे, त्याला जो गुरु व शास्त्र ह्यांचे योगानें जाणतो तोच प्रेमानें श्रीकृष्णाचें यजन करितो. व त्याहून इतर सर्व जीव संसारांत पडतात. ह्या प्रमाणें श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या योगानें जसें मला सुचलें तसें मी लिहिलें. आतां परकीय जडशास्त्राचें वगैरे साह्य घेऊन, 'ललितकुतूहल' नांवाच्या व्याख्यानांत हेंच दुसऱ्या प्रकारानें कदाचित् स्पष्ट करीन.

मया यथाबुद्धि कृतं सुकाव्यं ह्यालंदि राजस्यदयानियोगात् ।
तदीयपादाब्जयुगे समस्तं समर्पयेचन्नखगांगमीनः ॥ ४५ ॥

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

## सौ० दुर्गाआईला पाठविलेलें पत्र २ रें.

# पत्र नंबर ९.

प्रणम्य करुणामूर्तिं श्रीमज्ज्ञानेश्वरं गुरुम् ।
समाधानाय मातस्ते लेखयामि यथामति ॥ १ ॥

करुणामूर्ति श्रीमज्ज्ञानेश्वरगुरूला प्रणाम करून आई, तुझ्या समाधानाकरितां लिहितों.

कामादिभिरशक्यात्वं यदा गंतुं भविष्यसि ।
दुर्गास्यात्सफलन्नाम तदा तस्यै नमाम्यहम् ॥ २ ॥

जेव्हां कामादि विकार जवळ येवूं शकणार नाहींत तेव्हांच तुझें दुर्गा हें नांव सफळ होईल. अशा तुला मी प्रणाम करितों.

श्रुतं त्वयार्यपुत्रार्थं हैरण्यो मुकुटः कृतः ।
परतंत्रासि मातस्त्वं किमेतत्साहसं तव ॥ ३ ॥

तूं श्रीकृष्णाकरितां सोन्याचा मुकुट केला असें मी ऐकिलें आहे. आई, तूं परतंत्र असून, एवढे कष्ट कशाला केलेस.

अयं हि भगवान् शुद्धो निर्गुणो निष्कलोऽचलः ।
भक्तानुरोधात् साकारः श्रियासंपन्न एव सः ॥ ४ ॥

ह्या षड्गुणैश्वर्य संपन्न प्रभु शुद्ध, निर्गुण, निष्कलंक व अचल आहे. तेव्हां ह्यास अलंकार समर्पण करितांच येत नाहींत. तो भक्ताकरितां जरी साकार झाला आहे, तथापि तो लक्ष्मी व मनोहर शोभा ह्यांनीं युक्त आहे ह्मणूनही ह्याला कोणी कांहीं देऊं शकत नाहीं.

प्रसन्नस्त्वेकया भक्त्या न धनेन गुणेन वा ।
तं कः किं दुर्बलो जीवो शक्नोत्यंब समर्पितम् ॥ ५ ॥

जो एका भक्तीनेंच प्रसन्न होत असून, धन किंवा गुण ह्यांनीं प्रसन्न होत नाहीं, त्याला दुर्बल असा जीव काय समर्पण करण्यास समर्थ होईल ?

गृहीतं यावनालान्नं येनैव विदुरगृहे ।
त्यक्तं दुर्योधनक्षीरं तस्मात्प्रेमवशोह्ययम् ॥ ६ ॥

आई, विदुराच्या घरच्या कण्या भक्षण केल्या; पण दुर्योधनाच्या घरची क्षीर घेतली नाहीं; ह्यावरून हा एक प्रेमालाच वश आहे हें उघड आहे.

पृथुकार्पणमात्रेण हैमग्रामप्रदायकः ।
कथं शुल्कं स गृण्हीयादज्ञानामधृतात्मनाम् ॥ ७ ॥

ज्यानें सुदाम्याचें मूठभर पोहे घेऊन त्याला सोन्याची नगरी दिली, असा भगवान् ज्यांना ज्ञान नाहीं व भक्तिधैर्य नाहीं, अशांचा पैसा कसा ग्रहण करील ?

असौ सम्यग्विजानाति परतंत्रास्यनिंदिते ।
तस्मान्मातस्तमेवैकं सर्वथा शरणं व्रज ॥ ८ ॥

हे दोष रहिते, तूं परतंत्र आहेस हें त्याला माहित आहे; ह्मणून आई, तूं त्यालाच दोन हस्तक व तिसरें मस्तक एवढेंच घेऊन सर्व भावानें शरण जा.

असि चेत्प्रेमसम्पन्ना मुकुटेन ततस्तु किम् ।
नासि चेत्प्रेमसम्पन्ना मुकुटेन ततस्तु किम् ॥ ९ ॥

जर तुझे ठिकाणीं प्रेम असेल तर मुकुटच कशाला पाहिजे ? व प्रेम नसेल, तर मुकुटानें तरी काय होणार ? ह्मणून परमेश्वर प्राप्तीस एक प्रेमच कारण आहे.

गुणश्रवणमात्रेण न चेद्रोमांचिता तनुः ॥
कंठो न बाष्परुद्धश्चेदुपचारा निरर्थकाः ॥ १० ॥

जर परमेश्वराचे गुण ऐकल्याबरोबर शरीर रोमांचित होणार नाहीं, व कंठ सद्गदित होणार नाहीं, तर सर्व उपचार निरर्थक होत.

हें सांगावें काय किरीटि । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामाचिया सोडीं गांठी । पव्हयासाठीं ॥ १ ॥ पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ सानें थोर न म्हणें । आम्ही भावाचे पाहुणे । भल-तेया ॥ २ ॥ येर पत्र, पुष्प, फळ । हें भजावया मिस केवळ ॥ वांचू-नि आमुचिया लागीं निष्कळ । भक्ति तत्व ॥ ३ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ९ ओंव्या ३९४–९६.

यद्यप्येष भवेद्दास्ये नियमः श्रीमतामये ।
सर्वथा परतंत्राणामलं भावः शुचिस्मिते ॥ ११ ॥

जरी दास्य भक्तींत अलंकार समर्पण करावेत असा विधि आहे तथापि ही गोष्ट श्रीमंताकरितां आहे. जे सर्व प्रकारें परतंत्र आहेत, त्यांच्याकरितां एक भावच पुरे आहे.

न देवो विद्यते काष्टे पाषाणे न मृन्मये ॥
भावे हि विद्यते देवस्तस्माद्भावो हि कारणम् ॥१२॥

काष्ठ, पाषाण किंवा मृत्तिका ह्यांत देव नसून, तो फक्त भावां-तच आहे, ह्मणून एक भावच देवप्राप्तीला कारण आहे.

तुलायां स्थापिते हेम्नि रुक्मिण्या प्रेमयुक्तया ॥
तुलस्याः पर्णार्पणेन तुलितो ऽयं कृपानिधिः ॥१३॥

द्वारकेंतील लोकांनीं व स्त्रियांनीं श्रीकृष्णाला एका पारड्यांत बसवून दुसऱ्यांत बरेंच सुवर्ण टाकिलें तरी तो तोळला गेला नाहीं, पण रुक्मिणीनें प्रेमानें टाकलेल्या तुलसीपत्रानें मात्र तो मोजला गेला.

ऐक्यात्मबुद्धिर्भोग्येषु विरागः श्रीश्वरे रतिः ॥
लब्ध्वैतज्जगदंबायाः पदवीं याहि सुंदराम् ॥१४॥

ज्ञान, वैराग्य व भक्ति ह्यांना प्राप्त करून जगन्माता ही सुंदर पदवी प्राप्त करून घे.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

## रा० रा० वासुदेवराव यांना पाठविलेलें पत्र १ लें.

# पत्र नंबर १०.

साष्टांगप्रणिपात विनंति विशेष; रा० रा० वामनराव *** अकरा वाजतां भेटले आपल्या मुलीचे लग्ना संबंधांत, त्यांनीं तेथें झालेली हकिकत सर्व कळविली. परांजप्यांची हाकिकत वामनरावांच्या मुखानें कळण्याचे पूर्वीच मला कळली होती. वेदांतामध्यें हा एक प्रश्न चमत्कारिकच आहे; व त्यामुळें साधारण मनुष्याची बुद्धि मोहवश होणें साहजिक आहे. कारण बोध, वचनसाध्य असून क्रियासाध्य नसल्यामुळें, गुरुक्रियेचा शिष्यक्रियेशीं संबंध नसतो. वचनसाध्यता तरी तर्कशास्त्राप्रमाणें पटवून देण्यापुरतीच नसते; तर वृत्तीशीं व अनुभवाशीं मेळ प्रत्येक वेळां घालावा लागत असतो. व त्यांत क्रियेचा अर्थाअर्थी संबंध नसल्यामुळें, अर्थातच देहप्रारब्धानुसार त्याची क्रिया होत असते. वेदान्तांत ह्मटलें आहे कीं,

> कृष्णो भोगी शुकस्त्यागी नृपौ जनकराघवौ ।
> वसिष्ठः कर्मकर्ता च पञ्चैते ज्ञानिनः समाः ॥

ह्याच वचनावर मुक्त, आपली अलिप्तता व दुराचरणी, आपली दांभिक साधुता दृढ करून दाखवितात. ज्याच्या मनांत धर्माचा ओलावा आहे, तो अशा वचनांमुळें कचाट्यांत सांपडतो. त्याला कोणत्याच पक्षांत मिळून, हूं किं चूं करितां येत नाहीं. प्रत्येकाचें देहप्रारब्ध भिन्न आहे असें ह्मणावें, तर कोणताही साधु कशाही आचरणाचा येऊन एखादे वेळेस आपणास फसविणार ही भीतिच ! बरें केवळ नीतिमार्गाचें अवलंबन करून, ज्ञानी पुरुषाचे व्यवहाराला नियम घालावा, तर पराशर, वसिष्ठ, धर्मव्याध, वामदेव इत्यादि वेदपुराणजन्य इतिहास मिथ्या आहेत असें ह्मणण्याची पाळी येते; आणि तसें ह्मटलें ह्मणजे अर्थातच ते महात्मे जर पूर्ण झाले नाहींत तर "नारीपीनपयोधरालिंगन" सोडून ह्या कंटकवनांत आपण तरी कशाला शिरावें

असा संशय येणें साहजिक आहे. बरें आपल्या अंगावर सर्वस्वी अज्ञान घेऊन निमुटपणें एखाद्याच्या मागून जावें, तर तेंही आपल्या-कडून घडण्याची मारामार. प्रथमतः प्रश्न असा उत्पन्न होतो कीं तसें आपण करावें कां ? आपल्या स्वतःच्या बुद्धीचा कोंडमारा करून घेऊन, पुढें आपल्याला असें कोणतें फळ मिळणार ? बरें तशांतही दगडाप्रमाणें हृदय करून, पुढें पाऊल टाकलेंच तर शास्त्र-विरोधाच्या हाताखालीं, किंवा एकदेशीय शास्त्रापहाच्या हाताखालीं, काय कोणाची तारांबळ उडत नाहीं ? देवीभागवतांत कृष्णभक्तांचा पराजय व देवीभक्तांचा जय कित्येक वेळां सांगितला आहे. व त्याचप्रमाणें वैष्णवग्रंथांत शाक्तांचा पराजय व वैष्णवांचा जय पुष्कळ ठिकाणीं दाख-विला आहे. भक्तिविजयांत तरी, रासाईदेवीचा पराजय करूनच पिपा-जीला वैष्णव केलें अशी कथा आहे. साधारण लोकांना ज्या कालीं ज्याचा जय होतो, त्या कालीं त्याची कास धरावीशी वाटते. अशा लोकांची परमार्थबुद्धि ह्मणजे, दुसऱ्यांनीं दिलेल्या धाखल्यावर अवलं-बून असते. अशा लोकांचा निषेध समर्थांनीं आपल्या दासबोधांत केला आहे.

मान देखोनि स्तुति करी । आदर देखोनि नियम धरी ।
सर्वेंचि निंदी अनादरी । तो एक पढतमूर्ख ॥

अनसूयेचा पातिव्रत्यधर्मानें जय व गोपिकांचा व्यभिचारानें झालेला जय पाहून, हिंदुधर्माचीं शास्त्रें ह्मणजे धोत्रा खाऊन नशेमध्यें केलेली बडबड आहे, असें परक्याला वाटलें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण हिंदु तरी ह्या ब्रह्मघोटाळ्यांतून पार झालेले कितीसे सांप-डतील ? धार्मिक रीतीनें, एखाद्या मनुष्याचा एखाद्या मनुष्याला द्वेष करण्याचा अधिकार, हिंदुधर्माप्रमाणें कधींच पोहचत नाहीं. कारण हिंदु धर्मातच सांगून ठेवल्याप्रमाणें, प्रारब्धानें जर व्यवहार होतो, तर दुसऱ्यानें त्याचा द्वेष करावा असा अधिकार येतो कोठून ? आतां त्याचा द्वेष आह्मी करावा, हेंही त्याचें प्रारब्धच आहे असें जर कोणी ह्मणेल, तर एकाच्या प्रारब्धानें दुसऱ्याला रागद्वेष उत्पन्न होतात— ह्मणजे एकाच्या प्रारब्धानें दुसऱ्याला बंधन होतें—असें ह्मणण्यासारखेंच

आहे. मग आपल्या अज्ञानानें आपणच बद्ध होतो व आपले ज्ञानानें आपणच मुक्त होतों हें वेदांत कशाला रडून सांगतो ? ह्या ब्रह्म घोटाळयांतून पार पडण्याला खरोखर एकच मार्ग आहे कीं:—

१. जो धर्म ज्यावेळीं जितका, दंभ सोडून चालत असेल त्याधर्माचा त्यावेळीं तितका जय होतो; पण त्याला धर्मसंज्ञा मात्र असली पाहिजे.

२. आपण एकवेळ त्याग करण्याचा निश्चय केला, ह्मणजे आपल्याला फसविणारा कोणी फसवूं शकत नाहीं. कारण रागद्वेषांवांचून फसविणें संभवत नाहीं.

३. मुक्तांनीं जर असक्याच्या आचरणावरून एखाद्याचा द्वेष धारण केला, तर त्याला लोहभस्माप्रमाणें तत्वभस्म ह्मणून रसच तयार करावा लागेल. कारण आत्म्याचे ठिकाणीं कर्तृत्वबुद्धि असल्यावांचून अमुक क्रिया उत्तम व अमुक क्रिया वाईट, असा साक्षिरूपानें निश्चय करितां येत नाहीं; ह्मणूनच मुक्तमौनविधिमध्यें, विद्यारण्य सांगतात कीं, मुनिपुरुपाला कोणाच्या आचरणा संबंधानें, कुत्सितबुद्धि ठेवण्याची गरज पडत नाहीं. सुंदरदासही ह्मणतात कीं:—

"अज्ञानी और ज्ञानीकी क्रिया सब एकसीही ।
अज्ञ आस और ज्ञानी आस निरास है ॥
अज्ञ जोई जोई करै अहंकार बुद्धि धरै ।
ज्ञानी सोई करत पुनि धरत उदास है ॥
अज्ञ सुख दुःख दोऊ आप विस मानि लेत ।
ज्ञानी सुख दुःख कौन बैठे मेरे पास है ॥
अज्ञको जगत यह सकतसंतापकर ।
सुंदर ज्ञानीको सब ब्रह्मको विलास है ॥"

४. पुन्हा वेदांताचा उत्तम सिद्धांत असा आहे कीं, ईश्वर, गुरु व संसार हीं सर्व जीवकल्पित आहेत. मग अमुक गुरु असा आहे, किंवा ईश्वरानें आह्माला एकदम मुक्त कां केलें नाहीं, असे प्रश्न कोण कोणाला करणार ? कारण सर्व जर तुझेच कल्पित आहेत, तर कल्पना करण्यामध्यें त्वां कसूर कां केली ? तुझ्या इच्छे प्रमाणें तूं कल्पना

करावयाची होतीस, असें आह्मी प्रश्न करणाऱ्याला उत्तर देऊं शकूं; परंतु करावें काय ? कल्पनेनें स्वत:ची भूक शांत करतां येत नाहीं व वेदांतावर तर चर्चा करण्याची हौस.

५. आतां राहिला विचारा मुमुक्षु. त्याविषयीं तर आत्म्याचे ठिकाणीं जोंपर्यंत कर्तृत्वबुद्धि आहे, तोंपर्यंत त्याला विधीचें उल्लंघन करितां येत नाहीं. ह्मणून स्वत: विधि पाळून मुक्तांच्या आचरणाचें अवलंबन न करितां, आपली उपाधि जेणेंकरून दूर होईल, अशा कोणत्याही रीतीनें सद्गुरूचा आश्रय कसाही करावा. सुंदरदास ह्मणतात:—

"सो गुरुदेव लिपे न छिपे कुछु सत्वरजोतम ताप निवारी
इंद्रिय देह मृषाकरि जानत शीतलता समता उर धारी ।
व्यापक ब्रह्मविचार निरंतर द्वैत उपाधि सबै जिन टारी
शद्ब सुनाय संदेह मिटावत सुंदर वा गुरुकी बलहारी ॥"

६. ही ज्ञानाविषयींची गोष्ट झाली. पण उपासनेविषयीं तरी, आपल्या व्यभिचारिणी बायकोचे किंवा व्यभिचारी पुत्राचे अवगुण झांकून ठेऊन व्यवहार करणाऱ्यांप्रमाणें, अथवा मुक्तांच्या आचरणाप्रमाणें, त्या त्या अवताराची बुद्धि करणेंच उपासकाला हितावह आहे.

सारांश मी या पत्रांत दाखविलेले मार्गच, या ब्रह्मघोटाळ्यांतून धार्मिक पुरुषाला बाहेर निघण्याला सुलभ आहेत. अन्यमार्गांचा तर अभावच आहे. हें असो; पण असें जर आहे तर परांजप्यांच्या शिष्यांनीं त्यांनां सोडून काय केलें ? जीव आपल्याच कल्पित ईश्वराला, सोळा हजार स्त्रिया भोगणारा कृष्णावतार घ्यावयास लावतो, तर स्वकल्पित ज्ञानोपदेशकाचे ठिकाणीं, विशेष परिस्थितींत, त्यांनां कृष्णबुद्धि करावयाला काय झालें ? ह्याप्रमाणें परांजप्यांच्या शिष्यांनीं केलें नाहीं. एका मडक्यांत न शिजलेली डाळ दुसऱ्या मडक्यांत चांगली शिजते असें मुळींच नाहीं. याच प्रकारची सूचना उमाकांतानें थिऑसफी सोडली तेव्हां, मी आपल्याला लिहिली होती. मी परांजप्यांच्या उलट पक्षाचा असण्याचें कारण वैदिक धर्मांतील लोकांनीं तो पंथ स्वीकारूं नये हें होतें. स्वीकार केले-

क्यानें तो पंथ सोडावा हें नव्हतें. मला साधु ह्मणण्याच्या ऐवजीं पाहिजे तर आपण चाणक्य ह्मणा. चाणक्यानें नंदराजाचा समूळ नाश करण्याकरितां, भागुरायण सेनापतीची मदत घेऊन, राक्षसाच्या विरुद्ध काहुर माजवून आपलें कार्य सिद्ध केलें व शेवटीं जो राक्षस चाणक्याच्या विरुद्ध होता, त्यालाच हरएक उपायांनीं चाणक्यानें प्रधानकीचें वस्त्र दिलें, तेव्हां सिद्धार्थक नांवाच्या एका शिष्यानें चाणक्याला विचारलें कीं, आपण भागुरायणाची मदत घेतली असून, विरुद्ध बाजूच्या राक्षसाला प्रधानकीचीं वस्त्रें कां दिलीं ? तेव्हां तो ह्मणाला भागुरायणाची किंमत तितकीच. जो आपल्या राजाच्याविरुद्ध मला साह्य झाला तो दुसऱ्याला कशावरून नाहीं होणार ?

तात्पर्य मीही भागुरायणाप्रमाणेंच परांजप्यांच्या शिष्यांची किंमत समजतों. परांजप्यांनीं वाईट करून जितकें त्यांचें अकल्याण झालें असेल, त्यापेक्षां हजारपट त्यांच्या शिष्यांचें झालें आहे, असें मी स्पष्ट म्हणतों. कदाचित् आपण असें ह्मणाल कीं, तुह्मी मृदंगाप्रमाणेंच दोन्हीकडे थाप देण्याला तयार कां होतां ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, मृदंग तयार नसल्यास, वाजविणाराने हात सळसळ कां करणार नाहींत. या विषयीं तुलसीदासजी ह्मणतात :—

'ढोल मृदंग गवार अरु नारी । ये सब ताडणके अधिकारी ।।'

निष्ठावान मनुष्याची किंमत निष्ठावानच जाणत असतो. एखाद्या पतिव्रतेच्या पति, एखाद्या दुसऱ्या पतिव्रता स्त्रीवर जर बलात्कार करील, तर त्या नीचाला ती साध्वी शापानें भस्म केल्यावांचून कधीं राहणार नाहीं. तथापि त्या नीचाच्या पतिव्रता स्त्रीला तिच्या पतीच्या विरोधामुळें दुर्गति देणें, या दुसऱ्या पतिव्रता स्त्रीकडून होणार नाहीं.

उपासक ज्या पाषाणावर निष्ठा ठेवतात त्या पाषाणाचा फत्तरफोड चूर करूं शकतो; पण निष्ठेचा चूर करूं शकत नाहीं. म्हणूनच एक पाषाण भंगला तरी दुसऱ्या पाषाणांत देव त्याच्या निष्ठेनें शिरतोच; त्या प्रमाणेंच कोणत्याही निष्ठेची गोष्ट समजून घ्यावी. ह्याचें उदाहरण माझ्या आयुष्यांतलें मी देतों. सर्वांना युक्तीनें सिद्धांत पटवून देण्याचा माझा बाणा आपणास ठाऊक आहेच; तथापि मऱ्हाठीमिश्रित

संस्कृत संकल्प गोविंदशास्त्र्यांनी सांगितला असतां, मी त्याच्यांत आपल्या पदरचे संस्कृत शब्द मुळींच घालत नाहीं. निष्ठेची शक्ति इतकी प्रबल आहे कीं, जागृतींत पूर्ण न होणारे मनोरथ, निष्ठा आपल्या शक्तीनें स्वप्नांत पूर्ण करून घेते. स्वामी तुलसीदास ह्यांच्याविषयीं भक्तिमालेंत अशी एक कथा आहे कीं, स्वामी एकवेळ प्रजास गेले असतां, त्यांनां एका महात्म्यानें असें विचारलें कीं, राम तर ईश्वराचा अंशावतार आहे व कृष्ण पूर्णावतार आहे; मग तुह्मी रामाला कां भजतां ? तेव्हां स्वामी म्हणाले, 'मी आजपर्यंत रामाला उत्तम सुंदर मनुष्य आहे, असें समजून भजत होतों. परंतु आतां आपण ईश्वराचा अंश असें सांगितल्यावरून शतपट अधिक प्रीति वाढली आहे. म्हणून मी आपल्याला सद्गुरूच समजतों. आपल्या प्राचीन महात्म्यांनीं अशी एक रीति घालून दिली आहे कीं, प्रत्यक्ष पतिताला धर्मांत घेण्याची त्यांनीं मनाई करून, त्या पतिताच्या मुलांनातवांनां मात्र हयशीर्ष पंचरात्रादि द्वारा, वेदमार्गांत घेण्याची त्यांनीं सवलत ठेविली आहे. त्याचें कारण प्रत्यक्ष पतित जसा बुद्धिपूर्वक होतो, तशीं पतिताच्या पोटीं मुलें बुद्धिपूर्वक येत नाहींत. प्रारब्धाच्या भोगानें जो दीन आहे त्या विषयीं उपदेशमार्ग विहित आहे. जो बुद्धिपूर्वक पतित आहे त्या विषयीं उपदेशमार्ग विहित नाहीं. वेडा जरी जिंदगीच्या नालायक ठरला तरी त्याचा वंश जिंदगीच्या लायक ठरतोच. ही कायद्याची व्यवस्थाही याविषयीं प्रमाण मानतां येईल. तात्पर्य, निष्ठेच्या अधिष्ठानावर दृष्टि नसून निष्ठाच, पाहिजे त्या ठिकाणीं, परमेश्वराला ओढून आणते. किंवा तो व्यापक असल्यामुळें प्रगट करते ह्मणा. ह्मटलें आहे कीं :—

'नीलकंठ कीडा भखें हृदय बिराजत राम। करनी सों निसबत नहीं दर्शनसों नित काम' ॥ परंतु या वचनानें फसविणारे लोक या उत्तम निष्ठेचा फायदा घेऊन, आपला तळिराम गार करितात, ही गोष्ट खरी आहे; तरी निर्गतेंद्रिय मनुष्याला जसें कोणी चोर समजून, त्यावर आरोप ठेऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें रागद्वेषाचा परित्याग करणाऱ्या पुरुषाला फसविणारा कोणी उत्पन्न झाला नाहीं, होणार नाहीं, व होत नाहीं. जे रागद्वेषाचा परित्याग करून रिकामे झाले आहेत, ते महात्मे

असें ह्मणत असतात कीं, आमच्या जवळ कांहींच नसल्यानें आम्हांला कोणाला आतां फसवितां येणार नाहीं. आह्मीं मात्र आपल्या निष्ठेच्या बलानें कोठूनही सत्य काढून घेऊं. ' नंगा खुदासे जोरावर उसपर कौन धरे तरवार ' अशी एक कव्युक्तिही आहे. हेंच वरील प्रश्नाचें उत्तर.

हें इतकें लिहिण्याचें कारण मी प्रयागहून जबलपुराला येत असतां परांजप्यांच्या मंडळींतील एक शिष्य आपल्या मंडळींत येण्याची इच्छा करणारा मला भेटला. एक हर्यासही बापटचे मंडळींतील मनुष्य आपल्या मंडळीत येण्याची इच्छा करणारा मला भेटला. याजप्रमाणें ब्रह्मचैतन्य महाराजांचे मंडळींतील एक मनुष्य आपल्या मंडळींत येण्याची इच्छा करणारा दिसला. येथें एका ब्राह्मणानें दुसऱ्या गुरूचा उपदेश घेऊन पूर्वीचा पार्थिव सोडला व आतां तो पुन्हा मला पार्थिव आग्रहानें मागतो. ही मंडळी माझ्या संप्रदायांत आली ह्मणजे मला चार घरें जेवायला जास्त मिळतील; परंतु यांचें कल्याण माझे हातून शपथपूर्वकच होणार नाहीं. ह्या मूर्खांचें वर्तन पाहून पोट धरभरून हांसण्यापेक्षां, मी दुसरें कांहींही त्यांच्या संबंधानें करूं शकत नाहीं. गुलाबराव महाराजांना जर चार घरें जास्ती जेवण्याला मिळतात, तर त्यांनीं तरी त्यांचा मूर्खपणा त्यांच्या नजरेस कां आणून द्यावा ? ह्या सर्व विवेचनाचें तात्पर्य एवढेंच कीं " बेटा तेरी मानें खसम किया तो थोडा बुरा हुवा, और बेटा तेरी मानें करके छोड दिया तो उससेभी बुरा हुवा. " हें चर्वितचर्वण आतां पुरे करतों.

वासुदेवानंदसरस्वतींची व माझी गांठ पडली नाहीं. त्यांचा जो माझेवर आरोप आहे तो शास्त्रसंमत असल्यामुळें, त्या आरोपाला मी खरोखरच पात्र आहें. ते जेव्हां पत्रनीस होते, तेव्हां त्यांनां कोणी सांगितलें कीं, गुलाबराव महाराज आपल्या दर्शनास येणार आहेत. तर ते ह्मणाले कीं, 'माझ्या दर्शनास न आलेला बरा. कारण कुणबी असून तो वेद ह्मणतो व त्याचा स्त्रीवेष आहे. त्यामुळें मी तोंड पाहूं शकत नाहीं.' हें त्यांचें ह्मणणें मला एकानें चांद्यांत सांगितलें; परंतु तें ऐकींव असल्यामुळें त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं. पण जरी त्यांनीं ह्मटलें

असलें, तरी त्यांचें ह्मणणें सत्य होतें ह्यांत संशय नाहीं. कारण शिवलीलामृतांत देखील "पुरुषासी स्त्रीवेष देतां। पाहणार जाती अधःपाता। वेष घेणार तत्वतां। जन्मोजन्मीं स्त्री होय॥" असें ह्मटलें आहे. पण ह्याला माझा मात्र कांहीं इलाज नाहीं. मला स्त्रीवेष घेण्याचें जें गांजाप्रमाणें व्यसन लागलें आहे, तें कोणीतरी महात्म्यानें सोडविल्याशिवाय आतां सुटत नाहीं. व कोणांही महात्म्यांनीं माझें हें व्यसन सोडविण्याची खटपट करूं नये, अशी मी त्यांनां सविनय प्रार्थना करतों. दुसरे जे माझ्यावर त्यांचे आरोप आहेत त्या विषयीं शास्त्रमानानें मी खरोखरच दोषी आहें. कांहीं गोष्टी माझ्या आंधळेपणामुळेंही घडतात हें आपणाला माहित आहेच. सरस्वतीमहाराजांची व माझी अगदींच गांठ पडली नाहीं. हीच त्यांनीं ह्मटलेली गोष्ट सद्वैजयंतींत त्यांचें नांव गुंफण्यापूर्वीं जर मी ऐकिली असती तर कदाचित् शूद्रस्वभावामुळें मला त्या गोष्टीचें वाईट ही वाटलें असतें. परंतु एकवेळ माळेंत गुंफून गळ्यांत घातल्यावर, एवढ्या अमोल रत्नाला समोल करण्याची मला इच्छा उत्पन्न होत नाहीं. आणि किंचित् कुटिलता असलीच तर ती ह्या महामणिप्रभावानेंच दूर होवो. सद्वैजयंतींत गुंफल्यामुळें ते आतां माझे ईश्वर आहेत. म्हणून माझ्यामधील दोष निवृत्त करून गुण देण्याला ते सर्वथा समर्थ आहेत. श्रीवासुदेवानंद महाराजकी जय.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

मधान,<br>तारीख १।९।१९११.

आपला,<br>गुलाबराव.

# पत्र नंबर ११.

वेदशास्त्रसं० रा० रा० अण्णासाहेब, मुळे, भालेराव, खापरे, पाध्ये, दिनकर इत्यादि मंडळीस सा. न. वि. वि. माझी लिहिलेली विनंति सर्वांनां एकवेळ लक्षांत आणावी कीं, पुढील ग्रंथाच्या मुद्रणामध्यें शब्दकोश द्यावासा वाटतो, तर कोणी तेथें मदत करील काय ? दुसरें, मला संस्कृत येत नसल्यामुळें भक्तिसूत्रभाष्य प्राकृतांतच लिहूं काय ? तिसरें, मी नागपूरास आल्यावर मला एखादी राहण्याला जागा मिळेल काय ? मी कोणाला इतर त्रास देणार नाहीं. आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें आज्ञा व्हावी. दुसरी एक गोष्ट मनोरंजनाकरितां लिहितों. इकडे नर्मदातीरीं स्वामी वासुदेवानंदसरस्वती हे,चिखल्दाला असून हल्लीं तेथें संहितेचा स्वाहाकारही सुरू आहे. बळवंतराव छुक्कासवाले हे आपल्या मुलीचें वेडेपण दाखविण्याकरितां, तेथें गेले होते. त्यानां एक यंत्र, औषध व दत्त उपासना ह्या तीन गोष्टी सांगितल्या. त्यांच्याबरोबर माझा अति परिचित मित्रही गेला होता. त्याचें नांव दिनकर ओळखतो. आजच तो येथें आला आहे. त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, 'गुलाबरावामध्यें इतकी विद्या प्रगट होण्याचें कारण काय' ? असें मी दोन तीन वेळ स्वामींनां विचारलें, तेव्हां ते एकवेळ म्हणाले 'कोण म्हणतो ? कोठें आहे विद्या ? तुम्हांला वाटतें झालें.' ही गोष्ट कशीही असो. पण याविषयीं माझें मत असें आहे कीं, माझ्या मित्रानें जरी ही गोष्ट सांगितली, तरी ते महात्मे असल्यामुळें असें [illegible] नसेल. मित्रापेक्षां महात्म्यावर विश्वास ठेवणें मला भाग आहे. दुसरें, माझी व सद्गुरुस्वामींची प्रत्यक्ष भेटही झाली नाहीं. बरें, ही [illegible] गोष्ट असो. पण एखाद्या कोणाला मला विद्वान ठरविण्याचें [illegible] कठीण आहे ? कारण, संस्कृत भाषेंत जर मी पंडिताशीं बोलूं [illegible] तर हे शूद्र असून 'नोच्चरेत् संस्कृतां गिरम्' या निषेधाचें उल्लं-

घन करितो. "सर्वे व्यसनिनो मूर्खाः यः क्रियावान्सपंडितः" । अशा रीतीनें मला मूर्ख ठरविणार. बरें, निवळ मराठींत बोललों तर ह्यांनीं भाषांतरें पुष्कळ श्रवण केलीं आहेत अशा समजुतीमुळें, मला विद्वान् ठरविणें कठीण. तर्काचें अवलंबन करून बोललों तर रा० खापरे यांनीं ह्मटल्या प्रमाणें, 'पुनर्विवाहित बायको जशी सर्फोनें आपलें करणें मंडण करिते, तसें नीच मनुष्य दुसऱ्याचे बुद्धीला गोंद घालीत असतो;" या रीतीनें मी मूर्ख ठरणार. श्रद्धेचा अवलंब करून बोललों तर तुह्मी मंगळसूत्रावर श्रद्धा कां ? आह्मीं ह्मणतो त्यावर कां नाहीं ? असें ह्मणून कोणीं मला मूर्ख ठरविणार. जुन्या मताप्रमाणें बोललों तर पूर्वी हें मत सांगूनच ठेविलें आहे, हा काय विशेष सांगतो ? अशारीतीनें मूर्ख ठरणार. बरें, नवीन एखादें मत सांगितलें, तर हजारो आचार्यांचा सूर्य प्रकाश कोठें, व तुह्मी नवीन दिवटी कोठें ? असें ह्मणून मला मूर्ख ठरविणार. मंत्र, तंत्र, चमत्कारांनींही मी विद्वान् ठरणें कठीण. कारण मी शूद्र असल्यामुळें, प्रणव सिद्ध मंत्रानें सामर्थ्य आलें, असें कोणीही कबूल करणार नाहीं. केवळ उच्छिष्ट चांडाली वगैरे क्षुद्र कर्मे करूनच सामर्थ्य मिळविलें, असें कोणीही ह्मणणार. तेव्हां एखाद्या पंडितानें मला मूर्ख ठरविणें जेवढें सुलभ आहे तेवढें विद्वान ठरविणें केवढें कठीण आहे ? आणि त्यांनीं माझ्याकडे यावें तरी कोण्या तोंडानें ? माझ्या मित्रानें एका विशेष विषयांत स्वामीला एकांतीं विचारिलें असतां "आत्मज्ञानी पुरुष झाला कीं, सर्व कांहीं त्याला आपल्या मनाप्रमाणें करून घेतां येतें. तुह्मीं आपलीच सुधारणा करा. इतक्या लोकांची काळजी एकट्याच्यानें कशी होईल"? असें स्वामी ह्मणाले, तें अक्षरशः सत्य आहे. लोहगांव जळाला तेव्हां तुकारामांनीं देवा ! वांचीव, ह्मणून किती धावा केला ? पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं; असाही इतिहास आहे. हें वाक्य लिहितांना माझ्या मनांत किंचित् मत्सराची झांक असली, तरी स्वामींच्या स्मरणानेंच दूर होईल, असा माझा शपथ वाहून विश्वास आहे. आतां उगीच मी कोणाला फसवीत नाहीं. व संशयांत ठेवीत नाहीं. माझी विद्या किती आहे हें मी सर्वांस जाहीर करितों. वेदांवर पूज्य बुद्धि मात्र;

गीता, महाभारत, श्रीमद्भागवत, योगवासिष्ठ, वाल्मिकीरामायण या ग्रंथांचें होईल तेवढें श्रवण व आलोचन; ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकानाथी भागवत, तुकारामाची गाथा व तुलसीकृत रामायण या मऱ्हाठी हिंदुस्थानीं ग्रंथांचें पठण व मनन; एवढीच काय ती माझी विद्या आहे. याच्या पलीकडे मला कांहीं येत नाहीं. हें मी डिंडिम पिटून सांगतों. " कुणबीयांचें वंशीं जन्मलों जगदीशा । संस्कृत भाषा आह्मा कैची ? " हें महात्म्याचें ह्मणणें, त्यांचे जरी निरभिमान दर्शक असलें, तरी तें मला अक्षरशः लागूं पडतें. तेव्हां माझी विद्या किती आहे, हें स्पष्ट समजून त्या प्रमाणें कोणीही माझ्याशीं व्यवहार करावा.

दुसरी विनंति केवळ अण्णासाहेब महाराजांचे चरणीं आहे. ती अशी कीं, मी पुनः संस्कृत शिकण्याचा उपक्रम करूं काय ? त्यावांचून माझें भक्तिभाष्य सिद्धीस जाईल, असें वाटत नाहीं. कळावें ही विनंती.

॥ श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

हरदा. } आपला,
भाद्रपद वद्य २ संवत १९६८. } गुलाब.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

## रा० रा० पावनसकर यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

# पत्र नंबर १२.

मा. न. वि. वि. बाबुराव येथें आले आहेत. त्यांनीं, आपण भागवताचा फार अभ्यास केला व तो इतका कीं कोठेंही वकिली कामा निमित्य आपण बाहेर गांवीं गेलां, तरी देखील आपण भागवत आपल्या बरोबर नेत असतां असें सांगितलें.

माझें मत, बुद्धि सर्वांची एक आहे असें असल्यामुळें, आपल्याला भागवत समजलें नसेल असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. तथापि त्या ग्रंथाची समाधिभाषा असल्यामुळें व्युत्थानदशेंत समजण्यास, आह्मां सारख्यांस कठीण जातें. ह्मणूनच, आमच्यासारखीं प्राथमिक शिक्षण घेणारीं मुलें, त्याचा खालील दृष्टीनें विचार करीत असतात.

ग्रंथ प्रमाण मानावयाचा असल्यास, अनुमानानें सामान्यपरच गोष्ट कळत असल्यामुळें, परोक्ष विशेष शब्दानेंच कळतो असें समजलें पाहिजे. जगतांत सर्वच आशा पूर्ण होत नाहींत. आणि संयोगाचा उपयोग तर दुसऱ्या करितां असतो. ह्मणून, चेतन ह्मणून कांहीं तरी मानावें लागतें. तें चेतन, आत्मा आहे कीं ईश्वर आहे?

आपल्यास सुखदुःखें भोगावीं लागतात ह्मणून अन्य असलें पाहिजे तर्‍हांच तें जगाचें कर्तें होईल. ह्मणूनच त्याला ईश्वर ह्मणतात.

जडापासून चेतन होतें, असें म्हटलें तरी, लीनावस्थेंतून होतें असें ह्मणण्यासारखीं जडचेतनकारणाचा नाममात्र विवाद होतो.

जडांतील स्वभाववैचित्र्यानें जगद्वैचित्र्य होतें, असें ह्मणण्यापेक्षां, चेतन मानलें असतां, त्या शंका जास्त सुटतात.

आतां मानलेंले चैतन्य, मानणाराशीं सजातीय असल्यामुळें, जड धरून चालण्यापेक्षां तें समजण्याला सोपें आहे.

सजातीयत्वामुळेंच ईश्वर चेतन आहे व निर्दय नाहीं. कारण जो ज्याचा सजातीय असतो तो त्याची हानी करूं शकत नाहीं.

आणि सुखदुःखें जगांत दिसत आहेत, ह्मणून साधारण कारण, चैतन्य व असाधरण कारण, कर्म आहे.

जड समर्थ मानलें तरी, निरूपयोगी संयोग होऊं शकतो. उपयोगी संयोग चेतनांवाचून मानता येत नाहीं. उदाहरणार्थ वाफेचा व लोखंडाचा कितीही संयोग झाला, तरी लोकांना वमण्याच्या उपयोगाची आगगाडी बुद्धिमान लोकांवांचून तयार झाली नाहीं.

कर्तृचैतन्य ईश्वर; व भोक्तृचैतन्य जीव; भोक्तृ चैतन्याचा उपाधीनेंच भेद आहे कारण, 'अहं' प्रत्यय सर्वांच्या ठिकाणीं एक असून, नाम रूपाचा भेद दिसतो.

याप्रमाणें सामान्य गोष्टी, अनुमानाच्या आटोक्यांत येत असून, कर्माचा व जीवाचा संयोग कसा आहे, जन्मांतर जीव कसा घेतो इत्यादि गोष्टी योगज प्रत्यक्ष होई पर्यंत, शद्बाच्याच अटोक्यांत येतात.

अत्यंत नसलेली गोष्ट मनांत येत नाहीं. कारण अत्यंत नाहीं, ही मनाची साक्षच तिच्या उलट आहे. अत्यंत अभाव मनांवाचून इतर साधनानें कळत नाहीं. उदाहरणार्थ वर्तुलचौरस (*Round square*)

मनांत येते ती गोष्ट, स्थूल किंवा सूक्ष्म कोठें तरी असली पाहिजे. सूक्ष्म असल्यास, स्वप्नाइतकी स्थूल करण्यालाच फक्त जीवाची शक्ति आहे. तिला सृष्टीइतकी स्थूल करावयाची ज्याला शक्ति आहे, त्यालाच ईश्वरचैतन्य ह्मणतात.

अर्थातच तीव्र संवेगानें ईश्वरही देह घेऊं शकतो. तो ईश्वरदेह श्रीकृष्ण होय.

ग्रंथ मानावयाचा असल्यास पूर्वापर मानला पाहिजे.

रासक्रीडेची अशी उपपत्ति आहे.

परमात्म्यानें योगमायेनें आपली अनंत रूपें केलीं.

माया जी असते, ती मायावी पुरुषास गोचर नसते, इतरांस गोचर असते. जसें नजरबंदीच्या खेळाविषयीं ते खेळ करणाऱ्याला, नजरबंदीचे वाटत नाहींत, तर दुसऱ्याला ते तसें वाटतात, ह्मणून गोपीकानांच अनंतमूर्तिगोचर होणाऱ्या श्रीकृष्णाच्या ठिकाणीं आपत्ति येत नाहीं.

गोपीनीं कात्यायनीव्रत, कुमारीपणांत, श्रीकृष्ण पति व्हावा ह्मणून केलें होतें. तो भोग, त्यांच्या कर्माचें फळ असल्यामुळें ही आपत्ति येत नाहीं.

सर्वच पदार्थ ईश्वराचे असून, ईश्वराला कोणी स्वामी नसल्या-मुळें ही आपत्ति येत नाहीं.

प्रौढ स्त्रीयांचा जो अनुराग होता, त्यांनें आपला देह सोडून दिला होता, व योगज देह श्रीकृष्णभोगाकरितां ग्रहण केला होता. या देहांतरप्राप्तीमुळें गोपिकांना भोगाची आपत्ति नाहीं. कारण दुसऱ्याही जन्मांत तोच पति असवा, असा शास्त्राचा निर्बंध नाहीं.

पापपुण्य भोगाविषयीं शास्त्र प्रमाण आहे. कारण तें अनुभावाच्या अटोक्यांत येत नाहीं.

जें बुद्धीकडून सोडविलें जात नाहीं त्याला गृहित धरणें म्हणत नाहींत. कर्माचा नियम बुद्धीला सोडवीत नाहीं या विषयीं आपलें बोलणें झालें आहे, म्हणून शास्त्र गृहित नाहीं.

एकदेहानें अनेक पत्नी भोगिल्या असतां दोष आहे. अनेक देहानीं अनेक पत्नी भोगाविषयीं शास्त्र दोष सांगत नाहीं.

आतां त्या अनेक देहांत ईश्वर एकच आहे असें म्हटलें तर पुत्रानें स्वस्त्रीसंयोग केला म्हणजे स्नुषाभोगाचें पातक न करतांही पित्याला झालें पाहिजे. कारण बापाच्या व पुत्राच्या शरीरांत जीव एकच आहे.

अष्ट वर्षाच्या मूर्तीत कामोत्पत्ति संभवत नाहीं एवम् अनेक दृष्टीनें रासक्रीडा दोषावह नाहीं.

अलौकिक रसोत्पत्ति होत असते असा साहित्य शास्त्राचा सिद्धांत आहे. रसाचा समूह म्हणजे रास; असा व्याकरणघटित अर्थ होतो. म्हणून लौकिकभोगापत्ति संभवत नाहीं. याप्रमाणें अनेक युक्ति आहेत आणि आपल्या धर्मात राग द्वेषाचा जितका प्रतिषेध केला आहे, तितका अन्य धर्मात केलेला नाहीं कारण, बायबलादिकांच्या प्रार्थनेंतही “ आमची भाकर आम्हाला असूं दे ” अशी रागपूर्वक देवाला प्रार्थना केलेली आहे. परंतु आमच्या धर्मातील रागद्वेषाचा कडक निषेध करणारे व बालसंन्यासी श्रीमच्छंकराचार्यादिक, व बालब्रह्मचारी शुकादिक, या श्रीकृष्णचरित्राला दोष न देतानां, उलटें त्याचें समर्थन करीत आहेत, व तशा अनंत श्रुतिही आहेत. महात्म्यांचा अनुभवही महात्मे सांगतात. याप्रमाणें अल्पबुद्धीनें आमच्या सारखीं मुलें विचार करीत असतात. प्रौढांचा विचार, आमच्या बुद्धीपेक्षां, अधिक असल्यामुळें अर्थातच तो कळणें, आम्हांस शक्य नाहीं. आपणही आमच्याप्रमाणें नवशिक्षणग्राहक असल्यामुळें, आपल्याही बुद्धीनें कांहीं विचार ठरविला असेलच. तो मित्रप्रेमास्तव, कृपाकरून पत्रोत्तरीं कळवाल अशी आशा करीत आहें. कळावें. आपला,

देऊरवाडा, १५।१२।११. गुलाब.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर १३.

श्रीमहाराजांच्या सूक्तिरत्नावलि द्वितीय यष्टींतील पत्र नंबर १२ यांत " मग इंग्रेजी भाषेंतूनही तत्वज्ञान घ्यावें असें तुह्मी ह्मणाल, तर ती भाषा वैकृत असल्यामुळें मंत्ररहित आहे, ह्मणून तिजपासून तत्वज्ञान न होतां उलटा प्रतिबंध होतो. " असें वाक्य आहे. त्यावर रा. रा. एच्. के. वालिम्बे, मुक्काम सांवखेडा, प्रांत बडोदा, यांनीं केलेल्या शंकेस उत्तरादाखल पत्र—

शंका—' इंग्रजीमध्यें "तत्वमसि" महावाक्याचा उपदेश नाहीं ह्मणून इंग्रजीभाषा वैकृत ह्मणजे मंत्ररहित आहे याचा अर्थ काय ? याचा अर्थ " तत्वमसि " हें महावाक्य त्यांत नाहीं हा आहे कीं काय ? मला असें वाटतें कीं, " तत्वमसि " हें महावाक्य त्यांत नाहीं, असा आपल्या म्हणण्याचा अर्थ असावा.'

उत्तर—वि० वि० आपलें कृपापत्र पावलें, मजकूर समजला. आपल्या प्रश्नाचें सामान्यतः उत्तर असें आहे. केवळ वेदांताचा शब्दार्थ समजला ह्मणजे ब्रह्मज्ञान झालें, असा वैदिक सिद्धांत नाहीं. कारण, जगताच्या सुखदुःखांचें कारण ज्याप्रमाणें कर्म आहे; त्याप्रमाणें आत्मज्ञानाच्या प्रतिबंधाचेंही कारण दुरित आहे. पुष्कळ ऐकूनही, पुष्कळांना बोध झाला नाहीं, अशा अर्थाच्या श्रुति आहेत. "श्रुत्वाप्येनं वेदनचैवकश्चित् " असें भगवंताचेंही वचन आहे. कांहीं पापें श्रवणकालीं ब्रह्मबोधाला प्रतिबंधक असतात; कांहीं मननकालीं प्रतिबंधक असतात; व कांहीं निदिध्यासनकालीं प्रतिबंधक असतात, त्यामुळेंच साधनचतुष्टयसंपन्न अशा वामदेव भरतादिकांनां देखील, ब्रह्मज्ञान होण्याला कांहीं जन्म लागले. "एकेन वामदेवेन भरतेन त्रिजन्मभिः" ही स्मृति याविषयीं प्रमाण आहे. अनुमानानें नेहमीं सामान्य ज्ञान होत असतें. विशेष ज्ञान होत नाहीं. ह्मणजे एखादा घट पाहिला असतांना, तो कोण्यातरी कुंभारानें निर्माण केला आहे, असें ज्ञान

आपल्याला अनुमानानें होतें. परंतु तो अमुक नांवाच्या कुंभारानें केला आहे, असें ज्ञान प्रत्यक्षानें किंवा कोणी सांगितलेल्या शब्दानेंच होतें. परंतु प्रत्यक्षानें जवळचें आणि वर्तमानकालाचें तेवढेंच ज्ञान होतें. ह्मणून दूरचें विशेष ज्ञान, शब्दावांचून दुसऱ्या प्रमाणानें होत नाहीं. आतां केव्हां केव्हां प्रत्यक्षाच्या विरुद्ध असल्यास, शब्द खोटा ठरतो. परंतु कर्माचे ठिकाणीं प्रत्यक्षाची गति नाहीं. आणि जगाच्या सुख-दु:खावरून, सामान्यत: अनुमानही कर्मबोधकशब्दाचें बाधक नाहीं. यामुळें शब्द, कर्माचें विशेष ज्ञान करून देण्याला, समर्थ आहे असें ठरतें. आपल्या प्रश्नाचा निकाल शब्दानें लावावयाचा तर तो अशा रितीनें लागतो.

" योऽनधीत्य द्विजो वेदं अन्यत्र कुरुते श्रमम् ।
सजीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वय: " ॥१॥

ह्या स्मृतीवरून विवरणकारादिक द्विजातीला वेदश्रवणच विहित सांगतात. श्रवणापासून या जन्मांत जरी ज्ञान झालें नाहीं, तरी नियमादृष्टामुळें अन्य जन्मांत ज्ञान होतें. यज्ञादि कर्मांत जसा चूक होण्याचा संभव आहे, तशी श्रवणांत चूक होत नाहीं. ह्मणून श्रवणानें उत्पन्न झालेलें पुण्य, नियमानें फल देणारें असतें. एवढ्याच करितां त्याला नियमादृष्ट म्हणतात. तें नियमादृष्ट ब्राह्मणांनां, वेदश्रवणापासूनच उत्पन्न होतें. आणि शूद्रांनां, पुराणश्रवणापासून उत्पन्न होतें. व इतर वर्णांनां, भाषांतर श्रवणापासून उत्पन्न होतें. परंतु ती भाषा मंत्रसिद्धच असली पाहिजे. मंत्रसिद्ध भाषेविषयीं गुरुपाद असें सांगतात.

" अक्षरं वैकृतं त्यक्त्वा पूर्वापर समायुतम् ।
सिद्धः साध्यः सुसिद्धोवाऽरिर्वामंत्र इतीक्ष्यताम् " ॥१॥

एका अक्षराचा परिणाम दुसऱ्या अक्षरांत जेथें होतो अशी, व वैकृत अक्षरें सोडून देऊन, अकारादि क्रमानें, सिद्ध, साध्य, सुसिद्ध व रिपु यां पैकीं कोणतें अक्षर आहे हें पाहावें. कारण नियमित ध्वनीनेंच शरीरांतील मनोवाहिनीस्रोतसें उघडीं होऊन मनांतील सात्विक शक्तींनां प्रगट करितात. तसें वैकृत भाषेनें होत नाहीं. पुन्हा वैकृत भाषा " सिद्धारि " चक्रांत मांडतांही येत नाहीं. जसें इंग्रजी उच्चार

" ॲ " हा वर्ण सिद्धारिचक्रांत काय ' अ ' ला आरंभ करून मांडावयाचा, ' ए ' ला आरंभ करून मांडावयाचा, कीं ' य ' ला आरंभ करून मांडावयाचा ? कारण तिहींचीही अनुगतता, त्यांत सूक्ष्म लक्ष पुरविलें ह्मणजे, दिसून पडते. बरें; त्याचे तीन तुकडे करून सिद्धारिचक्रांत मांडल्यास ' अ ' च्या अनुगततेचा तुकडा, सिद्ध येत असून, ' ए ' च्या अनुगततेचा तुकडा, साध्य येतो. आणि ' य ' च्या अनुगततेचा तुकडा, सुसिद्ध येतो. बरें, दुसरा इंग्रजी उच्चार म्हणजे " ऑ " यांत ' अ ' आणि ' ओ ' या दोन वर्णांची अनुगतता दिसते. पैकीं ' अ ' च्या अनुगततेचा तुकडा, सिद्ध असून, ' ओ ' च्या अनुगततेचा तुकडा, रिपु येतो. तात्पर्य, यंत्रशास्त्राच्या मानानें, ह्या विकृत वर्णांनां मंत्रत्व देतां येत नाहीं. म्हणूनच वरील श्लोकांत वैकृत अक्षर सोडून द्यावें, असें प्राचीनांनीं म्हणून ठेविलें आहे. आतां ज्याचा मंत्र शास्त्रावर विश्वासच नाहीं, त्याला प्रत्यक्ष मंत्राचा अनुभव येईपर्यंत, आम्हीं त्याच्याशी वाद करण्याला समर्थ नाहीं. आपल्या प्रश्नाचें, मला समजलें तसें, यथामति उत्तर दिलें. चुकलें असल्यास पंडितांनीं त्याचा निर्णय करून द्यावा.

प्राणायामांत वैकृत शब्दानें मानसिक रोग ( *Hysteria.* ) जडतात. व तेच ' ॐ ' ' राम ' इत्यादि शब्दांनीं नाहींसे होतात, असें दिसून आलें आहे. हें आपण कोण्याही योगीयाची गांठ घेऊन, अनुभवानें पाहावें. ब्लॅव्हॅटस्कीनेंही, आपल्या ' सिक्रेट डॉक्ट्रिनमध्यें स्वरांची भिन्नता कबूल केली आहे, असें म्हणतात. हें उदाहरण दिल्यामुळें, मी ' थिऑसाफिस्ट ' आहें असें मात्र कोणी समजूं नये. कळावें.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

देऊरवाडा, तारीख ८।१।१९११.

आपला अपरिचित मित्र,
गुलाब गुंडोजी.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

## रा० रा० केसरीकर्ते यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

## गुरु व शिष्य.

# पत्र नंबर १४.

मी स्वत: गृहस्थ असून साधूचा कोणताही वेष घेतला नसल्यामुळें शिष्यशाखांची कोणत्याही प्रकारची जबाबदारी माझ्याकडे नाहीं. केवळ धर्मग्रंथार्जन व तीर्थनिरीक्षण आणि कोणी कांहीं वैद्यकसंबंधीं व धर्मसंबंधीं विचारलें असतां मला येतें तसें थोडें सांगणें एवढ्याचकरितां माझें बहुतेक फिरणें असतें. माझ्या जातींतील कांहीं लोक माझे शिष्य ह्मणवून, वर्णाश्रम महाराजांना मान्य नाहींत, ब्राह्मण व इतर जाती एक झाल्या पाहिजेत, असें गुप्तपणें वऱ्हाडाकडील खेड्यांत सांगतात असें माझ्या कानावर आलें आहे. माझी व असें सांगणारांची ओळखही नाहीं. माझ्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाविरुद्ध माझें मत ह्मणून कोणी कांहीं सांगितल्यास त्याविषयीं मी जबाबदार नाहीं. माझ्याकडे कितीही लोक येत असले तरी अजूनपर्यंत मी स्वत: कोणासही आपला शिष्य ह्मणून ह्मणविलें नाहीं. यंदा देउरवाड्यास झालेल्या कात्यायनि-व्रतांत कांहीं नीच जातीचे लोक जेवल्यावर आमची उच्छिष्ट पानें ब्राह्मणांनीं उचलावीं ह्मणून तंटा करूं लागले होते; त्याचप्रमाणें फार माणसांचा व बायांचा समाज जमवूं लागल्यास नागपुरास निघालेल्या वर्धा येथील हनुमानगडासंबंधीं चोपड्याप्रमाणें माझीही पुढें हकीकत होईल कीं काय अशी मला भीति आहे. ह्मणून मी विनंति करितों कीं, माझेकडे साधू समजून दर्शनाकरितां कोणीही येऊं नये. कोणाला मजशीं काम असल्यास पहिलें पत्रद्वारा विचारून माझें उत्तर आल्यावर नंतर मजकडे यावें. माझ्याकडे येणाऱ्या मंडळीच्या आचरणासंबंधानें मी आपल्याकडे कोणत्याच प्रकारची जबाबदारी घेऊं शकत नाहीं. मला योग वगैरे येतो, अशी लोकांची समजूत

असेल तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. माझ्या व्रतादिकांतही कोणी येण्या-जाण्याविषयीं मी हेच नियम लागू करतों. मी गृहस्थ असल्यामुळें माझे मतें माझें मन आतां जरी निष्कलंक असलें तरी यापुढें तें तसेंच राहील, याची माझ्या मनाला खात्री नाहीं. तें तसें राहिल्यास परमेश्वराची कृपा. इतकेंही करून कोणी माझें शिष्यत्व आपणावर बलानें ओढून घेत असल्यास त्यानें माझ्या ग्रंथाच्या विरुद्ध तरी जाऊं नये. जी चार मंडळी मी जवळ ठेवीत असतों ती केवळ ग्रंथलेखनाकरितां. दुसरा त्यांत कोणताही उद्देश नाहीं.

गुलाबराव गुंडोजी मोहोड माधानकर, ता० इलिचपूर,
जि० उमरावती. हल्लीं मु० हरदा, ता. ८ आक्टोबर १९१२

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## रा. रा. बाबुराव उर्फ गोविंदराव तांबे यांनां पाठविलेलें पत्र३रें.

# पत्र नंबर १५.

रा. रा. बाबुराव यांनां मातृनात्यानें प्रणाम ,चिरंजीवनात्यानें आशर्वाद. श्रृंगमास्तर बरोबर आलेलें आपलें पत्र त्रिपुरवारचे मुखानें कळलें आणि हेंही पत्र, त्रिपुरवारच्नेच हातानें लिहवीत आहें. परांजपे यांनीं व्याख्यान देऊन मंडळीची श्रद्धा दृढ करून घेतली असें आपण लिहिलें त्यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं. कारण “ निष्पापमभ्यसूयन्ते कलौ लोका न पापिनं ”.अशी स्मृति आहे. व कलीमध्यें निष्पाप लोकांची असूया करून पापी लोकांचा जन मान करतील असा तिचा अर्थ आहे. परांजपे यांच्या प्रकरणांत झालेली गोष्ट जर मंडळीकडून असती तर त्यांच्यावर आह्मी कांहीं दोष दिला नसता. कारण त्रिगुणात्मक जगाच्या मनावर जो तो त्याच्या मनाप्रमाणेंच परिणाम करूं शकतो. दुर्योधनाला श्रीकृष्ण, व्यास, भीष्म इत्यादिकांनीं सांगून सुद्धां त्याचें मन वळलें नाहीं. तेवढ्यावरून व्यासांत, भीष्मांत किंवा श्रीकृष्णांत कांहीं सामर्थ्य नव्हतें, असें म्हणतां

येईल काय ? किंवा हें कशाला ? परमेश्वरांत जर सामर्थ्य असतें तर त्यानें आपल्या विरुद्ध नास्तिक लोक जगांत कसे उत्पन्न केले असते, हें म्हणणें बरोबर होईल काय ? त्याप्रमाणें मंडळीची कांहीं गोष्ट असती तर त्याविषयीं परांजप्यांना कोणी कांहीं म्हणण्यासारखी गोष्ट नव्हती. परंतु त्यांची स्वतःचीच गोष्ट असल्यामुळें कितीही व्याख्यानें दिलीं तरी काय उपयोग ? यद्यपि साधु आपला अपमान जरूर करून घेण्याचा यत्न करीत असतात, असें तातांनीं ज्ञानेश्वरींत " वाचस्पती-चेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । परी वेडिवे माजी दडे । महिमे-भेणें " या ओवींत ह्मटलें आहे; तरी त्याचा अर्थ असा आहे कीं, वेदानीं सांगितलेले धर्म दूषित न करितां लोकांनीं आपल्यावर आळ आणावी असें वर्तन करावें तरच त्याचा योग सिद्ध होतो. नाहीं तर होत नाहीं. हेंच विष्णुपुराणांत सांगितलें आहे. " सम्मानना परां हानिं योगर्द्धेः कुरुते यतः जनेनावमतोयोगी योगं सिद्धिं च विंदति " तस्मा-च्चरेत्तु वै योगी सतांधर्ममदूषयन् । जना यथावमन्येरन्गच्छेयुर्नैवसंग-तिम् ॥ विष्णुपुराण अंश २ अध्याय १३ श्लोक ४२-४३.

भावार्थः—चांगला मान मिळणें यांत योगवृद्धीची मोठी हानी होत असल्यामुळें, लोकांनीं केलेल्या अपमानामुळेंच, योगी पूर्णत्वाला पोंचतो. ह्मणून लोकांकडून अपमान होईल असें आचरण महात्म्यांनीं करावें. परंतु महात्म्यांनीं, सांगितलेले धर्म बुडवून मात्र लोकांकडून छी थू करवून घेवूं नये. ह्मणूनच " सतांधर्ममदूषयन् " असें श्लोकांत ह्मटलें आहे. तर धर्म न बिघडवितां लोक अपमान करतील असें करावें.

तुकाराम बुवांवर सुद्धां कांहीं आळी आल्याचें प्रकरण आहे अशी प्रसिद्धि आहे. त्या त्यांनीं सुखानें येऊं दिल्या. परांजप्यांची गोष्ट तशी झाली नाहीं. त्यांनीं स्वतःच रूढीविरुद्ध लग्न करून धर्माचा नाश केला आहे; मग आतां अपमान झाला व मान झाला तरी काय ? सोनें मातींत पडलें तरी तें नष्ट होत नाहीं व लोखंड जपून ठेविलें तरी त्याला जंग खातो. या गोष्टीचा मनुष्यानें चांगला विचार करावा. आपण निष्पाप असून आपला अपमान होतानां, शास्त्रकार त्याला

अमृत पिणें ह्मणतात*केसरीमध्यें गुरु व शिष्य या नांवाखालीं ता० ८ आक्टोबरच्या अंकांत जें मी पत्र छापिलें आहे, तें आपण वाचलें असेलच. भैया साहेबांनां तें पत्र वाचण्याची मी शिफारस करूं काय? आणि त्यांनां पत्र लिहूं कीं नको? रायपूरला मी यावें असा आपला मानस दिसतो; परंतु माझी प्रकृति अष्टमीस होती त्या पेक्षां वाईट आहे. दुसरें, आपण पास झाल्यास मी आपणा जवळ राहण्याचें कबूल केलें आहे. त्यावर आपली इच्छा असेल तसें. जी नवीन मंडळी माझ्याशीं बोलण्याची इच्छा करीत आहे, तिच्या विषयीं आपल्याला केसरींतील पत्रावरून कळेल. पुष्कळ मंडळी प्रथम माझ्याशीं बोलणें करितात. व नंतर मनांतील कामना वगैरे न सोडितां, व आपले विकार व लौकिक यांची चाड तितकीच्या तितकीच कायम ठेवून, मनुष्य जन्मांतही मृत्यूची भीति न बाळगतां, मजपासून योगाभ्यासाची अपेक्षा करितात. अशाच प्रकारची आपण सुचविलेली नवीन मंडळी आहे काय? तसें असल्यास माझा पूर्ण उपराम आहे. असो. आपली शारिरिक व मानसिक प्रकृति आतां कशी आहे? माझ्या प्रकृतीबद्दल काळजी करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आपला माझे ठिकाणीं व माझा आपले ठिकाणीं खरा प्रेम आहे, तर वियोग होण्याचें कारणच नाहीं. मंडळी बरोबर फार सलगी करण्याविषयीं मला उपराम होण्याचें कारण, पुष्कळ मंडळीनें चमत्कार विचारणें व ते नसणें हें आहे. चित्तांतून कामना गेली नाहीं अशांचें आतां मला काय करावयाचें आहे? शिवाय ज्यांनीं जगद्गुरुपणाचा किता उचलला असेल त्यांनीं जगाच्या कामना पुरवीत बसाव्या. मी निष्पाप, निष्काम, व सप्रेम असणें यांतच आपली कृतकृत्यता समजतों.

---

* पत्र नंबर १४ पान १११ पहावें.

मु० हरदा.
ता. २०।६।१२.

आपला,
गुलाबराव.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

रा. रा. चिंतामणराव तांबे यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

## पत्र नंबर १६.

१ आधीं नमुनियां आळंदीचा राजा । वडिलांतें ओजा दंडवत ॥१॥ मोठी सान माता नमिल्या दोघीही । बोबडें मी लिहीं चित्त द्यावें ॥२॥ विनंति वरिष्ठा निजबाळा ऐसें । बोलिल्या आपैसें सांडूं नये ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरप्रभु करुणा अगाध । सांभाळो संबंध जन्म जन्म ॥ ४ ॥

२ आपण जेष्ठांत यावया कारणें । बोलिलीं वचनें तथापि ते ॥१॥ गृहकार्यास्तव न आलें घडोनी । इच्छा नारायणीं जैसी हो कां ॥ २ ॥ नाहीं मी समर्थ करावया बोध । लडिवाळ शब्द बोलतां हे ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरकृपें वाटोनि घ्या गोड । पुरवणें कोड तुह्मां माझें ॥ ४ ॥

३ परमार्थी तो न ह्मणावा आपुला । वडील धाकुला व्यवहारी॥१॥ हरीप्रेमामाजी द्यावी नित्य बुडी । काळाची ती उडी चुकवावी ॥२॥ पूर्वीचा दाउनी वाईल संबंधु । फसविती भोंदू नानापरी ॥ ३ ॥ ऐशा साधूवरी न ठेवा विश्वास । ज्ञानेश्वरीं आस दृढ राखा ॥ ४ ॥

४ पूर्वीचा येथिला जरी वा संबंध । परी तेणें बोध होत नाहीं॥१॥ लवण आवळे झाले एके ठायीं । तेणें द्वैत कांहीं निवटलें ॥२॥ वैराग्य वांचोनीं समाधीचे बोल । सुरापानें झोल जाती जेवीं ॥३॥ वैराग्यातें नोहे त्यागाची अहंता । शेवटीं महंता भय फार ॥ ४ ॥ वडिलां वंदावें लहाना पाळावें । निषिद्ध गाळावें सर्वांपरी ॥५॥ भुलों नये एका कामनेच्या पाठीं । ज्ञानदेव पोटीं सांठवूनि ॥६॥

५ आतां तुह्मां नाहीं ओढीचें कारण । वाबूचें संधान वाबू जाणे ॥ १ ॥ वृद्धपणीं फार वाढतां कामना । मृत्यूकाळीं मना न सोडी तें ॥२॥ थोडे तरी व्हावें अंतरीं उदास । मग आह्मी दास तुमचेची ॥३॥ पत्नी मूळ गोत वाबूचे सकळ । आपण केवळ धर्मनिष्ठ ॥ ४ ॥ धरूनि अंतरीं कैवल्याची रज्जु । सज्जन समाजु सेवा सुखें ॥ ५ ॥ ज्ञानदेव स्वामी जरी कृपा करी । उणें काय घरीं मग आहे ॥ ६ ॥

६ अर्धवट ज्याचा विश्वास गोविंदीं । येउनियां सिद्धी परतती ॥१॥ उर्वीवरी अर्धे विहीर खणतां । बुजुनी टाकतां श्रम मात्र ॥ २ ॥ तैसी हरी पायीं ठेविली वासना । तरी उपासना दृढ कीजे ॥ ३ ॥ ज्ञानदेव कृपा होय सावकास । ठेउनी विश्वास पदा वेगीं ॥ ४ ॥

७ माझ्याकडे पहा समाधान रहा । हृदय तें वहा भगवंतीं ॥ १ ॥ मजलागीं विद्या शिकविली कोणी । बुद्धीही कोठूनि आली सांगा ॥२॥ अनंत जन्मीचा कळला विश्वास । ज्ञानदेवें आस पुरविली ॥ ३ ॥

८ युधिष्ठिर खरा आणि कृष्ण बोले खोटा । परि देव पटावरी तोचि ॥ १ ॥ चंद्र तो शीतळ सूर्य तो अत्युष्ण । परि नारायण ह्मणती त्या ॥ २ ॥ जगांतील सुख देती जे पदार्थ । तेथें नाहीं अर्थ मोठेपणा ॥३॥ मोठेपणा साठीं व्हावा दृढ भाव । प्रेमें ज्ञानदेव आळवावा४

९ सोडवील कोणी आपुली सुनीती । तयामागें चित्तीं जाऊं नये १ बोलविल कोणी हृदयींचें गूज । तरी तें सहज बोलूं नये ॥ २ ॥ नाना सद्गुणाचा आवडत्या नारी । विश्वास त्यांवरी ठेवूं नये ॥ ३ ॥ ज्ञानदेवाकडे फिरलिया अंग । प्राप्तीविण मागें वळूं नये ॥ ४ ॥

१० वागणेंचि तरी वागावें सुमार्गें । शाहण्याचे मागें आधीं जावें ॥ १ ॥ बोलणेंचि तरी बोलावें सुंदर । जेणें बांधे थोर सान जन ॥२॥ खेळणेंचि तरी खेळावें चित्सुखीं । वासना विखरी जिंकोनियां ॥ ३ ॥ निजणेंचि तरी निजावें आनंदीं । ज्ञानदेव छंदीं गात गात ॥ ४ ॥

११ थोडक्या नीतीनें न मानावें सुख । नियमावें सुख कृष्णनामीं ॥ १ ॥ आणिका देवाची न धरावी आशा । एका हृषीकेशा वाचुनियां ॥ २ ॥ होईल तें होवो गोविंदाच्या नावें । ऐसेंचि करावें चित्त आधीं ॥ ३ ॥ मग तुह्मां सुचे पुढील उपाय । स्वामी ज्ञानदेव सुचविता ॥४॥

१२ अष्टाक्षरीमंत्र जपूं नये व्यर्थ । असतां समर्थ शिरावरी ॥ १ ॥ जेवढा कीं दृढ आपुला विश्वास । तेवढीच आस पुरवीतो ॥ २ ॥ ये यथा मां प्रपद्यंते ऐसें । स्वयें हृषीकेशें सांगितलें ॥ ३ ॥ वदनाचें व्यंग दर्पणीं दिसत । तैसा भगवंत विश्वासाचा ॥ ४ ॥ ज्ञानदेवस्वामी सर्वत्र उदास । जो भजे तयास सुखदाता ॥ ५ ॥

१ कसें करूं काय करूं.

१३ जागृति सुषुप्ति दोन्हीही विरुद्ध । एकावेहीं सिद्ध जयापरी १
तैसे बंध मोक्ष दोन्ही एका ठायीं । विरुद्धचि सोई नांदण्याची ॥ २ ॥
जागृतींत जाणा उघडे लोचन । झांकितो नयन सुषुप्तींत ॥ ३ ॥ तैसा
बंध जाणा मनाचा हव्यास । मनाचा जो नाश तो चि मोक्ष ॥ ४ ॥
ज्ञानदेवस्वामी न करी जों कृपा । तों हा मार्ग सोपा नाहीं नाहीं ॥५॥

१४ एकचि औषध सांगतों मी ग्रामी । पोषकत्वा बोलासी मान
द्यावा ॥ १ ॥ वाटों द्यावें जीवा वय झालें फार । कोणता विचार करूं
देवा ॥ २ ॥ वाटों द्यावें जीवा आलें वृद्धपण । केव्हां नारायण भेटेल
तो ॥ ३ ॥ वाटों द्यावें जीवा चळे पुढें बुद्धि । संतकृपा कधीं होय
साच ॥ वाटों द्यावें जीवा आत्म अनुभव । केव्हां ज्ञानदेव दाखवील ५

१५ अकस्मात चित्तीं प्रेमाचा पाझर । उठतां विचार रोधूं नये १
विश्वासें दृष्टांत होय जरी कांहीं । भलतिये ठायीं बोलूं नये ॥ २ ॥
व्यवहार नीति समाधान सोयी । इंद्रियांची ग्वाही देऊं नये ॥ ३ ॥
धरिलिया वीण ज्ञानदेव पाय । मोक्षाचा उपाय शोधूं नये ॥ ४ ॥

१६ देणें तैसें घेणें । येथें नाहीं पुरे उणें ॥ १ ॥ निष्ठा ठेवितां
गोपाळ । अवघी पुरवितो आळ ॥ २ ॥ खेळ खेळतां अघोरा । दैव
होय पाठमोरा ॥ ३ ॥ ज्ञानदेवस्वामी । दृढ धरा अंतर्यामी ॥ ४ ॥

१७ शिकवणें तुह्मां होतसे अन्याय । परितोषे माय बाळ शब्दें १
तेवीं बोलिल्याचा न धरावा राग । वात्सल्यानुराग वाढवावा ॥ २ ॥
पेरुनी पहावें विवेकाचें शेत । ब्रम्हरस त्यांत पिक पिकें ॥ ३ ॥ पुजु-
नि पहावा स्वामी ज्ञानदेव । संदेह संभाव सोडूनियां ॥ ४ ॥

१८ याचेंही साधन सांगतों पुढतीं । येवो द्यावें चित्तीं माहाराजा
॥ १ ॥ सोवळें ओवळें न पाहतां कार्यीं । मुखीं शेषशायी गात जावा
॥ २ ॥ राहों नये रितें अर्ध तेंही पळ । वय खातो काळ चालिलाची
॥ ३ ॥ अकस्मात यम देखील्या लोचनीं । मग तो गोचनीं मार्ग
नाहीं ॥ ४ ॥ वेदाच्या मंत्राचा सोवळ्यांत जप । ओवळ्यांत पाप
करितां होय ॥५॥ तैसें नाहीं नाम शुचि सर्वांठायीं । सखा फणीशायी
सांभाळिता ॥ ६ ॥ समर्थाचे श्वान त्यांचा होय मान । देवदासा कोण
वक्र पाहे ।७। ज्ञानदेवस्वामी माझा कृपावंत । उपाय अनंत आणी पुढें८

१९ रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी । अच्युत नरहरी नारायण ॥१॥
ऐशीं नामें आधीं जपावीं सद्गद । इंद्रियासी बंध देउनीयां ॥ २ ॥
ज्याचें तयाकडे सोपुनिया काम । मनांत निष्काम व्हावें आधीं ॥ ३ ॥
मग आरंभावा कांहीं प्राणायाम । पवना नियम लागावया ॥ ४ ॥
सूर्यासि भक्षावें चंद्रासी रक्षावें । शरीर शिक्षावें ऐशा रिती ॥ ५ ॥
वाम पाय टांचे शिवण दाबावी । वरी बसवावी सव्य टांच ॥ ६ ॥
न स्पर्शितां लिंगा बैसावें अधर । मेरु दंड वर करुनियां ॥ ७ ॥ गुरु
परंपरा चिंतोनि उत्तम । नमन सप्रेम करावें कीं ॥ ८ ॥ मागील
पुढील सांडोनि विचार । नयनीं नासाग्र विलोकावें ॥ ९ ॥ हनवटी
उरीं लावावी किंचित् । मन हृदयांत वोलवावें ॥ १० ॥ सुसिद्ध मंत्र
जो गुरुकृपा धाम । तयामध्यें नाम बैसवावें ॥ ११ ॥ सोऽहं श्वासीं
जपा सुलोम विलोम । अवकाश वर्म ठायीं पाडा ॥ १२ ॥ शक्ति ते
अंतरीं शिव तो बाहेरी । दोमध्यें मुरारी निर्विकार ॥ १३ ॥ तो शुद्ध
कुंभक साधावया लागीं । अभ्यासावा वेगीं प्राणायाम ॥ १४ ॥ प्राणा-
याम तुम्हां सांगितला होतां । षड्गुण तो होतां नाडी शुद्ध ॥ १५ ॥
नाडी शुद्धास्तव होती नाद नाना । तेथें गावें मना क्षणभरी ॥ १६ ॥
अथवा तो जरी प्राणायाम नोहे । तरी सोऽहं भावें कोटि जया ॥१७॥
तेणें हो तो उठे अनाहत नाद । वाजवो गोविन्द वेणू जेवीं ॥ १८ ॥
नादाचिया भरें हलु होय प्राण । निज जडपण सांडूनिया ॥ १९ ॥
व्यापितांचि नाद मन होय लीन । चालवितां प्राण कोण मग ॥ २० ॥
हेंचि द्वार ज्ञानी येथुनी निर्गुणी । जाताती सगुणी भक्तिमंत ॥ २१ ॥
शिवासवें जातां सांपडे निर्गुण । शक्ति अधिष्ठान सगुणाचें ॥ २२ ॥
सकार हकार झुंझतां निर्द्वंद्वीं । जीव तिचे संधीं सांपडला ॥ २३ ॥
झुंझणें संपलें जीवत्व निमालें । शिवशक्ती आलें एकांतासी ॥ २४ ॥
सगुण निर्गुण दोनी एक अंग । ज्ञानदेव चांग कृपावंत ॥ २५ ॥

२० याचा जरी तुह्मां नये अनुभव । भेटल्या उपाव सुचवीन ॥१॥
समजेल तरी करावा हा योग । न तो उमारंग आठवावा ॥ २ ॥
भेटी झाल्या पुढें ज्ञानदेव आई । सुचवील कांहीं तैसें करूं ॥ ३ ॥

---

१ आपलें वजन कमी होऊन.

२१ जननीचे डोळे दुखताती फार। प्रयोग विढार पाहिजे त्या ।१। चंद्रज्योति रस पांढरा पळस । उपयोग त्यास अचुकचि ॥ २ ॥ हाचि वेळ झाड ओळखावयाचा । फुलीं फळीं साचा भावदृष्टि ॥ ३ ॥ आणीक यावीण औषध जैं देणें । पाहिजे राहणें बहु माझें ॥ ४ ॥ किंवा इंदुरातें नेण्याचा विचार । वाईट साचार तोही नाहीं ॥ ५ ॥ कृपावंत ज्ञाता ज्ञानदेव आई । भजळिया ठायीं यश मिळे ॥ ६ ॥ लिहिल्या पत्रिके धाडावें उत्तर । रुचेल विचार जरी तुम्हां ॥ ७ ॥ नाहीं तरी बरें माझें मजपाशीं । नव्हे एकादशीं दुष्काळानें ॥ ८ ॥ जिंकिली जों नाहीं आपुली अहंता । न चुके महंता दुःख शेखीं ॥ ९ ॥ तेथें इतरांचा कोण करी पाड । जयालागीं चाड विषयाची ॥ १० ॥ घडीत वैराग्य घडीत संसार । कैचा शार्ङ्गधर तया हातीं ॥ ११ ॥ क्षणीं गुरु श्रद्धा क्षणीं आत्म यत्न । तया ब्रह्म रत्न मिळे केविं ॥ १२ ॥ क्षणांत समाधि क्षणांत समाधि । वासना अनादि चाळे करी ॥ १३ ॥ इतुकिया लागीं एकचि उपाय । गावा ज्ञानदेव दिन निशीं ॥ १४ ॥ मना ठेवा भेटो सानुकूळ जाया । तंव मोहमाया पाठीं लागे ॥ १५ ॥ मना वाटे पोर चालावें वचनीं । तंव तें लोचनीं पाणी आणी ॥ १६ ॥ मना वाटे बंधु असावे स्ववश । तंव ते वैरांश उभारिती ॥ १७ ॥ लौकिक तो लाभ नाहीं मना हातीं । जैसी पूर्व कृती तैसी होय ॥ १८ ॥ एक हरी मात्र मना वाटे तैसा । ज्ञानदेव आशा पुरविता ॥ १९ ॥

२२ करोनि वंदन संपवि बोलणें । आतां प्रेमदानें तोषवावें ॥ १ ॥ आपुला मानिल्या न ह्मणावा अन्य । हेंचि अंतःकरणें विनवितों ॥ २ ॥ आपण वडील लहानाचे बोल । न मानावे फोल महाराजा ॥ ३ ॥ ज्ञानदेवस्वामी सांगती ज्या खुणा । त्याचि पत्रीं जाणा लिहिल्या त्यां ॥४

२३ ज्ञानदेव नांव जपोनियां वाचे । प्रेम छंदें नाचे गोविंद धन्य १ उणी पुरी झाली अरुष कविता । अळंदीच्या नाथा प्रीति पावो ॥ २ ॥ तनुमनप्राणें करुनि वंदन । सद्गुरु निधान पुजूं सदा ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर माउली ऐसें हे सात । अक्षरें अनंत जन्मी जपूं ॥ ४ ॥

---

१ मानसिक दुःख.

हरदा, २१।८।१२. आपले अज्ञान बालक, गुलाब.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

## रा० रा० गोविंदराव तांबे यांनां पाठविलेलें पत्र ४ थें.

# पत्र नंबर १७.

रा० रा० बाबुराव यांनां नमस्कर व आशीर्वाद. आपल्या पत्राचें उत्तर लवकर न आल्यामुळें परवां मीच येण्याला निघालों होतों; परंतु इतक्यांत आपलें पत्र डाकेमधून मिळालें. ह्मणून येण्याचें बंद केलें. व्रताचीही गडबड असल्यामुळें व्रत झाल्यावर जाऊं असें ठरविलें.

आपल्या मनाचा फार गोंधळ झाला आहे, हें वाचून वाईटही वाटलें व आश्चर्यही वाटलें. महाभारतांत अज्ञाला हजारों कारणें रोज शोक व हर्ष वाढविणारीं होतात, तशीं सुज्ञाला होत नाहींत असें ह्मटलें आहे. आपण लिहितां कीं, मी आपणास फसवून घेत नाहीं अशी माझी खात्री नाहीं. परंतु येथें माझा कांहीं उपाय नाहीं. कारण ही शंका कोणत्याही माहात्म्याजवळ गेलें, तरी आपल्याला राहण्याचा संभव आहे. ही आपण व्यवहाराच्याच विचारानें दूर केली पाहिजे. फसविणारे साधु व फसविणारे व्यावहारिक लोक या दोन वर्गांपैकीं दुसरा पहिल्याच्या हजारपट भरेल. व्यवहारांत रोजच्या हजारों स्त्रिया विषयींचा डांगोरा पिटला जात असतांही, आपल्या स्त्रीविषयीं जोंपर्यंत खातरी आहे, तोंपर्यंत तिला सोडून देण्याचा कोणी विचार करतो काय ? नागपूरला गद्यांचें घर जळून पांच सहा जीव गेले, ह्मणून इतर रोग्यांनीं वैद्यांकडे जाणें सोडलें व वैद्यांनीं आपली वैद्यकी सोडली असें कधीं झालें आहे काय ? आपल्या वंशांत वंशाला कलंक लावणारा मुलगा पुढें कदाचित उत्पन्न होईल, ह्मणून कोणी लग्न करणें बंद केलें आहे काय ? एका आगगाडीला झालेला अपघात ऐकून आगगाडींत बसणें कोणी वर्ज्य केलें आहे काय ? नाना प्रकारचे जंतु पाण्यांत व अन्नांत एक सारखे फिरत असल्यामुळें त्यांनां भिऊन कोणी अन्नपाणी

सोडलें आहे काय ? ज्या देशांत अनेक सवर्त्रीवर दिवसाढवळ्या काडी मोडून देण्याचे प्रकार चालले आहेत, तेथें देखील स्वतःच्या स्त्रियांची खातरी देणारे कांहीं आहेत, असें आपण मागितलें होतें. तेव्हां परमार्थातच आपण फसूं अशी शंका दैवयोगानें कुप्रसंग आल्या शिवाय वारंवार कां घ्यावी ? व घेतल्यास तिचें समाधान कोण करणार ? कारण दुसऱ्यास जसा अनिष्ट प्रसंग आला तसा मला कशावरून येणार नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर सृष्टींत कोठेंही नाहीं. परंतु या संशयानें व्यवहार मात्र कोणी सोडीत नसून परमार्थाविषयी मात्र उदास होतात, हेंच लोकांचें आश्चर्य आहे. शिवाय आपण फसूं किंवा काय ? अशी ज्यांनां माझ्या संबंधी शंका आहे, त्यांनां परांजप्यां प्रमाणें कीर्तन करून वश करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. तसें करणें ह्मणजे चाणक्याच्या उपदेशरूप जलानें, भागुरायण सेनापतीचें पीक पिकविणेंच होय. भेद करून वश केलेल्या मित्रावर, किंवा दान देऊन जोडलेल्या मित्रावर, सर्वथा विश्वास ठेविला असतां, दोन्ही प्रकारचा प्रसंग येऊं शकतो. तेव्हां अपल्याला ती शंका खरोखर असो किं नसो, ज्यांनां माझ्या तडाक्यांत फसण्याची शंका आहे, त्यांनीं दहावीस वर्षें खरें काय आहे, हें पाहण्यांतच घालविणें बरें. या लिहिण्याचें आपणास वाईट वाटणार नाहीं, अशी मी आशा करितों.

* केसरींतील व सयाजीविजयांतील छापलेल्या पत्रावर आपला अभिप्राय उलट येणें बरोबरच आहे. मित्राचें थोडेसें वाईट ऐकल्यानें वाईट वाटणें, हें खऱ्या मित्राचें लक्षणच होय. आपण परांजप्यांसारखें वागत नाहीं, हें आपण जें लिहिलें, तेंही अत्यंत यथार्थ आहे. परंतु दीक्षादिकांचें नियम प्रकाशित नसल्यामुळें, जवळ येणाऱ्यापैकीं, पुष्कळ हिडिंबावल्लभही आपल्याला माझ्या मंडळींतले ह्मणवून घेत आहेत. व त्यांच्या वर्तनामुळें चांगलीही मंडळी तोंडावर कांहीं न बोलतां, घरीं बसून एखाद्या वेळीं मला दोष देण्याला तयार असते,

---

*पत्र नंबर १४ पान १११ पहा,

ह्मणून हीं पत्रें छापण्याची मी चूक केली आहे. आतां "पत्रांत योग येत नाहीं असें ह्मटलें, व ग्रंथांत तर योगाच्या प्रक्रिया दखविल्या" हा जो आपण विरोध दाखविला. त्याचा परिहार करण्याची पूर्ण बुद्धि आपणास आहे, ह्मणून मी त्याचा परिहार लिहित नाहीं. व लिहिणारही नाहीं. प्रसंग आल्यास तोंडीं सांगेन. येथें लिहावयाचें इतकेंच किं, आपणा सारख्या करतां, अशीं पत्रें असतातच असें नाहीं.

आपण लिहिलें कीं ज्या मंडळींपासून आपला उपराम होतो त्यांत मी एक आहे; ह्यांत आपली शालीनता असल्यास मला उत्तर देण्याचें कारण नाहीं, पण वस्तुस्थिति असल्यास थोडेंसें लिहितों.

कोणतीही गोष्ट कैवल्यावांचून असल्यास ती आपल्या अतिशय स्थितींत विपरीत परिणामिनी होत असते; हा गुणत्रयात्मक एकंदर मायाकार्याचा सिद्धांत आहे. चांगलें, वाईट व मध्यम हे तिन्ही गुण परस्पर जनक आहेत, हें सांख्यशास्त्राचें ह्मणणें आहे. त्या विषयीं ईश्वरकृष्णाची सांख्यकारिका व त्यावरील गौडपादभाष्य पाहावें. तात्पर्य, सांख्याच्या ह्मणण्या प्रमाणें, सत्वापासून देखील प्रसंगविशेषीं रज किंवा तम उत्पन्न होतो. प्रीति हें सत्वगुणाचें लक्षण आहे, राग हें रजोगुणाचें लक्षण आहे, आणि विषाद हें तमोगुणाचें लक्षण आहे. भगवद्गीता व सांख्यकारिका हीं दोन्ही मिळुन वाचल्यास, हें माझें ह्मणणें अधीक पटेल. या तिन्ही गुणांचें कांहीं धर्मांत साधर्म्य असून, कांहीं धर्मांत अत्यंत वैधर्म्य आहे. मृगजलाचें दिसण्यामध्यें जलत्व व झळ लागण्यामध्यें उष्णत्व जसें अतिशय प्रसिद्ध आहे, तसेंच मृगजलाप्रमाणें मिथ्यामायेच्या गुणाविषयींही प्रसिद्ध आहे. ह्मणून सत्वगुण वाढवीत असतां त्याचा एखादाच धर्म विशेष वाढून, बाकीचे सात्विक धर्म जर लोप पावतील, तर दुसऱ्या एखाद्या गुणाशीं त्याचें साधर्म्य

होऊन, लवकरच वाढलेल्या सात्विक धर्मांतून त्या सधर्मवान् असात्विक गुणाची उत्पत्ति होते. याला प्रीतीचेंच उदाहरण पुरे आहे. प्रीति हा सत्वगुणाचा धर्म सांख्यकारिकेंत सांगितलेला असून, त्या बरोबर इतर सात्विक धर्म नसल्यास तीच प्रीति रागात्मक होते. तुप मधुर आहे तरी मध घालून विष होतें, हें आयुर्वेद प्रसिद्ध आहे. अशी ही प्रीति रागात्मक झाल्यामुळें, राजस स्वभावामुळें, तिच्यांत कापट्य उत्पन्न होते; किंवा मनोरथ पूर्ण न झाल्यास, तामस स्वभावामुळें विषाद उत्पन्न होतो. ह्मणून कोणतीही सात्विक वृत्ति कैवल्यपर्यवसायिनी होईल, इतकीच वाढली पाहिजे. याविषयीं, नाथ आपल्या एकादश स्कंधाच्या तेराव्या अध्यायाच्या टीकेंत ह्मणतात.—'सर्प चावला होय ज्यासी । विष खादल्या उतार त्यासी। तें विष खातां येरे दिवशी। आत्म घाताशीं वर्धक ॥ तैसें रजतम लोपीं सत्व वाढे। वाढलें सत्व बाधक कुडें। तीही बाधा निज निवाडें। ऐक तुजप्रती सांगेन ॥'

परंतु कैवल्यापुरतीच सात्विक वृत्ति कशी वाढवावी, हें बहु प्रासंगिक असल्यामुळें, गुरूवांचून केवळ शास्त्राच्या हातांत नाहीं. शास्त्र प्रमाणप्रवीण आहे; प्रक्रियाप्रवीण नाहीं. ह्या गोष्टीचें अज्ञानादि अनेक कारणांमुळें, प्रेम करणाऱ्या पासून देखील, बहुशंकापूर्वक ताप होतो; व तो कोण्याहि निस्पृह माहात्म्याला होईल; असें माझें मत आहे.

धर्म, प्रेम व त्यांतील गुर्वाज्ञापूर्वक व्यवस्था, या तीन गोष्टींच्या समुच्चयानेंच साधक पुरुषाला आपला मार्ग स्पष्ट करूं शकतो. एखादें न्यून असल्यास, सगळीकडे आंधारच होऊन राहतो.

चित्रशिक्षका विषयीं मी आपणास असें कळवितों कीं, त्याचा मजवर प्रेम आहे व तो माझें हितही करतो. परंतु बिचाऱ्याची भोळ्याबाळ्प्रमाणें स्थिति होते ती कशी, हें मी भेटी अंतीं कळवीन. आपल्या मनाचा फारच गोंधळ होत असेल, तर मी वारंवार पत्रें पाठवीन त्यांचा विचार करावा.

साधुपरीक्षेविषयीं भय्यासाहेबांकडे मी इंदुरास एक पत्र पाठविलें आहे तें व आपणासही पाठविलें आहे ते वाचावें. याही पत्रांतील एक एक वाक्य वाचून व उत्तम मनन करून लवकर उत्तर पाठवावें.

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवम् ।
तदा सर्वज्ञोस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।।
यदा किंचित्किंचिद्बुधजनकाशादवगतम् ।
तदा मूर्खोऽ स्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ।।

भर्तृहरि नीतिशतकम्

असें मोठ्या मोठ्यांचें ह्मणणें आहे; तर मला संस्कृत येत नाहीं व इंग्रजी येत नाहीं हें सर्वांस ठाऊक असतां, मी सुशिक्षित मंडळीला आपल्या हातांत घेण्याची इच्छा करणें, ह्मणजे दरिद्र्यानें राजपक्वान्नांची इच्छा करण्यासारखेंच व्यर्थ आहे. ह्मणून त्यापासून पराङ्मुख होणेंच बरें. हें काम करण्याला पदवीधरच गुरु पाहिजेत.

घट्ट तुपाचें किंवा "या महाराज" या शाब्दिक मानाचें दान करून शिष्य मिळविण्याची माझी इच्छा नाहीं. प्रारब्ध जर इच्छेविरुद्ध वागवील तर नाइलाज आहे.

पत्राचें उत्तर कृपाकरून लवकर पाठवावें. परमार्थच मिळवायाचा असेल तर थोडेंसें जीव धरून राहावें· मी होईल तितकें कोणास फसवीत नाहीं असें आणखी सांगून ठेवतों. कळावें.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

माधान,
तारीख २०।११।१९१२.

आपला,
गुलाबराव.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर १८.

नमामि प्रत्यक् चैतन्यं सत्यमानंद विग्रहम् ।
निजाचार्यस्वरूपेण यदलंद्यां विराजते ॥ १ ॥

श्रीगुरु श्रीनिवासशास्त्री उर्फ अण्णासाहेब रा० मुळेमास्तर, रा० भालेराव, रा० खापरे, रा० पाध्ये व रा० दिनकर प्रभृति मंडळीस पूर्वपद्धति प्रमाणें, अनेक नमस्कार व आशीर्वाद.

आपल्या येथें वाचन व वेदान्तचर्चा चालत असते हें मला बऱ्याच दिवसांपासून माहित आहे. ह्मणून त्या चर्चेंत मी कांहीं प्रश्न पाठविले आहेत; त्यांचें विचारानें उत्तर पाठवितील, अशी आशा आहे.

हे माझे प्रश्न न्यायशास्त्रसंबंधी आहेत व त्यांचे उत्तरही मला न्यायानेंच ठाऊक आहे. पण आपली चर्चा अशा विचारानें परिप्लुत व्हावी, ह्मणून हे प्रश्न मी पाठवीत आहें. या प्रश्नांचा योग्य विचार व्हावा; परंतु शद्बाचा अर्थ मात्र शास्त्रकारांनीं घेतला असेल तोच घ्यावा; नाहींतर अर्धवट नवीन वादकाप्रमाणें सामान्य ह्मणजे, अभेद ज्ञान किंवा साधर्म्य; प्रामाण्याचे परतोग्रहण ह्मणजे, अन्योन्याश्रय; सन्निकर्ष ह्मणजे, सन्निधी किंवा समीपता; दृष्टिसृष्टिवाद ह्मणजे, संकल्पतीव्रपणा; ज्ञातसत्व ह्मणजे, क्षणिक विज्ञानवाद; सर्वज्ञता ह्मणजे, ईश्वराचे ज्ञानांत त्रिपुटीचा अभाव; इत्यादि विपरीत अर्थ घेण्यासारखी स्थिति होऊन, प्रश्नांचा आशय न समजून, उत्तरही देतां येणार नाहीं. नवीन वादकामध्यें अयोग्य शब्दार्थ प्रयोग फारच दृष्टीस पडतो; व त्यामुळें कल्पपर्यंत वाद तुटणें अशक्य होतें. ग्रंथकाराचें ह्मणणें काय आहे हें योग्य न समजून घेतल्यामुळें, पुष्कळवेळां आपल्या मनांत शब्दाचे विपरीत अर्थ येत असतात. वरील चारपांच शब्दांचें उदाहरण देऊन, त्याचा विपरीत अर्थ कसा होतो व शास्त्रीय अर्थ कसा आहे, हें सांगून नंतर उत्तर लिहितों.

(१) सामान्य म्हणजे, अभेदज्ञान किंवा साधर्म्य ज्ञान नव्हे, साधर्म्य हें उपमान प्रमाणाला जसें हेतुभूत होत असतें, तसें सामान्य होत नसतें. कारण गंध व रस या दोन गुणांच्या ठिकाणीं गुणत्व सामान्य आहे पण तेवढ्यावरून गंधोपमानाचा उपमेय रस किंवा रसोपमानाचा उपमेय गंध आहे, असें म्हणतां येत नाहीं. " प्रसिद्ध-साधर्म्यात्साध्यसाधनमुपमानम् । " गौतमसूत्र अध्याय १ सूत्र ५ तसेंच द्रव्याश्रितत्व व निर्गुणत्व हीं दोन्हीही सामान्य रस व गंध यांचे ठिकाणीं आहेत. परंतु तेवढ्यानेंही, रस गंधाचा उपमानोपमेय भाव होत नाहीं. तात्पर्य साधर्म्य व सामान्य हे अगदीं भिन्न आहेत. नवीन नैय्यायिकांचे असें मत आहे कीं उपमान व उपमेय भाव सादृश्यानें होतो; साधर्म्यानें होत नाहीं. तेव्हां सादृश्य आणि साधर्म्य या शब्दाचा अर्थ देखील थोडासा निराळा होतो. हें नवीन नैय्यायिकांचें मतही बिलकूल टाकाऊ नाहीं. कारण आकाश, दिशा व काळ या तिघांचे ठिकाणीं जरी प्रसिद्ध विभुत्वसाधर्म्य आहे, तरी तेवढ्यावरून, त्यांचा उपमानोपमेयभाव नाहीं. म्हणजे काळ कसा आहे तर ' आकाशा प्रमाणें आहे ' असें कोणी सांगत नाहीं. आतां काळ व्यापक कसा आहे तर ' आकाशा प्रमाणें ' असें जरी वाक्य कोणाला उच्चारता आलें, तरी ते बरोबर नाहीं असे समजावें. कारण आकाशाच्या व्यापकत्वाप्रमाणें असा तेथें शब्द प्रयोग पाहिजे होता, तो नाहीं म्हणून. विभु हा परिणाम नांवाचा गुण असून, आकाश व काळ हीं द्रव्यें आहेत. बरें हें वाक्य बरोबर म्हटलें तरी आकाशाचा जो विभुत्व धर्म त्याच्या वरून काळाच्या विभुत्व धर्माचेंच येथें उपमानोपमेयत्व आहे. आकाश व काळाचें नाहीं. धर्माचें ठिकाणीं धर्म राहत नसल्यामुळें, धर्माचें साधर्म्य होत नाहीं; म्हणून हें परस्परांचें उपमान उपमेयत्व साधर्म्यमूलक नसून, सादृश्यमूलक आहे, असें मला वाटतें व तसेंच वार्तिककारांनांही वाटतें. या प्रमाणें पहिल्या शब्दाचा विपरीत व शास्त्रीय अर्थ सांगितला.

(२) प्रामाण्याचें परतोग्रहण म्हणजे, अन्योन्याश्रय, हा अर्थ विपरीत आहे. कारण, ज्या पदार्थाला अन्योन्याश्रय असतो, त्या

पदार्थांचा संयोग संबंध असतो किंवा पूर्वपश्चाद्भावी संबंध असतो; व त्यांत फळ निराळें नसतें. येथें प्रमाण व प्रमेय हे दोनही पदार्थ प्रमातृ ग्राह्य ह्मणजे आपल्याला समजत असून, प्रमाता ह्मणजे आपण हे मूळ, एक शिलकच राहतो व मूळाच्या खालीं प्रमाण किंवा प्रमेयाचा प्रवेश होत नसल्यामुळें, व प्रमाणांचें प्रमा हें निराळें फळ उपलब्ध होत असल्यामुळें प्रमे नंतर त्याच प्रमे विषयीं प्रमाणांचा आरंभ अनुभवास येत नाहीं. ह्मणून प्रमाण व प्रमेयाचा परस्पर अन्योन्याश्रय नाहीं. तर परतोग्राह्य प्रमा ज्ञान ह्मणजे, ज्ञानाचे साधनाहून भिन्न अशा दुसऱ्याकडून ते ग्रहण करविले जाणारें. हें नैय्यायिकाचें मत आहे; व स्वत: प्रमा ज्ञान ह्मणजे ज्ञानाचे साधनानेंच ज्याचें ग्रहण होतें तें. हे भाट्टादिकांचे मत आहे. या प्रमाणें दुसऱ्या शब्दाचा विपरीत व शास्त्रीय अर्थ झाला.

३ सन्निकर्ष ह्मणजे सन्निधि किंवा समीपता, हाही अर्थ विपरीत आहे. कारण घटत्वादि जाती विषयीं इंद्रियांचा लौकिक सामान्य सन्निकर्ष आहे; व तो त्रिभुवनांतील सामान्याला अनुमाना वांचून एकदम प्रत्यक्ष करितो. प्रमाणासाठींच त्याचा प्राचीन व अर्वाचीन नैयायिक स्वीकार करितात. व्याप्तीच्यानंतर होते असें जें अनुमानाचें लक्षण, तें यांत सांपडत नाही. कारण सामान्याची व्याप्ती दृष्टांत सिद्धांतरूप नसून एकसारखी आहे, पण तीं अनेक समवेत ह्मणजे अनेक पदार्थाचे ठिकाणीं समवाय संबधानें राहात असल्यामुळें विभुरूप नाही;ह्मणून सन्निकर्ष ह्मणजे सन्निधि किंवा समीपता नसून नैयायिकांनीं मानलेला परिभाषिक विशेष संबंध आहे. याप्रमाणें तिसऱ्या शद्बाचें विपरीत व शास्त्रीय अर्थ झाले.

४ दृष्टिसृष्टिवाद ह्मणजे संकल्प तीव्रपणा. मी या मताचा असल्यामुळें, माझ्या ग्रंथांत व बोलण्यांत या मताची रेलचेल आढळते. व माझ्याशीं ज्यांची ज्यांची भेट झाली त्याचेंही तोंडात हा शद्ब वराच वेळ येतो; पण त्याचा अर्थ असा समजला जातो कीं, ज्यापदार्थाची भावना करावी तसा तो उत्पन्न होतो. हा समज वेदांत ग्रंथांचीं भाषांतरें करणाऱ्यांचा देखील झाला आहे. उदाहरणार्थ योग वासिष्ठाचे

दोन प्रसिद्ध भाषांतरकार. त्यांनीं आपल्या भाषांतरांत प्रत्यक्ष असें ह्मटलें आहे कीं, योग वासिष्टांतील दृष्टिसृष्टिवाद आता युरोपमध्येंही वाढत चालला आहे; कारण Berkeley ( बार्क्ले ) वगैरेचा Idealism (आयडिआलिझम ) अशाच प्रकारचा आहे. योगवासिष्ठाच्या भाषांतर कर्त्यांच्या लक्षांत हे आलें नाहीं कीं, बार्क्लेचा Berkeley (आयडिआलिझम) dualistic द्वैती आहे; Fichte [फिष्टे] चा Idealism आयडिआलिझम pantheist अद्वैती आहे व आमचा दृष्टिसृष्टिवाद तसा नाहीं. शिवाय idealistic आयडिआस्टिक लोकांचा असा समज आहे कीं, पदार्थ मूळींच नसून, पदार्थाच्या आकाराच्या नुसत्या Ideas कल्पना मात्र आहेत. पण दृष्टिसृष्टिवादांत पदार्थ वृत्यनुसार उत्पन्न होत असून, वृत्ति व पदार्थ दोन निराळे आहेत; तरी ध्यानापासून होणाऱ्या तीव्रभावनेपासून झाले नसून, भ्रमापासून झालेल्या तीव्रभावनेपासून, ते उत्पन्न झाले आहेत. ह्मणजे पदार्थ हा भावना तीव्रतेचा परिणाम नसून भ्रम तीव्रतेचा परिणाम आहे. असा त्याचा अर्थ समजावा. पदार्थ हा भावना तीव्रतेचा परिणाम दृष्टिसृष्टि वादांत मानला असता तर स्त्रियांचे योनीचे ठिकाणीं यज्ञकुंडरूपानें केलेल्या शास्त्रीय भावनेचाही तीव्रसंवेगानें प्रत्यक्ष परिणाम झाला असता; पण तसा तो होत नाहीं; तर त्या पासून उत्पन्न झालेल्या कर्मानें फल विशेष मात्र होतो. त्या वादांत मनोमात्र जगत् ह्मणण्याचा अर्थ असा आहे कीं, जगत् हें ज्ञानानें निवृत्त होतें व अंत:करणानें सोडतां येतें. भ्रमाचा स्वभावच असा आहे कीं, तो अंत:करणानें सोडता येतो, पण अंत:करणानें उत्पन्न करितां येत नाहीं. ह्मणजे दोरीवर भासलेला सर्प अंत:करणानें निरीक्षण करून मिथ्या ठरवितां येतो; पण एकदां निवृत्त झाल्यावर, पुन: भ्रम झाल्याशिवाय, उत्पन्न करितां येत नाहीं. ह्मणून तो भावनाजन्य नसून, भ्रमजन्य आहे; व मनानें सोडतां येतो, ह्मणून मनोमात्रही आहे; त्या वादांत दिला आहे तो स्वप्न दृष्टांत देखील, ध्यानजन्य भावना तीव्रत्व सांगत नसून, प्रबलनिद्रादोषजन्यभ्रमतीव्रत्व सांगतो. हा दृष्टिसृष्टि वादाचा सर्व ग्रंथांत सांगितलेला शास्त्रीय अर्थ आहे. पण हल्लीं अर्धवट वेदान्तीं करितात तसा अर्थ केल्यास कोणती-

ही वस्तु वासना तीव्र करण्यानें जर आपल्यास मिळते तर संसाराचीच वासना तीव्र करण्यास काय हरकत आहे ? असा एक अनिवार्य आक्षेप या बिचाऱ्या निरपराधी दृष्टिसृष्टि वादावर येऊन, वैराग्य सांगण्याऱ्या त्या वादाचें फळ दृढ संस्कारप्राप्ती करून देणें हें होऊं पाहतें. अशा भाषांतरकाराच्या चुकीनें युरोपियन लोकांनीं जें Idealism ( आयडियालिझम ) चें खंडण केलें, त्यांतच हिंदुस्थानांत कधीं न येऊन वाऱ्याच्या वरातीवर भरवंसा ठेऊन, दृष्टिसृष्टिवादावर हात फिरविण्याचे धाडस करण्यात आलें. या माझ्या ह्मणण्याची सत्यता पटण्याकरितां, हीगेल वगैरेंचे ग्रंथ पाहावे.

(५) ज्ञातसत्व ह्मणजे विज्ञानवाद हाही शब्द दृष्टिसृष्टिवादाशीं संबंध ठेवतो; पण त्याचा अर्थ पदार्थ व ज्ञान एक स्वरूप आहेत; असा नसून, 'ज्ञान समकालीन पदार्थ आहेत' असा शास्त्रीय महात्मे अर्थ करितात. त्याच प्रमाणें साक्षिभास्य शब्दाचा अर्थही बोलण्यामध्यें सध्यां विपरीत होत असतो. साक्षिभास्य ह्मणजे, 'प्रमात्याला कळणारें' किंवा 'अहंकाराला कळणारें,' असाच लोक अर्थ करितात; पण 'साक्षिभास्या'चा अर्थ 'प्रमाण सामुग्री रहित' असा आहे व 'प्रमाता' शब्दाचा अर्थ 'प्रमेयाला सत्यत्वानें ग्रहण करणारा' असा आहे. साक्षि हा प्रमेयाला सत्यत्वानें किंवा असत्यत्वानें ग्रहण करीत नाहीं; तर उपेक्षत्वानें भासवीत असतो. आतां सत्यत्वानें ग्रहण करणें याचा अर्थही 'हा पदार्थ सत्य आहे असें प्रतिपादन करणें' नसून, 'पदार्थाची स्थिरता मनांत घेणें' असा आहे.

(६) 'सर्वज्ञता' ह्मणजे 'ईश्वर ज्ञानांत त्रिपुटीचा अभाव' या विषयीं माझें उमरावतीच्या पुष्कळ वकीलांशीं भाषण झालें होतें व तेथें हरिभाऊ केवले, कान्तोपन्त, जोशी वगैरे मंडळी हजर होती. या संबंधांत आपल्या मंडळीशींही कांहीं भाषण झालें होतें. कित्येकांचें तर ह्मणणें असें आहे कीं, ईश्वराचे सर्वज्ञतेमध्यें कोणीच शास्त्रकार त्रिपुटी मानीत नाहींत. सर्वज्ञान तादात्म्यरूपानें होतें, असें ह्मणणाऱ्याविषयीं मला खेदयुक्त संशय वाटतो कीं, बिचाऱ्यानें वेदान्ताचा एकही ग्रंथ वाचला नसावा ? कारण लहानशा तत्वबो-

धापासून तर भेदधि:कारापर्यंत कोणताही ग्रंथ वाचला तरी, हें स्पष्ट आढळतें कीं, ईश्वराचें सर्वज्ञत्व ब्रह्माविषयीं नसून जगाविषयीं आहे. सर्वज्ञत्व देखील वाच्यांश असल्यामुळें, ब्रह्माचे ठिकाणीं त्याची जहती लक्षणा होते. तेव्हां जीवाला बरोबर कर्म फळ देतां यावें ह्मणूनच ईश्वर सर्वज्ञ मानला आहे. तें त्याचें ज्ञान त्रिपुटीरूप नसून तादात्म्य-रूप जर असेल, तर अमुक जीवाला नरक देतो याच्या ऐवजीं मीच नरक भोगतों असा अनुभव त्याला येईल. इदमाकार वृत्तीवांचून व त्रिपुटीवांचून कर्म फळ दातृत्व नाहीं. आतां अंशानें ईश्वरावर अव्यापकत्व दोष येतो, असें कोणी हास्यास्पद आक्षेप घेतात; पण ईश्वर अहंकाराला प्रमाता किंवा साक्षि मानलें नसून, ज्ञाता मानलें आहे. ह्मणून त्याचेवर अव्यापकत्व दोष येत नसून त्रिपुटीही कायम राहते. या विषयीं पुष्कळ रहस्य विचार मी संप्रदाय सुरतरूंत करीन व तेथें ग्रंथातून वाक्यही देईन. परंतु माझ्याशीं बोलणाऱ्यांनां व आपल्या मनानें ग्रंथ वाचून विचार कर-णाऱ्यांनां, मी अशी विनंति करितों कीं, शब्दाचा फलत: तात्पर्यत: आणि शक्तित: अर्थ, कोशांतून किंवा माझ्या ग्रंथांतून समजून घेऊन, नंतर माझ्याशीं चर्चा करावी. नाहींतर मला आपले मूर्ख समजून सोडून द्यावें. कारण मी गरीब व शूद्रप्राय जाति आहे. मला धातु, व्याकरण वगैरे येत नाहीं हे मी मुक्तकंठ सांगतों, व सर्वांस ठाऊकही आहे. तरी निराग्रह पंडिताशीं एक एक पदाचा अर्थ घेऊन मराठीमध्यें पतंजलि महाभाष्याचा अर्थही सांगूं शकेन असा गर्वही केव्हां केव्हां माझे ठिकाणीं उत्पन्न होत असला, तर तो उपेक्ष्य आहे. असा वादच करणें असल्यास लेखी करावा. तोंडी नको. या प्रमाणें या लघुसूच-नेला मान देऊन तर्कसंग्रहासारख्या सोप्या ग्रंथांतून तरी शब्दार्थ सम-जून, पुढें पाठविलेल्या प्रश्नांचा विचार करावा. आतां प्रकृत अनुसरण करितो.

## न्यायसंबंधी प्रश्न.

(१) नित्य द्रव्याचे गुण नित्य आहेत, आणि कार्य द्रव्य प्रथ-मक्षणीं निर्गुण उत्पन्न होत असतें, असा न्यायाचा सिद्धान्त आहे;

तेव्हां या सिद्धान्ताचा समन्वय कसा ? कार्य द्रव्य जर प्रथम निर्गुण उत्पन्न होत असतें, तर त्याच्या नित्यपरमाणूंतील नित्यगुणांचा ध्वंस होतो काय ? नित्यगुण जर कार्य अनुगत मानले तर कार्य द्रव्य प्रथमक्षणीं निर्गुण कसें ?

(२) द्वित्रादि संख्या सर्वत्र अनित्य आहेत, तर नित्य नव द्रव्यावर असणारी नवत्व संख्या नित्य कशी, संख्येला अनित्य मानल्यास, नव द्रव्याची पृथक् सिद्धि कशी ?

(३) गुण हा द्रव्यावर राहूं शकतो; संख्या हा गुण आहे; तेव्हां " द्रव्यगुणपदार्थसामान्यविशेषसमवाया भावा: सप्त पदार्थाः " या वाक्यांत सप्तमत्व संख्या अभावावर राहिली कशी ? आतां गुण द्रव्यावर राहतो या ह्मणण्याचा अर्थ असा आहे कीं, गुणाच्या अत्यंताभावाचें अधिकरण द्रव्य नसतें असें कोणी ह्मणेल तर अत्यंताभावावरही द्वितीयत्व किंवा चतुर्थत्व संख्या आहेच. याप्रमाणें प्राचीन न्यायमतावर तीन प्रश्न सांगितले. आतां नवीन न्यायमतावर एक प्रश्न सांगतों.

दीधितिकाराचे नवीन न्यायमत होय यांत" आकाशदिक्काला-ईश्वरान्नातिरिच्यंते"। असें ह्मटलें आहे. व अनेक हेतु देऊन तें सिद्ध केलें आहे; पण दिशा व काल ईश्वराहून पृथक् न मानल्यास, दिक्कृत व कालकृत या दोन्ही परत्वापरत्वाची सिद्धि नुसत्या ईश्वराच्यानें होत नाहीं याची वाट काय?

या प्रमाणें हे न्यायावर प्रश्न आहेत. त्यांचें उत्तरही निष्कर्षतः न्यायांत आहे पण आपणही याचा बुद्ध्यनुसार विचार करावा. (*Socratis method*) साक्रेटिसच्या रीतीचा अंगिकार करून आपणाला थोडी अशा विचाराची संवय लावावी ही इच्छा आहे; पण एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं मी आपल्या ग्रंथांत एखाद्या शास्त्राचें खंडण केल्याशिवाय, माझ्या सहज बोलण्यात आलेल्या शास्त्रावरील आक्षेपांनें, कोणत्याही शास्त्राविषयीं उगीच अनादर करून घेऊं नये. वादीची हुर्यो उडविण्या विषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं; पण केव्हां केव्हां असें होतें कीं माझ्या सहज बोलण्यांतील आक्षेपाला उत्तर नाहीं असें

समजून त्या शास्त्राविषयीं अनादर होतो या विषयीं मी एक उदाहरण देतों. आकाश, काल, दिशा व आत्मा हे चार पदार्थ विभु होऊं शकत नाहीं. हा मी आजपर्यंत न्यायावर आक्षेप आणीत होतों व जीवात्मा विभु असून प्रति शरीर भिन्न कसा हाही आक्षेप आणीत असतों. त्याला न्याय शास्त्रांत मुळींच उत्तर नाहीं असा माझ्या मंडळीचा तरी निदान समज झाला आहे. बहुत काय, पण क्रोडपत्र संग्रहांत देखील या प्रश्नाचें उत्तर निघूं नये याचें मोठे आश्चर्य आहे. यावरून पंडितांची निरनुभव प्रवृत्ति व्यक्त होते. पण खरोखर पाहिलें असतां या प्रश्नाचे उत्तराकरितां दीधितिसारख्या न्याय ग्रंथांत बुडी मारावी लागत नसून तर्कसंग्रह किंवा मुक्तावलीसारख्या कुंभानेंच उत्तररूपी तृषा शांत होते. चारही पदार्थ विभु कसे या विषयीं उत्तर असें आहे. साधारण तर्कसंग्रह ज्यानें वाचला त्याला पदार्थ सात असून, त्यांत विशेष एक पदार्थ आहे, हें ठाऊक आहे. तो विशेष नित्य द्रव्यावर राहणारा असून, सामान्य रहित आहे. व्यक्तीचे ठिकाणीं जशी व्यक्तित्व जाति आहे, तशी विशेषाचे ठिकाणीं विशेषत्व जाति नाहीं तर तो विशेषच स्वतः व्यावर्तक आहे. त्याचे ठिकाणीं विशेषत्व जाति मानल्यास व्यक्तित्व येईल. आतां हा विशेष मानला कशा करितां? तर वर सांगितलेलें चार पदार्थ हे अति संकर आहेत, ह्मणून त्यांच्या व्यावृत्ति करितां हा विशेष आहे. हा विशेष नसता तर त्यांच्या विभुत्व संस्कारामुळें काल शब्दाचा अर्थ आकाश किंवा आत्मा देखील आपल्याला करतां आला असता. विशेष, नित्य असल्यामुळें, व नित्य द्रव्य वृत्ति असल्यामुळें, चारही विभु पदार्थाला निराळा करणारा असा आहे; व त्या निराळेपणामध्यें देशाची अपेक्षा नाहीं. कारण जेथें जेथें निराळेपणा आहे तेथें तेथें देश असला पाहिजेच असा नियम, मूर्त द्रव्यास लागू आहे; अमूर्त द्रव्यास लागूं नाहीं. नाहीं तर जाति व्यक्तीचें ज्ञान पृथक् होत असून त्यांच्यामध्यें देश मानावा लागेल. किंवा एकाच घटावर गुणत्व जाति, रूपत्व जाति, द्रव्यत्व जाति, व घटत्व जाति हे चार सामान्य राहतात; व सामान्याचे लक्षण तर व्यापक असणें असें आहेच; पण एके ठिकाणीं राहणाऱ्या चारही सामान्याला वेग्या-

शिवाय कोणी एकही ह्मणत नाहीं, व फटही दाखवीत नाहीं. आतां कोणी असें ह्मणेल कीं, हे तुमचें उत्तर आम्हांला पटत नाहीं, तर त्याला मी असें ह्मणतों कीं, याचें न्यायांत व तेंही तर्कसंग्रहासारख्या लहानशा ग्रंथांत उत्तर आहे असें मी ह्मणत होतों; व तें मी दाखविलें आहे. मीही प्रश्न करतांनां न्याय दृष्टीनेंच आज पर्यंत उत्तर मागत होतों. वेदान्त दृष्टीनें मागत नव्हतों. बहुत काय सांगावें, हा विशेष मानल्यामुळेंच कणादाला आपल्या शास्त्रास वैशेषिक नांव द्यावें लागलें. दुसरा न्यायांत व त्याच्यांत कांहीं भेद नाहीं. मीच न्यायासंबंधी प्रश्न विचारला व मीच न्यायशास्त्राला धरून त्याचें उत्तरही दिलें. हें दिलेलें उत्तर कोणाला पटत नसेल तर त्यानें विशेष खंडनपर खुशाल एक ग्रंथ लिहावा. परंतु तो लिहिण्यापूर्वी विशेषनिरुक्ति ग्रंथाचें मात्र अवलोकन करावें. नाहीं तर सगळी थट्टाच होईल. मी लहान ग्रंथानुसार उत्तर दिल्यामुळें निरुक्तींतील मोठ्या युक्ति लिहिल्या नाहींत. तात्पर्य आजपर्यंत कठीण वाटलेल्या प्रश्नाचें उत्तर कसें थोड-क्यांत मिळालें. पण ग्रंथांत, किंवा विनोदरहित ज्या शास्त्रावर मी आक्षेप काढतों, त्याचें मात्र त्या शास्त्रांत उत्तर नसतें हे मी शपथेवर सांगतों. इतकें लिहून बराच लांबलेला लेख श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणीं समर्पण करितों.

वि० सूचना—हर्द्याला असतांना सोहागपूरचा एक नैयायिक आला होता. त्याच्याशीं माझा वाद व्हावा, अशी तेथील मंडळींनीं पुष्कळ खटपट केली; पण लेखी वाद करण्याला मी तयार आहे बोलण्याचा वाद करण्याला तयार नाहीं असें मी तीन कारणामुळें उत्तर दिलें. पहिलें कात्यायनी व्रतांत वेळ नव्हता. दुसरें कारण तो म्हणाला, "मला प्रश्नच करावा मी त्याचें उत्तर देईन. मी मात्र प्रश्न करणार नाहीं" व तिसरें कारण मला व्याकरण ह्मणजे कौमुदी येत नाहीं हें. तथापि पंडित, बापु वगैरे मंडळी या चार विभूविषयीं प्रश्न विचारण्यास त्यांच्याकडे गेली होती. या विभुच्या प्रश्नावर त्यांनीं यांचा निष्क्रिय संबंध आहे, असें उत्तर दिलें. पण निष्क्रिय संबंध पडला मीमांसकाचा; मी उत्तर मागितलें होतें न्यायांतून; आणि

न्यायशास्त्रांतच उत्तर देण्याविषयीं तो आग्रह करीत होता, पण लेखी वाद करण्यास तो तयार नाहीं. या घोळा घोळींत बापुचें काम स्पृहणीय झालें. असो तो भेदधिकारापर्यंत वेदान्त ग्रंथ वाचले असें ह्मणत होता पण विभुचतुष्टयाच्या प्रश्नाचें तर्कसंग्रहासारख्या लहानशा ग्रंथानें होणारें समाधान मीमांसकाच्या निष्क्रिय संबंधाचा आश्रय करून करण्याची बुद्धि झाली पण निष्क्रिय संबंधाचें न्यायानेंच उलटें उत्तम खंडन केलें आहे. आणि तें इतकें उत्तम आहे कीं पुन: त्या निष्क्रिय संबंधाचें मंडन आजपर्यंत कोणा मीमांसकाच्यानें झालेंच नाहीं. आतां कौमुदीच्या भीतीनें मी जें त्यांच्या पुढें गेलों नाहीं याचा दोष मी विनोदानें अण्णासाहेबावर देतों. मी आपल्यावर घेत नाहीं.. त्या नैयायिकानें विभुचें लक्षण ह्मणून एक परिष्कार दिला होता. तो मजजवळ लिहिलेला आहे. तो अगदीं निरर्थक आहे.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| हरदा,<br>तारीख २०।१।१९१३. | आपला,<br>**गुलाबराव.** |

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर १९.

ती. स्व. रा. रा. अण्णासाहेब मुळे वगैरे मंडळीस सा. न. मी काला करित असतों तेव्हां सर्वांनीं पाय धुवून काला घ्यावा, तढवावर वगैरे खावूं नये असा मी निर्बंध करीत असतों, त्याबद्दल येथील वारकरी टीका करितात; पण तिला भीक न घालतां मी व माझ्या मंडळीनें असाच काला चालूं ठेवावा. जरी वर्णसंशय असला तरी फुकट जाति मोडण्याकडे माझी प्रवृत्ति नाहीं. शिवाय श्रीकृष्णानें जें

सर्वांबरोबर एकत्र भोजन केलें, त्यांत तरी माहार चांभार होते असा कोठें उल्लेख नाहीं. तर सर्व गौळीच होते. पुन: तेही पोर होते त्यांत मोठा कोणी नव्हता आणखी तेही सर्व गोपाळ पूर्ण होते. तात्पर्य जातित: वयत: आणि शास्त्रत: ज्यानां निर्बंध नाहीं, अशांचे उदाहरण घेऊन, तेली तांबोळी माळी वगैरेंनीं एकत्र बसून उष्टा काला घेऊन एकाचा उष्टा हात दुसऱ्याच्या तोंडांत घालणें, हा गोपाळकाला नसून संकर आहे, असें मला वाटतें.

(२) दुसरी गोष्ट अशी; आपल्या आपल्या धर्मांनें सर्व तरून जावोत। परंतु एखादीच्या पतीनें तिला जास्त दागीनें घातले ह्मणून आपला दरिद्री पति सोडून दागिन्याकरितां तिच्या पतीकडे जाणें हें कांहीं पतिव्रतेला शोभत नाहीं. त्याप्रमाणें धर्माच्या घमेंडीवर श्रीकृष्णाच्या प्रसादाचा अनादर करणाऱ्यांनां अनुमोदन देणें हे माझ्या सांप्रदायिकांनां शोभत नाहीं. अशी गोष्ट कात्यायनींत घडून आली, व तिला कित्येकानीं अनुमोदनहि दिलें. अमुक मनुष्य चांगला आहे, अशी प्रशंसा एखादा मनुष्य सहज करूं शकतो पण त्याची गोम माझ्या मतानें कोठें असते, हें मलाच ठाऊक असते. 'गुरु संप्रदाय धर्म। तेचि जयाचे वर्णाश्रम।' असें आमच्या ज्ञानेश्वर महाराजानी ह्मटलें आहे आतां जरी त्यापासून कोणाच्या दृष्टीनें आह्माला नरक होईल तर 'मन: प्रीतिकर: स्वर्गो नरकस्तद्विपर्यय:' हें विष्णुपुराणवचन आमच्या जवळ आहेच व दुसऱ्या जवळही आहे. प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे. मी कोणाचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची इच्छा करीत नाहीं व माझेंहि स्वातंत्र्य हिरावून घेऊन, संबंध जुळवून आणण्याची इच्छा, कोणी करूं नये, बरें झालें कीं, मी कोणाचे तोंडांत काला कोंबत नाहीं. कळावें.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु।

| | | |
|---|---|---|
| हरदा, | } | आपला, |
| २०।३।१९१३. | } | गुलाबराव. |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २०.

तीर्थस्वरूप आण्णासाहेब यांचे चरणी साष्टांग प्रणिपात वि. वि. आपले आलेलें कृपापत्र मला हर्दाला पोहचलें तें मी पुष्कळ वेळ वाचले पण उत्तर पाठविण्यास कांहीं मन होईना. शेवटी आपण मला खोटा समजाल म्हणून उत्तर पाठवितों. पत्राचा अर्थ मला कांहीं समजलाच नाहीं. व त्यांतील धांवही अशक्य वाटली. वेदान्त सर्व मुखी झालाच आहे पण धर्माचें ज्ञान सर्वतोमुखी करून द्यावे, अशा अर्थाचें एक वाक्य पत्रांत आहे. पण त्याचा अर्थ काय ? " वेदान्त बहुधा उपेक्ष्य आहे. मोक्षाची सध्यां कांहीं अपेक्षा नाहीं. " असा आहे काय ? तो सर्वतो मुखीं झाला आहे, असे ह्मणण्यांत तर कांहीं अर्थच नाहीं. कारण वेदान्ताचा यथार्थ विचार करणारे अत्यंत थोडे आहेत. आणि जे आहेत त्यामध्येंही अनेक दोष आहेत. त्यांचें थोडक्यांत उद्घाटन करितों.

(१) प्रथम तर वेदान्ताचा विचार शिष्यवर्गांत मनोरंजनाकरितांच होतो व गुरु ह्मणविणाऱ्या वर्गांत पोटाकरितां होतो. असे विचार करणाऱ्यामध्यें कोणत्याच गोष्टीसंबंधानें खरी कळकळ नसते. या विचारांत गुरुची थोडीशी क्रूर वृत्ति शिष्याला खपत नाहीं व शिष्याची थोडी कार्पण्यवृत्ति गुरूस खपत नाहीं. सर्व व्यापक परमेश्वर कोठे ? व मनोरंजनाकरितां व पोटाकरितां वेदांत ऐकणें व सांगणें कोठें ?

(२) दुसरा वेदान्ती ह्मणविणारा वर्ग आपल्याला यथेष्टाचरण करितां यावें अशा करितां असतो. आणि त्यांचे वेदान्तिक अनुमानाचे परिष्कार सुद्धां या प्रमाणें असतात. " माता भोग्या स्त्रीत्वात् गणिकादिवत् " " भोक्ता निर्मल: आत्मत्वात् ब्रह्मवत् " अशा प्रमाणें ज्यांची अनुमानें असतात त्यांचे यथेष्टाचरण कोठें ? आणि अनादि संसारांत

अनंत जन्मीं रागद्वेषमूलक झालेल्या वासनासंचयाचा एकदम परित्याग करून शांतिसुखांत निमग्न होणाऱ्यांचा मोक्षानुभव कोठें ?

(३) तिसरा वर्ग जाति मोडण्याकरितां वेदान्ताचा आश्रय करीत असतो. सर्वच जर आत्मा आहे तर ब्राह्मणादिक जाति कोठल्या ? पण एकाचा थुंका दुसऱ्यास खाण्यास काय हरकत आहे ? असें म्हणण्यासारखेंच हें म्हणणें आहे. ब्राम्हण ! कशाचे ब्राम्हण ? आम्ही ब्रह्म जाणतों तर आम्हीं ब्राम्हण, असें ह्मणण्याची प्रवृत्ति वारकरी प्रभृति लोकामध्यें सुद्धां पुष्कळ आढळते. जेवणाकरितां व लग्नाकरितां एकंकार करणारे हे लोक भलतेंच बोलतात. देहाहंकारानें मी ब्रम्ह जाणतों ह्मणल्यास, तें प्रमाण कसें होतें ? चैतन्य, ब्राह्मणादिकांचे ठिकाणीं व माझे ठिकाणीं, असंग आहे याचे नांव ब्रह्मज्ञान आहे. असंग वस्तु, विक्षेपाला जोडण्याची व मोडण्याची इच्छा करीत नाहीं. या निर्मल ज्ञानापुढें जाति मोडणाऱ्यांच्या ज्ञानाचे हंसू येत नाहीं काय ?

(४) चवथा वर्ग समाजाकरितां वेदान्ताचा आश्रय करणारा असतो. आत्मा सर्व ठिकाणीं एकच आहे मग वेदान्ती लोकांनीं आपल्याच मोक्षाची आवड कां धरावी ? लोकांचेही कांहीं कल्याण करावे. असें या लोकांस वाटत असतें. पण लोक ह्मणजे यांच्या मतें विशिष्ट व्यक्तीनें बनलेला समाज त्याच्या कल्याणाकरितां निरपराधी गरीब प्राण्यांचें मांस खावून देखिल आपल्या आंगांत शक्ति आणावी, असें हे लोक निर्धास्तपणें म्हणत असतात या विषयीं माझ्या म्हणण्याची साक्ष पटण्याकरितां, विवेकानंदांची पत्रें पाहावी. समाज चांगला आहे, नाहीं कोण ह्मणेल पण त्याची मांडवासारखी समदृष्टि आहे वृक्षासारखी नाहीं. मांडव ज्याच्या घरीं पडतो त्याला, किंवा त्याच्या घरीं येणाऱ्या मित्रालाच, त्याची छाया मिळते, पण वृक्षाची छाया सर्वांसच मिळते. पुनः कल्याण करावे इत्यादि कर्तृत्वधर्म ज्याचे ठिकाणीं नाहींत, असा निर्मळ वेदान्तगोचर परमात्मा कोठें ? आणि स्वप्नांतील मृगजलाच्या पाठीं लागणारा काल्पित समाज कोठें ? वेदान्ती लोक आळशी असतात असे सामाजिकांनां सहज म्हणतां येतें. ह्मणून

सामाजिक लोक उतावीळ, क्रूर व अविचारी असतात असे वेदान्ती यांना म्हणतां येत नाहीं, असें थोडेंच आहे ? हें असो. या प्रमाणें साधारण लोकांतील वेदान्ताची स्थिति आहे.

आतां असाधारण लोकाचे दोन वर्ग आहेत. १ नूतन शिक्षित व २ प्राचीन शिक्षित; पैकीं—

पहिल्या वर्गाची मजा कांहीं विलक्षण आहे. इंग्रजी ग्रंथांचा व वेदान्ताचा तंतोतंत मेळ घालावा, ही त्यांची अत्यंत इच्छा या लोकांनीं गुरु जवळून ज्ञान घेतलें नसल्यामुळें यांनां वेदान्ताची उत्तम माहिती नसते. किंबहुना या लोकांना गुरूची अवश्यकताच वाटत नाहीं म्हणून यांच्या साऱ्या दिवसाचा विचार दुसऱ्या दिवशीं झोपेंत विसरून जातो. साहेबानीं दिलेली पदवी जितके दिवस मनांत राहते, त्याच्या सहस्रांश वेळ देखील वेदान्त ज्ञान यांच्या मनांत ठसत नसतें. या लोकांचा संस्कृत आंग्लविद्येचा समन्वयही विचित्र असतो. ( J. C. Bose ) जे. सी. बोस नीं ( Physiological response ) फिजिऑलॉजिकल रेस्पॉन्स जड पदार्थांत शोधून काढला. आणि तेवढ्यावरून ऋषींनीं शोधलेल्या ब्रह्माची मला कल्पना आली असें ह्मणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. Response नें काय सिद्ध केलें, तर जडाला देखील सुखदुःख होतात हें आणि वेदान्ताचें ब्रह्म कसे आहे ? तर सुखदुःख विवर्जित. आजपर्यंत ब्रम्हाच्या सुखदुःखराहित्यास दृष्टान्त देण्याला दगड राहिला होता तोही Response पुस्तकानें नाहींसा केला. ही स्वतंत्र शोधकाची गोष्ट झाली. परतंत्र शोधक तर ( Ionic theory) आयोनिक थिअरी ह्मणजेच ब्रह्म ह्मणावयाला लागले आहेत. जगाचें अपूर्ण स्वरूप आता पूर्णत्वास जाऊन पोह्चणार असें ( Electron theory ) इलेक्ट्रन थिअरी वरून अनुमान काढू लागले आहेत सर्वदा जगद्रूप परिणाम पावून नित्य आपला जीव धोक्यांत घालणारें हें Elctron ब्रह्म कोठें ? आणि ज्याचे ठिकाणीं अणू पासून ब्रह्मांडा पर्यंत सर्व कल्पित असून, जें त्याहून अलिप्त आहे असें वेदान्ताचें परब्रह्म कोठें ? ही सायन्स ( Science ) शिकणाऱ्यांची गोष्ट झाली. आतां ( Philosophy ) शिकणाऱ्याचा समन्वय याहूनहि

विलक्षण आहे. ( Spencer ) स्पेन्सरचें ( Unknowable ) ह्मणजे सत्. पण Spencer चें Unknowablo जसें दुःखमय जगद्रूप होत असतें तसें वेदान्ताचे सत् होत नाहीं हा जो वेदान्ताचा समज, त्याला हे समन्वय करणारे विसरतात. आतां वेदान्ताचे ह्मणणें जर यानां बरोबर वाटत नसलें, तर त्याचें त्यानीं खंडन करावें; पण भलतेच घुसडून मात्र देऊं नये. विषमिश्रित अन्न फेंकून देण्या पेक्षां, तें खाणें अधिक धोक्याचें आहे, हें अधिक लक्षांत ठेविले पाहिजे Idealism ह्मणजे दृष्टिसृष्टिवाद असेंही हाच वर्ग ह्मणतो. पण ( Idealism ) पदार्थ नसून सर्व कल्पनाच आहे असें प्रतिपादन करतो; आणि दृष्टिसृष्टिवाद, Idea व पदार्थ दोन्ही आहेत; व ते अविद्याकल्पित आहे असें ह्मणतो सर्व कल्पना Idia च आहेत असें ह्मणणाऱ्यास मनुष्याचें मन तरी कसें वळेल कारण सर्व कांहीं जर कल्पनाच बनते व त्याची गति जर अव्याहतच आहे, तर मग निरोध करावा कशाचा ? वेदान्ताच्या दृष्टीनें Idealism ह्मणजे सूक्ष्म Matorealism मटेरिऑलिझमच आहे. मोठ्या कष्टानें त्याला सूक्ष्म भूतवाद ह्मणतां येईल. पंचदशींत कामादिक पुरविले पण मनोराज्य नको असें स्पष्ट ह्मटले आहे या Ideaislm ला किंवा भावनावादाला दृष्टिसृष्टि ह्मणणाऱ्याचें मनोराज्य जारापेक्षांही भयंकर वाढलेले असते आणि नास्तिकापेक्षांही एकाद्याची बायको मिळविण्याविषयीं यांनां भयंकर भरंवसा असतो. असा हा पिकदानीप्रमाणे नैतिक दिसणारा Idealism कोठें? व तिन्हीकाळीं बंधन नसल्यामुळें गंभीर आणि निर्विकल्प असा वेदान्ताचा ब्रह्मानंद कोठें ? सर्व भावनामय आहे असें ह्मणून यानाही दुसऱ्या जन्मांत तुह्माला तुमची इष्ट बायको तीव्र भावनेनें मिळालीच पाहिजे, असा सैताना प्रमाणें संसार दृढ करणारा हा भावनावाद कोठें ? आणि जड पदार्थामध्यें परस्पर कार्यकारणभाव नसल्यामुळें जगताचें विशेषरूपानें अधिष्ठान व सामान्य स्वरूपानें आधार, मी आहे; ह्मणून मला कांहींच मिळवायाचे नाहीं; असा वासनात्याग सांगणारा दृष्टिसृष्टिवाद कोठे ? ही नवीन विद्यार्थी वर्गाची स्थिति झाली, आतां नवीन जो गुरुवर्ग आहे या सर्वांचा झोंक इकडेच आहे कीं, हिन्दु-

लोक वेदान्ताचा अभ्यास करण्यास कुच कामाचे आहेत, तर सर्व जें काय वेदान्ताचें कार्य करावयाचें ते, अमेरिकेंतच केलें पाहिजे. अनादि परंपरेनें वेदान्ताचें अध्ययन करून दैवानें गरीबी आल्यामुळें आह्माला सर्व बाबतींत हिरासे करणें हा या गुरुवर्गाचा जखमेवर मीठ लावण्या प्रमाणें, नीचपणा आहे. हा वर्ग विद्यार्थी देशांत असतो तेव्हां यानां गुरुची गरज नसते. पण गुरुदशेंत आल्यावर शिष्यांनां आपल्या ताब्यांत घेण्याकरितां, मोहजाल पसरतो. विहीर दुसरी खांदणें अवश्य आहे. पण अर्धी विहीर भावाजवळून वाटून घेऊन, त्यामध्यें पायखाना करणें जसें नीचपणाचे आहे, त्याप्रमाणें आर्यसमाज व प्रार्थनासमाजापेक्षां या गुरुवर्गाचा नीचपणा अधिक आहे "गरीब लोकापासुन पैसे मिळत नाहीं ह्मणून वेदान्त शिकण्याचीं तुह्माला आवडी नाहीं" इत्यादि शद्व गुरूपदेश नव्हेत तर तापलेल्या विळ्याच्या डागण्या आहेत. याप्रमाणें नूतन शिक्षितवर्गाची स्थिति आहे.

आतां प्राचीन शिक्षित लोकांत तर व्यक्तीलाच वर्ग ह्मणण्याची पाळी येते. यांच्या एकीं प्रश्नाचें उत्तर नसते तो प्रश्न हा कीं "गाणाऱ्याला बेसूर कां आवडत नाहीं आणि वेदान्तियानां विषयोपभ्याप कां आवडतो ? काय वेश्येच्या गाण्या इतकेंही तुमचें मन वेदान्तानें स्थिर होत नाहीं ? प्रारब्ध ह्मणावें, तर तें काय नियमानें तुह्मां वेदान्तियाच्याच पाठीं लागले आहे ? सर्पाच्या प्रत्यक्ष तोंडांत गेलेली मेंडकी देखील सुटण्याचा प्रयत्न करीत असते आणि तुह्मी याच्या उलट पैशाकरितां वेदान्ताच्या Professor चा धंदा करण्याची खटपट करीत असतां? पुनः या लोकांना शब्दाच्या मोठ्या लांबलचक परिष्कारावांचून खरा वेदान्त समजत ही नसतो. "सुख दुःख ज्ञातसत्व असल्यामुळें, प्रातिभासिक आहेत; व त्यांचें उपादान अंतःकरण आहे; तेव्हां व्यावहारिक अदृष्टाचे सुखदुःख प्रातिभासिक फळ कसें ? आणि मग स्वर्ग नरक स्वप्नमय का नाहींत ? आतां दृष्टिसृष्टि वादानें उत्तर दिलें, तर त्यावरही असा प्रश्न करतां येतो कीं, सर्वच जर प्रातिभासिक आहेत, तर अदृष्टाला अज्ञात सत्ता कशी ? जर ते अज्ञात सत् नाहीं, तर मग कर्म करतांनांच फल व्हावें; कालांतर कशाला पाहिजे ?"

या व अनेक प्रश्नांचें उत्तर अद्वैतसिद्धि व चित्सुखीसारख्या परिष्कारानें मिळत नाहीं, तथापि याचें उत्तर वेदान्तांत आहे हे मी शपथेवर सांगतो. वासुदेवानंदासारखे महात्मेच या प्रश्नाच्या उत्तरानें आमची पिपासा दूर करणारे असावेत असें मला वाटतें. त्यांची माझी भेट झाली नाहीं. पण इतर पंडित वर्गाची समजूतही वेदान्ताच्या विरुद्ध असते. कित्येक खुशामतीला भितात म्हणून ईश्वरानें उपदेश केलेलें ज्ञान खरें; मनुष्यानें उपदेश केलेलें ज्ञान खरें नव्हे; असें ह्मणावयाला तयार होतात. पण मनुष्य जर गुरुपणास चढणार नाहीं व सर्वदा ईश्वरच गुरु होईल, तर लक्षणेनें तरी जीवेश्वर ऐक्य कसें होईल ? हें त्यांनां समजत नाहीं. कांहीं पंडितांची अशी समजूत असते कीं, जितका विद्वान् तितका गुरु श्रेष्ठ, पण वेदान्ताची समजूत याच्या उलट आहे, ती अशी कीं, जितका मूर्ख तितका गुरु श्रेष्ठ कारण श्लोकानें अर्ध्या श्लोकानें किंवा श्लोकपादानें ज्याला ज्ञान होतें त्याचें प्रयोजन क्षीण झालें, असें अद्वैतकौस्तुभांत ह्मटलें आहे; आणि जितका कमी शब्दानें बोध होईल तितका उत्तम अधिकारी असा सर्व वेदान्ताचा डिंडिम आहे. तेव्हां गुरुपणा व सर्वज्ञपणा शेपटीं तोंडाप्रमाणें विरोधी आहे. तात्पर्य अशी वेदान्तिक वर्गाची स्थिति आहे.

शेवटचा राहिलेला योगी वर्ग. आंधळे दळते व कुत्रें पीठ खातें तशांतली गोष्ट. गुरु वेडे व शिष्य लालची. गुरूच्या तोंडांतून निघावें आंब्याचें फळ; व शिष्यानें त्याचा अर्थ समजावा माझ्या बायकोला मुलगा होणार ? अशा ठिकाणीं सर्व विश्व चमत्कारमय होऊन जातें. दुष्काळामुळें मांस खाणाऱ्याच्या योगानें होणारा गाईवरील जुलूम कोणत्या योगियानें आपल्या शापानें किंवा वरानें दूर केला आहे ? पण आमच्या अनाथ बायकांनां मूल देण्यामध्यें मात्र सर्व योगी तयार. ज्या योगीगुरुच्या घरीं शिष्याला धन मिळाल्यामुळें, चाळीस चाळीस हजार माणसें जेवीत असतात, त्यांचेच घरीं गरीब भिकाऱ्यांना धक्के खाण्याची पाळी येते; ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आतां यामध्यें कोणीच चांगला नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं कारण माझ्या आंगीं कांहींच दोष नसते तर तसें ह्मटलें देखील असतें पण आपल्या

आंगचा उणेपणाच दुसऱ्याच्या पूर्णपणाचा अनुमापक होत असतो; या न्यायानें श्रेष्ठ महात्मे असलेच पाहिजेत अशी माझी खात्री आहे पण ते आमच्या सारख्यानां रस्त्यावर पडलेले नाहींत.

मनुष्याणांसहस्रेपुकश्चिद्यततिसिद्धये ।
यततामपि सिद्धानांकश्चिन्मांवेत्तितत्वतः ॥

हजारों मनुष्यामध्यें एकादाच आत्मप्राप्तिकारितां प्रयत्न करितो. व त्या अशा प्रयत्न करणाऱ्यामध्यें एकादाच भगवंताच्या खऱ्या स्वरूपाला जाणतो, असें आर्यपुत्र वचन आहे.

अशा स्थितींत वेदान्त सर्वतोमुखी झालाच आहे असें लिहून, त्याची उपेक्षा करणें धाडस होय असें मला वाटतें. या प्रमाणें पत्राचा प्रथम खंड झाला. आतां दुसऱ्या खंडास आरंभ करतो.

केसरीच्या लेखाकडे जशी सर्वांची दृष्टि जाते तशी धर्माच्या लेखाकडे सर्वांची दृष्टि जावी आणि सर्व समाजाचा तुलनात्मक समन्वय व्हावा ही गोष्ट सोपी नाहीं. प्रथम धर्म शब्दाचे अर्थ दोन आहेत. " चोदनालक्षणार्थोधर्मः " अर्थ—वेदाच्या शब्दानें प्रेरणा करणें हे धर्माचें लक्षण आहे. हा पहिला अर्थ. " यतोऽभ्युदयनिश्रेयससिद्धिः सधर्मः " वैशेषिक सूत्र अ० १ पा० १ सू० २

अर्थः—ज्यापासून अभ्युदय व मोक्ष होतो तो धर्म. तेव्हां पहिला अर्थ तर किटकिटीमुळें आपणास सम्मत नसला पाहिजे असें मीच गृहीत धरून त्याचें विवेचन करणें सोडून देतो. दुसराच अर्थ आपणास सम्मत असला पाहिजे; कारण त्यांत अभ्युदय शद्ब आहे. व त्यावरच आपला सर्व जोर असला पाहिजे. पण त्या अभ्युदय शद्बाचा अर्थ इह लोकांतील सुख असा आहे. हा अर्थही व्याकरणाप्रमाणें बरोबरच आहे. पण तें इह लोकांतील सुख वाटेल त्या द्वारानें संपादन केलें, तर मात्र धर्म होत नाहीं; व तसा धर्म सूत्रकारास अभिमतही नाहीं. कारण असा धर्म चार्वाकाला देखील साधतां येतो. अभ्युदय शद्बाचा अर्थ Matereal science भौतिक शास्त्राची वृद्धी आतां कधींही करतां येणार नाहीं. आणि खुशीनें केल्यास धर्माग्रही लोकांनीं न अंगिकार करण्याची त्यांची खुशी आहे. तर या सूत्रांतील अभ्युदय शद्बाचा अर्थ

धर्मद्वारा सुख मिळणें ह्याच आहे. गणिकेचे ठिकाणीं किंवा स्वस्त्रीचे ठिकाणीं व्यभिचारानें पुत्र होणें, याला सूत्रकारानीं 'अभ्युदय' म्हटलें नाहीं. तर 'पुत्रकामेष्टि' यज्ञकरून स्वस्त्रीचे ठिकाणीं स्ववीर्यापासून याच लोकीं पुत्र होणें इत्यादि सुखालाच, सूत्रकारानें अभ्युदय ह्मटलें आहे. किंवा पूर्व जन्मांतील कर्मानें देखील यालोकीं सुख मिळणें यालाही सूत्रकारांनीं अभ्युदय ह्मटलें आहे. अथवा, स्वर्ग देखील मोक्षाच्या दृष्टीनें अभ्युदयच आहे, निश्रेयस नव्हे. ही धर्माच्या लक्षणाविषयीं गोष्ट झाली. शिवाय धर्माची प्रमाणेंही वेद, पंचरात्र, शिवागम, शाक्तागम इत्यादि अनेक आहेत. श्रुतींतल्या श्रुतींत देखील वेदान्ताप्रमाणें समन्वय नसून विकल्प आहे. मग इतर आगमाची गोष्ट निराळीं. शिवांबु कल्पादि तंत्रांत तर मूत्रपान देखील सांगितलें आहे. त्यांचा तुह्मी निषेध केल्यास तुह्मी गोमूत्र कां पितां ? असा तेही तुमचा निषेध करूं शकतात. अशा स्थितींत समाजाची व समजुतीची तुलना ती कशी करावयाची ? पूर्वमीमांसेत देखील धर्म वाक्यांचा समन्वय केल्यावर हजारो विकल्प व अर्थवादासंबंधी वाद उपस्थित आहेत. आणि आपआपल्या अधिकारानुसार ते योग्य आहेत, असें माझें मतही आहे. आतां केसरीचा जो दृष्टान्त दिला तो विषम आहे. कारण लोकांची प्रवृत्ति दोन गोष्टीकडे धांवत असते. प्रत्यक्षाकडे किंवा अपरोक्षाकडे. केसरीचा विषय प्रत्यक्ष आहे म्हणून तिकडे लोकांची धाव जाणें साहजिक आहे. वेदान्ताचा विषय अपरोक्ष आहे, ह्मणून तोही तुमच्या ह्मणण्या प्रमाणें सर्वतोमुखी होण्यास कसें बसें अनुमोदन देतां येईल. पण धर्म परोक्ष श्रद्धामूलक व मध्यस्थ असल्यामुळें, त्या विषयावर फला वांचून केवळ साधन दृष्टीनें समन्वय अभिप्राय देणें, माझ्या सारख्यास दुर्घट आहे. मला असें वाटतें कीं, न्यायांतून Material Science जुनें काढून नवीनही शोध लावावेत. तेवढी शक्ति न्यायांत आहे. न्याय बुद्धि निरुपणावर जो वाढला आहे, तो बुद्धीतर पदार्थ निरुपणाविषयीं वाढविला पाहिजे. व त्या विषयीं आस्तिक नास्तिक एक होऊन मासिक पुस्तकें, वर्तमान पत्रें, काढलीं पाहिजेत आणि ५०।६० वर्षांतच यानें अभ्युदय दृष्टीसही पडेल. Material

Prosperity ही (भौतिक अभ्युदय) वाढविण्यास हा मोठा मार्ग आहे. माझ्या सारख्या आंधळ्या व अर्धवट शिकलेल्याचे विचार जसे होते तसे दर्शविले. पत्रामध्यें शब्द थोडे कडक झाले आहेत ते माझ्या दुष्ट स्वभावास अनुसरून असल्यामुळें किंवा आपणास वाईट वाटेल तर विषयास अनुसरून ह्मणा, लिहिले गेले आहेत. त्या विषयीं हात जोडून क्षमा मागतो. कोणत्याही प्रकारचा द्वेष किंवा उद्देश मनांत धरून मी कडक शब्द वापरले नाहींत. माझ्या धाडसा बद्दल मूळ देवतेसहित क्षमा करतील, अशी आशा आहे. पण कोणतेच काम होत नसेल, तर मग निर्मत्सर बुद्धीनें पूर्वीचेच करावे. त्यांत यश येवो अगर न येवो. पण रिकामें मात्र बसूं नये. असें माझे निश्चित मत आहे. माझी प्रकृति सांभाळून माझ्याच्यानें होईल तेवढे लेखद्वारानें माझ्या मताचे विरुद्ध असले तरी, साह्य करीन. झोपेला समाधि ह्मणून घोरत पडणाऱ्या वेदान्त्यापेक्षां नास्तिकांचें खोटें बोलणें अधिक चांगलें, असें मी निक्षून सांगतों. तर मग आपण तर मूळदेवतेसहित धार्मिक आहांत. असो मला लेंकराला इतकीच विनंती करण्याचा अधिकार आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

हरदा, २८।३।१९१३. | आपला, गुलाबराव.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर २१.

तीर्थस्वरूप आण्णासाहेब यांचे चरणीं चि. गुलाब याचा सा. न. वि. वि. मध्वाचार्यांच्याप्रसंगांत आपले झालेलें बोलणें रा. पाध्ये यानीं सांगितलें. परंतु प्रसंग माझ्या येण्याच्या संशयानें प्रतिबद्ध झाला याबद्दल मला फार वाईट वाटतें. महाराज ह्मणून मला तार केला

असता तर मी कदाचित् आलों नसतों पण शिष्य ह्मणून तार केला असतां तर खात्रीनेंच आलों असतों. कारण व्याकरणांत मी आपला शिष्य आहे हे जगप्रसिद्ध आहे. परंतु वादाचा विषय तप्तमुद्रा सारखा गुळपुळीत घेणें मात्र सोईचें झालें नसतें. कारण कांहीं गोष्टी वादाच्या सोईत पडत नसतात. शिवांबुकल्पतंत्रांत मूत्र प्यावें ह्मणून सांगितलें आहे त्याचा आपण निषेध करितो. पण आपणच गाईच्या मूत्रानें व शेणानें पवित्र कसें होतों हें जर विचारिलें तर खरोखरच सांगतां येणार नाहीं. पण दुसऱ्या रितीनें वाद सोईचा झाला असतां. व तें माझें काम आपणही केलें असतें. मीही केलें असतें, वाद कसा, सोयीचा झाला असता याविषयीं कांहीं प्रश्न आपणाकडे लिहून पाठवितो.

जीवाचा व ईश्वराचा भेद आहे याविषयीं प्रमाण काय? प्रत्यक्ष, अनुमान किंवा शब्द? प्रत्यक्ष संभवत नाहीं, कारण दोघेही अदृश्य आहेत ह्मणून. अहंवृत्तीनें घेऊन जीव प्रत्यक्ष मानल्यास व त्याच्या पासून ईश्वराचा भेद मानल्यास, ईश्वर व्यापक आहे किंवा नाहीं, हा प्रश्न येतो. व्यापक मानल्यास जीव तत्समान आहे कीं त्याच्यापेक्षां स्थूल आहे ? समान दोन पदार्थाची एके ठिकाणीं स्थिति हे… नाहीं. जीवस्थूल मानल्यास अवयवी होऊन अनित्य होतो. शब्द प्रमाण मानल्यास वेद मानावा लागतो. वेद ईश्वर वाक्य आहे ह्मणून प्रमाण मानल्यास, अर्थ करणारी बुद्धि जीवाची असल्यामुळें, ईश्वर शब्दाचा अमुकच अर्थ आहे हें, जीव बुद्धीवरच अवलंबून राहणार. ईश्वराच्या अभिप्रायाला जीव जर यथार्थ जाणील, तर जीव ईश्वर समान झालाच पाहिजे आणि जर जाणणार नाहीं, तर वेद अपौरुषेय आहेत याचाही निश्चय होणार नाहीं. पुनः अग्नीनें थंडी निवारण होते, इत्यादि गोष्टी वेदांत आहेत पण हें ज्ञान परमेश्वराला कसें होऊं शकतें? कारण शीत उष्णाचें ज्ञान मधल्या स्थितींत उत्पन्न होतें कोणत्याही अत्यंत स्थितींत राहत नाहीं. शिवाय स्पर्श हा त्वगिंद्रिय मात्र ग्राह्य आहे. परमेश्वराला भूतजन्यमात्र शरीर नाहीं. ह्मणून थंडीचें व उष्णतेचें ज्ञान परमेश्वराला असणें संभवनीयच नाहीं. तेव्हां हें वाक्य जीव प्रणीत

असलें पाहिजे. परमेश्वर, लीलेनें शरीर धारण करितो ह्मटल्यास देखील शहाण्याचें समाधान होत नाहीं. कारण वस्तुतत्व असें आहे कीं ज्या-गोष्टी करतानां कर्त्याला उदासीन राहतां येतें, त्याच गोष्टीविषयीं लीला करितां येते. ज्यागोष्टीविषयीं कर्त्याला उदासीन राहतां येत नाहीं त्यागोष्टीविषयीं लीला करितां येत नाहीं. या नियमान्वयें जसें मी सुखी दु:खी आहे हें दाखवितां येतें, तसा सुखदु:खाचा अनुभव लीलेनें घेतां येत नाहीं. विकारी असल्या प्रमाणें जसें लीलेनें दाखवितां येतें, तसा विकाराचा अनुभव लीलेनें घेतां येत नाहीं, परतंत्र होऊनच घेतां येतो. ह्मणून कांहीं गोष्टींचें ज्ञान परमेश्वराला नाहीं असें मानणें भाग पडतें. तसें मानलें ह्मणजे तो सर्वज्ञ होत नाहीं आणि सर्वज्ञ न झाल्यामुळें, त्याचें वाक्यही जीववाक्या प्रमाणेंच होतें. ह्मणून शद्व प्रमाणही द्वैताचें ठिकाणीं संभवत नाहीं. आतां अद्वैताचें ठिकाणीं कोणतें प्रमाण संभवतें, असा प्रश्न झाल्यास द्वैताचें ठिकाणीं कोणतेंच प्रमाण संभवत नाहीं. हेंच प्रमाण आहे, असें उत्तर चोपून द्यावें. वेदाविषयीं ज्या मी या पत्रांत कोट्या केल्या आहेत त्यांचे स्वानुपयुक्त मायावृत्ती नियमान्वयें खंडण होतें, व तें मला माहित आहे. विशेष कांहीं लिहित नाहीं कळावें.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| हरदा,<br>तारीख २।४।१९१३. | आपला,<br>**गुलाबराव.** |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २२.

प्रणम्य करुणामूर्तिं मलकापतिवल्लभम् ।
सुहृदर्थे (सुहृत् प्रीत्यै) मनोभावं लेखयेऽहंयथामति ॥

तीर्थस्वरूप अण्णासाहेब यांनां साष्टांग दंडवत विनंति विशेष राजेश्री पाध्ये यांचे पत्रावरून घरासंबंधीं सर्व कांहीं कळले पण घर थंडीचे आहे किंवा नाहीं व चिटनवीसच्या घरास कांच बसविले आहेत किंवा नाहीं हे कांहीं कळले नाहीं. माझ्या करितां दशम ठेवला असल्यास मी आपला अनुग्रहच समजतों. मला येथें थोडेसे काम आहे. तें झालें कीं माझा तिकडे येण्याचा विचार आहे. जीजीबाई-संबंधानें लिहिले होते तर मी इकडे थोडे दिवस आहे तितक्यांत देखील इकडे पाठविण्यास हरकत नाहीं. प्रतिनिधी महाराज द्वारें मूळ-देवतेस कळविल्या जावें कीं एकादा ग्रंथ जरी आपल्याला स्वपद्धतीचा रचावयाचा असला तर तो भाषांतराचें मूळ रूप झाला पाहिजे. मूळाचें भाषांतर नको. कांहीं संस्कृत ग्रंथकारानीं विचित्र चेष्टा केल्या आहेत व त्यामुळें वैशेषिक व जडशास्त्र यांनां कायमचें वैकल्पिकत्व आले आहे. न्यायावर न्याय प्रदीप नांवाचा एक ग्रंथ आहे. यांत न्यायाचे तात्पुरते विषय सर्व आले असून ग्रंथकारानें पाश्चात्य समन्व-याची खटपट केली आहे. ती ग्रंथकाराच्या विद्वत्तेची दर्शक असली तरी महामुनि अक्षपाद व कणाद कीर्तिला उज्ज्वल करणारी नाहीं. स्वत:चे नांव करून घेणें गौण कर्णाला देखील सुलभ आहे. पण तेव-ढ्यानें तो योग्यतेस चढला तरी कुळाचे नांव होत नसते. कुळाच्या नांवा करितां परंपरागत सचोटी दाखवावी लागते. तेव्हांच तें कुल पुढें हजारो पिढींनां सन्मार्ग दाखविणारें होतें. जडशास्त्राचे ग्रंथ हक्स्ले, टिडांल, जेम्स इत्यादिकांचे ग्रंथ पाठ करून एकादा संस्कृत ग्रंथ लिहिला तर त्यांत लिहिणारा गुण ग्राहक व अव्याहत श्रम करणारा आहे असें कोण ह्मणणार नाहीं. पण अखेर ने ठरणार वैश्याचेच काम

सर्व जगत व्यापारी बनविण्याचाच त्याचा उद्देश; परंतु निजभावाची व औदार्याची खूण यांत सांपडावयाची नाहीं. कोणत्याही कुलांत असून स्वत: वर येणें मोक्ष साधक होईल कदाचित्, पण अभ्युदया-करितां कीर्ति दिवाकर परंपरेनेंच मेघानाच्छादित ठेवित आले पाहिजे. आर्य धर्माचें ज्ञान भांडार इतकें चमत्कारिक आहे कीं एका कुत्र्याला दोन शिंगें असून एका शिंगाच्या शेंड्यावर समुद्र होता. हे देखील त्याच्या आधारानें सिद्ध करून देतां येते. तेव्हां जडशास्त्र प्रयत्नानें सांपडणार नाहीं हे ह्मणणें आळशी लोका शिवाय कोणाला शोभेल ? अलीकडे समन्वय शब्द फार बोकाळला असून पतिव्रता व वेश्या एका पंक्तीला बसविण्यापर्यंत त्याला वाचकत्व येऊं लागलें आहे. " एकाधिकरणकभिन्नवृत्तित्वेसतिसंप्रदायविच्छेदरीहतत्वेसीतचपूर्वा-नेकफलोपष्टंभानंतरमेकफलजनकत्वंसमन्वयलक्षणम् " हे त्याचे स्वरुप आतां लुप्त होत चाललेले आहे. सर्व जातीचा एककार करणें याचे नांव जसे अद्वैत रूढ झाले आहे तसे वालाचे, महात्म्याचे, वेश्ये-चे, वेड्याचे वाक्य कोणत्या तरी अर्थानें एकत्र मिळविणें यालाच समन्वय ह्मणणें आतां रूढ झालेले आहे यामुळें कांहीं दिवसानें प्रत्ये-काचे बोलणें शास्त्रच होईल कीं काय असेही मन मांडे खावूं लागले आहे. ही गोष्ट बापूदेव शास्त्रींचे बीज गणीतावरील ग्रंथ वाचल्यास कळून येण्या सारखे आहे. याचा स्पष्ट मासला वर नाम निर्देश केलेल्या न्याय प्रदीपांत आहे तो असा:— परमाणु निरूपण करतांनां न्याय प्रदीप परिच्छेद दुसरा पान ५३ " परमाणौ मानन्तु गवाक्ष-रंध्रेऽर्कप्रकाशे यत्सूक्ष्मं रजोदृश्यते स त्रसरेणु: त्र्यणुकंचोच्यते। तत्त्र्य-णुकं अवयवजन्यम् चाक्षुषद्रव्यत्वात् घटवत् इति द्वयणुके सिद्धे द्वयणुक: अवयवजन्य: महदारंभकत्वात् इति तदवयव: परमाणु: सिध्यति। अनावस्थाभयान्नावयवधारांगिकार: तदनित्यत्वे समवायिकारणं विना-कार्योत्पत्तिप्रसंग: । यदिसूक्ष्मदर्शनयंत्रेण तस्यापि सावयवता संभाव्यते तर्हि यस्ततोपिसूक्ष्म: स एव परमाणुरस्तुलक्तदूषणद्वयभिया तत्परित्याग एवतु कर्तुमशक्य: " भावार्थ:—सूर्याच्या उन्हांत जे बारीक बारीक दिसतात ते त्रसरेणु होत जे घटाप्रमाणें डोळ्यानें दिसण्या जोगे

असल्यामुळें अवयव जन्य आहेत. या प्रमाणें द्व्यणुकाची सिद्धी झाली द्व्यणुकही मोठ्या कार्याचा आरंभक असल्यामुळें अवयव जन्य आहे. या प्रमाणें परमाणूची सिद्धि झाली आहे. परमाणु विषयीं प्रमाण आहे. सूक्ष्मदर्शक यंत्रानें जर त्याला कोणी सावयव ह्मणेल तर त्याही पेक्षां जो सूक्ष्म भाग त्याला आह्मी परमाणु ह्मणतो परंतु विनाकारण कार्याची उत्पत्ति मानणें व अनवस्था हे दोन दोष येऊं नयेत ह्मणून परमाणूचा त्याग आह्मीं करीत नाहीं.

समीक्षा:—वाहवा ! न्यायावर ग्रंथकाराच्या हातून अशा चुक्या व्हाव्या हे मोठें आश्चर्य आहे यांत चार दोष आहेत. पहिला तर कणादाची कीर्ति सकलंक केली आहे. कारण कणादादिकांनां सूक्ष्म दर्शक यंत्र ठाऊक नव्हतं व त्यामुळें त्यांचें परमाणूंचे लक्षण चुकलें आहे असा त्यांच्यावर आरोप येत आहे. दुसरा दोष सिद्ध साधन, कारण परमाणु वगैरे पदार्थांचे सिद्धि करितां योगज अलौकिक प्रत्यक्ष-न्याय मतांत मानलेलें आहे. " अस्मद्विशिष्टानां तु योगिनां युक्तानां योगजधर्मानुगृहीतेन मनसा स्वात्मान्तराकाशदिक्कालपरमाणुवायु-मनस्सु तत्समवेतगुणकर्मसामान्यविशेषेषु समवायेचावितथं स्वरूप-दर्शन मुत्पद्यते (वैशेषिक दर्शन प्रशस्तपाद भाष्य) भावार्थ:—आमच्या पेक्षां वरिष्ठ जे योगी त्यांनां दिशा, काळ, आकाश, वायु, परमाणु, मन व त्याचे बरोबर असणारे गुणकर्म विशेष सामान्य आणि समवाय या संबधाचें खरें प्रत्यक्ष ज्ञान उत्पन्न होतें. सूक्ष्म दर्शन यंत्रानें तर उष्णता व कस्तुर्यादि गंधच दृग्गोचर होत नाहींत. तर मग परमाणु गोचर कसा होईल आणि प्रत्यक्षा पेक्षां कांहीं सूक्ष्म दर्शक यंत्र सूक्ष्म नाहीं. ह्मणून त्याचा आश्रय घेऊन शंका करण्यांत सिद्ध साधन आहे. पुन: रूपवत्वे सति महत्वं बहि: प्रत्यक्षे हेतु: असें नैय्यायिकांचें ह्मणणें आहे परमाणूहून प्रकाश उलटूं शकत नाहीं किंवा परमाणु ह्मणजे जसा तुकडा समजतात तसा तुकडा नव्हे तसें मानल्यास परमाणु पुंजवादी नैय्यायिक आहेत असें ह्मणावें लागेल. परंतु सर्व नैय्यायिकांनीं त्याचें खंडन केलें आहे; ह्मणून त्रसरेणूचा सहावा भाग नाहीं. दुसरा भाग जरी तो विशिष्ट कार्य व्यवच्छिन्न असल्यामुळें सूक्ष्म दर्शक यंत्रानें

देखील चक्षुष प्रत्यक्ष झालाच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं, नाहींतर भाजलेल्या पाषाणाचा जो गंध येतो त्या गंधाचा आश्रय पार्थिव परमाणु कार्य पृथ्वीचें रूप न झाल्यामुळें विषयरूप होणार नाहींत व मग न्याय सिद्धान्ताची हानि होईल. हा न्यायाचा अविवेककारक तृतीय दोष ग्रंथकाराच्या ह्मणण्यांत आहे आणि सूक्ष्म दर्शक यंत्रानें दिसणाऱ्या परमाणुपेक्षां आमचा परमाणु सूक्ष्म आहे असें ह्मटल्यास दुसरा त्याही पेक्षां सूक्ष्म दर्शक यंत्रानें परमाणु दिसूं शकेल तर त्याही पेक्षां आमचा परमाणु सूक्ष्म आहे. अशी अनवस्था मानण्याचा दोष आमच्या ग्रंथ कारावर येतो. याच प्रमाणें रूप निरूपणांत तृतीय परिच्छेदांत "अंग्रेजास्तु नलिपीतरक्ताख्यात्रयएव मुख्या वर्णा अन्ये सर्वेऽपितद्योगजा इत्याहुः" न्यायाचें निरूपण करून ग्रंथकारानें ही या English ) मताचें निरूपण केलें आहे. पण महादेव वृत्ति आदि सांख्य ग्रंथांत रूपत्रयवाद आहे तो ग्रंथकारास माहित नाहीं त्याचा विशेष विचार मी न्याय रत्नाकरांत करीन. ग्रंथकारानें "अंग्रेजास्तु" असें कां ह्मटलें इंग्लिशास्तु असें कां ह्मटले नाहीं हे समजत नाहीं. अन्य भाषा ह्मणून त्या शद्बाचा त्याग केला असेल तर अंग्रेज शद्ब कोणत्या पाणिनीय सूत्रानें सिद्ध झाला आहे ? अंगरं एजति अशी तर एखादी व्युत्पत्ति ग्रंथकारानें लढविली नाहीं ना ? याप्रमाणें शद्ब गुण निरूपण करतानांहि ग्रंथकारानें असेंच ह्मटले आहे. "अंग्रेजास्तु यंत्रेण घटाद्युदराद्वायौ निष्कासिते शद्बो न भवति एवेति शद्बो यावद्द्रव्य भाव्येवेति । वायुरपि न स्वतः क्रियः किंतु शैत्यौष्ण्यवशाद्धाताद्वातत्र क्रियोत्पद्यते इति प्राहुः । भावार्थः—यंत्रानें घटांतून हवा काढून घेतली असतां शद्ब घेत नाहीं ह्मणून तो यावद्द्रव्य भावी आहे. वायु देखिल स्वतश्चलनवान नसून उष्णतेच्या योगानें हलका झाला ह्मणजे इकडे तिकडे फिरतो असें अंग्रेज ह्मणतात. जेथें तर्काचा अंतर्भाव श्रद्धेंत होतो त्याठिकाणीं अभ्युपगमयुगलसामानाधिकरण्य असते. हाच न्याय प्रस्तुतच्या वायूस व शद्बास लागूं असल्यामुळें न्यायाचे निरूपणच विशेष उत्तम आहे हे कणादा पेक्षां मी नाद श्रेष्ट मानणाऱ्या ग्रंथकाराला कसें समजावें. आतां आमचें असें ह्मणणें नाहीं कीं गुणग्राहकतेनें को-

णाचेही गुण घेऊं नयेत परंतु मी अमुकाचे भाषांतर केले आहे असे तरी स्पष्ट ह्मणावें. आर्ष निरूपण करतांनां नवीनांची घालघुसड करूं नये. ग्रंथकारानें अंग्रेजास्तु ह्मटलें आहे पाश्चात्यास्तु असें ह्मटलें नाहीं त्यांत त्यांचा हेतु Germany वगैरेमध्यें कोणी Scientist नाहीं असा असल्यास न कळे. घालायचा होता तर पाश्चात्य शब्द व्याकरणानें सिद्ध होताच. परमाणु व गुरुत्व निरूपण करतांना ग्रंथकारानें असाच घोटाळा केला आहे. ग्रंथकाराच्या वेळेला Mesmerism वगैरे जर निघाले असते तर कदाचित ग्रंथकाराचा योगज प्रत्यक्षावर विश्वास बसून सूक्ष्मदर्शक यंत्राचा उपयोग ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत केला नसता; किंवा Mesmerism निघूनही ग्रंथकारास माहीत नसेल. परंतु सूक्ष्मदर्शक यंत्रानें देखील रोगाचे कीडे पाहतांनां ते रंगवावे लागतात हाही नियम ग्रंथकाराला माहीत नाहीं तो माहीत असता तर अनुद्भूतरूप अशा परमाणूंचे ठिकाणीं सूक्ष्मदर्शक यंत्राचा अंगिकार ग्रंथकारानें केला नसता. तात्पर्य मूळाच्या भाषांतराप्रमाणें आर्षमताला करणें हा जीर्णोद्धार नव्हे या प्रमाणें पत्राचा प्रथम खंड संपला.

द्वितीय खंड—(१) माझ्या न्यायावर एक प्रश्न आहे कीं योगियाला जर परमाणु दिसतात तर ते कणादाला दिसले असलेच पाहिजे. आणि कपील व पतंजलि योगी होते मग त्याना ते दिसून त्यांनीं त्याचा अंगिकार कां केला नाहीं ? वेदान्तीयावर हा प्रश्न येत नाहीं कारण त्यांची माया योगियाला देखील अनिर्वाच्य आहे. योगज प्रत्यक्ष देखील तिचाच धर्म असून शिवाय आवरण प्रत्यक्ष होत नसते. व विक्षेप सर्व प्रत्यक्ष प्रसिद्ध आहेत. सांख्यानें कांहीं पदार्थ नित्यानुमेय मानले आहेत ह्मणून त्यांच्यावरही हा प्रश्न येत नाहीं व योगीयावरही याचमुळें येत नाहीं तेव्हां नैय्यायिकानेंच या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. दुसरें मी ग्रंथ भाषांतरावरून लिहीत असतो असे मागे नगरकराचे ह्मणणें सर्वांस माहीत आहेच. परंतु गदाधराचा ज्ञान शक्तिवाद, भूषणकाराचा योग्यता शक्तिवाद, अष्टविध स्फोटवाद, ईश्वर समवाय स्वरूप योग्यतावाद, तौतातिकमत, वेदांतांतील क्षणसमाधिवाद, भूषणकाराचा समास शक्ति निर्णय वाद, इत्यादि वाद अति विस्तारानें माझ्या

ग्रंथांत आलेले आहेत या विषयीं माझा आगम निर्णय पहावा. आणि या पत्राच्या तारखेच्या पूर्वी या वादांचे भाषांतर कोठे झाले आहे काय ? हे कोणी कृपाकरून दाखवून द्यावें. नाहीं तर सर्व मी भाषांतरावरून लिहीतों हें ह्मणणें तरी आपलें माघारें घ्यावें. तथापि मला संस्कृत येत नाहीं हे मी मागच्या पत्रांत कबूल केलेंच आहे. आणि व्याकरण हे वादास अमवश्यक आहे असें माझें स्पष्ट मतही आहे. नगरकराचें नुस्तें माझ्या विषयींचें अनुमान होते आणि तें मी मराठी ग्रंथ लिहीतो ह्मणून. संस्कृत वेत्ते आमच्या तुकारामादिकांच्या ग्रंथाना तुच्छ समजतात पण आह्मी ही ह्मणतों कीं संस्कृत भाषाच कांहीं ज्ञानास आवश्यक आहे असे नाहीं तथापि संस्कृत भाषे विषयीं माझा अत्यंत आदर आहे. जैन मतांत तीर्थंकराचा उपदेश सर्व प्राणी आपआपल्या भाषेंत समजतात असें ह्मटलें आहे. आणि ब्राह्मणांत देखील अशा प्रकारचा कांहींसा दंश आहे हे या धातु मात्र संस्कृतवेत्त्यास ठाऊक नाहीं. कित्येकानें तर " प्राकृतं श्रवणं व्यर्थं न पुण्यं तेन जायते " असें स्पष्ट ह्मटले आहे. संस्कृत शब्दांतच शक्ति आहे. अन्य भाषेच्या शब्दांत नाहीं असेही कित्येकांनीं ह्मटलें आहे याचा विचार माझ्या आगम निर्णयांत आहे. आगम पूर्व सिद्धीला संस्कृत आणि मंत्र सिद्धीला व ज्ञानाला कोणतीही भाषा चालते असें माझे ह्मणणें आहे. प्रश्न कदंबांत न आलेले असे किरकोळ प्रश्न कांहीं पत्रांत लिहावे असा माझा विचार आहे. त्या पैकीं याही पत्रांत कांहीं लिहीतो.

(१) प्रत्येकाच्या शरीराची रचना भिन्न भिन्न असल्यामुळें त्याच्या आधारादि चक्रांच्या पंकोलीकेंत व स्थानांत कांहीं फरक होतो काय? होत असल्यास पश्चिम मार्गानें द्वार खुले करणें आहे कसें?

(२) श्वासांत पांचही तत्व वाहत असतात आणि त्या मानानें श्वास कमी अधिक जड होत असतो असा स्वरोदय शास्त्राचा सिद्धान्त आहे व तो वर्णात्मक अनुभवानें बरोबरही आहे तेव्हां नेमलेल्या वेळेंत २१६०० जप होणें कसें शक्य आहे.

हरदा, १३।४।१९१३. | आपला, गुलाबराव.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर २३.

तीर्थस्वरूप श्रीनिवास शास्त्री आण्णासाहेब यांचे चरणी सा. प्रणिपात वि. वि. आपण कांहीं दिवस जैन शाळे मध्यें शिक्षक होता. तेव्हां नागपूरांतील जैन लोकाशीं आपला बराचसा परिचय झाला असेल असे वाटते, ह्मणून मी थोडीशी विनंति करितो, त्या लेंकुराच्या विनंतीला मान मिळेल अशी आशा आहे. जैन मताचें खंडण करण्याकरिता आचार्यांनीं "नैकस्मिन्न संभवात्"अ० २ पाद २ सू० ३३ या सूत्रांत त्यामताचें प्रथम निरूपण केले आहे. याभाष्यावर आनंदगिरी, भामती, रत्नप्रभा, ब्रह्मविद्याभरण या प्रसिद्ध टीका सर्वास माहित आहेत. भामतीची अमलानंदानीं केलेली एक कल्पतरु नावाची टीका आहे. त्यासर्व भाष्यावरील टीकेंत जैनमताचें निरूपण करतांनां जीवाचे तीन प्रकार सांगितले आहेत. नित्यमुक, मुक्त आणि बद्ध. त्यांत अर्हत नित्य मुक्त. जे जैनधर्माचें साधन करून मुक्त झालेत ते मुक्त व इतर ते बद्ध. या टीकेतील वाक्य मी येथें लिहीतो.

रत्नप्रभा:—जीवास्ति काय स्त्रिविध:-कश्चिज्जीवो नित्य सिद्धो ऽर्हन्मुख्य: केचित्साप्रतिकमुक्ता: । केचिद्बद्धा इति.

आनंदगिरी—जीवास्तिकाय स्त्रेधा ३ बद्धोमुक्तो नित्यसिद्धश्चेति । तत्र अर्हन् मुनिर्नित्य सिद्ध: । इतर केचितसाधनैर्मुक्ता । अन्ये बद्धा इति भेद: ।

भामति—जीवास्तिकायस्त्रिविध: बद्धोमुक्तोनित्यसिद्धश्चेति ।

कल्पतरु—अर्हन्नित्य सिद्ध: । इतरे केचित्साधनैर्मुक्ता: । अन्येबद्धा: ।

पुन: सर्व जैनांचा सिद्धांत हा आहे कीं ईश्वर मानावयाचा नाहीं. कारण एक ईश्वर मानला ह्मणजे समभंगीनयाला व जैनांच्या मुक्तीला अडचण येते, ती अशी— एक ईश्वर आहे तर अनेकान्त पदार्थ उत्पन्न करूं शकणार नाहीं. व दुसरी जैनांची मुक्ति ह्मणजे कर्माचा क्षय झाल्यावर वरवर अलोकाकाशांत फिरत राहणें किंवा सिद्ध शिलेवर

राहणें. पण नित्य मुक्त जर कोणी मानला तर ईश्वर मानण्या सारखेच आहे; म्हणून माझ्या अवलोकनांत आलेल्या जैन ग्रंथांत दोनच प्रकारचे जीव सांपडतात. जसें 'संसारिणो मुक्ताश्च' तत्वार्थसूत्र अ० २ सूत्र१० जीवा द्विविधाः संसारिणो मुक्ताश्च ( नयचक्रसार ) जीव दोनच प्रकारचे आहेत. संसारी आणि मुक्त. पहिले पासून मुक्त असा कोणीही जीव नाहीं. तर साधनांनीं मुक्त होऊन एकदां अर्हत होतो. आणि दुसरे त्याच्या उपदेशानीं अर्हत होऊन मुक्त होतात, व सिद्ध होतात. तेव्हां या पक्षांत नित्य सिद्ध जीव कोणीच नसल्यामुळें ईश्वर मानण्याची गरज मुळींच राहत नाहीं. अशा दोन प्रकारच्या जीवाचे निरूपण सर्व जैन ग्रंथांत सांपडते. विद्यारण्य स्वामीनें आपल्या सर्वदर्शनसंग्रहांत जैन मताचें जें निरूपण केलें आहे, त्यांत देखील वरील ग्रंथाप्रमाणें २ प्रकारचे जीव सांगितलें आहेत. तेव्हां जीवाचा तिसरा प्रकार आला कोठून ? आनंदगिरी प्रभृतीला आमचे मत समजले नव्हते असें जैनानें सहज म्हणणें संभवनीय आहे. माझ्या पाहण्यांत आलेले जैन ग्रंथ येणें प्रमाणें आहेत. उमास्वामीचे तत्वार्थसूत्र, समंतभद्रकृत गंधहस्तीमहाभाष्य, श्वेतांबराचे दुसरे तत्वार्थाधिगमभाष्य, समंतभद्रकृत आप्तमिमांसा, देवागम स्तोत्र, वसुनंदीकृत देवागमवृत्ति, न्यायावतार, नयचक्रसार, प्रकरण रत्नाकर, श्वेतांबराचे कर्मग्रंथ, प्रमेयकमल मार्तंड, समवायांग सूत्त, पण्णवनासूत्त, कुंदकुंदाचार्यकृत समयसार, इत्यादि प्राचीन ग्रंथ, व जैन तत्वादर्श, तत्वनिर्णय प्रासाद, सम्यक्ज्ञानदीपिका, ( क्षुल्लकजीकृत ) हे अर्वाचीन ग्रंथ माझ्या प्रत्यक्ष पाहण्यांत आले आहेत. पैकी प्राचीन समयसार व अर्वाचीन सम्यक्ज्ञानदीपिका या दोन ग्रंथांत तर शांकर वेदान्ताची भेसळ झाली आहे. समयसारांतील भेसळ लपविण्या करितां तर त्याच्या वरील टीकाकारानें हवा तसा यत्न केला आहे पण तो साधला नाहीं. सम्यक्ज्ञानदीपिकेंत तर हा ग्रंथ जैन व वैदिक या दोघालाही पटण्याला योग्य आहे असे स्पष्ट म्हटले आहे. हेमचंद्राचार्यानें एक जैनाचें योगशास्त्र लिहिलें आहे. त्यांत परमात्मा म्हणून एक दिला आहे पण तो परमात्मा म्हणजे साधनानें मुक्त झालेला जीवच असल्यामुळें नित्य मुक्त नव्हे.

वर दिलेल्या यादींतील सर्व जैन ग्रंथांत व आपल्या कडील विद्यारण्य-स्वामीनीं निरूपण केलेल्या जैन दर्शनांत दोनच प्रकारचे जीव जैनांनां मान्य आहेत असें स्पष्ट दिसतें. तेव्हां आनंदगिरी प्रभृतिनीं वर दिलेले तीन प्रकारचे जीव जैनांनां मान्य आहेत असें कसें ह्मटलें असावें. भामतीवर कल्पतरु नांवाची टीका आहे त्यांतही हें स्पष्ट केलें नाहीं. जेथें आह्मांला संशय तेथे टीकाकारांनीं निरूपण करूं नये अशा प्रकारचीं उदाहरणें आपल्या कडील ग्रंथाचीच मला मोजून हजार देतां येतील. तेव्हां आपल्या लोकांच्या विद्याव्यासंगाचे मला आश्चर्य वाटते. मर्जी प्रभुची ! सदानंदस्वामी हे विद्यारण्याच्या नंतरचे असावेत असे त्यांच्या अनेक ग्रंथावरून दिसते. त्यांनीं आपल्या अद्वैत ब्रह्मसिद्धि नावांच्या ग्रंथांत तीन प्रकारच्या जीवाचे वर्णन केले आहे, तें कोठून केले आहे कोण जाणें. पण तें आनंदगिरी वगैरेचे खास नव्हे. कारण त्यांनीं नित्य सिद्धाचा अर्थ नित्य साधनांनीं मुक्त झालेला असा केला आहे. " जीवास्ति कायः पुनः त्रिविधः बद्धो मुक्तो नित्य सिद्धश्चेति । तत्र अर्हन्मुनिर्नित्य सिद्धः नित्य साधनैर्मुक्तत्वात् इतरे केचन साधनैर्मुक्ताः अन्ये तु बद्धा इति भेदः । पण हे नित्य साधन ह्मणजे काय व इतर जैनांना मुक्त होण्याची जीं साधने आहेत तीं कोणतीं ? अर्हन् कांहीं जैन मार्गांत सांगितलेल्या साधनांहून निराळ्या साधनानें मुक्त झाला आहे कीं काय ? पण सदानंद पडले वैदिकच. जैन प्रथम तीन जीव-स्वीकारतात कोठें ? ही जीवा विषयींची गोष्ट झाली. पुनः अशीच सप्तभंगीनया विषयीं झाली आहे. स्वचतुष्टयाच्या अपेक्षेनें सप्तभंगमय समजून शंकराचार्यांनीं जे जैन मताचें खंडन केलें आहे तें बरोबर नाहीं. असें तत्वनिर्णयप्रासादकारानें ह्मटलें आहे. तो म्हणतो स्वचतुष्ट-याच्या अपेक्षेनें पदार्थ अस्तिरूप आहे व परचतुष्टयाच्या अपेक्षेनें नास्तिरूप आहे. आणि असेंच वर यादि दिलेल्या सर्व ग्रंथांत दिलें आहे. पण याचा अर्थ अन्योन्याभावा शिवाय दुसरा कोणताही असेल तर आपल्याला कळत नाहीं. जरी अन्योन्याभाव नित्यत्वानित्यत्वांत लागूं होत नाहीं तरी तेथें विशेषणान्योन्याभाव ह्मणून म्हणतां येतें. माझें मत असें आहे कीं, तीन प्रकारचे जीव मानल्यास आपल्या मह-

त्याच्या बाबी सोडून द्याव्या लागतात, असें समजून जैन लोकांनीं ही ग्रंथांत बदल केली असावी. जैनांचा ग्रंथ संग्रह सरासरी दीडलक्ष आहे. तो पुष्कळसा मागधी, शूरसेनीआदि बालभाषेंत आहे आणि संस्कृत भाषेंत ही कांहीं आहेत. अर्वाचिन जैन ग्रंथ बहुधा हिन्दि भाषेंत आहे. एवढा हा ग्रंथ संग्रह त्यानीं बदलविला असल्यास त्या लोकांच्या धर्म विश्वासाची व एकीची तारीफच करावी लागते. ही ग्रंथांची गोष्ट झाली. पण पुष्कळ दिवसापूर्वी मला जैन लोकांचा एक उपाध्याय भेटला होता. अर्हन्त व इतर आमच्या धर्मप्रमाणें झालेलें मुक्त यानां आह्मी सारखें मानीत नाहीं, असें त्याचें ह्मणणें होते तेव्हां गुप्त रीतिनें जीवाचे तीन प्रकार अझूनही जैनांत मानलें जात असावेंत असें माझें अनुमान आहे. ह्मणून आपण कांहीं ओळखीच्या जैन पंडिताशीं गांठ घ्यावी व आपला नेहमीचा उत्तेजक स्वभाव व्यक्त करून अर्हन्त श्रेष्ठच असला पाहिजे इत्यादि वचनांनीं कां होईना पण जीवाचे तीन प्रकार कोण्या ग्रंथात सांगितलें आहे याचा उत्तम शोध करून आनंद गिरी प्रभृतीवरील कलंकसंभवना मिटविण्या करितां मला कृपाकरून पत्रोत्तरीं कळवावें. आनन्दगिरी प्रभृती खोटें बोलणारें नव्हतें असें माझें पक्कें मत आहे. आर्यांचें ह्मणणें योग्य आहे हें सिद्ध करण्या शिवाय मला व आपण प्रभृती माझ्या हितचिंतकांनां दुसरें कोणतेही काम नाहीं. योग, सांख्य, वेदांत जे कांहीं असेल तें आमचे हेंच. आणि इतर कामाची टाळाटाळी करणारा मीही या कामांत कधींही टाळाटाळी करीत नाहीं एवढाच आपल्याला माझ्या एकंदर आयुष्यांत नियमपणा दिसत असेल. तेव्हां हें मी आपले काम बरोबर करित आहे असा माझ्यावर विश्वास ठेवून मला एवढें साह्य करावें

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

हरदा, तारीख १८।४।१९१३. } आपला व्याकरण वर्जित चिरंजीव, **गुलाब.**

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २४.

रा. रा. मुळे मास्तर आण्णासाहेब पाध्ये खापरे आदि मंडळीस सा. न. वि. वि. मी हा प्रश्न कदंब लिहून पाठवीत आहे तो अवश्य छापावा. कारण याच्या योगानेंच आह्मा सारख्या लोक मारून खाणाऱ्यांची नाडी हातांत येणार आहे. योगावांचून जे ब्रह्मसुख आह्माला मिळाले ह्मणतात त्या द्विरेफांनां आमचें कांहीं ह्मणणें नाहीं परंतु जे जिज्ञासु आहेत त्यानीं सद्गुरुपासून काय विचारलें पाहिजे तेच प्रश्न या लेखांत मी लिहीत आहे. यद्यपि अधिकारी असल्यावांचून सांगूं नये अशी शास्त्राची आज्ञा आहे तरी प्रश्न अनधिकाऱ्यास विचारण्यास हरकत नाहीं उत्तर मात्र अधिकाऱ्यावाचून सांगू नये असा त्या शास्त्राचा आशय आहे. ह्मणून हा प्रश्न कदंब छापण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं कारण योगा वांचून वेदान्त बकण्याची खोड दुसऱ्याच्या टीका-चोरून घेऊन आपल्या नांवावर प्रसिद्ध करणाऱ्या आणि संतमालिकेंत गणल्या जाणाऱ्या पण अनुभवी असणाऱ्या मोठ्या लोकांसही लागली आहे. गीतेवर संस्कृत गूढार्थ दीपिका नांवाची मधुसूदननीं केलेली टीका आहे हिला मधुसूदनीही ह्मणतात हिची आतांपर्यंत ३ भाषांतरे व १ रूपांतर झाले आहे. गीतेवर भावप्रकाश ह्मणून जी संस्कृत पद्यात्मक टीका केली आहे आहे ती मधुसूदनीच्या गद्याचेंचं रूपांतर आहे आणि ती माझ्या पुस्तकालयांत विद्यमान आहे. दुसरे ओवीबद्ध भाषांतर रंगनाथानें चित्सदानंद लहरी ह्मणून जी टीका केली आहे. तिसरे चिद्घनानंद स्वामीनें गीतेवर हिंदी भाषेंत गूढार्थ दीपिका ह्मणून टीका केली आहे ती आहे व चवथे भाषांतर रघुनाथ शास्त्री पर्वते यांनीं भाषा विवृति नामका टीका केली आहे ती आहे. परंतु रंगनाथी ओवी बद्ध भाषांतरांत जो श्रीज्ञानेश्वर महाराजा विषयीं खडंणाभास दाखविला आहे. तो मधुसूदनाचा नसून स्वत: रंगनाथाचा आहे उदाहरणार्थ ६ अध्यायाच्या 'प्रशांतात्मा विगत भीर्ब्रह्मचारीव्रते स्थित:' या १४

ल्या श्लोकावरील टीका पाहावी. 'एक या श्लोका वदती । वायू धारण प्रशंसिती ।।' असा श्रीज्ञानेश्वर महाराजाविषयीं आक्षेपाभास करून देवाचा असा अभिप्राय नाहीं असें ह्मटलें आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज व देव प्रत्यक्ष विष्णूच असल्यामुळें त्यांचा अभिप्राय सोडून देऊन यांनीं पदरचा अभिप्राय कोठून सांगितला आहे कोण जाणे इतरही वेदान्ती माझ्या प्रश्न कदंबानें जिंकल्या जातात. ज्या शंकराचार्यांनीं वेदान्त स्थापन केला त्यांचेच योगतारावल्यादि ग्रंथ या वेदान्ती ह्मणवून घेणाऱ्यानीं पाहिलेले नसतात असें वाटतें.

# प्रश्न कदंब १ ला.

नमामिपरमानंदं गुरुमाळंदिवल्लभम् ।
वेदान्तदुर्विदग्धानां शासनायेदमुच्यते ।। १ ।।

जयजयसद्गुरु आळंदीपति । जयजयसद्गुरु करूणा मुर्ति । जयजयसद्गुरु अविचलकीर्ति । गाति श्रुति जयाची ।। १ ।। माये तूझिया पसायदानें । आत्मा अंकित न कीजेकवणें । प्रश्न कदंब येणेंचि मानें । निर्मिला तुवां ।। २ ।। तो वेदान्त आणियोग । दोन्ही करावे सांग । भृषुंड बोलिलेचांग । वासिष्ठीं हे ।। ३ ।। वेदान्त आणि योगाचा । गूढसंधी असे साचा । परी नाथयोग जाणता तयाचा । भावकळे ।।४ ।। इतर विवेके नामरूप संस्कार । ते न राहती उलंघिता षड्चक्र । हे आचार्यांसिही समग्र । संमत आहे ।। ५ ।। कोणी वैष्णव ज्ञानीभक्त । आचार्यांसी वादकरित । ऐसे बोले शांकरदिग्विजयांत । आनंदगिरी ।।६ ।। परीत्या वैष्णवाची मतें । आचार्यकृत ईशवास्या सारिखे होते । तथापी अडविलें तयातें । आचार्यांनीपुसोनि षड्चक्रपंथा ।। ७ ।। योग वेदान्ताचा संबंधनसता । तरीहे अडविणें होईलवृथा । यालागीं सयोगवेदान्ता । विचारणें ।। ८ ।। कूर्मपुराणीं ईश्वरगीता । तेथ बोलणें घडले कैलासानाथा । कीं ज्ञानें योग होय वाढता । आणि योगें ज्ञान वृद्धिपावे ।९। योगयुक्तज्ञानिया मी प्रसन्न । ऐसें ईश्वरगीतेंत बोलिलें उमारमण ।

आतां आनंदगिरीकृतादिग्विजयांतीं आचार्यभाषण । वैष्णवासी झालें तें प्रमाण लिहितो मी ॥ १० ॥ "किंच ज्ञान मार्गे वर्तिनो वय मिति भवद्भिरुक्तं । तत्राप्यधिकारोनास्त्येव । यद्यस्ति तर्हि सदसल्लक्षणं ब्रह्मनाडिविभेदनं चित्परामर्षभावं षड्चक्रमार्गं दर्शयध्वम् ।

ओव्या:—जें बोलिलासी तूं वैष्णव । कीं ज्ञानमार्गी आह्मी सर्व परी आघवे अपूर्व । अधिकार नाहीं ह्मणोनी ॥ ११ ॥ ब्रह्मनाडी विभेदन । चित्परामर्षें षड्चक्रोल्लंघन । हें दाखवी गा संपूर्ण । कवणे रीती कीजे ॥ १२ ॥ वेदान्तेचि होय मुक्ति । तरी कां वैष्णवासी अडविलें षड्चक्र संविती । महात्मयाप्रती प्रतारक ह्मणणें गौण ॥ १३ ॥ हें असो बृहद्वासिष्ठीं निर्वाण प्रकरणीं । काकभृशुंडोपाख्यानीं । वेदान्तान्वयें षड्चक्र कडसणी । प्राणचिंतानिरोपणी दाखविली ॥ १४ ॥ किंबहुना पातंजल शास्त्रीं । हा षड्चक्रादियोग न बैसे प्रधान पात्रीं । या लागीं नाथ संप्रदायी तंत्री । योग शास्त्र रूढ हें ॥ १५ ॥ पातंजल सूत्र व्यास भाष्य भिक्षु वार्तिक । तत्व वैशारदी भवदेव भाष्य नागेश वृत्ति सम्यक् । इत्यादि ग्रंथ पातंजल दार्शनिक । परी नाथ ग्रंथ वेगळे ॥ १६ ॥ शिवसंहिता योगी याज्ञवल्क्यसंहिता । शिव स्वरोदय गोरक्ष पद्धती तत्वता । हठ योग प्रदिपिका घेरंडसंहिता । इत्यादि नाथ योग ग्रंथ ॥ १७ ॥ श्वेताश्वतर योग शिखादि उपनिषन्मूल । ह्मणोनि हें प्रमाण केवल । वेदान्त योगाची वाद खलखल । पातंजलासी ॥ १८ ॥ नाथ योगासी नाहीं किंबहुना तयाची अत्यंत अपेक्षावे दान्ताठायीं । आणि मीन नाथाचार्योहीं । पातंजल दर्शनावरही नाथ योगपर भाष्य केलें ॥ १९ ॥ तया नाथ योगाचें प्रकार दोन । प्रथम प्राणलय पूर्वक मनोलय करण । द्वितीय मनोलय पूर्वक प्राणलय स्थापन । परी षड्चक्राश्रयण दोहींतही ॥ २० ॥ तया षड्चक्रांची बुद्धी । बोलिली आहे नाथयोग ग्रंथी । परी प्रश्न कळावया निश्चिती । संक्षेप रीती बोलितो एथ ॥ २० ॥ शरीर चिरोनि पाहतां । चक्रें न दिसती तत्वतां । इत्यादि नास्तिकांचिया प्रश्नार्थी । आह्मी न घेऊं ॥ २१ ॥ परी योगियांतचि योगियाचे । जे प्रश्न होती साचे । तेचि या कदंब लेखाचे । विषय भूत हो ॥ २२ ॥ प्राण वायू हृदया पर्यंत । जाये आणि तेथोनि परतत ।

तो ब्रह्मांडी कैसा चढत । इत्यादि नास्तिक प्रश्न संघात । अनुभव विरुद्ध ह्मणोनि त्यागिला ॥ २३ ॥ ध्यानें प्रकाशलिया ज्योती । अपंचीकृत प्राणाची गती । दिसूं लागे योगियां प्रति । सकळाही हे ॥ २४ ॥ ह्मणोनि नास्तिक पातोडा । पाहोनि योगी हाणिती तोंडा । या लागीं योगीयांत योगि संवाद गाढा । प्रश्न कदंबें वदू ॥ २५ ॥ आधार चक्र योनि स्थानीं । कंदाच्यावर सुषुम्ना गगनीं । चार पाकोळ्या कमळ प्रमाणी । कर्णिका स्थानी गजानन ॥ २६ ॥ स्वाधिष्ठान सुषुम्ना गगनी । साधारणमान लिंगस्थानीं । षड्पंकोलिका कमल प्रमाणीं । कर्णिका स्थानीं ब्रह्मदेव ॥ २७ ॥ मणिपूर चक्र रक्तवर्ण । कमल दश पंकोलिका प्रमाण । कर्णिका स्थानीं रमारमण। सुषुम्ना गगनीं नाभि मंडळी ॥२८॥ हृदय स्थानीं सुषुम्ना गगनी । द्वादश दल कमल तत्कर्णिका स्थानीं । ब्रह्मांड नायक शूलपाणी बैसला आहे ॥ २९ ॥ विशुद्ध चक्र षोडश दळीं । सुषुम्ना गगनीं कंठ मंडळी । बैसला आहे कर्णिका स्थळी । जीवचि तो ॥ ३० ॥ भृकुटि स्थानीं सुषुम्ना गगनीं । द्विदल चक्र आज्ञा भिदानी । तेथ बैसले कर्णिका स्थानीं । सद्गुरु रावो ॥ ३१ ॥ ब्रह्म रंध्री सहस्र दल । कर्णिका स्थानीं परब्रह्म केवळ । सुषुम्नेचें मूळ हेंचि एक । इतुके अंतरी धरावें । मग हे पुढील प्रश्न समजावें । ( प्रश्न पहिला १ ) कंठ स्थान जरी वसविलें जीवें । तरी कोणी चढावे आधारा पासुनी ॥ ३३ ॥ कोणी ह्मणती सत्वगुणी अहंकार । चढों लागतो षड् चक्र । परी तो जीव संयोगेचि चिन्मात्र । अन्यथा कर्ता न होय ॥ ३४ ॥ जीवावीण अन्यथा कर्ता । तरी जीवा मुक्तीची नलगे कथा । ( प्रश्न दुसरा २ ) जीवेंचि आधारा पासोनि चढता । तरी कंठ स्थानी जीवें जीव पूजावा कैसा ॥ ३५ ॥ कर्तृकर्मव्यपदेशात् या सूत्रीं जाण । अद्वैत वादांतही उपास्य उपासक बोलिलें भिन्न । जीवो पासना निषेधिली बलें करून । येथ तव उपास्य जीव होय ॥ ३६ ॥ ( प्रश्न तिसरा ३ ) एकवीस सहस्र सहा शत । अजपा जप जो प्राणिया होत । तो सुषुम्ना मार्गे करोनि विपरीत । चक्रीं समर्पावा हें योग शास्त्रांत बोलिले ॥ ३७ ॥ त्यांत एक सहस्र जीवा कारणें । जप लागे समर्पणें । तेथ समर्पावा जीवें कवणें । कवण्या जीवा ॥ ३८ ॥ दुसऱ्या-

चा मुक्त जीव आपल्या कंठी बैसत । ह्मणोनि तो उपास्य होत । ऐसें ह्मणतां कोपत । मुक्तगत्यभाव श्रुती ॥ ३९ ॥ ( मुक्तांचे प्राण कोठें जात नाहींत असें सांगणारी श्रुती ) एक शरीर दोन जीव । ह्मणणें सर्वथा गौरव । ( प्रश्न चौथा ४ ) बरें कंठीं राहे जीव । तो शुद्ध कीं अशुद्ध ॥ ४० ॥ अशुद्ध ह्मणतां उपास्य कैसा । शुद्ध ह्मणतां ब्रह्मचि आ पैसा । मग पुढें दोन चक्रांचा वळसा । भेदावा कवणें ॥ ४१ ॥ मुख्य जीव कंठ स्थानीं आणि जीवाभास चढे आधारा पासुनी । हेंही बोलणें हास्यवाणी । बिंबाभासामाजी संधी नसे ह्मणोनिया ॥ ४२ ॥ ( प्रश्न पांचवा ५ ) असो गणेश ब्रह्मा हरिहर । यांचे भूतकार्य कीं माया कार्य शरीर । प्रथम पक्षीं उपास्यत्व समग्र । मोडेल यांचे ॥ ४३ ॥ द्वितीय पक्षीं पाहतां जाण । जीवांच्या तळवटी काय यांचें स्थान हें जरी श्रेष्ठ नाहींत जीवाहून । तरी उपास्य कैसे ॥ ४४ ॥ ( प्रश्न सहावा ६ ) म्हणाल दक्षिण नेत्र पुरुषा प्रमाणें । भावना मात्र ययातें घेणें । तरी हे अनुभव विरुद्ध बोलणें । योगिया दृष्टि ॥ ४५ ॥ किंवा उपासनेसाठीं च जंव । घेतला चक्राचा देवता भाव । तरी एकानेंचि कार्य होईल सर्व । मग षट् चक्र कां मानावें ? ॥ ४६ ॥ जेथ ईश्वरो पासना सांगे श्रुति । तेथ उपासना त्याग नाहीं निश्चीती । भृगुवल्लींत अन्न उपासना दि त्याग स्थीति । तेजी व कोशरीति ह्मणूनी ॥ ४७ ॥ पुनः उपासना मात्र चक्रींच्या देवता । म्हणता विशुद्ध चक्रींच्या जीवासही उपास्यता जीवोपासना तव श्रुति माता । सर्वत्र निषेधी ॥ ४८ ॥ या लागीं नसोनि उपासना मात्र । स्वरूपेंचि गणेश विधि हरिहर । येऊनि वसविती म्हणावें चक्र । तरी तेहि मात्र साहवेना ॥ ४९ ॥ ( प्रश्न सातवा ७ ) ब्रह्मा बैसला लिंग स्थानीं । जीव बैसला कंठ स्थानीं । एवं ब्रह्मा तळवटीं असतां निर्वाणीं । तरी अर्चिरादि मार्गी योगी काय ह्मणूनि ब्रह्म लोकीं जाती ॥ ५० ॥ पिंडीं ते ब्रह्मांडीं येणें मानें । जीवाच्या तळवटीं ब्रह्म लोक होणें । मग जीवानें ब्रह्म लोकीं येणें हे कोण्या पुण्याचें फळ ॥ ५१ ॥ ( प्रश्न आठवा ८ ) ( प्रश्न नववा ९ ) ह्मणाल पिंडाच्या वरुतें ब्रम्हांड तत्वतां । तेथील ब्रह्म लोकीं जीव गंतां तरी पिंडस्थ चक्रींची ब्रह्मांड लय चिंता । योगिया कारणें होईल व्यर्थ

॥ ५२ ॥ ( प्रश्न दहावा १० ) पुनः स्थूल देह औट हात । रक्त म्हणा तेथ । श्वेत वर्ण निश्चित सूक्ष्म देह ॥ ५३ ॥ अर्धपर्व तो कारण, महा कारण मसुरे प्रमाण । तरी अविद्या रहितासी आकार जाण, कवणे रीति पातला ॥ ५४ ॥ असो हे लय योगाची खटाटोप । येथही प्रश्न असती अमूप । सूक्ष्म देहाची साटोप । स्वप्नावस्था ॥ ५५ ॥ ( प्रश्न आकरावा ११ ) तो जरी म्हणतां नाभी स्थानीं । तरी आधारे पासूनी चढणें कोण्या देहानीं । स्वप्न शरीरवव्यापक स्थानीं । ब्रह्मांड लय चिंता म्हणोनि पिंडी ॥ ५६ ॥ ( प्रश्न बारावा १२ ) तरी ब्रह्म लोकीं जावें कोणी । असो हे जीवासी जीव भेटलीया कंठ स्थानीं । मग पुढील चक्र भेदावे कोणी । दोन्ही जीव मिळोनि कीं एकट ॥५७॥ दोन्ही जीव मिळोनि म्हणतां । तरी शुद्ध जीवासी चाड कां तत्वता । चालत्या जीवानें एकट म्हणता । तरी तो शुद्ध कीं अशुद्ध ? ( प्रश्न तेरावा १३ ) ॥ ५८ ॥ पहिला शुद्ध जीव कंठ स्थानीं आपैसा । तरी हा अशुद्ध जीव पुढें जाईल कैसा । पाहूनी रमाविलास उमाविलासा । अजूनि कैसा शुद्ध नाहीं झाला ॥ ५९ ॥ ( प्रश्न चौदावा १४ ) शुद्ध जीवचि ब्रह्म पूर्ण । परी त्याच्यावरी गुरुचे स्थान । आज्ञा चक्र ते काय म्हणोन । ब्रह्मांहून कोण श्रेष्ठ असे ॥ ६० ॥ ( प्रश्न पंधरावा १५ ) बरें गुरु श्रेष्ठ म्हणावा ब्रह्माहूनी । तरी गुरुच्या वर ब्रह्म पाहणें आहे सहस्रदळ स्थानीं । बरें तेथही गेलिया निघोन तरी भिन्न कीं अभिन्न रहावें ? ॥ ६१ ॥ भिन्न मानतां होय द्वैत । अभिन्न मानतां जप समर्पणें असे तेथ । आतां शबल ईश्वर जीव निश्चीत । कंठ स्थानीचा म्हणावा जरी ॥ ६२ ॥ तरी तेही भार्या संतोष मात्र । वेदान्तीं स्थान नाहीं शबल ईश्वरावर । एथ तंव दोन स्थानें असती वर । आज्ञा आणि सहस्र दळ ॥ ६३ ॥ अवघेचि भावना मात्र म्हणतां । तरी निमाळी योगियांची अतिक्रान्त भावनीयता । इतुके हे बोलिले तत्वता । योग ज्ञाना माजी प्रश्न ॥ ६४ ॥ आतां योग क्रियेंत प्रश्न कैसे । तेही लिहितो आपैसे । सुषुम्ना मार्गे जो प्राण जात असे । आणि त्या सवे अंत:करण ते भौतिक की अभौतिक ॥ ६५ ॥ प्रथमपक्षीं शरीरच्छेद होईल निष्टंक । द्वितीय पक्षीं अंगिकारितां सम्यक् । ग्रंथ प्रमाण दे

यावे ॥ ६६ ॥ चक्रीं चक्रीं प्राणाचा। अभौतिक परिणाम होय साचा। तरी माया मय परिणाम झालिया प्राणाचा। ईश्वर होईल प्राणोपहित जीव ॥ ६७ ॥ मग तो होईल अंतर्यमिता। तरी चक्र भेदावया कोण उरला आतां। अथवा भूताचा परिणाम म्हणता। कोण्या ग्रंथा अवलंबिले ॥ ६८ ॥ आतां अशी चक्री चक्री मनाची स्थिति। राखावी तरी कवणे रीति। प्रत्याहार रूप धारणा रूप ध्यान रूप निश्चीति। समाधी रूप कीं संशय रूप सांगा ॥ ६९ ॥ प्रथम पक्षीं विजातीय वृत्ति उठती। तेथ कासयाची जप निवेदन संपत्ति। द्वितीय पक्षीं भावना रूप निश्चीती। होईल अवघे ॥ ७० ॥ म्हणाल सकल चक्रीं करावी धारणा। तरी ध्यान समाधी कवणिया स्थाना। प्रति चक्र धारणा त्यागी व्युत्थाना। येईल मन ॥ ७१ ॥ मग पुनः आधारा पासूनि लागेल चढणें। धारणा ध्यान या दोहींनी गति येणेंचि मानें। प्रति चक्र ध्यान त्यागितां धारणे वरी येणें। सहजचि घडे ॥ ७२ ॥ सालंबन एकाग्र मनाचा हा निश्चीत स्वभाव। आलंबन सोडिता मन घे मागे पाव। निरालंबन म्हणता तंव। गति चक्राची कासया ॥ ७३ ॥ म्हणोनि धारणा ध्यान समाधि तिन्ही। होऊं द्यावे एके चक्र स्थानीं। तरी पुढें जावया व्युत्थानीं। येणें घडेल तैसेंचि ॥ ७४ ॥ मग पुनः पहिल्या पासून लागेल चढणें। म्हणाल कीं निर्विकल्प समाधीच्या अपेक्षेनें। संयमासही बहिरंग घेणें। हे केले बोलणें पातंजल शास्त्रीं ॥७५॥ तरी ते मानिले म्याही। परी मग चक्रीचा देवता साक्षात्कार होणार नाहीं। एवं योग क्रियेंतही। शंका असती ससंख्य ॥ ७६ ॥ ( अनंतत्व निरसन करण्या करितां ससंख्य म्हटले ) एवं पूर्व मार्गानें जातां। प्रश्न हे सांगितले तत्वतां। पश्चिम मार्गे त्रिकुटादिकें जातां। याहूनि अडचणी पैं असती ॥ ७७ ॥ या प्रश्नांचे न देतां उत्तर। कोणी म्हणेल हे घ्यावे श्रद्धा मात्र। तरी यासी येईल समग्र। उपर्युक्त धनादि भावना सादृश्य ॥ ७८ ॥ हे सर्वथा योगी न घेती। येथ कोणी ऐसे बोलती कीं न जावे या योग प्रांतीं। केवळ पुस्तकें वाचूनी वेदान्तीं। मग्न व्हावे ॥ ७९ ॥ तरी तयासी आमुचे नाहीं बोलणें। तीहि वागावे धक्कोट पंच लक्षणें। वकील मंडळींत येणेंचि मानें। वेदान्त सभ्यो

वाढिला ॥ ८० ॥ हे असो क्रिया प्रश्न । शब्द वेदान्त पढता हि जाण । मनाचा देह आंत घालोन । विवेक करिती मूढ हे ॥ ८१ ॥ मनाच्या देहांत दुसरे मन । त्याचा विवेक करितां पुनर्देह धारण । किंवा आकाश वृत्ति संस्थान । किंवा नामरूप संस्कार ॥ ८२ ॥ किंवा अनुमाना वेगळा राहोनी । मग वृत्तिच्या पाठी साक्षि अनुमानी । तेणें ब्रह्मविद्या देवीचे अंगीं नाव ठेवूनी । भ्रांति डाकिनी बळे वाढे ॥ ८३ ॥ तैसे बोल वाचा बळें । झकविजती प्रतीतीचे डोळे । हे बोलिले आळंदी नाथे सोहाळे । यास्तव मायाग्रस्त सर्व शाब्दिक ॥ ८४ ॥ धड विवेक ना धड योग । चुकीला दोहीपक्षी मार्ग । पुस्तके किंवा टाळ मृदंग । बाह्य साधन मात्र उरले ॥ ८५ ॥ ग्रंथाचेही मर्म । शाब्दिका न कळे परम । हेही प्रश्नानुगम । करूनि दावूं ॥ ८६ ॥ । गुरु पाहिजे सर्वज्ञ कीं अल्पज्ञ । प्रथमपक्षीं वेदान्ती महा दूषण । वाक्यांत लक्षणा न होय म्हणून । द्वितीय पक्ष ही जाण । येणेंचि दूषण दुष्ट ॥ ८७ ॥ ज्ञान पुण्याचे फळ ह्मणतां । तरी कुत्सित भोग प्रवृत्ति न संभवे मुक्ता । पुण्य कर्म जना तत्वतां । ज्ञानिया नीच जातींत कां ॥ ८८ ॥ जरी मिथ्या आहे पंची करण । लय चिंतनार्थ बोलिले पूर्ण । अनियमित होतसे ध्यान । तरी आकाशाचे जळांत लय चिंतन कां न घडे ॥८९॥ तैसेही लय चिंतीतां । ब्रह्मोपासना कां न घडे तत्वतां । पंचीकरण सत्य ह्मणतां । तरी वृथा त्रिवृत करण श्रुति ॥ ९० ॥ साच मानितां त्रिवृत् करण । तरी पंचीकरण भाष्य व्याकोपगहन । दृष्टि सृष्टि ग्रंथही दारुण कोपती येणें ॥ ९१ ॥ दृष्टिसृष्टिवादांत ही पाहतां । आकाशाचा जलांत लय नये चिंतीतां । येणें प्रमाणें सृष्टि दृष्टि वादता । दृष्टि सृष्टि वादास येऊं पाहे ॥ ९२ ॥ भलते करणें दृष्टि सृष्टि वाद लक्षण । तरी द्वैतांची मुक्ति निवारितां फोडीन वदन । विवेके ये भेद पण । अभेद पणें अविद्या ॥ ९३ ॥ इत्यादि वृथा वितंडा निश्चीती । शब्द वादी-या नाटोपती । तेथ मागील प्रश्न हृदयीं शिरती । कवणे रीति तयांच्या ॥ ९४ ॥ आळंदी वल्लभ स्वामी तात । जरी न होतील कृपावंत । तरी वाहोनि सांगतो शपथ । कीं या लेखासी उत्तर मिळेना ॥ ९५ ॥ या लेखाचे उत्तर योगांत पूर्ण । आहे हे वाहोनि सांगतों आण । परी वेदान्त

दुर्विदग्धा कारण । निश्चये प्रश्न पुसिले म्यां ॥९६॥ या प्रश्नांचे उत्तर नेणुनी । ब्रह्मज्ञ समजेल तो * * * । योगी सांगती निवडुनी । जे वेदान्त कडसणी आश्रितू ॥ ९७ ॥ श्री ज्ञानेश्वर माझी माता । तियेच्या करुणेनें तत्वतां । या प्रश्नांची मोहकता । माझिया चित्ता झांकोना ॥ ९८ ॥ आवृणोतु न मां माया तव विश्व विमोहिनी । ही रामायणांतील विनवणी । मी आळंदी वल्लभ चरणीं । आपुल्या तारणास्तव करी ॥ ९९ ॥ जय जय आळंदी वल्लभा भगवंता । जय जय श्री गुरो करुणावंता । जगद्व्यापका त्वत्पदर्चिता । हृदयीं असतां पूर्ण आह्मी ॥ १०० ॥

॥ इति श्रीज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवी छंदबद्धे प्रथम प्रश्न कंदब: संपूर्ण: ।

---

# प्रश्न कदंब २ रा.

श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिव: पिता ॥
पति: कृष्णोराधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥ १ ॥
पंचायतन मित्येतद्धृद्यास्थाप्यप्रपूज्यच ।
वेदान्त दुर्विदग्धानां शासनायेदमुच्यते ॥ २ ॥
अज्ञस्सुखमाराध्य: सुखतरमाराध्यते विशेषज्ञ: ।
ज्ञानलव दुर्विदग्धं ब्रह्मापितं नरं न रंजयति ॥ ३ ॥
इति भर्तृहरेर्वाक्यं सत्यं किंतु श्रुतिद्विषाम् ।
गुरुगर्व विनाशाय ममाप्येष महाग्रह: ॥ ४ ॥

जय जय आळंदीवल्लभू । सद्भावें नमूं स्वयंभू । तद्भावे द्वितीय प्रश्न कदंबू । प्रगटो विलंबू न लागतां ॥ १ ॥ परी ययाचे उत्तर । ते अंबे तुज कडोनिच हो समग्र । येरवीं नेणें मी अन्य वक्त्र । जे प्रमत्तमात्र सर्वदा ॥ २ ॥ [प्र० १] मागील कदंब निरूपणीं । ऐसें उत्तर देईल कोणी । कीं जीवादिक तेथ नसोनी । भावना मात्र उपदेशीली ॥ ३ ॥ तरी हरिहरावरी जीव भावना । ते शुद्धपक्षीं हरीहरा अशुद्धपणा ।

अशुद्धपक्षी जीवो वासना । श्रुतीनिषिद्ध गळापडे ॥ ४ ॥ [प्रश्न दुसरा] आतां आभास वादी वेदान्ती । आभासाची अनिर्वचनीय उत्पत्ती । ह्मणती तैं जीवोत्पत्ती । अंगिकारिली ॥ ५ ॥ तेणें अनादि षट्पदार्थ वार्तिक विरोध । ऐसे बोलतील जरी प्रसिद्ध । किं दृष्टांति आभास उत्पत्ती सिद्ध । आणि सिद्धांती अनादि तरी ते वृथा ॥ ६ ॥ दृष्टांताचे निरूपण । यथार्थ करावया कारण कवण । अनादि न मानितां जीवा कारण । तरी मुक्ता बंधन चुकेना ॥ ७ ॥ [प्रश्न ३] ॥ प्रमाण वृत्तींत चेतन विशेष । ते काय मुख्य चिदाभास की चिदाभासाभास । आद्य-पक्ष साधी जीव लोपास । आभास द्वय साधी एक देही ॥ ८ ॥ ते दोन्हीं अनिष्ट होती । कारण जीव लोपी होईल सुषुप्ती । प्रमाण चेत-नाची आहे उत्पत्ती । या लागीं क्षणक्षणाभासें बंध प्राप्ती मुक्ता ॥ ९ ॥ द्वितीय पक्ष अंगिकारिता । तरी वृत्तीस उत्तर उपाधित्व कवणिया अर्था । अंतःकरणासी समसत्वता । मिश्र सत्व ह्मणोनी ॥ १० ॥ तेथ कवण व्यवच्छेदु । मानावया उपाध्युपधेय संबंधु । हें असो आणिक विरोधु । दावितो प्रश्नें ॥ ११ ॥ [ प्रश्न ४ ] जगती कार्यकारणभाव किं मायाविलास । आद्यपक्षीं दृष्टिसृष्टिवादा अनवकाश । अंत्यपक्षीं विरोध ब्रह्मसूत्रास । जन्माद्यधीकरणा विषयी पैं ॥ १२ ॥ न मानिता कार्यकारण । तरी न घडे तटस्थ लक्षण । अंत्यपक्ष अंगिकारितां जाण । तरी अडचण असे बहु ॥ १३ ॥ [ प्रश्न ५ ] विक्षेप आणि आवृत्ती । या दोन्हीचि मायेच्या शक्ति । तेथ जीवाचे ठायीं मात्र आवृत्ती । आणि प्रपंच विक्षेप शक्ति ह्मणावी जंव ॥ १४ ॥ तंव निरावरण विक्षे-पें । ईश्वराही दुःख आरोपें । जीवा हातील पुण्यपापें । आवरणपूर्वके न गणवती ॥ १५ ॥ आवरणपूर्वक विक्षेप ह्मणतां । तरी ईश्वरा येईल बद्धतां । किंवा कार्यकारणता । होईल नियम ॥ १६ ॥ प्रश्न ६ ॥ एवं शास्त्रावरील प्रश्न । आतां क्रियेमाजी करितों कथन । लयचिंतनांत कार्यकारण । वेदांती गमापूर्वक सृष्टी ॥ १७ ॥ याचा भाव ऐसा पाही । किं आकाशादिक क्रम सृष्टींत सत्य नाहीं । लय चिंतनार्थ लव-लाही । बोलिला सकल ॥ १८ ॥ नियमित न होय ध्यान । वस्तुतंत्र असाया कारण । ऐसें ह्मणावे तंव पृथ्वी स्थान । मानुनी गगन लय चिंत-

न घडे न कां ॥ १९ ॥ वायुमाजी जल लय चिंतता । तरी कवण हेतु चुके तत्वतां । शास्त्रेचि शास्त्रीय फळनिर्मितां । तरी शास्त्रे शशश्रृंग ह्मणतां मिळे काय ॥ २० ॥ आत्माकार करितां वृत्ती । ते देशबंधे कीं अबंधें स्थिती । प्रथम पक्षीं जैन मत प्राप्ती । आणि द्वितीय पक्षीं सुषुप्ती होईल ॥ २१ ॥ किंवा प्रथम पक्षीं सर्वथा धारणा । सदा समाधी सविकल्पपणा । द्वितीय पक्षीं अर्धसाक्षात्कार अर्धभावना । राहिल व्यापकत्व गुणादिकांचे ॥ २२ ॥ योग गतीचा पुनः प्रश्न । किं उत्क्रांती श्रुती सांगे प्राणीं मन लीन । आणि रजो समष्टि होय प्राण । वेदांत मत ॥ २३ ॥ योगी प्राण त्याग करितां । प्राणाचा लय तेथ धरितां । तरी ब्रह्मलोकीं जाणें तत्वतां । घडेल कैसें तयाते ॥ २४ ॥ कारण योगीगम्य ब्रह्मलोक केवळ सत्व । तेथ प्रवेशेल कंवी प्राणरजस्त्व । आतां अंत:करणी प्राणलीनत्व । अंगिकारावे जरी ॥ २५ ॥ तरी आधी येईल श्रुती विरोध । आणि अंत:करण सत्व भूतसमष्टि प्रसिद्ध । प्राण निमित्तावीण शुद्ध । गती नाहीं तयातें ॥ २६ ॥ स्वप्नीं बाहेर न जाये मन । याचें हेंचि बोलिलें वेदांती कारण । तेव्हां योगियासी ज्ञानावीण । होईल मुक्ति वाटते ॥ २७ ॥ गुरूंचे प्राण कोठें न जाती । जेथीच्या तेथें लीन होती । ऐसे ह्मणे मात्र श्रुती । आणि अंत:करणीं प्राण लयेप्राप्ति तोंचि होय ॥ २८ ॥ तरी मग ज्ञानाचे काय कारण । आतां पुढेंही ऐकावा प्रश्न । जेणें चळे हृदय भिन्न । मूढांचे होय ॥ २९ ज्ञान समाधींत कीं होय व्युत्थानीं । प्रथम पक्षीं शिष्य बोध समयीं गुरू अनुभव खाणीं । द्वितीयापक्षीं भूमिकारोहणी । प्रयास व्यथा ३० किंवा प्रथम पक्षीं जगत्तत्व संपत्ती । आणि द्वितीय पक्षीं सर्वदा विवेक स्थिती । तेणें सांख्य मत वा जैनमत प्राप्ती । परी वेदान्त संविती न घडे ॥ ३१ ॥ एवं केलिया प्रश्ना स्वभावें । उत्तर कदंबे सन्मानावें आळंदीवल्लभे करुणार्णवें । पूर्वीच दिधले उत्तर यांचे ॥ ३१ ॥ याचे उत्तर आहे वेदान्ती । परी शाब्दिका मात्र भ्रांती । श्रीज्ञानेश्वर कृपामूर्ती । अनुग्रहावीण ॥ ३३ ॥ ह्मणोनी तयां भगवंताचें स्मरण । तोचि हितप्रद आज्ञाकारण । श्रीज्ञानराज अभिधान सदा अंत:करण जपो ॥ ३४ ॥ ज्ञानेश्वरकृपा प्रसादे ओवी छंद्बद्ध द्वितीय प्रश्न कदंबः ॥

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

रा० रा० मुळे मास्तर यांचे चरणीं चि. गुलाबचा सा. न. वि. वि. रा. पाध्ये येथें आले होते, तेव्हां त्यानीं प्रश्न कदंब कशा करितां लिहिला असें विचारलें होतें, त्याचें कारण आतां मी लिहितों. सर्व धर्म व भक्ति न मानून वेदान्ती म्हणविणाऱ्यांची परीक्षा पाहण्या करितां हा मी प्रश्न कदंब लिहित आहे. तो मराठींत लिहिण्याचे कारण असे कीं, संस्कृत वेत्ते वादामध्यें जी लबाडी करितात ती त्यांनां करतां येऊं नये. मला या प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रसंग आल्यास, मी तुकाराम बोवाचे अभंगानें सुद्धां देईन. पुष्कळ संस्कृत वेत्त्यानीं बोलतांनां मला ज्या शिव्या दिल्या आहेत, त्यामुळें त्यांच्याशीं बोलण्याचा मला कंटाळा आला आहे. भगवान् श्रीमच्छंकराचार्य स्वत: अनुभव स्वरूपच होते, परंतु वादी कोणी त्यांनां अनुभवी भेटला नाहीं. माझ्या प्रश्नांचे उत्तर मराठींत दिले पाहिजे. मला संस्कृत येत नाहीं. आतां तृतीय कदंब लिहितों.

# प्रश्न कदंब ३ रा.

नमामि सद्गुरुं शांतं सच्चिदानंद विग्रमं ।
पूर्ण ब्रम्ह परानंदमीशमालंदिवल्लभम् ॥१॥

ओव्या:—जय जय सद्गुरु आळंदिनाथा । जय जय सद्गुरु करुणावंता । जय जय सद्गुरु अनंता । भक्तवत्सला ॥ १ ॥ माझा न वाढवितां गर्व दारुण । मम लेकराचा धरोनि अभिमान । मूर्ख साधूंचे कराया कंडण । प्रश्न कदंब चालवा पुढें ॥ २ ॥ तयाची फजिती करूं आह्मीं । हे बोलिले शान्तही तुकाराम स्वामी । "तोंवरी तोंवरी माळा मुद्राचे भूषण-जंव तुकयाचे दर्शन झाले नाहीं" । हेही अनुगामी बोलणें त्यांचेचि ॥ ३ ॥ आणिकही एक विचार । जो या प्रश्नांचे देईल उत्तर। तया आपुला मित्र । मानीन सत्संगति साठीं ॥ ४ ॥ उत्तर न देतां कोणी । तरी उगाचि राहीन तुमचे भजनीं । संस्कृत ज्ञानीही हे कदंब

वाचुनि । मज कळावे म्हणूनि उत्तर प्राकृतांत गाये ॥५॥[ प्रश्न १] अहो वेदान्ताचिया पोटीं । क्रमीं कीं युगपत् सृष्टि । लय चिंतनार्थ शेवटीं । बोलिला क्रम हें बोलावें ॥ ६ ॥ ध्यानाचा नियम नाहीं । ध्यान भलते भलते ठायीं । ह्मणोनि कार्यकारणता नाहीं । परस्पर भूतांची ॥ ७ ॥ तरी पृथ्वीचा आपांत । लय क्रम कां शास्त्र बोधित । पृथ्वीचा वायूंत वा आकाशांत । कां न बोधी ॥ ८ ॥ एवं अग्नीचा आकाशांत । आकाशाचा पृथ्वींत । आपाचा वायूंत । कां न सांगत लय श्रुति ॥ ९ ॥ वृत्ति इष्ट आहे लय । या लागीं अदृष्ट शास्त्र प्रमाण शंका नये । [प्रश्न२] उत्पत्तिक्रम ह्मणतां विपाये । तरी क्रम भेद श्रुतींत कां ॥ १० ॥ ( प्रश्न ३ ) दृष्टिसृष्टिवादें युगपच्छुष्टि । ह्मणणें मात्र सोपे ओठी । अदृष्टाची कवण सृष्टि । सांगावी लागेल ॥ ११ ॥ पूर्वी जन्मीं कर्म केले । ते जरी ज्ञात सत्ताक जाहले । तरी करतांचि नाश पावले । मग फलावसायी कैसे ते ॥१२ ॥ उत्तर जन्मारंभक फलाव-सायी ह्मणतां । तरी तयासी येईल अज्ञात सत्ता । मग सत्तात्रयवाद सर्वथा । पडेल गळा ॥ १३ ॥ ( प्रश्न ४ ) पुन: वेदान्तीं जगदाभास । ब्रह्माचा विवर्त मायेचा परिणाम विशेष । परी परिणामाचे लक्षण नि:-शेष । बोलिले ऐसें योगवासिष्ठीं ॥ १४ ॥ एकवेळ झालिया अवस्थां-तर । पुन: पूर्व अवस्था नये साचार । याचाचि नांव परिणाम सुंदर । हे निर्वाण प्रकरणीं पाहावी व्याख्या ॥ १५ ॥ एवं मायेचा परिणाम विश्व ह्मणतां । तरी तथासी प्रलयीं न यावी पूर्वावस्था । प्रलयांत माया लीन जगत् न मानतां । तरी ज्ञानावीण मुक्तता होईल सहज ॥१६ प्रलयीं मायेंत मानतां लीन । तरी जाईल जगाचे माया परिणाम पण । जयासी वाटे शब्दार्थ आहे भिन्न । त्यानें दुसरा ग्रंथ करावा ॥ १७ ॥ ( प्र० ५ ) मायेचे नाहींत तुकडे बहुत । मायारंभवाद नाहीं वेदान्तांत । जगत् मानतां मायाविवर्त । तरी चैतन्य व्यर्थ होईल कीं ॥१८॥ माये वांचून ब्रह्माचा । विवर्त नुपजे साचा । तोचि विवर्त होता मायेचा । तरी ब्रह्माचा अन्यथा सिद्ध भावो ॥ १९ ( प्र० ६ ) यावरी उत्तर देतील कोणी । कीं कार्यकारण न सांगे वेदा-न्तवाणी । आवरण शक्ति जीवस्थानीं । विक्षेप शक्ति जगन्मात्र ॥ २०

तरी हेही बोलणें भार्या मोहक । विक्षेप शक्ति मात्र जगत् सम्यक् । मानतां लय चिंतनीं सुरेख । कारण विपर्यय कां न साहे ॥ २१ ॥ (प्र० ७) विक्षेष होईल आवरणाविण । तरी सकळ वेदान्तपक्षा दूषण। विशेप अपेक्षील आवरण । तरी वाक्यवृत्तिकार पक्ष दूषित ॥ २२ कार्यकारणचि वेदान्ति नाहीं । तरी समन्वयाध्याय वृथा सर्वही । तटस्थ लक्षण लवलाही । जन्मादि सूत्रांतील वृथा ॥ २३ ॥ तटस्थ लक्षणाविण । केवल मानतां स्वरूपलक्षण । तरी वृत्तिचे न व्हावे व्युत्थान । अदृष्ट संभोगादिक वृथा ॥ २४ ॥ [प्र० ८] ह्मणेल ज्ञानिया अदृष्ट नाहीं । तरी गुरुसंप्रदाय वृथा सर्वही । अदृष्ट आहे ह्मणता ठायीं । कारणत्वें अपेक्षा तटस्थ लक्षणाची ॥२५॥ [प्र० ९] समन्वया-ध्यायीं अंगुष्ठ मात्र पुरुष । नेत्रीं बोलिला जो ध्यान विशेष । तें ध्यान करतां भावना शेष । कवणे परी पैं उमटे ॥ २६ ॥ अंतःकरणांत प्रति बिंबे ध्यान । तरी जीव प्रतिबिंब नष्ट न व्हावे त्यांतून । एका उपाधींत मानतां प्रतिबिंब दोन । तरी जड पूर्ण होईल ध्येय ॥ २७ ॥ ध्यान-करतां जीव नष्ट । होईल तरी ध्यान कनिष्ठ । ज्ञानाविणाचि स्पष्ट । होईल मोक्ष ॥ २८ ॥ ( प्र० १० ) ॥ अवच्छेदवादें पाहतां । बुद्धीनें ध्येयावच्छेद होता । तरी जीवावच्छेद सुटेल तत्वता । मग होईल मुक्त-ता ज्ञानाविण ॥ २९ ॥ उपाधि मध्य ठेवितां जाण । तरी ध्यानचि होईल अध्यान । आभासवादीं दोष जाण । प्रतिबिंबा सारखे ॥ ३० ॥ (प्रश्न ११ ) प्रतिबिंब पाठी ह्मणोनी । बिंब ध्येय न होय अंतःकरणीं । ध्यान प्रतिबिंब होता चक्रपाणि । तरी जीव झालिया वांचुनि राहेना ॥ ३१ ॥ (प्रश्न १२ ) अवच्छेदवादीं प्रतिबिंबवादी । दोष हे बोलिलेचि आधीं । ईश्वराची न होतां ध्यान सिद्धी । तरी भक्ति आदि होतील वृथा ॥ ३२ ॥ ( प्र० १३ ). आतां ऐसे ह्मणेल कोणी । कीं आम्ही अहं-ग्रहाचि मानतो ध्यानीं तथापि प्रथम ईश्वर बुद्धींत घेऊनी । नंतर अहंग्रह तेथ होय ॥ ३३ ॥ ऐसे न मानितां होईल जीवोपासना । ती तवं श्रुति विरुद्ध जाणा । दृष्टिसृष्टिवादीं ही स्वप्रकल्पित ईश्वरोपासना । परी जीवोपासना बोलिली नाहीं ॥ ३४ ॥ आणि ईश्वर प्रथम बुद्धीत मानोनि अहंग्रह ह्मणतां तरी पूर्वोक्त दोष येती सर्वथा । ( प्र० १४ ) अहंग्रहासी

आवश्यकता । प्रणवोपासनेची ॥ ३५ ॥ प्रणवाचे पाद कल्पोन । जैसे घडे प्रविलापन । तैसे रामकृष्णनामे करून । कां न होय ते सांगां ॥३६॥ यद्यपि रामतापनीयादिग्रंथीं । बोलिली आहे नाम पाद स्थिती । तथापि तेथही विलापनाप्रति । प्रणवापेक्षा बोलिली कां ॥ ३७ ॥ प्रणवापेक्षा मानतां । तरी ध्याना नियम येईल तत्वता । मग सृष्टी क्रमा नियतता ! तेणें सांख्यवाद प्रवेश हळुहळु ॥ ३८ ॥ ( प्र० १९ ) कलिसंतरणादिक श्रुति । प्रणवादिक कां नाम सांगती । हे ज्ञानियास पुसिले आता भक्ताप्रति । पुसतो तेही सांगावे ॥ ३९ ॥ भक्ति ह्मणजे देव विषयक । जो कां होय रसातिरेक । ऐसेचि ह्मणती सकळिक । भक्तिवेत्ते ॥ ४० ॥ तो ही विशेषे शृंगार । संभोग वा विप्रलंभ सार । हा धरूनि तयांचा आधार । द्यावे उत्तर प्रश्नांचे ॥ ४१ ॥ ( प्र० १ ) श्रीविष्णुभागवतीं एकादश स्कंधीं । भक्तिरहस्य चवदाव्या अध्यायामधीं । त्यांत देवाचे हास्य ध्यान आधीं । बोलिले श्रेष्ठ ॥ ४२ ॥ ते हास्य ध्यान करिता । हास्य रसाविष्ट होये कीं न होय ध्यातां । प्रथमपक्ष अंगिकारिता । तरी समाधींत सर्वथा विप्रहास्य ॥ ४३ ॥ हास्य रसाविष्ट ध्याता होईल । तरी शपथचि रसास्वादांत पडेल । न होय ह्मणता कोणताहा होईल । ध्यात्याचा रस ॥ ४४ ॥ एकावेळीं दोन्ही रस । योग्य न होती समाधीस । ध्यानें तंव उमटे रस । हेंहि एक विरुद्ध ॥ ४५ ॥ वचनेंचि रस उमटत । ध्यानें उमटिले हे न सांगे कोणी ग्रंथ । एवं विहरण ध्यानादि कीं निश्चीत । प्रश्न अनंत हे असती ॥ ४६ ॥ ( प्र० २ ) भक्तिशास्त्रीं याचे उत्तर । आहे ते मज मिळावे समग्र । वेदान्त भक्तीचा निर्धार । करोनिया ॥ ४७ ॥ भक्ति करता वा वेदान्त वाचितां । या गोष्टी कळल्याविण नाहीं मुक्तता । ह्मणोनि माझी विनंति सकळ पंडिता । संदेह तत्वता फेडावा ॥ ४८ ॥ यांचे वेदान्तीं आहे उत्तर । ऐसे विश्वासे माझे अंतर । परी निवडोनि सांगावे तुम्हीं चतुर । प्रीतीते प्रीति वाढवावया ॥ ४९ ॥ श्रीज्ञानेश्वर सद्गुरुस्वामी । त्याविण कोणीं ही संदेह ऊर्मी । वारू न शके यास्तव आह्मी । तच्चरणानुगामी सदा व्हावे ॥ ५० ।

इति श्रीज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवी छदंबद्धे तृतीय प्रश्न कदंब संपूर्णः ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# प्रश्न कदंब ४ था.

जयजय सद्गुरु करुणाघना । जयजय सद्गुरु मनमोहना । जयजय सद्गुरु कल्याण निधाना । आळंदीपते ॥ १ ॥ आतां चतुर्थ कदंब पूर्ण । श्रोते परिसोत सावधान । विश्वरूप पाहों ह्मणतां अर्जुन । दिधले दिव्य नयन भगवंतें ॥ २ ॥ ते दिव्य नयन ह्मणजे काय । योगजन्य कीं ज्ञानजन्य होय । योगांत चित्तनिरोध स्वयें । विराट धारणा घडेना ॥ ३ ॥ किंवा चित्त निरोध झाला पूर्ण । तरी समाधींत हारपे मन । भयें व्याकुळ अंत:करण । ऐसें अर्जुन बोलिला ॥ ४ ॥ ह्मणून विराट धारणा केली । तरी ध्यात्याची ध्येयाकारता झाली । तेव्हांचि दिसेल वहिली । विश्वरूपता।५। तेणें माझें ह्मणावया। पुढती न फावेल पार्थराया। आतां ज्ञानमय दृष्टि तया । जरी ह्मणों ॥ ६ ॥ तरी हे उपसंहरी आतां । इत्यादि भीतोक्ति श्लोक वृथा । ब्रह्माची सर्वत्र समता । ह्मणोनियां ॥ ७ ॥ ह्मणाल कीं समाधीवीण । धारणा ध्यानीं माझेपण । तरी मृदुमध्यवें[illegible] । न होय दर्शन सर्वथा ॥ ८ ॥ विश्वरूप देखिलें दिठी । [illegible] कथा आहे गोमटी । यालागीं कवण योग परिपाटी । उकलावी ॥ ९ ॥ (प्रश्न २) सत्वरजस्तम साम्यावस्था । प्रकृति वा माया मान्य सांख्य वेदान्ता । परी हे अघटमान गा सर्वथा । वाटत कीरू ॥ १० ॥ स्थूल सूक्ष्म देह वियोगें । ज्ञानाचीया अप्रसंगें । सुषुप्ती कारण देह अंगें । होणें असे ॥ ११ ॥ तया कारणाच्या ठायीं । सत्वाचें लक्षण कवण देहीं । सत्ववृत्तीविण नाहीं । आणि वृत्ति तंव परिणाम अविद्येचा ॥ १२ ॥ परिणाम परिणामीचे स्थानीं । साम्यावस्था म्हणतां क्षणीं । कार्यकारणा अनुगुणी । होईल नाश ॥ १३ ॥ सुषुप्तीमाजी सुख । तेंचि साम्यावस्थागत सात्विक । म्हणतां होतील एक । निद्रा समाधी ॥ १४ ॥ किंवा आवरण विक्षेप भेदा । जे वेदान्तीं महाविधा । तियेते येईल बाधा । परिणत परिणामी साम्यानें ॥ १५ ॥ [प्रश्न ३] विक्षेपरूप माया । येईल आवरण कराया । तरी

जीवपण ईश्वरा या । न चुकेल सहज ॥ १६ ॥ आवरण विक्षेप होतां। तरी अवचट बद्धही सृष्टि कर्ता । दोन्ही अंश भिन्न कल्पितां । साम्यावस्था आटली ॥ १७ ॥ (प्रश्न ४) आणिक एक अनुभवें । साचची उत्तर देयावें । आत्माकार मन करितां वरवें । तें प्रदेश उपजवी कीं नुपजवी ॥ १८ ॥ चैतन्यासी प्रदेशकरण । हा तंव वृत्तीचा स्वभाव पूर्ण । यद्यपि आभास व्याप्तीवीण अंत:करण । आत्माकार होय तथापि प्रदेश संपादन । चुकेना ॥ १९ ॥ प्रदेश संपादितां वृत्ति । सकलाध्यास निवटावा कवणे रीती । निवटलियाही पुढती । प्रदेशाध्यास न जाय ॥ २० ॥ म्हणोनि विवेक करावा कैसा । हाही एक प्रश्न आपैसा। ( प्रश्न ५ ) आतां लय योगी सहसा । हाचि ठावो ॥ २१ ॥ कर्ता भोक्तादि अध्यास पंक्ति । सूक्ष्म देहाच्या प्रसिद्ध वेदान्ती । उकारमात्र निश्चिती । असे तेथ ॥ २२ ॥ ॐकाराचें करितां ध्यान । उकाराचे मकारीं विलापन । तें सूक्ष्म देह विलापे कर्तृत्वाध्यास पूर्ण । विलापल्या जाती ॥ २३ ॥ तेथ मकार तुर्यंत प्रविलापावया । कर्ता आणावा कोठूनिया । कर्त्याविण प्रविलाप मानताचिया । घडो नित्य मोक्ष विलापू ॥ २४ ॥ ( प्रश्न ६ ) अकार उकार मकारीं । विलापिता कारणा माझारीं। तेथ निद्रा वृत्ति निर्धारी । उपजे कीं नाहीं ॥ २५ ॥ कारण देहाची अवस्था सुषुप्ती । ते उपजली पाहिजे तयाचे संगती । उपजता मोडेल ध्यान स्थिती । मग प्रविलाप वृत्ति चालवावी कें ॥ २६ ॥ ( प्रश्न ७ ) म्हणाल परोक्ष निद्रा घेऊन । करितां येईल प्रविलापन । तरी अवस्थेचे परोक्ष ध्यान । सर्वथा न घडे ॥ २७ ॥ पूर्व देहाचा अभिमान त्याग । याचेचि नांव अवस्था प्रसंग । तो अपरोक्षाविण चांग । घडे कैसा ॥२८॥ ( प्रश्न ८ ) एवं शब्द ज्ञानिया। वाचा बळे जिंकावया । प्रश्न बोलिले आतां दंभिया । भक्तार्थही वदू ॥ २९ ॥ ईश निर्मित वस्तूच्या ठायीं । संस्कारे जीव वासना स्थायी । म्हणोनी रस लोपे नाहीं । स्थायी भाव लोपू ॥ ३० ॥ परि दृष्टिसृष्टिवादे भगवत्काया । भावनेविण सांपडे काह्या । तरी रसभेधे. लवलाह्या । स्थायी भाव वेधू घडेल ॥ ३१ ॥ तेणें हांसणें रडणें एक स्थिती । घडतां निश्चये मोडेल भक्ति । समाधीमाजीं एकाग्र वृत्ति । परी रसीं लागती भावनय ॥ ३१ ॥ ते समाधीं-

त घडती कैसे । एक लीन होतां रस नुमसे। म्हणता भक्ति समाधी नसे। तरी भागवतादि व्यर्थ॥ ३३ ॥ (प्र० ९) परस्पर परिणाम गुणांचा । कीं गुणी प्रधानाचा । प्रथमपक्षीं कारणाचा आटेल खेवो ।३४। द्वितीयपक्षामधीं । रज सत्व ते न होय कधीं । मग गोपी कामीं असुर क्रोधी । पावले मुकुंदी काय ह्मणूनी ॥ ३५ ॥ सत्वाविण राजस वृत्ति । पावविती जरी भगवंतीं । तरी इतर संसारी मरती । कवण हेतु व्यर्थेची ॥ ३६ ॥ वेदान्त भक्ति सागरीं । उत्तर रत्नें असती निर्धारीं । ती काढोनिया चतुरी । प्रश्न काचवटी लपवाव्या ॥ ३७ ॥ श्रीज्ञानराज श्रीगुरु । करुणानिधान धैर्यमेरू । माझे हृदयीं संशय पुरू । प्रश्ने न आणो ॥ ३८ ॥ श्रीज्ञानेश्वर नामे । विण जे ग्रंथ कामे । भरले तें अनुगामे । पुढील कदंबही ऐकोत ॥ ३९ ॥ आम्हा एका आळंदी रावो । प्रश्नोत्तरा समचि ठावो । कळता न कळता देवो । विसंबेचिना ४०

इति श्रीज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवी छंदबद्धे चतुर्थ प्रश्न कदंबः संपूर्णः।

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २५.

तीर्थस्वरुप आण्णासाहेब, मुळे, भालेराव, खापरे, पाध्ये, दिनकर इत्यादि मंडळीस सा. न. वि. वि. मी चार पांच पत्रे पाठविली पण त्यांचे कांहींच उत्तर आले नाहीं आपणा कोणास उत्तर द्यावयाचे नसेल तर मलाही पत्र पाठविण्याचे व्यर्थ श्रम नको. किंवा पत्रें पोष्टांत गहाळ झाली असल्यास मिळालीही नसतील तर कोण जाणें. ग्रहणामुळें या पौर्णिमेला चांद्रायण राहिले. शास्त्रीबोवाच्या प्रतिनिधी पत्राचे ही उत्तर नाहीं. व जैन संबंधी पत्राचे ही उत्तर आले नाहीं. प्रारब्ध प्रयत्न वादाचे नुकतेच पत्र आले होते. त्या संबंधांत माझें ह्मणणें असे आहे कीं प्रयत्न करणारा मनुष्य प्रयत्नाची दिशा जाणून असला

पाहिजे. एकाचा प्रयत्न जेव्हां दुसऱ्याच्या प्रयत्नाला ह्मणून पाडण्याचा प्रयत्न करितो तेव्हां तो प्रयत्न कलहात्मक होऊन दोन्ही प्रयत्न सफळ होत नाहींत आणि मग मनुष्य दैवावर येतो. प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे असेंच माझें मत आहे. प्रत्येकांनीं आपली स्वतंत्रता कायम राखावी. व दुसऱ्याच्या स्वतंत्रेला उपसर्ग लावूं नये ह्मणजे वैयक्तिक प्रयत्नापासून त्याला जय येतो. आतां नैसर्गिक प्रयत्नापासून जय मिळविण्याला तर प्रवृत्ति पक्षीं योगावाचून व निवृत्तिपक्षीं शमावाचून उपाय नाहीं. अमुक एका ठिकाणीं असलेली आसक्ति प्रयत्नानें सिद्ध होईल असे कोणीही प्रयत्नवादी म्हणत नाहीं. कारण आसक्तीचें स्वरूप निश्चित नसते. आणि आसक्तीनें तीव्र संवेगही सिद्ध होत नाहीं. कारण वृत्तीचा तीव्र संवेग अविद्या क्षोभावाचून आकाराला प्राप्त होत नाहीं. बालबुद्धीनें विचार केला असतां अविद्याक्षोभ संस्कारावांचून संभवत नाहीं. याचा प्रत्यय आपणास स्वप्नामध्यें येतोच. स्वप्नामध्यें भूतसंस्कार उपादान होऊन पदार्थांचा मध्यसंवेग दिसतो तसा कामक्रोधादि विकारांचा दिसत नाहीं. कदाचित् विकारांचा तीव्र संवेग झाला तरी तो प्रबल विकाररूपच होतो ह्मणजे एका जन्मांतील क्रोध दुसऱ्या जन्मांत अतिशय जोरदार होईल किंवा एका जन्मांतील प्रेम दुसऱ्या जन्मांत अतिशय होईल पण अदृष्ट विशेषाला तो प्रतिबंधक होत नाहीं. यद्यपि द्वेषापासून सर्प योनींत जातो असें म्हटलें आहे तरी केवळ द्वेषाचा तो परिणाम नव्हे कारण मनाचा तीव्र संवेग जर सृष्टि झाली असती तर त्या तीव्र संवेगी सृष्टींत मनच उरलें नसतें. परिणामी कार्यांत कारणाचे निःशेष अवस्थांतर होत असतें ह्मणून आतां मनाचा विवर्त तो तीव्र संवेग आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण ब्रह्मावांचून अन्य पदार्थांचा विवर्त वेदान्तांत स्वीकृत नाहीं. रज्जूचा विवर्त सर्प देखील रज्ज्ववच्छिन्न चैतन्यगत अविद्या क्षोभानें होतो. रज्जूशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. असें वेदान्ती ह्मणतात ह्मणून द्वेषजन्य अदृष्टानेंच सर्पयोनी प्राप्त होते. द्वेषानें नाहीं असें ह्मणावें लागतें. आतां दृष्टि सृष्टि वादावर या सिद्धान्तान्वयें अशी शंका येते कीं दृष्टि सृष्टि वादांत जगत् साधिष्ठान क्षणिक असल्यामुळें जरी

बौद्ध विज्ञान वादापत्ति येत नाहीं तरी क्षणिकाचे ठिकाणीं जन्मावांचून अन्य व्यापार संभवत नसल्यामुळें आणि कारण नाशापासून कार्याची उत्पत्ति मानली जात नसल्यामुळें प्रथमक्षणीं नष्ट झालेल्या अदृष्टापासून क्षणांतरीं फल कसें उत्पन्न होते एवढ्याकरितां अद्वैत सिद्धिकारानें दृष्टि सृष्टि वादांतही कारणात्मक जगत् स्थायी मानले आहे. परंतु त्यामुळें काय झाले हे त्यांना समजलें नाहीं. दृष्टि सृष्टि वादांत कारणात्मक जगत् स्थायी मानले ह्मणजे दृष्टि सृष्टि वादाचीच हानि होत असते कारण चैतन्यावांचून अन्य पदार्थाची अज्ञातसत्ता नाहीं हे दृष्टि सृष्टि वादाचे लक्षण सूत्र आहे पण कारणात्मक जगताची सत्ता स्थायी मानून अदृष्टाचीही सत्ता मधुसूदनानें दृष्टि सृष्टि वादांत स्थायी मानली आहे. त्यामुळें ब्रह्माची पारमार्थिक, कारणात्मक जगताची व्यावहारिक व कार्यात्मक जगताची प्रातिभासिक असा सत्वत्रयवाद मधुसूदनीय दृष्टि सृष्टि वादांत बळेच प्रविष्ट झाला परंतु ही मधुसूदनाची चूक नाहीं. खंडण मंडण करणाऱ्याचे असे निश्चयानें होतच असते. अद्वैतसिद्धि वादग्रंथ नसून जल्पग्रंथ आहे कारण न्यायामृताचे ते खंडण आहे म्हणूनच त्याच्यामध्यें कांहीं चुक्या झाल्या आहेत. या खंडण मंडण कारानीं पर शास्त्राच्या व्याख्या वेदान्ताला लावून पतिव्रतेला रंगभूमीवर नाचण्यास आणण्याची खटपट केली आहे. उदाहरणार्थ कांहीं ग्रंथकाराचीं चेतनाची व्याख्या पहा "तेजो भिन्नत्वे सति प्रकाशकं चेतनं" टीका:- तेजसि अतिव्याप्ति वारणाय तेजो भिन्नत्वे सति इति चेतनेतिव्याप्ति-वारणाय प्रकाशकमितिपदं । वृत्तावति व्याप्ति वारणाय चेतनमित्युक्तिः। या परिष्काराचे खंडण असे:—यतस्तेजसो चिद्व्यावृत्तिरपेक्षिता किं तत्तेजो वेदान्तसंमतमुतन्यायसंमतं ? नाद्यः सिद्धसाधनात् । न द्वितीयः भास्वरशुक्लरूपे तेजोगुणे एव अतिव्याप्तिः—- ( खंडण स्वकृत ) भावार्थ—तेजोभिन्न प्रकाशकाचे नांव चेतन आहे. तेजाचे ठिकाणीं अतिव्याप्ति येऊं नये म्हणून तेजोभिन्नत्वेसति असे पद घातले आहे. चेतनाचे ठिकाणीं अतिव्याप्ति येऊं नये ह्मणून प्रकाशक असे पद घातले आहे कारण ब्रह्मचैतन्य सत्तास्फूर्तिदायक आहे व साक्षीचैतन्य प्रकाशक

आहे. अद्वैतकौस्तुभांत वृत्ति ही विषयाभिव्यंजक मानली आहे. तिचे ठिकाणीं अतिव्याप्ति होऊं नये म्हणून चेतन पद घातले आहे पण हे लांबलचक लक्षण व टीका व्यर्थ झाले आहेत, कारण या ठिकाणीं तेजाचे जे ग्रहण केले ते काय वेदान्त संमत की न्याय संमत ? प्रथम पक्ष अंगिकारल्यास सिद्ध साधन आहे. कारण वेदान्तामध्यें ब्रह्म भिन्न सर्व पदार्थ कल्पीत आहेत हे पूर्वीच सिद्ध झाले आहे. आतां नैय्यायिकाला समजून देण्याकरितां हा परिष्कार आहे म्हणावे तर वेदान्त संमत तेज ग्रहण करण्याचे कांहीं प्रयोजन नाहीं. कारण साधक अंश गुरु शिष्यांनां संमत असला पाहिजे. हे वेदान्त माह्य तेज नैय्यायिकांना संमत नाहीं म्हणून नैय्यायिकांचे तेज या परिष्कारकाराला अभिमत आहे असें म्हटलें तर तेजाचे ठिकाणीं असलेल्या भास्वर शुक्ररूपावरच याच्या लक्षणाची अतिव्याप्ति होते. टीकाकार अगदीं गाढव आहे कारण परिष्कारांत चेतनाचे लक्षण केले आहे म्हणजे लक्ष्य 'चेतन' आहे व 'तेजोभिन्नत्वे सति प्रकाशकं' हे लक्षण आहे. टीकाकारानीं तर लक्ष्य पदाचा देखील वृत्तिवरील अतिव्याप्ति वारणाकडे उपयोग केला आहे तेव्हां परिष्कारांतील लक्षण कोणाचे समजावे ! शून्याचें कीं भूताचे ? कारण गोत्वपदाचा जर गोलक्षणामध्यें अशी विचित्र व्यवस्था लागेल तर मग लक्ष्य विधायक पद वाक्यांत न राहिल्यामुळें जी गाईची स्थिति तीच विचाऱ्या चेतनाची झाली आहे म्हणून या ग्रंथ करणारास लक्षण करावयाचा प्रसंग आल्यास असें लक्षण करावें लागणार— " तेजोऽन्यत्वे सति तद्वृत्ति भास्वर शुक्ररूपान्यत्वे सतिच तैजसांतःकरण भिन्नं तद्वृत्ति वृत्तिमत् प्रकाशकं चेतनं ( स्वकृत ) अर्थ - तेजाहून निराळे असणें. वृत्ति म्हणजे ठिकाणीं, संबंधीं. हा वृत्ति शब्दाचा साधारण अर्थ आहे. तद्वृत्ति म्हणजे तेजाचे ठिकाणीं असलेल्या भास्वर रूपाहून निराळे असणें. अंतःकरण तैजस आहे म्हणून तेही तैजस आहे. पण ते वेदान्त संमत असल्यामुळें त्याहूनहि निराळे असणें हे एक पद लक्षणांत पुनः घातले. तद्वृत्ति म्हणजे अंतःकरणाचे ठिकाणीं असलेली जी वृत्ति असा मतुप् प्रत्ययाचा अर्थ आहे. 'प्रकाशकम्' येथपर्यंत लक्षण समाप्त केले आहे व चेतन लक्ष्य पद शेष ठेवले आहे म्हणून

सध्यां तरी मी केलेल्या परिष्कारांत कोणताही दोष नाहीं. परंतु अशा प्रकारचीं लक्षणें करून वेदान्ताचा थांव निश्चयानें लागावयाचा नाहीं. कारण ब्रह्म लक्षणाकार वृत्ति ह्मणजे ज्ञान किंवा लक्ष्याकारवृत्ति ह्मणजे ज्ञान ? असा, अशा प्रकारच्या सर्व ग्रंथकारांना प्रश्न विचारतों. आणि त्या ग्रंथाचे अध्ययन करणारे जे आतां कोणी असतील त्या सर्वांनीं एकत्र मिळून या प्रश्नाचे उत्तर द्यावे अशी मी इच्छा करितों. कारण ब्रह्मलक्षणाकारवृत्ति ज्ञान ह्मटल्यास योग्य होणार नाहीं कारण एक प्रकारच्या परिष्कारांत केलेले लक्षण अन्य प्रकारच्या परिष्कारांत केलेल्या लक्षणानें खंडीत होईल. आतां एक प्रकारच्या परिष्काराच्या लक्षणांत कोणी व्यभिचार काढणार नाहीं असेही ह्मणतां येत नाहीं. कारण तसे असते तर न्यायामृताचे खंडण अद्वैतसिद्धींत; अद्वैतसिद्धीचे खंडण तरंगिणींत; तरंगिणीचे खंडण ब्रह्मानंदींत, खंडण खंडखाद्याचे खंडण खंडणोद्धारांत इत्यादि ग्रंथ निर्माणच झाले नसते. द्वितीय पक्षही बरोबर नाहीं. कारण लक्ष्यत्व लक्षणसापेक्ष आहे आणि ब्रह्माचे ठिकाणीं लक्ष्यतावच्छेदक समनियतत्व धर्महि राहूं शकत नाहीं किंवा लक्ष्याकारवृत्ति ज्ञान मानल्यास एकवेळ ब्रह्मज्ञान झाल्यावर त्याचा नाश होणार नाहीं आणि तसे मानणें तर वेदान्तास अनिष्ट आहे. जो जो वेदान्ती आहे व ज्यानें ज्यानें वेदान्ताचे अध्ययन गुरु जवळून प्रेमानें केले आहे, त्या त्या महात्म्याला निश्चयानें वेदान्तास ब्रह्मज्ञानाचा नाश संमत आहे असें ठाऊक आहे. बरें, तेवढ्याच लक्षणानें एकास ज्ञान होईल व दुसऱ्या परिष्कारानें दुसऱ्यास ज्ञान होईल. वेदान्ताच्या भिन्न प्रक्रिया असल्यामुळें असें कोणी उत्तर देईल ते बरोबर नाहीं कारण पूर्व लक्षणांत व्यभिचार शेष राहिल्यामुळें त्या लक्षणानें मिथ्याज्ञान होईल. मिथ्या ज्ञानानें जर अज्ञानाची निवृत्ति होईल तर संसारानेंच अज्ञान निवृत्ति कां होऊं नये कारण तेही मिथ्या ज्ञानच आहे. यद्यपि ब्रह्मज्ञानहि मिथ्या आहे तथापि अनिर्वचनीयत्व सादृश्यास्तव मिथ्या आहे लक्षण सादृश्यास्तव मिथ्या नाहीं. आणि लक्षणसादृश्य मिथ्या ज्ञान जर या सर्व परिष्कारकारांनां संमत असेल तर सांख्याच्या प्रधानाचे अशब्दत्वाद्यधिकरणांत

निराकरण केले तें व्यर्थ होईल, कारण ब्रम्हाचें जें जगज्जन्मादिमत्वादि तटस्थ लक्षण त्याचें मिथ्या सादृश्य प्रधानाचे ठिकाणींही घटत आहे. चमत्कार तर एकापेक्षां एक विशेष जाणवीत असल्यामुळें अद्वैत वेदान्ताचे अत्यंत प्रतिपक्षी आहे. ह्मणूनच आह्मी वेदान्ती चमत्काराचा खेटर मारून निषेध करीत असतो. शिवाय चमत्कार जसें हिंदु साधूनीं दाखविले आहेत तसें बौद्ध, मुसलमान, जैन साधूनींही दाखविले आहेत अशा त्या धर्मात कथा आहेत व त्या त्या धर्मात आतां साधु आहेत. हिंदु धर्मात जैन देवाला पळविण्याच्या कथा आहेत तर जैन धर्मातही हिंदु देवानां पळविण्याच्या कथा आहेत. हिंदु धर्म तंत्र शास्त्रांतील मंत्र जे कार्य करितात तेच कार्य जैन शास्त्रांतील मंत्रही करितात. आणि पातंजल योगशास्त्रानीं ज्या सिद्धी प्राप्त होतात त्याच सिद्धि हेमचंद्रांनीं केलेल्या योगशास्त्रांतील योगानेंही प्राप्त होतात ह्मणून चमत्कारानें कोणताच निश्चय होत नाहीं. शिवाय चमत्कारानें धर्म निश्चय करणें ह्मणजे चार्वाक मताचा आश्रय करून प्रत्यक्ष प्रमाणानें धर्म निश्चय करण्यासारखेंच आहे किंवा चमत्कार दर्शन प्रति पुरुष भिन्न असल्यामुळें त्याला चार्वाकाच्या प्रत्यक्ष प्रमाणा इतकीही स्थायिता नाहीं. मग अन्य प्रमाणा इतकी कोठली? एवढ्या करितां सर्वज्ञोक्त लक्षण सदृश मिथ्या ज्ञानानें अज्ञान निवृत्ति मानणें ही समीचीन होत नाहीं. शिवाय वेदान्तांत प्रक्रिया नाना आहेत असें ह्मणण्याचे तात्पर्य लक्षण कसेंही करावें असें ह्मणण्यांत नाहीं; तर शिष्योपाधि भिन्नत्वानें अभ्यास भिन्नत्व आहे असें ह्मणण्यांत आहे. तात्पर्य दुसऱ्या शास्त्राचे परिष्कार खरें मानून विचार केल्यास वेदान्त मननान्तच राहतो निदिध्यासापर्यंतही जात नाहीं मग साक्षात्काराची गोष्ट निराळी. सर्वदा मननान्त असणें हे वेदान्तास महादूषण आहे आणि निदिध्यासितव्यः या श्रुतीसही व्यर्थता येते. अन्यलक्षणावशेषत्व हेंच मननान्त राहण्याचे स्वरुप आहे. अशा प्रकारें वेदान्त मननान्त ठेवण्यापेक्षां सर्व ग्रंथ जाळून टाकणें उत्तम. यद्यपि मंतव्यः इत्यादि श्रुति आहेत त्यालाही वैयर्थ्य देऊं देणें कामाचें नाहीं तथापि निदिध्यास पूर्व मनन मानल्यानेंच त्या श्रुतीला सार्थत्व येते. परंतु सर्वदा मनना-

स वेदान्त मानल्यास निदिध्यासितव्य: हे श्रौत पद कधींच सार्थ होत नाहीं. एवढ्या करितां अद्वैत सिद्धी सारख्या जल्पग्रंथांतील दृष्टि सृष्टि वादाला मुळींच मातब्बरी नाहीं. व त्या मुळेच अप्रमाण वैकारिक तीव्र संवेगोपजीवी ह्मणजे ज्याला प्रमाण नाहीं अशा विकाराच्या तीव्र संवेगात ज्याची उपजीविका अवलंबून आहे त्या प्रयत्न वादाला व दृष्टि सृष्टि वादाला मातब्बरी नाहीं. योगवासिष्ठांत कृत्रिम अहिल्योपाख्यान आहे त्यांत जार जारिणी रूपानें एका ब्राह्मणाचे व राणीचे प्रेम वर्णिले आहे. त्या प्रेमानें जरी त्यांनां पति पत्नित्व आले तरी जारत्व पाप जन्य कीटकत्वादि योनि मिळाल्या वांचून राहिल्या नाहींत. ह्मणून संस्कारनिमित्तक किंवा विकारजन्यअदृष्टनिमित्तकतात्कालिक—कारणाविद्या—क्षोभजन्य--ज्ञानभिन्न--यावद्वृत्ति-स्थायी—ज्ञेयालाच दृष्टिसृष्टि ह्मणतात आणि त्या वादांत प्रयत्नवाद यावद्दृष्टी प्रत्यक्षत्वास्तव दैववादापेक्षां प्रबल आहे असे मी निश्चयानें ह्मणतो. हेच पाध्याचे पत्राचें मला सुचले तसें उत्तर दिले.

कर्मणाबाध्यतेबुद्धिर्नबुध्याकर्मबाध्यते ।
सुबुद्धिरपियद्रामोहैमंहरिणमन्वगात् ॥

हा श्लोक कशांतला आहे ? वाल्मीकी रामायणांतला असल्यास काव्यरूप आहे आणि वाल्मीकीची खुपी असें त्याचें उत्तर आहे व इतर ऋषींचा असल्यास जीवाला संसार निवृत्तिकडे लावण्या करितां आहे कारण अर्थ व काम दैवावर टाकून द्यावे असे स्पष्ट भारतांत ह्मटलें आहे. आर्षव्यतिरिक्त काव्यांतला हा असल्यास त्या कर्त्याच्या तोंडांत मारून असे उत्तर देतां येते कीं हे मूर्ख ! अशा प्रकारची वाल्मिकीच्या म्हणण्या प्रमाणें लीला करावी हे पूर्वीच ठरलें होतें ह्मणून तसें करण्याचा रामाचा प्रयत्न झाला त्या वरून तूं प्रारब्ध वादाचें अनुमान कसें करतोस ? 'न खलु पर तंत्रा: प्रभुधिय:' असें महिम्नांत ह्मटलें आहे व मोठ्यांची बुद्धि कधींही दुसऱ्याच्या स्वाधीन राहत नाहीं असा त्याचा अर्थ आहे. बस. पुरे बोलणें.

इति पत्रस्य प्रथम: खंड: याप्रमाणें पत्राचा बृहत्खंड संपला. आतां अणुखंड लिहितो :—

प्रत्यक्ष अनुमान उपमान व शाब्दही चार प्रमाणें गौतमानीं सांगितलीं आहेत. त्या चारप्रमाणावरच तत्वचिंतामणि नांवाचा गंगेशोपाध्यायानीं ग्रंथ लिहिला आहे व त्याच्यावरच गदाधरादिकांच्या टीका आहेत. ग्रंथ सर्व मिळून लक्ष श्लोक होतील इतका आहे. शंभर सव्वाशे किंमतही आहे, तो आणला आहे व वाचला आहे. परंतु त्यांत बुद्धीच्या अनुभव भागाचेच विशेषें करून वर्णन आहे. शिवाय असे ग्रंथ कितीही जरी लिहिल्या गेले तरी त्याचे दोन खंड अपुरेच राहणार! एका खंडाची फारशी जरूर नाही आणि शाब्द खंडाच्या विचारांत सिद्ध साधन आहे कारण वेद व यास्कापुढें याची मातब्बरी काय ? ह्मणून मला असें वाटतें कीं न्यायाचा विचार असा करावा. काल, मन, आत्मा, आकाश, बुद्धि, इच्छा, द्वेष, सुखदुःख, प्रयत्न, संस्काराचा भावना नावांचा भेद आहे तो, इतका भाग मानस शास्त्राकडे सोपवून देऊन पृथ्वी, आप, तेज, वायू व दिशा हे पांच द्रव्य, रूप, रस, गंध स्पर्श संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द आणि स्थीतिस्थापकता व वेग हे संस्काराचे भेद, उत्क्षेपण, अपक्षेपण, प्रसारण, आकुंचन व गति हे पांच कर्म इतक्याच्याच विचारानें भौतिक शास्त्र पुरे करावें. त्यांत स्पर्श, गंध आणि रस, इंद्रिय विज्ञान शास्त्रांत जाऊं द्यावे. संख्या, परिमाण, परत्व, अपरत्व हे गणीत शास्त्रांत जाऊं द्यावे. व बाकी सर्व भौतिक शास्त्रांत घ्यावें. आपली कल्पना सध्यां जरी बाल्यदर्शन आहे तरी टिटिभा प्रमाणें यत्न केल्यास असाध्य कांहींच नाहीं. प्रतिनिधी पत्राच्या सूचनेवरून सांगतों कीं मूलदेवतेचें मासिक पुस्तक सुरू झाल्यास त्यांतही असे लेख लिहण्यास बरें पडेल. तथापि येथेही उदाहरणार्थ थोडे लिहितो.

नव्या शिकलेल्या लोकांचें असें ह्मणणें आहे कीं हिंदुस्थानामध्यें परार्धाच्या वर गणीत करण्याची रीति नव्हती; पण हे ह्मणणें अगदीं चुकीचे आहे परार्ध ह्मटल्यानेंच दुसऱ्या पर संख्येचे अनुमान होत आहे. पुराणांत पर संख्या ह्मणून सांगितलीही आहे ती पुराणें वाचून पहावी. भागवताच्या दशम स्कंधांत वसुदेव स्तुतींत " नष्टे लोके द्विप-

राधीवसाने " असे वचन आहे या प्रमाणें परार्ध परार्धाला परसंज्ञा ह्मणतां येते. येथपर्यंत संख्येला संज्ञित्व आहे पुढें बौद्धार्थत्व आहे. एक पर दशपर इत्यादि पर पराला खवार्ध ह्मणून एक पर दशपर पर पर इत्यादि काला आरंभ करून शेवटीं तृतीय पर पर पर याला खव ह्मणता येते. या प्रमाणें कवचवादि संज्ञा केल्यास मनुष्याची पाठ शक्ति आहे तो पर्यंत कोणीही नाहीं ह्मणत नाहीं. पुढें बौद्धार्थत्व आहे हा एक स्वकृत संख्येंत विशेष सांगितला. आणखी एक स्वकृत विशेष सांगतो. संख्येला आनंत्य कधींच होणार नाहीं. बुद्धीला कितीही ती अगम्य झाली तथापि अनवच्छिन्न होणार नाहीं कोणत्याना कोणत्या तरी अपेक्षेनें तिला अवच्छेद राहिल. अशा स्थीतींत कोणी ह्मणतात बुद्धि कुंठित होते पण हे बुद्धीचें कुंठीत होणें नसून सामान्यांत प्रवेश करणें आहे संख्येला अनंत मानल्यास एवढ्या पुरता तरी सामान्यांत विरोध नाहींसा होत असतो असें मानावें लागते. कारण संख्यातत्व व अनंतत्व विरोधी आहे. आतां ज्या सामान्यांत विरोध नाहींसा होतो ते सामान्य अर्थातच वेदान्ताचे विषम सत्ता स्वरूप असले पाहिजे. कारण त्या वांचून विरुद्धैक्य संभवत नाहीं. सदृश गणिताचेही उदाहरण आपल्या मध्यें आहे. सदृश गणित ह्मणजे एकाद्या गोष्टीवरून एकाद्या स्थीतीचे अनुमान करणें. याला नवीन जडशास्त्रांतील उदाहरण देतो व नंतर जुनें उदाहरण देतो. जसें, ध्रुव किती दूर आहे तर प्रकाश जितक्या वेगानें जातो तितक्या वेगानें तेथे जाण्याला ५० वर्षें लागतात. इतका तो दूर आहे. ह्मणजे आज जर तो तारा आपल्याला दिसला नाहीं तर आज पासून ५० वर्षें पूर्वी तो नाहींसा झाला असें समजावें कारण ५० वर्षें त्याच्या प्रकाशाला पृथ्वीवर येण्याला लागतात. कोणी ह्मणेल ध्रुवाच्या ताऱ्या विषयीं ही गोष्ट नाहीं तर कदाचित् मला आठवत नसेल पण तसा एक तारा मी English Astronamy त नाहीं म्हणणाऱ्याला दाखवून देतो. हे असो. अशा प्रकारची काल गणनेची पद्धत आपल्या कडेही आहे.

वाप्य: पुनर्योजनविस्तृतास्ता: क्रोशंचगंभीरतयावगाढा: ॥
आयामत:पंचशताश्चसर्वा:प्रत्येकशोयोजनत:प्रवृद्धा: ॥३१॥

वाप्याजलं क्षिप्यतिवालकोटयात्वन्हासकृत्ताप्यथनद्वितीयम् ।
तासांक्षयेविद्धिपरंविसर्गसंहारमेकंचतथाप्रजानाम् ॥ ३२ ॥
महाभारत शांतिपर्व मोक्षधर्म अध्याय २८१.

अर्थ—उत्पत्ति पासून लया पर्यंतच्या सृष्टीच्या कालाला कल्प ह्मणतात. तो हजारो विहिरीच्या विस्तरावरून मोजतात. एक योजन रुंद, एक कोस खोल व ५०० योजन लांब अशी एक विहीर अशा हजारो विहीरी कल्पून त्यांतून दररोज एकच वेळ केसाच्या टोकानें घेतां येईल इतके पाणी काढून त्या कोरड्या करण्याला क्रमानें जितका वेळ लागेल तितके दिवसाचा एक कल्प समजावा अशी काल गणना जैन ग्रंथांतही लिहिली आहे. आमचे आधुनिक कदाचित आमच्या काल गणनेला हासतील तर अत्यंत अडाणी ५० वर्षानें येणाऱ्या प्रकाशालाही हासतील परंतु या काळ गणनेंत अनुमान साम्य आहे या वरून आपल्याला लहान मोठे गणीत कीति करतां येईल बरें ? भूमिति ह्मणजे देश गणितादिकांची व्यवस्था शुक्र नीतींत सांगितली आहे. आतां न्यायांतून आणखी काही Physics ची प्रकरणें सांगतो. Heat, light, and electricity हे तीन Science मध्यें निराळे मानले आहेत. आपल्याही मध्यें ते निराळे मानले आहेत. त्वगिंद्रिय मात्रग्राह्य उष्ण स्पर्श मानला आहे रूप चक्षुर्ग्राह्य मानलें आहे. रूप हे तेजाचा गुण आहे असे नैय्यायिक व वेदान्ती ह्मणतात व ते तन्मात्ररूप असल्यामुळें द्रव्य आहे असा सांख्याचा निष्कर्ष निघतो. तेव्हां सांख्याच्या मतानें रूपाला परमाणू आहेत प्रकाश हा सर्व रूपाचा मिळून झालेला आहे असे नवीन Science मध्यें ह्मटले आहे आणि न्यायामध्यें श्रेष्ठ जो तत्व चिंतामणि त्यांतही असें ह्मटले आहे कीं " आलोकस्योद्भूतरूपमपि व्यंजकं अन्वयव्यतिरेकात्—अर्थ—उद्भूतरूप प्रकाशाचेही व्यंजक आहे अन्वयव्यतिरेकास्तव घटादि विषयासी आलोकसंयोग प्रत्यक्षहेतु तत्वचिंतामणिकारानीं मानला आहे. न्याय मतांत गुणांचा संयोग होत नाहीं यामुळें प्रकाशही द्रव्यच न्याय मतांत अभिमत असले पाहिजे. न्याय मतांतील द्रव्य अणु संघटित असलेच पाहिजे. प्रकाश शुक्ल असतो या विषयीं " भास्वरं शुक्लंच तेजसि " हे वाक्य

स्पष्टच आहे. आतां प्रकाश त्या त्या आकाराचा होत असतो या विषयीं उपदेश साहस्रींत असे वाक्य आहे " व्यंजको वा यथालोको व्यंग्यस्याकारतामियात् " अर्थ—व्यंजक किंवा आलोक व्यंग्याच्या आकाराचा होत असतो. नवीन Science मध्यें प्रकाशाच्या दोन कल्पना आहेत. एक प्रकाश द्रव्य आहे अशी व एक प्रकाश लहरी आहे अशी परंतु त्या दोन्ही कल्पनेस परमाणु कल्पनेनें सोडलेले नाहीं. एकींत स्थूल द्रव्याची कल्पना आहे व दुसरींत Æther च्या परमाणूंची कल्पना आहे. Æther ला परमाणु मानल्याशिवाय कंपनच होणार नाहीं. Electron theory काढणाऱ्यानें देखील एक Atom पृथ्वी एवढा केल्यास एक Electron रबराच्या गोळ्या एवढे होईल असे म्हटले आहे तेव्हांहि Electron theory देखील सजातीय Atomic theory आहे असे म्हणण्यास हरकत नाहीं. वेदान्ताचा रूपासंबंधीं गुणवाद व सांख्याचा रूप द्रव्यवाद एकत्र केल्यास परमाणूंचे कंपन प्रकाश सिद्ध होईल पण या विषयीं ग्रंथच लिहिला पाहिजे. प्रकाशाच्या उलटण्याची कल्पना विष्णु पुराणांत आहे. " ये ये मरिचयोऽर्कस्य प्रयान्ति ब्रह्मणः सभां । ते ते निरस्तास्तद्भासा प्रतीपमुपयांति वै " भावार्थः—जी जी सूर्याची किरणे ब्रह्म सभेकडे जातात ती ती सभेच्या वलवत्प्रकाशाने कुंठीत झाल्यामुळें परतून येतात. यान्ति व प्रतीपमुपयान्ति या दोन पदावरून प्रकाशाची गति व किरणपरावर्तन Reflection हे आपल्याकडे ठाऊक होते हे सिद्ध आहे. न्याय शास्त्रांतहि प्रभा फैलण्या विषयीं कांहीं नियम आहेत. तमाला आलोकाभाव न्यायानें स्पष्ट म्हटले आहे व Science ने हीं म्हटले आहे. विवरण प्रमेय संग्रहांत व न्याय परिष्कारादिकांत प्रकाशाची पदार्थावरून उलटण्याची क्रिया प्रतिबिंब प्रक्रियेंत दिली आहे आणि कांच प्रकाशाला रोध करीत नाहीं असेंही स्पष्ट म्हटले आहे जसे " काचाद्यव्यवहितचक्षुःसंयोगोऽपिभवति तस्य प्रकाशरोधकत्वाभावात् " वेदान्ती वायुजन्य तेज आहे असे म्हणतात. कारणगुण कार्याचे आरंभक होत असल्यामुळें अर्थात प्रकाश, उष्णता हे तेजाचे धर्म वायूस्थ गति जन्य आहे असे म्हणण्यांत आमची कांहीं हानि नाहीं परंतु कित्येक

गति वाढविली तरी तिचा चक्षुष प्रकाशरूप परिणाम व त्वाच प्रत्यक्ष उष्णतारूप परिणाम कसा होतो हे मात्र Science ला सांगतां येत नाहीं. अन्वय व्यतिरेकानें ह्मणतां येत नाहीं. तैजस परमाणूच्या उपाधिमुळें म्हणून. गतीचा परिणाम उष्णता व प्रकाश आहे हे म्हणणें श्रद्धा मात्र आहे. विशिष्ट संख्या व गतीनें विशिष्ट प्रकाश उत्पन्न होतो असा हेतुही Science ला देतां येत नाहीं कारण प्रकाशांत ही गति अनुगत राहते म्हणून. शिवाय गति प्रकाशाचा आरंभक आहे, परिणामी आहे कीं विवर्त आहे ? हे आधुनिक जडशास्त्र वाद्यांना सांगितले पाहिजे कारण चवथ्या प्रकारचा कार्य कारण भाव जगांत उपलब्ध नाहीं व बुद्धींत येत नाहीं प्रथम पक्षवादी अंगिकार करील तर गति व प्रकाशाचा अर्थानच भेद सिद्ध होतो. दुसरा पक्ष अंगिकार करील तर प्रकाशाला गति राहणार नाहीं कारण परिणामीचे अत्यंत अवस्थांतरच परिणाम आहे तिसरा पक्ष अंगिकार करील तर वादीनें कोणता तरी उपाधि दाखविला पाहिजे. जो उपाधि वादी दाखवील तोच प्रकाश ह्मणणें बरें त्याहून गतिचा विवर्त प्रकाश कल्पण्यांत गौरव आहे आणि उपाधीला प्रकाश मानल्यास गति साहचर्याचीही हानि होत नाहीं. विशिष्ट गति प्रकाशाची अभिव्यक्ति करणारी आहे असे ह्मटलें ह्मणजे झालें. Science मध्यें अशी एक कल्पना केली आहे कीं सर्व रंग प्रकाशाचेच आहेत. वेदान्तामध्येंहि अशी कल्पना आहे जितके म्हणून रूपाचे प्रकार आहेत तेवढे सर्व तेजाचेच आहेत. यद्यपि अजाधिकरणामध्यें तेजाचे रक्तरूप जलाचे शुक्लरूप, पृथ्वीचे कृष्णरूप सांगितले आहे तथापि पंचीकरण क्रियेनें पृथ्वीजल प्रविष्ट तेजोवृत्ति रूपाचेच वर्णन आहे स्वयं पृथ्वीजल वृत्ती रूपाचे नाहीं. अथवा पृथ्वीजल वृत्तिरूप खुशाल असो पण तेथें वृत्ति सर्व रूप आहे कीं तेजाचे शुक्लरूप इतर सर्व रूपाचे अभिव्यंजक आहे. पुनः Science मध्यें एक कल्पना केली आहे कीं प्रकाशाचे किरण पदार्थावर पडले म्हणजे कांहीं किरणांचा त्यांत लय होतो व विवक्षित किरण वळून आपल्याकडे येतात पण लय द्रव्याचा होतो गुणाचा नाहीं. आणि प्रत्यक्षाला उद्भूत रूपत्व हेतु आहे. द्रव्याचा पदार्थामध्यें लय मानल्यास

जितके आपल्या डोळ्यावर किरण येतात त्यापेक्षां अनंतपट अधिक द्रव्याचाच एका पदार्थांत लय झाला पाहिजे व त्यामुळें त्या पदार्थाचें वजन प्रकाशांत वाढले पाहिजे व अंधारांत कमी झाले पाहिजे पण तसे कां होत नाहीं याला Science उत्तर देत नाहीं गतीचा तर लय संभवत नाहीं नाश संभवतो रूपांतरही संभवत नाहीं. कारण दोन अवस्थेमध्यें अनुगत होण्यासारखी गति नाहीं. ज्याचा प्रत्यय दोन अवस्थेंत अनुगत रूपानें येतो त्याचेच अवस्थांतर व रूपांतर संभवते एवढ्या करितां प्रकाशाला वजन नाहीं असे ह्मणेल तर Science /वर दुसरा एक प्रश्न येतो. प्रकाश द्रव्य आहे हे तर ठरले आहे मग Material असो किंवा Etherial असो द्रव्य असले कीं त्याला अणु असलेच पाहिजे. त्या वांचून कंपन संभवत नाहीं. ब्रह्मा प्रमाणें घन-दाट वस्तुमध्यें कंपनाचे उदाहरण नाहीं व कंपन मानल्यास समानच होईल कमी जास्त होणार नाहीं. क्षणे क्षणे पूर्वोत्तर देश संयोगित्व कंपन लक्षणं ( स्वकृत ) हे लक्षण घनदाट वस्तूंत कधींच घटणार नाहीं. कंपनाचा स्पंदन पर्य्याय आहे. आणि ‘ स्पदि किंचित् चलने ’ हा त्यांत मूळ धातु आहे तेव्हां जर प्रकाशाला वजन नसेल तर वजन ह्मणजे काय ? अल्प देशांत अधिक परमाणूंचा संयोग होणें यावर अवलंबून आहे कीं प्रत्येक परमाणुला particular weight आहे ? पहिला पक्ष बरोबर नाहीं कारण समदेश वृत्तित्व हे परमाणूचे लक्षण Science नी केले आहे ह्मणजे जितके परमाणु एका पदार्थाचे एका देशांत मावतील त्याच देशांत तितकेच परमाणु दुसऱ्या पदार्थाचेही मावले पाहिजेत असा त्याचा अर्थ आहे तेव्हां Hydrogen च्या atom पेक्षां Oxygen चा atom १६ पट वजनदार आहे हे सिद्ध कसे होणार ? आणि ते न झाले तर पाणी ह्मणजे $H_2O$ हा रसायन शास्त्राचा नियम कसा सिद्ध होणार ? कारण Hydrogen पेक्षां Oxygen चे परमाणु कांहीं तरी कमी जास्त होतील व त्यामुळें हा नियम राहणार नाहीं. याचे विशेष खंडण न्यायाचे तऱ्हेनें Science वर ग्रंथ लिहिल्यास मी करीन. दुसरापक्ष मानल्यास प्रकाश किरण लयानें पदार्थाचे वजन वाढलेच पाहिजे. आतां कांहीं द्रव्य परमाणूला

स्वयमच वजनही आहे व कांहीं द्रव्य परमाणूला स्वयमच वजन नाहीं असे जर Science वादी ह्मणेल तर मग तेजाला गुरुत्व नाहीं हे जे वैशेषिकांचे मत त्याचाच अनुवाद यानीं केला ह्मणावयाचा. या प्रमाणें light ची theory आपल्या कडून बरोबर सांगतां येते. आतां धातु संबंधी थोडीशी माहिती सांगतो. सुवर्णा संबंधांत न्याय शास्त्रांत असे ह्मटले आहे. '.स्वर्णं तैजसं अत्यंतानल संयोगेप्यनुच्छिद्यमानद्रव-त्वात् यन्नैवंतन्नैवं यथा पार्थिवद्रव्यं'। कितिही अग्नि दिला तरी सोन्याचे भस्म होत नाहीं. हा या परिष्काराचा भावार्थ आहे. Science मध्येही सोन्याचे Oxide अजून सांपडले नाहीं. सर्वच धातु आकरज आहेत असे नैय्यायिकाचे मत आहे आणि त्याचे ठिकाणीं वज़न वगैरे पृथ्वीचे अवयव मिश्र झाल्यामुळें येते असे ते ह्मणतात ह्मणून भस्म झाले तरी त्यांत धातु राहते. वैद्यशास्त्रांतही लांकडा प्रमाणें धातूचे भस्म औषधांत घेतले नाहींत म्हणून पार्थिवावयवाचेच अग्नि योगानें भस्म होते व व धातु शेष राहते. आधुनीक Chemistry नेंही हेंच सिद्ध केलें आहे इतकेच सध्यां लिहिणें बरें. अलीकडे आपल्याकडे Science आहे हे दाखविण्याची खोड पुष्कळांनां लागली आहे आणि तिचा परिणामही विपरीत झाला आहे. लोक Ether ला ब्रह्म. Electron theory ला वेदान्त व Bose च्या Response ला चैतन्य या खोडीमुळें म्हणूं लागले आहेत पण माझे हे करणें तसे आभास मात्र किंवा वहकवि-णारे नसून भाषांतराच्या मूळाप्रमाणें आहे ह्मणजे English Science ग्रंथ तंतोतंत संस्कृताचे भाषांतरच आहेत हे सिद्ध करून देण्याच्या धाटीचे आहे पण या कारितां मला सर्व पंडितानीं मदत केली पाहिजे किंवा जय पत्र देऊन माझ्या म्हणण्या प्रमाणें तरी चालले पाहिजे पण हे दु:खानें म्हणतो काय करावें. तर्क शास्त्राकडे न्यायाचा जोर आतां वाढलाच आहे तो आतां द्रव्य गुण निरीक्षणाकडे वाढवावा एवढेच माझें ह्मणणें आहे. तंत्र शास्त्र वैद्यशास्त्रांतील प्रयोग आणि न्याय शास्त्रांतील द्रव्य गुण कर्माच्या उपपत्ति, ज्योतिष, पुराणांतील गणित, महा भाष्य कैय्यट यांतील शब्दोपपत्ति ह्मणजे Sound ची theory आणखीही उपदेश साहस्री प्रमाणें इतर संस्कृत ग्रंथांतील उपपत्ति

मिळून आर्यभूत शास्त्र रचल्यास व कथा सरित्सागरादिकांतील व जैन बुद्ध ग्रंथांतील कला वचनें त्यांत मिसळल्यास प्रयत्नांती भाषांतराचे मूळ हे शास्त्र होणार आहे असे मी निश्चयानें सांगतो. Radium हे उद्भूतरूप उद्भूत स्पर्शवत् आकरज तेज आहे अशा प्रकारचे तेज नवीन न्याय मतांत सांगितले आहे. दुर्घट वृत्यादि प्राचीन ग्रंथावरून स्पष्ट नवीन शब्द करावे अशी आज्ञाही आहे तेव्हां अर्धवट धार्मिक लोकानीं व मच्या थांड तरुणानीं Scientific धर्माची अपेक्षा करण्या पेक्षां Scientific वैशेषिक शास्त्राची अपेक्षा करावी असें मी ह्मणतों. वैशेषिक शास्त्रांत शब्द प्रमाण मानलेले नसून प्रत्यक्ष व अनुमान असे दोनच प्रमाण मानले आहेत. या विषयीं कणाद सूत्रावरील प्रशस्त पादाभाष्य पहावे. ही त्या शास्त्रानें Physics तयार करण्याला मोठी सवड दिली आहे. हा माझा लेख सध्यां दिग्दर्शन मात्र आहे या कामा करितां नागपूरांत किंवा कोठें एकादी संस्था स्थापन झाल्यास तिच्या सेवेची लहानशी जागा नियमानें पण प्रकृत्यनुसार पत्करीन.

इति पत्रस्य द्वितीयः खंडः संपूर्णः—

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | | |
|---|---|---|
| माधान, | | आपला, |
| २१।४।१९१३. | | **गुलाबराव.** |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २६.

तीर्थस्वरूप रा. रा. केशवराव यांचे चरणी सा० प्रणिपात वि० वि० मागाहून मी पत्र पाठवितो असें आपणास लिहलें होतें ह्मणून अनृण होतो. परमार्थांत जो होतकरू आहे त्याला धर्मच प्राणसखा आहे. धर्म हा मुख्य निष्ठेपासून निष्पन्न होत असतो. आणि निष्ठाही ज्याच्या त्याच्या योग्यतेवर अवलंबून आहे. जगांतील सर्व धर्म धुंडाळून पाहिले तर कर्मशरण्य कोटींत किंवा ईश्वरशरण्य कोटींत त्यांचा अंतर्भाव होतो. पैकीं पहिल्या प्रकारचे धर्म भानगडीचें असून त्याचा विचार मी संप्रादय सुरतरूंत विशेष केला आहे ह्मणून येथें लिहीत नाहीं. आपला आर्य धर्म विशेषें करून दुसऱ्या प्रकारच्या कोटींत येत असून तो आपल्या उदात्तपणानें पहिल्या व दुसऱ्या कोटींतील सर्व धर्मांना आश्रय देऊं शकतो असें माझें मत आहे. आर्य धर्माच्या व्यापक दृष्टीला घेऊन धर्माचें पुन: दोन प्रकार करता येतात. आगमीक व काल्पित. आर्यधर्म ह्मणतो, सर्व जगत आगम परतंत्र असल्यामुळें ज्याच्या ज्या धर्मात जसें सांगितलें असेल तसेंच त्यानें सांगितले पाहिजे. स्वत:चा आगम सोडून दुसऱ्याच्या आगमाची इच्छा करणें सूज्ञास शोभत नाहीं. भगवंतानें 'आपल्या धर्मात मरावें पण दुसऱ्या धर्माची इच्छा करूं नये' असें भगवद्गीतेंत तिसऱ्या अध्यायांत ह्मटले आहे ते सर्वांस ठाऊक आहेच. पण अनादि संसारांत व मायेच्या तडाक्यांत सांपडलेला मनुष्य चुकीला पात्र आहे. सर्वांकडून आगमाचे तत्व पाळल्या जाणें सर्वदाच शक्य नसते. त्याचमुळें अनेक धर्म व अनेक पंथ जगांत निपजत असतात. आर्यधर्मान्वयें चुकलेल्या वर्गाचा धर्म निराळा असतो. सर्वथा चुकीची क्षमा करणें किंवा शिक्षा देणें या दोन्ही गोष्टी आर्य धर्मात निंद्य मानल्या आहेत. कित्येक धर्मांत कितिही चुक्या केल्या तरी ईश्वर क्षमाच करितो असें ह्मटलें असून नरकांत जाणाऱ्या पाप्याला कधींही सुटका नाहीं असें ह्मटलें आहे. पण

आर्य धर्म ह्मणतो बाबांनों ! ईश्वर जर कोणी तुमच्याहून भिन्न असता तर तुह्माला त्यानीं चुकीची क्षमा केली असती, किंवा चुकी बद्दल चिरकाळ दु:ख दिले असते. पण तो निराळा नसून तुमच्या आत्म्याचे शुद्ध स्वरूपच आहे. जसें तुह्मीं शुद्ध व अशुद्धाच्या मिश्रणानें बनले आहां, तसा तुमचा मार्गही धर्माधर्माच्या मिश्रणानें बनलेला आहे. आपल्या चुकीचें फळ भोगणार आपणच व क्षमा करणार आपणच. तुमची चुकी झाली हे जर तुह्माला पक्कें समजलें असेल तर जोंपर्यंत ती तुमच्या मनांत आहे तोंपर्यंत तिचे फळ भोगल्या वांचून शक्य नाहीं. यावर कोणी असें ह्मणूं शकेल कीं आह्मी कितीही चुक्या करून त्यामनानें मानल्या नाहींत ह्मणजे झाले ? यावर माझें उत्तर असें आहे कीं एका वासनेच्या प्रवाहाला दाबण्याकरितां त्या प्रवाहाची गति खुंटेल असा यत्न केला पाहिजे. परंतु तुह्मींच निर्माण केलेल्या अनादि आगमाच्या दृष्टीनें जेव्हां चुकी करून तिला दाबून टाकण्याचा प्रयत्न करतां तेव्हां अद्वैतपणा विसरल्यामुळें व देहाभिमान धरल्यामुळें अत्यंत लौल्यानें चुकीचा स्मृति प्रवाह चालूं असतांही दाबण्याचे धाडस करीत असतां. अशा धाडसानें आपण केलेल्या चुकीची क्षमा होणें शक्य नाहीं. आपल्याच दातानें आपली जीभ चावल्यावर जीभ तोडावी कीं दांत पाडावे, क्षमा करावी किं दु:ख भोगावें याचा विचार आपल्यालाच करावा लागतो व चुरमळ्याचे लाडु खात बसावें लागते. आपल्या स्वप्नांत आपणच व्याघ्र निर्माण केला व त्यानें आपल्यास खाल्लें तर त्याची चुकी आपल्याकडे कीं परमेश्वराकडे ?

अभंग:–जीभ दातानें चाविली । कोणें बत्तिशी पाडिली ।। १ ।।

(ताटिचे अभंग)

सारांश चुकीचे फळ स्वत: भोगलें पाहिजे व क्षमाही स्वत:च केली पाहिजे. दातानें जीभ चावल्याचे दु:खही भोगले पाहिजे व दातांवर क्षमाही केली पाहिजे व पुन: चावल्या जाणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. हाच न्याय धर्मास लागू पडतो. पण दृष्टान्त एकदेशीय असतो एवढें मात्र लक्षांत ठेवावे. महाकालतंत्रादिकांत असें सांगितले आहे कीं वाममार्गी पुरुषानें विष्णूचें नांव घेऊं नये, तुळ-

शीला स्पर्श करूं नये; व वेदिकाला नमस्कार करूं नये. वाममार्गी चांडाळ असो किंवा यवन असो त्याच्याशींच संग धरावा. दक्षिण-मार्गीतील वाममार्गीत गेला असतां व वाममार्गीतील दक्षिणमार्गीत गेला असतां दोघालाही देवता खातात. आपण केलेल्या चुकीचे फळ प्रथम भोगून नंतर त्या चुकी करणाऱ्याला कोणत्या तरी धर्माच्या द्वारानें गति होते. अन्नाच्या वाईट भागाचा मळ झाल्यावर त्याचा देखील खताच्या द्वारानें अन्नाला उपयोग होतो. तसेंच प्रमाद शीलांचे-हि आहे. आगमाच्या दृष्टीनें जे चुक्या करितात त्यांत कांहीं चुक्या अशा आहेत कीं प्रायश्चित्त घेऊन आगम त्यांचा स्वीकार करतो व कांहीं चुक्या अशा आहेत कीं आगम त्याविषयीं मौन राहतो. कितिही उनाड पोर असला तरी मारमोदाड करून त्याचे अपराध आई सहन करूं शकते पण तिच्याशींच संग करणाऱ्या पुत्राचे अपराध आई कडून सहन होत नाहींत. दुसरें उदाहरण असें आहे कीं एकादी स्त्री व्यभिचारिणी झाल्यास तिला पतिव्रता करून गति देणें आर्य धर्माच्या हातीं नाहीं पण महानंदे प्रमाणें वागून तिला आर्य धर्मात गति सांगून ठेविली आहे. राजेश्री मुळे मास्तरच्या पत्रांत परांजप्यांनां सोडणाऱ्या बद्दल मी जे लिहिलें ते देखील या सिद्धान्तालाच धरून आहे. त्यांपैकीं कांहींनां सामान्य प्रायश्चित्तानें, कांहींनां विशेष प्राय-श्चित्तानें, निष्कृति आहे. कांहींनां मुळींच नाहीं. शेवटच्या वर्गातील लोकांनीं त्यांनां सोडण्याचें कांहीं कारण नव्हतें. या उद्देशानें मी ते लिहिले या बद्दल मला कोणी धर्मातील चाणाक्य म्हटल्यास खुशाल म्हणोत. परंतु मी स्पष्ट व सत्यवक्ता असल्यामुळें दुसऱ्याला कलह करणाऱ्या सारखा दिसलो तर त्यांत माझा अपराध काय ? याचमुळें श्रीनारद मुनीवरही कलहकारीत्वाचा आरोप आहे. पण आगमाच्या दृष्टीनें चुकलेल्याचा कल्पीत धर्माच्या दृष्टीनें आगम त्याचा स्वीकार करतो. या विचारान्वयें जन्मजातिवाद थोडासा महत्वाचा दिसतो. कल्पना करा कीं एकाद्या दुर्गुणी मनुष्याला सद्गुणी करावयाचे असल्यास त्याला दुर्गुणाची स्मृति आल्यावांचून कधींही राहणार नाहीं; आणि त्यामुळें सद्गुण आंगीं लवकर येण्याच्या ऐवजीं पश्चात्तापांत

कांहीं वेळ जाईल. पण दुष्कर्मानें कां ह्मणाना, एक वेळ वाईट योनींत देखील जन्मास येऊन पूर्व जन्माची स्मृति न राहिल्यामुळें दुर्गुणाच्या पश्चात्तापाची पिचकाट चुकून हलु हलु ज्या रीतीनें होईल त्या रीतीनें ह्राच आपला धर्म, असें मनुष्याला वाटून घेतां येणें सोपे आहे. ऋषी सारख्या तीव्र संवेगी मनुष्याना अर्थातच ती गोष्ट लागूं नाहीं. त्यांच्या विषयीं गुणकर्मजातिवाद खुशाल असो. याचा विशेष विचार मी सुरतरूंत केला आहे. पण ह्रा वाद वचनांवरच अवलंबून असल्यामुळें मी विमर्श वश झालो आहे. तथापि या सर्व लेखाचें सारांश एक वार असें सांगून ठेवतों कीं एखादे ठिकाणीं प्रथम निष्ठा ठेवतांना आपल्या कल्याणाकडेच लक्ष राहत असून, रागद्वेषाला निमित्तक अशी ती निष्ठा होत नसते. पण ती निष्ठा काढून दुसऱ्या ठिकाणीं ठेवीत असतांना अवश्य रागद्वेष उत्पन्न होत असतात. पंडितनें काल मला अशी एक गोष्ट सांगितली कीं आमच्या चंद्रपूरास जेव्हां झाडींतील लोक येतात तेव्हां त्यानां तांदुळाची आंबील न मिळाल्यास एकादे दिवस देखील ते राहण्यास काकूं करितात. घरीं मिळणाऱ्या जवारी बाजरीच्या भाकरीवर जे संतुष्ट राहतात त्यांना कोणाविषयीं द्वेषा उत्पन्न होत नाहीं. असें आपण पाहतो पण दुसऱ्याच्या घरची पुरणपोळी अशी जेव्हां इच्छा उत्पन्न होते तेव्हांच आपल्या घरच्या पोळी विषयीं द्वेष व दुसऱ्याच्या घरच्या पुरणपोळीविषयीं राग उत्पन्न होतो व ती मिळविण्याविषयीं चोरी वगैरेचें मार्ग सुचतात. स्वधर्मनिष्ठा सोडणारा व तंबाखु ओढणारा हे दोनच नित्य भिकारी जगांत आहेत. इतर सर्व कार्यापुरतें भीक मागतात. आतां माझ्या लिहिण्यावर एक प्रश्न येणार आहे तो ह्रा कीं आपणच चुकीचें फळ भोगणारे व क्षमा करणारे आहोत हे जर आर्य धर्माचें ह्मणणें असेल तर त्याला जीवच कर्माचा फळ भोक्ता व कर्म कर्ता अशा कर्मशरण्य कोर्टांत घातला पाहिजे. ईश्वरशरण्य कोर्टांत घालण्याचें प्रयोजन नाहीं. पण ह्रा प्रश्न बरोबर नाहीं. कारण कर्मशरण्य धर्मात जीवाचे निर्मळ स्वरूप अन्य घेतलें नसल्यामुळें फळ भोगल्या नंतर अडचणींतून आपली गति शोधतां येईल, अशी जीवाला शक्तीच मानतां येत नाहीं.

जैनधर्म कर्मशरण्य असून तशी शक्तीहि जीवाला मानली आहे खरी, परंतु गतीचा मार्ग एकच मानला गेल्यामुळे फल भोगाचेच आनंत्य मानावें लागले आहे आणि तीर्थंकराचें ठिकाणीं देखील क्षमेचा संकोच झाला आहे. आर्य धर्मांत जीवाचे निर्मल स्वरूप ईश्वर असून त्याचे अध्यस्त स्वरूप चुकी करणारे आहे. फल भोगून कंटाळा आल्यावर जीवांनां आपआपसांत सहन शक्ति वाढवून आपल्या अध्यस्त स्वरूपाचा परित्याग करण्याविषयीं अनंत गति शोधतां येतात म्हणूनच आर्य धर्माला आम्ही ईश्वरशरण्य कोटींत घातले आहे. नुकतेच जे रायपूरांत आपले बोलणें झाले, त्यांतही मी हाच वंश दाखविला होता व आपली निष्ठाही माझ्या म्हणण्याला अनुकूलच पडली हे पाहून मला फार आनंद वाटला. हा लेख श्री ज्ञानेश्वर चरणीं समर्पण करून पुरे करितों.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

माधान, } आपला,
२८।४।१९१३. } गुलाबराव.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

## पत्र नंबर २७.

रा. रा. बाबूराव यांस सा. प्रणिपात वि. वि. आपल्या व माझ्या नुकत्याच झालेल्या योगाच्या गोष्टी संबंधांत व पत्रांत विचारलेल्या संबंधानें कांहीं लिहून पाठवितों, त्याचा विचार होईल अशी आशा आहे. सर्व योग प्रक्रियेंत राजयोग श्रेष्ठ असून त्याच्या करितां हठ योगाची अवश्यकता आहे असा गोरखनाथादि योगशास्त्रकारांचा डिंडिम आहे. हठ योगाची उपलब्धि होणें कधींही शक्य नाहीं.

देहादि नियामक तामस द्रव्यशक्ती व आवरण, प्राण व इंद्रिय चलनादि राजस क्रियाशक्ति व विक्षेप या दोहोंचा निरोध करणें हठ योगांत येत असून केवळ ज्ञान शक्तीचा संस्कारशेष निरोध राज योगांत येतो. अभ्यास व वैराग्याच्या योगानें हा सर्व निरोध साध्य आहे. वैराग्यावांचून नुसता अभ्यास करणारा शेवट पर्यंत जातच नाहीं. कारण क्षणोक्षणीं तो विषयासक्तीनें घेरल्या जाऊन अभ्यासाच्या श्रमास कटांळून सोडून देतो. अभ्यासावांचून वैराग्य असलेलाही पहिल्या पेक्षां उत्तम असला तरी प्रवृत्ति निरोधाच्या बाबतींत अज्ञ असल्यामुळें मरेपर्यंत त्याला त्रासच होत असतो. म्हणून दोहोंच्या समुचायानेंच निरोध साध्य आहे असा सर्व प्राचीन योग शास्त्रांचा सिद्धांत आहे. नियमांतील वेदान्त श्रवणानें तामस शक्तीचा निरोध होऊन यमानें व इतर नियमानें इंद्रिय शक्तीचा निरोध होतो. आसनानें अवयवस्थैर्य येऊन प्राणायामानें सर्वच चलन शक्तींचा निरोध होतो. याप्रमाणें चित्ताची मूढावस्था संपते. क्षिप्त अवस्थेचा प्रत्याहारानें, विक्षिप्त अवस्थेचा धारणेनें व ध्यानानें निरोध होऊन, संप्रज्ञात समाधींत तें एकाग्र होते व शेवटीं निर्विकल्प समाधींत निरुद्धावस्था प्राप्त होते. हा संपूर्ण योगशास्त्राचा थोडक्यांत क्रम आहे; परंतु यांत तयारी अतिशयच पाहिजे. मृत्युच्या भीतीचा तर निःशेष त्यागच केला पाहिजे. अनेक योनीमध्यें दुःख होते हे पाहून पुनर्जन्माच्या भीतीनें आपण इकडे प्रवृत्त झालों आहों असें समजलें पाहिजे. मृत्युची भीति सोडणारे जगांत कोणीच नाहींत असे कांहीं नाहीं. खरा आस्तिक व खरा नास्तिक दोघेही मृत्युला भीत नसतात. मुक्तीवर, पुनर्जन्मावर, सत्कर्मावर, आणि ईश्वरावर दृढ विश्वास ठेवून आस्तिक मृत्युच्या भीतीचा अगदीं परित्याग करीत असतात. पण नास्तिक लोक एकवेळ मेल्यावर पुनः येतो कोण व जातो कोण. याजन्मांत सर्व कांहीं भोगून घेतले पाहिजे अशा समजूतीवर, प्रसंग विशेषीं जीवनार्थ कलहाकरितां देखील मृत्युच्या भीतीचा परित्याग करीत असतात. रणभूमीवर उभे राहिलेल्या शूरांनीं व आत्महत्या करणाऱ्या विकारी लोकांनीं मृत्युच्या भीतीचा परित्याग केलेला आपण पाहतो तेव्हां अत्यंत आस्ति-

क किंवा अत्यंत नास्तिक यांना मृत्युची भीति नसून अर्धवटानांच ती असते असे ह्मणावें लागतें. देह लोलंगिताहि त्यांनाच दृढ असते. "आत्मा नित्य आहे असे समजून किंवा मेलेल्याचा जन्म होतो व जन्म लेला मरतोच असें समजून किंवा हे सर्व मेलेलेच असें समजून देखील, तुला मृत्युचे भय धरण्याचें कारण नाहीं," असे गीतेंत भगवंतानें दुसऱ्या अध्यायांत अर्जुनास सांगितले आहे. यद्यपि इतरत्र ससांर भीताचे लक्षण सांगितले आहे तथापि ते संकोचित मृत्युभय मात्र नसून जन्म, मृत्युजरा, व्याधि, दुःख, व दोष या सर्वांचे अनुक्षण दर्शन करावे अशा स्वरूपानें सांगितले आहे. अध्यास भयानें जन्म दर्शन, गर्भाद्यवस्थाचें ठायीं दुःख दर्शन, सत्कर्म उतावेळतेनें मृत्युदर्शन, इंद्रियावर अविश्वास व्हावा ह्मणून जरादर्शन, कालविलास महात्म्या करितां व्याधि दर्शन, आणि शरीरादिकांच्या अपावित्रतादिकाविषयीं दोषदर्शन, असा त्यांचा क्रम प्राचीन पंडितास संमत आहे. विषयासक्ति ज्यानीं सोडली आहे अशा पुरुषालाच या मार्गात अधिकार आहे. मानस विषयांना जो प्रथम जिंकतो, व त्यांतील तारतम्यता ज्याला कळते, विहीत विषयाची समता ठेवितो, व पुढें वेळेस पुढें सोडून देतो, तोच या योग शिखरावर जाऊन पोंहचतो. क्रमानें येणाऱ्या वृत्तींनां आसन चळू न देतां धक्का कसा द्यावा हे ज्यांना माहीत असतें, ह्मणजे क्रमानें येणाऱ्या वृत्तींत प्रथम कोणत्या वृत्तीचा जय करावा व युगपत् येणाऱ्या वृत्तींचा कोणत्या महा शक्तीच्या हातून पराजय करावा हे जो समजतो; तसेंच क्षणोक्षणीं येणाऱ्या वृत्तिसंधींत ब्रह्म चिंतन करावे कीं निरुद्ध संस्कारशेष वृत्तिसंधींत चिंतन करावे हें ज्याला ठाऊक असते तोच योगाचा शेवटचा पल्ला गांठतो. अनुभवलेल्या संसार क्लेशापुढें अभ्यासाचे व मृत्युभयाचे श्रम त्याला कांहींच वाटत नाहीं. संप्रज्ञात समाधींत मृत्युचे भय राहते असें विज्ञानभिक्षूनें ह्मटलें आहे त्याचा विचार मी योगप्रभावांत करीन, पण विकारी पुरुष देखील प्रसंग विशेषी मृत्युचे भय सोडूं शकतात हे लक्षांत ठेवले ह्मणजे विकार नसतो अशा संप्रज्ञात समाधींतील मृत्युच्या भयाचा उलगडा होणें मोठेंसे कठीण नाहीं. शारीरिक भयाला अनुसरूनच

भक्ती सोपी व योग कठीण असा बऱ्याच लोकांचा समज आहे पण " योगा सारिखे सोपे । कांहीं आहे " असे श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटलें आहे. त्याअर्थी भक्त्यादि वस्तुतंत्र मानसभावापेक्षां स्थूल कर्तृतंत्र योग खरोखरच सोपा आहे असें माझेही मत आहे. त्रिगुणापैकीं तमोगुण वेग रहित असून भंगड वेगाचा असा रजोगुण आहे पण सत्त्वगुण सांख्याच्या व योगाच्या मतानें लघु असल्यामुळें तो अतिशय एकात्मक वेगाचा आहे. एकादा पदार्थ चालत असताना त्याचा वेग थांबविण्याला त्या पेक्षां अधिक जोराचा वेग पाहिजे. भिरंगी ( Motor ) गाडी पकडणाऱ्या रामसूर्तीचे उदाहरण याला दृष्टान्ता दाखल पुरे आहे. स्वभावतःच रजोगुणाच्या अनादि प्रवृत्तींनीं चल झालेल्या इंद्रिय मनः प्राणांचा निरोध करणाऱ्या सत्वाचा वेग व बल अतिशय मोठें असलें पाहिजे यांत संशय नाहीं, परंतु सत्वाचा केवढाही वेग असला तरी स्वस्थान न सोडणें हे त्याचे स्थैर्य वाखाणण्या जोगे आहे. या प्रमाणें ही सामान्य माहिती लिहिली असून विशेष अनुक्रमानें सांगेन. कळावे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

नागपूर,
तारीख १०।५।१९१३.

आपला गरीब मित्र,
गुलाब.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर २८.

रा. रा. विठ्ठलराव केकरे यांस सा. प्रणिपात वि. वि. आपले कृपा पत्र आले. आशय समजला. आपली इतकी निष्ठा आहे हे पाहून कोणालाही आनंदच वाटेल. परमार्थात साधारण मनुष्याला निष्ठेची फार उणीव असते. संशयी विद्वानापेक्षां निष्ठावान् भोळाच संसार सागराला तरून जातो. संशयी लोकांपुढें धर्म स्थापकाचें सुद्धां कांहीं चालत नाहीं. आचार्यांपुढें सर्वच अपूर्ण असल्यामुळें त्यांनां बरोबर वादी मिळाला नसला तरी जे वादी मिळाले होते ते तरी जो पंथ त्यांनीं घेतला होता त्यावर पंथावर धर्म समजून त्यांचा दृढ विश्वास होता. आतां स्थिति तशी नाहीं. आतां ऐहिक सुखाच्या अपेक्षेमुळें कोणाचाही धर्मावर विश्वास नाहीं. होटाळी टाळीच्या विजयापैकीं पहिल्या प्रकारानें अशा वेळीं काम होत नसते. संपूर्ण शास्त्रप्रमाणें वागणारा तरून जातो किंवा शास्त्र वगैरे माहीत नसून कोणाच्या वाक्यावर श्रद्धा ठेवणारा तरून जातो; परंतु अर्धवट जो शास्त्र पाहून त्याचा परित्याग करितो त्याची गणना धार्मिकांत होत नाहीं. असे आचार्यांनीं भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायाच्या भाष्यांत ह्मटले आहे पण आमची स्थीति एव्हां विचित्र आहे. परीक्षे करितां वेदान्त ग्रंथ घेऊन साधन चतुष्टय संपन्नाच्या ऐवजीं आह्मी पदवीधर होत असतो. तेव्हां अर्धे ग्रंथावर विश्वास व अर्धे ग्रंथावर अविश्वास ठेवणें आपण शिकतच असतो. पण त्यामुळें निदिध्यासनजन्यवृत्तिसाक्षात्कार न होऊन व साधक पक्षीय मनन ही न होऊन बाधक तर्कच वाढत असतात. दुसरे, निष्ठा क्षीण होण्याला साधारण कारणें असतात. त्या अमुकानें अमुकास फसविलें त्यावरून आपणासहि एकादा साधु ह्मणविणारा फसविणार कशावरून नाहीं असें नेहमीं त्याला वाटत असते. पण हा अनुत्तर संशय आहे. कारण दुसरा फसविलच असें धरून चालले तर सर्वच लोक वाईट आहेत असें घेऊन चालावे लागते. व त्यामुळें

"सर्वे शंकाभिराक्रान्तमन्नं पानंच भूतले । प्रवृत्तिःकुत्रकर्तव्या जीवितव्यं कथमुंवा" अर्थः—संशयानें ग्रासिली क्षिति । अन्नपानहि खळांचें हातीं । तरी कैसी करावी प्रवृत्ति । वाचावे कीं मरावे ? ॥ १ ॥ अशी आपल्या मनाची स्थिति होते. आतां कोणी फसविणार नाहीं असें घेऊन चालले तर सर्व जग चांगले आहे असें ह्मणावे लागते खरे परंतु यापक्षांत थोडेसें सुख आहे असें मला वाटतें जोपर्यंत वासना व विषय फसण्याची व फसविण्याची सामुग्री जवळ आहे तोपर्यंत फसणें व फसविणें परस्परांत चालूच असते. गाईचे दूध काढतांना वासरास आपण नित्य फसवीत असतो. शेतींतील उत्तम अन्न आपण खावून बैलास फसवीत असतो. मधा करितां आपण कितिवेळ तरी माशांनां फसवीत असतो. व्यापारांत परस्पर सचोटी लागते ह्मणतात पण ती ग्राहीका करितां असते काय ? ज्यांनीं कोणाचा अपराध केला नाहीं अशा प्राण्यावर ताबा करून मग मनुष्य प्राणी ईश्वराने उच्च केला ह्मणून सर्व प्राणी त्याचे भोग्य आहेत असे यौक्तिक तत्वज्ञान लढवीत असतो परंतु ताबा करणाऱ्याला जशी उच्चता वाटत असते तशी ताब्यांतील प्राण्यांनां उच्चता वाटली पाहिजे इकडे लक्ष जात नाहीं. आपले सत्य नेहमींच स्तेन टोळींनीं परस्परांत आणभाक करण्यासारखे असते. अशा स्थितींत दुसऱ्यानें आपल्यास फसविले असल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. न फसावे अशी इच्छा असल्यास विषयासक्ति सर्वथा सोडली पाहिजे मार्कंडेय पुराणांत मदालसेची कथा आहे. तिनें राज्यावर बसलेल्या आपल्या अलर्क पुत्राचे राज्य एका दुसऱ्याच्या हातून घेववून त्याला विरक्त केले. शिवाय निष्ठावंतांनां अनेक ठेंचा लागल्यातरी त्या ठेंचानीं त्यांचें अदृष्टच नाहींसे होते निष्ठा नाहींशी होत नाहीं पण धरून बांधून ठेवलेल्या निष्ठेचा मात्र अशा स्थितींत चुराडा होतो. दुसरे एक निष्ठा डळमळीत होण्याचे कारण सामान्य नीतीच्या विरुद्ध जाऊं नये असे वाटणें हे आहे. आणि हे मलाही मान्य आहे. पण सामान्य नीति आत्यंतिक होऊं शकेल असा फाजील विश्वास ठेवणें मात्र मला मान्य नाहीं. पाश्चात्य नीति शास्त्रांचा विचार केला तर नीति कशाला ह्मणावे हें अजून चांगले

ठरलेच नाहीं असे दिसून येते. अतिशय नीतीचा पुतळा परमेश्वर अशी साधारणत: Theologian लोकांची समजूत आहे. बरें, पाश्चात्य शास्त्रांचे कितिही आलोचन केले तरी चारच कल्पना हातीं येतात. Authority, Intuition, Utility व evolution या चहूपैकीं कोणतीही कल्पना घेऊन परमेश्वर नीतीचा पुतळा आहे असे सिद्ध करणें कठीण आहे. कारण परमेश्वर नीतीचा पुतळा ह्मणजे Authority प्रमाणें वागणारा असे पहिल्या कल्पने प्रमाणें ह्मणावे लागेल; पण तसें मानणें ह्मणजे परमेश्वराची अनवस्थाच मानणें होय. दुसऱ्या कल्पनें प्रमाणें परमेश्वराला सत् व असत् असे दोन्ही प्रकारचे Conscience आहे असे मानावे लागते तेव्हां परमेश्वराला केवळ चांगलेच Conscience आहे असें ह्मटलें तर सैतानाला उत्पन्न करण्याची प्रवृत्ति त्याला कशी झाली याचा उलगडा होत नाहीं. तिसऱ्या कल्पने प्रमाणें तर थोडे लोक कितिही चांगले असले तरी त्या गरीबांची परमेश्वराच्या कोटींत दाद लागणें शक्य नाहीं असे ह्मणावे लागते आणि चवथी कल्पना तर आज परमेश्वर आहे हे सिद्धच होऊं देत नाहीं. उत्क्रान्ती होऊन होऊन सर्व चांगले झाले ह्मणजे एक वेळ परमेश्वराची घटणा होणार आहे असे अनुमान कदाचित् त्या कल्पने वरून काढतां येईल. म्हणून Western Ethics घेऊन नीतीचा व अनीतीचा निर्णय चांगला करता येत नाहीं. आपल्या शास्त्राचा विचार केला तरी नीतींत अनेक प्रकारांचा समावेश होतो पण तित्क्यांचा विचार करण्याची गरज नाहीं. अर्थ नीती व धर्म नीति हे दोनच प्रकार जर घेतले तर पहिल्या प्रकारच्या नीतीची स्थीति आतां वर लिहिल्या प्रमाणेंच आहे. दुसऱ्या प्रकारच्या नीतीचा समावेश योगाच्या यम नांवाच्या अंगांत होत असुन तिचा देखील पुतळा जगांत परमेश्वर किंवा आणखी कोणी राहूं शकेल हे अनाकलनीय आहे. कारण यमापैकीं एक अहिंसाच घ्या, ती अहिंसा परमेश्वराचे ठिकाणीं अत्यंत आहे असें म्हटल्यास अहिंसावान् पुरुष जेथें असेल तेथें गाई, व्याघ्र, नकुल, सर्प इत्यादिकानीं आपले आपले परस्पर वैर सोडले पाहिजे, या योग शास्त्रांत

सांगितलेल्या फलास्तव व परमेश्वर व्यापक असल्यामुळें त्याच्या सृष्टींत गाई व्याघ्र नकुल सर्पादिक इत्यादि स्वाभाविक वैरी प्राणी उत्पन्नच होऊं नये. आतां ते आपल्या अदृष्टा प्रमाणें होतात असें ह्मणणें देखील शोभत नाहीं कारण अदृष्टानें प्रथग उत्पन्न झालेल्या गाई व्याघ्राचे देखील वैर अहिंसावान् पुरुषाच्या पुढें नाहसि होत असते. नाहीं तर प्रथम पासून निर्वैर गाई व्याघ्राचा कळप त्याच्या पुढें येत असतो असे थोडेंच आहे. तात्पर्य नीतिही केवळ साधका करितां असून तीहि योगांतील पहिले अंग आहे सत्ता भेदास्तव परमेश्वराशीं तिचा संबंध उपासकानुकूलच आहे व म्हणूनच श्रीकृष्णाच्या रासक्रीडेवर आह्मी अत्यंत पूज्य बुद्धी ठेवीत असतो. बरें साधकानें तरी या नीतीचा अभ्यास समुच्चयानेंच केला पाहिजे असतो. पण अलीकडे साधारण लोकांची प्रवृत्ति विचित्रच दिसून येते. सर्व लोकांची टीका अलीकडे एकाद्या काम वृत्तीवरच होत असून शास्त्रांत कामा पेक्षांही वाईट सांगितलेल्या अशा क्रोध वृत्तीवर फारशी टीका होत नसते. व्यापारांत असत्य बोलणाराला कोणी नावें ठेवीत नाहीं व मांस इत्यादिक खाणारांची ही कोणी चर्चा करीत नाहीं तथापि काम वृत्ति चांगली आहे असे माझे मत आहे असे मात्र कोणी समजूं नये पण जितकी काम वृत्ति वाईट आहे तितकीच किंवहुना त्याही पेक्षां जास्त वाईट क्रोध वृत्ति शास्त्रांत समजल्या गेली आहे. म्हणून नीतीचा अभ्यास समुच्चयानें केलेलाच उपयोगी होतो. एका वृत्तीनें केलेला उपयोगी होत नाहीं. उलट एका वृत्तीनें अभ्यास केल्यास आपल्या धर्मा प्रमाणें दुसरी कडे अनीतीचा जोर होतो. एवढ्या करितां एकाद्या वृत्तीच्या अपेक्षेनें कोणाच्या अनीतीवर आपली टीका असल्यास आपल्याकडेही आपण पाहिले पाहिजे. इतके लिहून हा लेख श्री ज्ञानेश्वर चरणीं समर्पण करीतो. कळावें.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| माधान,<br>१८।५।१९१३. | आपला,<br>गुलाबराव. |

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर २९.

रा. रा. मुळे मास्तर यांस सा. प्र. वि. वि. मी आपल्या जाती बांधवांस ब्राह्मणांनीं वेद शिकविले नाहींत या मुद्यावर त्याशीं भांडण करणें व्यर्थ आहे, अशा अर्थाचें एक पत्र नुकतेंच पाठविले तें आपल्या-पोहोचलेंच असेल. आतां हें दुसरेंही पत्र त्याच संबंधांत पाठवीत आहे. याचाही चांगला विचार व्हावा, आतां प्रश्नारंभ करतो. ब्राह्मणांनीं वेदविद्या चोरून ठेवली नाहीं पण ठेवली असें जरी घेऊन चाललें तरी तीन विकल्प उत्पन्न होतात. त्यांनी ऐहिक विद्येकरितां चोरून ठेविली कीं पुराणेंही लोकांना खोटी शिकविली व खरी विद्या आपल्या जवळ राहावी अशा बुद्धीनें चोरून ठेविली किंवा धर्म परतंत्रते मुळें विचाऱ्यां-चा निरुपाय होऊन सांगतां आली नाहीं ? पैकीं पहिला पक्ष स्वीकार-तां येत नाहीं कारण वेदा पेक्षां पुराणांतच ऐहिक विद्या अधिक स्पष्ट आहे याविषयीं अग्निपुराण, स्कंद पुराणादि, ग्रंथ ब्राह्मणांशीं कलह करणाऱ्यांनीं वाचून पाहणें इष्ट आहे. सर्व तंत्रांचा ब्राह्मणेंतरांनांच अधिकार असून तंत्रांमध्यें इतकी ऐहिक विद्या भरली आहे कीं. भौति-क शास्त्राचे ह्मणजे Material Science चे प्रयोग सुद्धा भाषांतरा-च्या मुळाप्रमाणें त्यांत सांपडतात. याविषयीं शिवोक्त पारसिक तंत्रादि तंत्रें पाहावीं. केवळ ब्रह्मणांचा व शूद्राचा कलहच असता तर पाहुण्या-हातून सर्प मारीवण्याकरितां धर्नुविद्या प्रथम म्लेंछाला व नंतर शूद्राला, ब्राह्मणाला कधींच शिकवूं नये असें त्यांनीं ह्मटलें असतें कारण हें शत्रु अनायसेंच बळी पाडण्याच्या उपयोगी पडलें असते. पण तसें त्यांनीं केलें नाहीं. धनुर्विद्येचा यथार्थ अधिकार क्षत्रिय जातिलाच दिला आहे. राज्याच्या आज्ञेनें ब्राह्मणानीं आपणांकडे घेतला नाहीं इतकेंच नाहीं तर ब्राह्मण आपल्या धर्मांत चुकला असतां पर जाती-च्या ह्मणजे क्षत्रियांच्या हातूनच दंड देण्याचा त्यांनीं नियम ठेविला पक्ष राखण्याच्या आज्ञेनें ब्राह्मणानें ब्राह्मणाळाच दंड दिला पाहिजे

असें लिहून ठेविलें नाहीं. अधिकारी लोकांना विष घालूं नये म्हणून स्वयंपाक्याची मर्जी जशी संपादावी लागते तशी धर्म बुद्धि नसती तर मरणाच्या भयानें वैद्याची मर्जी त्यांनी संपादन केली पाहिजे होती. पण ब्राह्मण जरी वैद्य असला तरी त्याला श्राद्धांत व शुभ कार्यात घेऊं नये असें उलट लिहून ठेविलें आहे. आपला पुत्र जरी पतित झाला तरी त्याला वेद शिकवूं नये असेंच त्यांनीं लिहून ठेविलें आहे. बरें देशचे ब्राह्मण श्राद्धाला घेवूं नये म्हणून सांगितलें देशचे ब्राह्मण घ्यावें असा एखादा विकल्प त्या देशच्या ब्राह्मणानें धर्म ग्रंथांत लिहून ठेविला नाहीं. राष्ट्रीय एकत्वाची हाव धरून देखील द्राविड व गौड ब्राह्मणाचा लग्न विधि करावा असा एखादा ग्रंथ लिहिला नाहीं व्यापाराकरितां समुद्रांत मरण्यासाठीं, शूद्राला व म्लेच्छाला पुढें सूड घ्यावा म्हणून पाठविलें नाहीं. तर वैश्याच्याच माथ्यावर काम सोंपविले. धनाचें भांडार आपल्याच हातांत रहावें म्हणून ब्राह्मणानें आपणाकडे घेतलें नाहीं. आतां या गोष्टीनें इतर कोणताही तोटा झाला असो पण ही वर्ण व्यवस्था लोभानें किंवा दुसऱ्यांनां दाबण्याकरितां केली असें म्हणतां येत नाहीं कारण रथकाराला अग्न्याधान सांगितले आहे ब्राह्मणांशी रथकाराचा संबंध फारच थोडा येतो. प्रिय बायकोचे डागीनें करणाऱ्या सोनारांचा पक्ष या बाबतींत वैश्यानें राखला नाहीं साजरी तरवार करुन देणाऱ्या लोहारांचा पक्ष या बाबतींत क्षत्रियानीं राखला नाहीं. आणि संध्येला पळि पंचपात्री करून देणाऱ्या कासाराचा पक्ष ब्राह्मणांनीं राखला नाहीं. स्तुतिपाठ करणाऱ्या भाटाचा पक्ष तरी कोणी राखावयाला पाहिजे होता पण तोही कोणी राखला नाहीं. तेव्हां या बाबतींत ब्राह्मणांचा लोभ किंवा भांडण कसें सिद्ध होतें ? क्षत्रियांच्या हातीं धडधडीत तरवार देऊन आपलें वर्चस्व त्यांच्यावर कायम ठेविलें म्हणणारांनां काय म्हणावें ? वर्चस्व ठेवण्याकरितां दुसऱ्याच्या हातची शस्त्रें हिसकून घ्यावीं लागतात हें कोणाला ठाऊक नाहीं. वेद म्हणतांनां शूद्रांचा जिव्हाच्छेद करावा असें म्हटलें आहे पण कांहीं खाटिक चांडाळांच्या तोंडांतून वेद निघाले तेव्हां कोण्या राजानें किंवा ब्राह्मणानें त्यांचा जिव्हाच्छेद केला ? मला वाटते कीं या बाबतींत लोभ किंवा

भांडण नसून कोणाच्या तरी स्वाधीन होऊनच ब्राह्मणांनीं हें काम केलें. आतां तुकारामबुवा सारख्या कांहीं साधूंनां ब्राह्मणांनीं छळलें खरें पण त्या लोकांनीं कडक जातिभेद मानणाऱ्या रामदासांचा देखील छळ केला आणि जातिभेद मानणाऱ्या रामदासांनीं तुकाराम बुवांचा छळ करण्याचे कधींच मनांत आणलें नाहीं. तेव्हां एखाद्या छळकाचे कृत्य सर्व जातीवर लादणें अळकंवत् नव्हे काय ? याप्रमाणें पहिल्या पक्षाचा विचार झाला.

दुसरा पक्ष अंगिकारणें तर याहीपेक्षां चुकीचें आहे. कारण धर्माला तुच्छ समजणाऱ्याच्या दृष्टीनें तर पुराणांत व वेदांत भाकडकथा सारख्याच आहेत. किंबहुना वैदिक विधि पौराणिक विधींपेक्षां कठिण व सायासाचे आहेत. बरें, धर्म ज्याला पाहिजे त्याला तर पुराणें व वेद सारखेच आहेत. उलट वेदाचा अर्थ देखील पुराणाच्या अनुरोधानें करावा असें लिहून ठेविले आहे. यद्यपि पुराणें देखील ब्राह्मणानेंच ऐकवावेंत असें लिहून ठेविलें आहे. तथापि अर्थ चुकल्यास दंडही लिहून ठेविला आहे. कांहीं ऋषींनीं व कलीतील जीव गोस्वामी वगैरे ब्राह्मणांनीं तर वेदापेक्षां पुराणांचा मोठेपणा आपल्या षट्संदर्भादिक ग्रंथांत लिहून ठेविला आहे. तो जरा डोळ्या खालून जाऊं द्यावा. बरें, वेदाचे तरी अक्षरें ऐकण्याचा व म्हणण्याचाच निषेध केला आहे, अर्थ ऐकण्याचा किंवा म्हणण्याचा निषेध केला नाहीं, हें वार्तिकादि ग्रंथ वाचल्यानें सहज कळून येण्यासारखें आहे. तेव्हां अक्षरें चोरून ठेवण्यांत लोभ व भांडण कसें सिद्ध होत असते ? इतकें असून पुन्हां या ठिकाणीं विकल्प देखील आहे. तो मी सुरतसूत दाखविला आहे. सेवेकरी शूद्र कलहानें विष घालील या भीतीनें त्यांनीं वैद्यक विद्या शूद्रापासून चोरून ठेवावी होती पण ती शूद्राला शिकवावी असेंच उलट सुश्रुतांत लिहून ठेविलें आहे तेव्हां वेद चोरून ठेविलें या मुद्यावर भांडण करतांनां कोणाला हंसूं येणार नाहीं ? निरपराधी शेर अफगाणला मारतानां मारेकऱ्याला देखील वाईट वाटले ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. समाज स्थापन होतानां व्यक्तीच्या देखील मनांत हे विचार आले नाहींत व कोल्हापूरच्या प्रकरणांत

शंकराचार्यांनीं देखील काढले नाहींत तेव्हां हिंदु धर्माला कोणी कळ-कळीचा त्राता नाहीं असेंच ह्मणावें लागते. या प्रमाणें दुसरा पक्ष अयोग्य ठरतो.

शेवटचा पक्ष अंगिकारल्यास आह्माला इष्टच आहे. कारण धर्मबुद्धि उपदेश परंपरे वांचून स्वतंत्र येत नसते. तेव्हां धर्म बुद्धीनें अक्षरें न सांगणाऱ्या वर्गानें कोणता अपराध केला ? काय वेद मंत्रांनीं अर्घ्य दिल्यानें सूर्य सारखा कायम राहतो व पौराणिक मंत्रांनीं अर्घ्य दिल्यानें चार प्रहराच्या पूर्वीं बुडतो ? असें असूनही वर्णवादांत आश्रम वादानें विकल्पही आहेत. शिवाय अशा प्रकारची भेद बुद्धि जर उपदेश परंपरेनें आलेल्या धर्म बुद्धीमुळें ब्राह्मणांत आली असेल तर तो अपराध वेद परंपरा उत्पन्न करणाऱ्या ईश्वराचा ह्मटला पाहिजे, ब्राह्मणांचा नव्हे. आतां वेद ईश्वरानें केलेले नाहींत असें जर माझ्या बांधवांचे ह्मणणें असेल तर मग ते शिकण्याकरितां एवढें भांडण कां ? आपणही मनुष्यच आहोंत आपण वेदापेक्षां ताण एखादें शास्त्र करावें उगीच आपसांत व जातीजातींत भांडण वाढवून दयालु सरकारच्या दृष्टीनें व स्वधर्मीयांच्याही दृष्टीनें गुन्हास पात्र होण्यांत अर्थ नाहीं. गतानुगतिक एखाद्यावर प्रेम करण्यापेक्षां भांडण करण्यानें भयंकर नुकसान आहे याप्रमाणें तीनही प्रश्नांचा विचार स्थळ संकोचास्तव येथें अल्पसा केला आहे तो वाचून चर्चा सुरू करावी किंवा आग्रह तरी सोडावा. कळावें लोभ असावा हे विनंती.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

माधान,
तारीख २१।५।१९१३.

आपला,
गुलाबराव.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर ३१.

रा. रा. मुळे मास्तर यांस सा. प्र. वि. वि. मी दोन पत्रें पाठविली त्यांचे उत्तर आपण पाठविलें नाहीं. इकडील कांहीं स्थिती मी आपणांस लिहून कळवितों त्याबद्दल कसें करावें हें मला सुचत नाहीं. इकडील इतर जातींत व ब्राह्मणांत अत्यंत कलह आहे व तो केवळ ब्राह्मणांनीं इतर जातीला वेद शिकविला नाहीं इतक्याच मुद्या-वर आहे. पौराणिक काल सोडून दिला तर मी तरी सध्या ब्राह्मणेतर जातींत निपजलों आहे त्यामुळें जातीविषयीं समाजसंघशक्तीनें मला अधिकार नसला तरी विचार शक्तीनें मला लिहिण्याचा अधिकार आहे. आजपर्यंत ज्या ज्या गांवांत गेलों त्या त्या गांवांत बऱ्याचं ब्राह्मण व्यक्तींनीं माझ्याशीं कटाक्ष धरला. हरदा व धूगांव या गोष्टीची स्पष्ट उदाहरणें होत असें असतांही माझ्या विचाराला जें वाटतें तें स्पष्ट लिहितों.

एखाद्या क्षुल्लक मुद्यावर त्यांतील खरें तत्व न कळतां द्वेष धरणें प्रथम घातास कारण असतें. इकडील द्वेष्ट्या मंडळींत मुख्यत: ब्राह्म-णाची चूक होत नसून इतर जातीची चूक अधिक होत आहे. इकडे इतर जाती ब्राह्मणाच्या भांडणाबद्दल शपथा घेत असतात तशीच पाळी माझ्यावरही आली होती पण मी ती टाळली. सर्व भांडण करणाऱ्यांनां माझे कांहीं प्रश्न आहेत. ब्राह्मणांनीं वेद शिकविले नाहींत या मुद्यावर कटाक्ष ठेवतांनां पांच प्रश्नांचें उत्तर अवश्य द्यावें लागतें ते पांच प्रश्न येणें प्रमाणें:—

१. वेद शिकविले नाहींत असें ख्रिश्चियन किंवा मुसलमान ह्मणत नाहींत परंतु हिंदुच ह्मणतात. तेव्हां असें ह्मणतांनां ब्राह्मणेतर मंडळी आपले हिंदुत्व कबूल करितात काय ?

२. कबूल करित असतील तर वेद त्यांनां शिकविलेच पाहिजे व त्यावांचून आपण वाया गेलों इतके त्यांनां वेद प्रमाण वाटतात काय ?

३. वेद धर्मामुळें प्रमाण वाटतात किंवा ऐहिक विद्या त्यांत आहे ह्मणून प्रमाण वाटतात ?

४. धर्म अदृष्ट असल्यामुळें वेदांतूनच निघालेला धर्म आपणाला तारूं शकेल व आपल्याला ज्याची परवानगी आहे त्यातून निघालेला धर्म आपणांस तारूं शकणार नाहीं हें सिद्ध करण्याविषयीं खात्री कशाची ?

५. बरें धर्म नको असेल तर मग ब्राह्मणानें चोरून काय ठेवले ? ते धर्म वेडे समजून त्यांनां सोडून द्यावें. त्याच्याशी भांडण करण्यांत हांशील काय ?

हे पांच प्रश्न पुन: स्पष्ट करतों.

१. प्रथम प्रश्न विवरण:—

कुराण व बायबल शिकविले नाहीं असें ह्या जाती ह्मणत नाहींत. तसेंच जैनांनीं आपला धर्म आह्माला शिकविला नाहीं असें ह्मणत नाहींत. तेव्हां या लोकांनां आपले हिंदुत्व गर्भीत आहे. पण जैन धर्मीत जती लोकांच्या विरूद्ध किंवा मुसलमानी व ख्रिश्चियन धर्मांत उपदेशक वर्गाच्या विरूद्ध विशेष तक्रार नसते ती हिंदु धर्मातच कां असावी ? कोणी ह्मणेल ब्राह्मण इतर जातीस नीच समजतात ह्मणून हिंदु धर्मांत अशी तक्रार उत्पन्न होते असें ह्मणणाऱ्यांनीं खरोखर ग्रंथच पाहिले नाहीं असें माझें मत आहे. इतर जातीच्या धर्मापेक्षां ब्राह्मणाचा धर्म अधिक समतेनें सांगितला आहे. ह्मणजे शूद्राला केवळ ब्राह्मणालाच नमस्कार करावयास सांगितलें आहे. परंतु ब्राह्मणाचा धर्म तर अश्व, चांडाल, गाई, गाढव या सर्वांनां नमस्कार करण्यास सांगत आहे. तेव्हां ब्राह्मण इतर सर्वांस नीच मानतात, हें धर्मानें सिद्ध होत नाहीं. आतां ब्राह्मणांनीं आपला धर्म सोडला असेल व म्हणून इतर जातीचा त्यांचेवर कटाक्ष असेल तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण जसें शूद्रानें वेद ह्मणूं नये असा विधि आहे. तर धर्म सोडलेल्या ब्राह्मणांनींही ह्मणूं नये असाही विधि आहे. तथापि ते लोक कां ह्मणतात असें जर कोणाचे ह्मणणें असेल तर आमचे ह्मणणें कीं त्यांनां धर्म मिळतो असें मी ह्मणत नाहीं. धर्मा वांचून जर वेद ह्मणावयाचा आहे तर त्यांचे म्हणणें व तुमचें

ह्मणणें सारखेंच आहे. धर्मच जर त्यांनीं सोडला आहे असें जर तुमचें मत आहे तर त्यांनां वेद म्हणून कांहीं विशेष मिळणार नाहीं हें उघड आहे. मग तुह्मीच म्हणून अधिक काय मिळविणार कीं ज्याच्या करितां ब्राम्हणांशी तुम्हाला भांडले पाहिजे. त्यांच्याशी भांडण्या इतकें वेदांत अधिक आहे तें काय ? हें जर ठाऊक नसेल तर भांडणें चिथावलेल्या कुत्र्यांच्या भांडणा प्रमाणें नव्हे काय ?

द्वितीय व तृतीय प्रश्न विवरण :—

हिंदुत्व वेदां वांचून सिद्ध होत नाहीं. हिंदुस्थानांत जो जो राहतो तो तो हिंदु असें गृहीत धरून चालल्यास जैनांनीं व मुसलमानांनीं आम्हाला त्यांचा धर्म शिकविला नाहीं अशी त्यांच्याशी कोणी तक्रार करीत नाहीं. मुसलमान झाल्या वांचून जसा कुराणाचा कांहीं उपयोग नाहीं तसें हिंदुत्व मानल्या वांचून वेदाचा कांहीं उपयोग नाहीं. मुसलमानांत शिया व सूनी असे दोन पंथ आहेत व ते दोन्हीं कुराणाच्या आधारानें आहेत. परंतु त्या दोघांचेही कुराणाचे भिन्न भिन्न अर्थ केल्यानें अनेक प्रकारचें भांडण होत असते आणि ते केवळ धर्मा करितांच होत असतें. हिंदु धर्माची परिस्थिति सध्यां शिथिल असून ब्राम्हणेतर जातीला धर्म पाहिजे आहे असें सध्यां वाटत नाहीं असें माझें मत आहे. कारण मद्य मांस न खाण्याचा धर्म सर्व वर्णांत सारखा सांगितला आहे. तथापि ब्राम्हणेतर जाती मद्य मांसापैकीं कांहीं सोडण्यास तयार नाहींत. आतां ब्राम्हणही पूर्वी असें करित होते असें कोणी म्हणेल तर जो त्यांचा पुर्वीचा धर्म होता तो आतां तुम्हां लोकांत हयात आहे मग त्यांनीं आम्हाला वेद शिकविले नाहीं असें म्हणून भांडण करण्यांत काय अर्थ आहे. वैदिक कर्मानें स्वर्ग मिळतो व पौराणिक कर्मानें स्वर्ग मिळत नाहीं पण असा कोठें लेख आहे काय ? किंवा कोणी पाहून आला आहे काय ? पौराणिक कर्म कठीण व वैदिक कर्म सोपें असेंही कांहीं दिसत नाहीं. आतां वैदिक ज्ञानकांडांत व पौराणिक ज्ञान कांडांत तर मुळींच फरक नाहीं. किंबहुना वैदिक ज्ञान कांडापेक्षां पौराणिक ज्ञानकांड अति स्पष्ट आहे व त्याचा सर्वांस अधिकार आहे. आतां आह्माला धर्म न मिळो पण वेदांत

ऐहिक भौतिक विद्या आहे ती ब्राह्मणांनीं आमच्यापासून चोरून ठेविली असें जर कोणी ह्मणेल तर ते ह्मणणें अत्यंत मूर्खपणाचें आहे. कारण ऐहिक विद्या, सर्व ब्राह्मणेतरांनीं शिकाव्यात. औषधी विद्या, भौतिक विद्या, विमान विद्या, शिल्प विद्या आदि करून विद्येंत ब्राह्मणापेक्षां इतरांचाच जय झाला पाहिजे असें स्मृत्यादि ग्रथांत ठिकठिकाणीं ह्मटलें आहे. व ते मी दाखविण्यास तयार आहे तेव्हां वेदांवांचून आपण वाया गेलो अशा समजुतीवरून ब्राह्मणांशी भांडण करण्यांत फळ काय ? व धर्मच नको असेल तर मग वेद चोरून ठेवून आपल्या अभ्युदयामध्यें अडथळा कोणता केला हें मी तुमच्या जातीचा असल्या मुळें मी तुह्मां सर्वांस विचारतो.

चतुर्थ प्रश्न विवरण:— धर्म हा प्रत्यक्ष गम्य नाहीं तसाच तो अनुमानगम्यही नाहीं तर केवळ शद्वगम्य आहे. इतरांनीं ब्राह्मणांनां दान द्यावें असें सांगितलें आहे तसें ब्राह्मणांनीं प्रतिग्रह घेऊं नये असें त्याच धर्मानें सांगितलें आहे. तेव्हां दोन्ही पक्षीं वैराग्य सिद्ध करणारा हा धर्म अमुकाचा कमी श्रेयस्कर आहे असें सिद्ध करण्याला प्रमाण नाहीं. मग पौराणिक धर्मानें आपली सिद्धि होत नाहीं व वैदिक धर्मानेंच होईल अशा समजुतिवर भांडण्यांत काय तात्पर्य आहे. मुसलमानाच्या स्नानाच्या वेळेस गुसल न ह्मणतां वेदमंत्र ह्मटला तर तो रागावतो तर मग आपण आपले पुराण सोडून ब्राह्मणांस वेदमंत्र कां ह्मणवयास लावावें आतां पुराणांत भाकड कथा फार आहेत. असें कोणी ह्मटल्यास वर वर पाहणाऱ्यास वेदांत कुराणांत व बायबलांत सगळीकडेच भाकडकथा दिसतात. तेव्हां त्याच्या दृष्टीनें धर्म विचारच व्यर्थ आहे. तेव्हां चार पायी मोकळ्या मनुष्यानें धर्मवेड्या ब्राह्मणांशी भांडण्यांत काय अर्थ आहे. उलटी त्या धर्मवेड्यालोकांची या शहाणें समजणाऱ्या लोकांनीं कींव केली पाहिजे.

पंचम प्रश्न विवरण:—

मला पक्कें वाटतें कीं असें ह्मणणाऱ्या ब्राह्मणेतरांनां वैदिक धर्मासारखे कडक बंधन सोसवत नाहीं ह्मणूनच सर्व जातींशीं लग्न व्हावें इत्यादि बिलें पुढें येतात. व ऐहिकविद्येचा तर ब्राह्मणांनीं प्रतिबंधच

केला नाहीं. तेव्हां त्यांच्याशी व्यर्थ भांडण करून आपल्या पायावर धोंडापाडून घेण्या सारखेंच आहे. दयाळु इंग्रज सरकारचें राज्य समतेचे आहे तेव्हां असें करणें हें कायद्याच्याविरुद्ध करण्यासारखेंच आहे. आहे. प्रजेचे मायबाप सरकार असल्यामुळें जरी कोणाच लेंकराचें मन त्यास दुखवितां येत नाहीं, तरी शंकराचार्यो सारख्यांनीं इकडे लक्ष दिल्यास बरें, असें मला वाटतें. मी ब्राह्मणेतर जातींतील आहे व ब्राह्मणेतर जातीस प्रश्न करित आहे याचे कारण ब्राह्मणाच्या वैभवानें मी दिपलो आहे असें मात्र कोणीं समजूं नये. कारण त्यांनीं मला पैशाची किंवा कशाचीही मदत केली आहे असें मुळींच नाहीं. उलटी माझ्या व्रतादिकाला ब्राह्मणेतर जातीचीच मदत आहे. परंतु मी विचारशून्य नाहीं हेंच माझ्या जाती बांधवांनां विचारण्याचे कारण आहे. फुकट कोणाशी ही भांडण करणें दयाळु इंग्रज सरकारचा कायदा व धर्म या दोन्ही दृष्टींनीं गुन्हा आहे. मी हे प्रश्न थोडक्यांत लिहिले आहेत. यावर ब्राह्मणेतर जातीशीं चर्चा करावी अशी माझी इच्छा आहे. तेव्हां ज्याला हिंमत असेल त्यानें पुढें येऊन माझें समाधान केल्यास 'सत्य शोधक' समाजा सारख्या मंडळींत मला शिरणें बरें पडेल ज्याला धर्म नको आहे त्याचा तर तोटा ब्राह्मणांपेक्षां जड यंत्रानें जास्त केला आहे. धर्म जेव्हां मिळेल तेव्हां मिळो पण सध्याचाच चरितार्थ यंत्रामुळें बंद पडत चालला आहे. तेव्हां यंत्राचा कोणी द्वेष करतो काय ? मग धर्म वेड्या लोकांच्या वेदचोरीवर कटाक्ष धरण्यांत काय अर्थ आहे. खरें धर्म पाहिजे असेल तर वेदाची व पुराणाची आज्ञा सर्वांस समान मान्य आहे मग परस्परांवर कटाक्ष करण्यांत अर्थ काय ? आह्मालाच गर्भाचा त्रास देणारा पक्षपाती परमेश्वरच नसला पाहिजे असें मानून नास्तिक होणाऱ्या बायकाप्रमाणेंच हा ब्राह्मणेतर जातींचा दुराग्रह आहे असें माझें स्पष्ट मत आहे. या लोकांनां धर्म नको ह्मणून जाती नको असल्यास जाती आहे तोपर्यंत भांडण केल्यानें उलट्या त्या अभिमानानें दृढ होतात. मोडत नाहींत. तेव्हां याही दृष्टीनें भांडण आहे. शिवाय जर ब्राह्मणांनां वेद शिकवावयाचे नसते तर मानभावाच्या लिपीचे ग्रंथ अजून छापले गेले नाहींत तसें वेद छापलेच गेले नसते.

ब्राम्हणेतर जातींत कोणी विद्वान असल्यास त्यानें माझ्या प्रश्नांचें उत्तर द्यावें.

वेदामध्यें मद्य मांस सेवन सांगितलें आहे तें ब्राह्मणांनीं छपवून ठेविलें असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. कारण शूद्रादिकांनां मद्य मांसाचा निषेध नाहीं हें शास्त्रांत सांगितलें आहे. आतां ब्राम्हणाची सेवा करण्याची जबाबदारी शूद्रावर दिली आहे तर शूद्रापेक्षांही ब्राम्हणांस सर्व भुतांची सेवा जबरदस्त ग्रंथांत सांगितली आहे. इतरानें सेवा मात्र करावी व ब्राम्हणांनीं रिटोळा सारखें बसून खावें असें कोठेंही लिहिलें नाहीं. तेव्हां ब्राम्हणांनी आपल्या पोळीवर दाळ ओढून घेण्यासारख्या गोष्टी कोठेंच नाहीं.

लग्नासंबंधाचा प्रश्न देखील श्रुति स्मृतिनें भिन्न भिन्न रितीनें सोडविला आहे. जाती कायम असोत किंवा नसोत आम्हाला वेद शिकविले नाहीं या मुद्यावर भांडण मूर्खपणाचे आहे. जाती वादाचा प्रश्न निराळा आहे. त्याच्याशी याचा कांहीं संबंध नाहीं.

' अथास्य ' या श्रुतींत शूद्रांनीं वेद ऐकण्याचा निषेध केला आहे तसा ब्राम्हणांनी ही वेदा वांचून इतर विद्या पढूं नये असा निषेध स्पष्ट आहे.

' योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् । वृथा श्रमो भवेत्तस्य भस्मनीव हुतं यथा ' । शिवाय शूद्राप्रमाणें स्त्रियांनीही वेद पढूं नये असेंही म्हटलें आहे. तेव्हां ब्राह्मणांनी स्त्रियांचा द्वेष केला असें झटल्यास चोदनें वांचून प्रिय पदार्थांचे ठिकाणीं चोरी कशी संभवते हाही एक प्रश्न उपस्थित होतो. पण सध्यां त्याची गरज नाहीं.

तूर्त इतक्याच प्रश्नांचे उत्तर हवें आहे.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

माधान, } आपला,
३०।९।१९१३. } गुलाबराव.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्र नंबर ३२.

रा. रा. मुळेमास्तर यांस सा. प्र. वि. वि. मी आमच्या वर्गाविषयींच्या माहितीचें हें दुसरें पत्र पाठवीत आहे. तें प्रसिद्ध करण्यास कोणत्याही भीडभाडीचा विचार करूं नये.

स्वत: शरीराकडून कष्ट न करणें हेंच आमची सध्याची जीवन्मुक्ति ठरली असल्या मुळें उपजीविके करितां आम्हाला लबाड्या कराव्या लागतात. तितक्या शरीराची मेहनत ज्याच्या कडून होते अशा कोणत्याही नीच वर्गाला कराव्या लागत नाहींत. जबरदस्त प्रसंग आल्यावांचून समय विशेषीं चोर देखील आपल्या समाजांतील गोष्ट बाहेर फोडत नाहीं. पण आम्ही लोकांनीं समाज बंधनें अगदीं झुगारून दिलीं आहेत. एखादा गुरु म्हणविणारा माझ्याहून जास्त झाला कीं मी आपल्या शिष्य मंडळींत व फुटणाऱ्या त्याच्याही शिष्य मंडळींत त्याच्या विषयीं निंदा सुरु केलीच समजा. संस्कृत विद्वान आमच्यापुढें आला कीं लोककल्याणाचें ढोंग करून चार लोकांनां समजेल त्याच भाषेंत आह्माला बोललें पाहिजे ह्मणून प्राकृतानें आह्माला त्याला अडवावें लगतें. व तुकारामाचे अभंग ह्मणून सुंदर कीर्तन करणारा एखादा पुढें आला तर संस्कृत भाषा आल्यावांचून वेदाचें रहस्य काय कळणार ह्मणून रूपावलींतल्या दोन चार विभक्त्या घेऊन त्याला अडवावें लागतें. माझ्यापेक्षां देखील कित्येकांनां ही युक्ति सर्वकाळ करावी लागते. कांहीं येत नसलें तरी आम्हाला मोठ्या शांतीच्या आड लपतां येते. मी आव्हान करून सर्व लोकांनां असें विचारतों कीं लबाडी करून लोकांनां फसविणारा फसविणारा आमच्या वर्गाहून एखादा नीच वर्ग जगांत आहे काय ? एखादा विद्वान मनुष्य आमच्याहून अधिक असला ह्मणजे त्यानें साधना करून देवता प्रसन्न केली आहे त्याला अंतीं मोक्ष नाहीं असें आह्मी त्याच्या मागें दुसऱ्या जवळ ह्मणत असतों. व होईल त्या रीतीनें दुसऱ्याची श्रद्धा आह्मी त्याच्या वरून उडविण्याची खटपट करीत असतों. एखादा ज्ञानी भेटला ह्मणजे आह्मी चापलुसीनी प्रशंसा

करतो. व उपासक भेटला ह्मणजे ज्ञानाची प्रशंसा करतो. मूर्तिपूजेला प्रसंगविशेषीं दगडाची पूजा ह्मणून जड व दगडापेक्षांही प्रसंगीं निरूपयोगी अशा स्वदेहाची पूजा करविण्यांत आमचा हातखंडा आहे. सरकारला वर्गणी दिल्यास त्यांच्याकडून लोकांनां नळ पाण्याचा तरी पुरवठा होतो. वेश्येला वर्गणी दिल्यास कामी लोकांच्या गर्भिणी स्त्रियांचे तरी प्रसंगविशेषीं तिच्या कडून रक्षण होतें ह्मणजे आपल्या गर्भिणी स्त्रियांस त्रास न देतांनां कामी लोकांनां आपली इच्छा वेश्येकडून भागवितां येते. अशा रीतीनें तिच्याकडून मोबदला मिळतो. कुत्र्याला खाऊं घातल्यास तें इमानानें घर राखतें. आणि भंग्याला वर्गणी दिल्यास तो तर रोगाचें बीज बाहेर काढून टाकतो. पण आह्मा लोकांनां वर्गणी दिल्यावर त्याचा मोबदला आम्ही कांहींच देत नसतो. आम्हीं जो आशीर्वाद ह्मणून देतो त्याचें मातृभिन्न विधवेच्या आशीर्वादाहून कांहींच अधिक फळ होत नाहीं. आह्माला कोणी लेखी वाद करण्यांत हाक मारली ह्मणजे दस्त कटण्याच्या भीतीनें आम्ही तसें करीत नाहीं. बोलून वाचावाची करण्यांत मात्र आह्मी तयार असतों. वेदान्ताच्या पाठीमागें लपून आह्माला वाटेल तसें करितां येतें. वैय्याकरणाला अपशब्द आवडत नाहीं. गाणाऱ्याला बेसूर आवडत नाहीं. नैय्यायिकाला व्यभिचार आवडत नाहीं. पूर्वमीमांसकाला वैगुण्य आवडत नाहीं. पण आम्हा वेदांत्यांनां मात्र कामक्रोध मद मत्सर सर्व कांहीं प्रारब्धाच्या नांवाखालीं दडपून आवडतात. वैद्याच्या हातून चुकून औषधांत विष पडल्यास त्याला सरकारी रीतीनें शिक्षा होते पण आह्मी आत्मानुसंधान सोडून * खाल्ला तरी आमचें पाठीराखें इतकें समर्थ आहे कीं ईश्वराच्या हातून तें आम्हाला शिक्षा होऊं देत नाहीं. प्रारब्धाची एवढी प्रशंसा आह्मां वेदांत्याच्याच कोशांतून निघाली आहे. देहात्मवादी चार्वाकाच्या हातून होणारीं सर्व कृत्यें प्रारब्धाच्या आड लपून आह्मांला मुक्त होऊन करितां येतात. आणि मजा ही असते कीं अद्वैतसिद्धी सारखे ग्रंथ वाचून आह्माला तत्वबोधासारखे ओनामे समजत नाहींत. यांत वेदान्ताची कांहीं चुकी आहे असें माझें ह्मणणें नाहीं. अनेक सुधारकांनीं जो वेदान्तावर तडाका झाडला आहे त्यांतीलच

मीही आहे असें मात्र कोणी समजूं नये ही विनंती आहे. माझें म्हणणें इतकेंच कीं गानादि शिकणारे जसा तो विषय अनुभवारूढ करून घेण्याची संवय करीत असतात तसे आह्मी वेदान्ती करीत नसतो. पड्ज स्थीर झाल्या वांचून, शंकराभरणांतील शुद्ध स्वराची माहिती झाल्या वांचून कोमल तीव्राच्या ताना घेण्याची गाणारे लोक खटपट करीत नाहींत. पण वर्णाश्रम कर्म केल्यावांचून किंवा भगवत्कीर्तनावांचून अथवा साधनचतुष्टय संपत्तिवांचून देखील शाळेंतील विद्यार्थ्यांप्रमाणें वेदान्ताचे ग्रंथ आह्मी घडघड पाठ ह्मणत असतो. पण मला वाटतें मी चुकतों. आह्मी जर साधन चतुष्टय संपन्न होऊन वेदान्ताचा विचार केला तर कदाचित् एका वाक्यांतच आमचा मोक्ष होईल मग इतक्या मोठ्या ग्रंथ भांडाराचें रक्षण कोण करणार ? ह्मणून या ग्रंथ रक्षकांनां नमस्कार असो. पण त्या ग्रंथांतील तरी सर्वांशीं वेदान्ती आह्मी नसतो. एकांशी वेदान्ती तर पुष्कळ प्राणी आहेत त्याच वर्गात आह्मी जात असतो. समता हें वेदान्ताचें तत्व घेतलें तर धुळींत लोळण्यापुरती समता गाढवांत आहे. मायबहीण देखील भोगण्याची समता कुत्र्यांत आहे. आणि अन्न व विष्ठा सारखी खाण्याची समता माशींत आहे. तेव्हां हे प्राणी एकांशीं वेदान्ती नव्हत काय ? आह्मी केवळ जीवन्मुक्ताचीं लक्षणें आपल्या आंगास लावून एकांशीं वेदान्ती होत असतों, व त्यामुळें या प्राण्यांतून कोण्यातरी एका वर्गात आमची गणना होत असते. एका मुनीनें वेदान्त शिकवून राजाला कन्या मागितली अशी छांदोग्य उपनिषदांत कथा आहे. आणि दुसऱ्या एका मुनीनें दोन स्त्रिया केल्या अशी बृहदारण्यकांत कथा आहे. यावरून वेदान्ती लोकांनां प्रारब्ध बंधन आहे खरें परंतु त्या त्या मुनींनीं आह्मी स्पष्ट या विकारांत बद्ध आहों असें सांगितलें व इतकेंही करून कित्येकांचा त्या मुनींवर विश्वास बसला ही गोष्ट निराळी आहे. पण आह्मी लोक प्रथम आपले विकार लपवून ठेवून लग्न न करतां शिष्यांच्या मायबहिणींचे ठिकाणीं ते प्रगट झाले ह्मणजे मग प्रारब्धाच्या साह्यानें त्यानां उज्वल ठरवीत असतों. खरे वेदान्ती प्रारब्धाच्या भोगाबद्दल नाखुष असून आत्मनिष्ठ असूनही आपल्या चुका पहिले पासूनच कबूल करीत

असतात. व त्या विकारांतून मला प्रसंग विशेषीं सोडवावें असें ह्मणत-ही असतात. आपल्या सारखाच दुसरा विकारी असल्यास त्याची निंदा ते करीत नाहींत. व केल्यास आपलीही करून घेतात. साधूचें लक्षण बांधतां येत नसलें तरी गुरु ह्मणवून घेणाऱ्यांनां इतकें तरी बंधन कबूल करावें लागतें. चहूंपायीं मोकळा वेदान्ती गुरु होण्यास पात्र होतो असें मला वाटत नाहीं.

सत्पुरुष कशाही प्रकारचे असूं शकतील ही जर गोष्ट खरी आहे तर लोक त्यांनां कशाही प्रकारें वागविणार ही गोष्टही त्या बरोबर ठरलेली आहे पण या कुंचुकापेक्षां देखील आमच्या वर्गाची स्थिति कांहीं निराळी आहे. विकार बाहेर फुटे पर्यंत आह्मी शुकाचार्यास मागें टाकणारे ब्रह्मचारी असतो आणि नंतर कृष्णासारखे सर्वसमर्थ सर्व भोगी होतो. एखादा योगी भेटला तर चमत्कारांत कांहीं अर्थ नाहीं असें त्याच्या पुढें आह्मी ह्मणत असतों. कर्मठ भेटल्यास हा अझून तुच्छ वस्तूच्या मागें लागला आहे असें ह्मणत असतो. भक्त भेटल्यास वस्तु अझून पलीकडे आहे असें आह्मी त्यास ह्मणत असतो: आणि नीतिमान वेदान्ती भेटल्यास त्याचें शाद्बिक ज्ञान किती आहे हें पाहत असतो. आमच्या पेक्षां आह्माला एखादा पंडित भेटल्यास मोक्ष तर एका वाक्यानेंच होतो इतक्या भाराभर ग्रंथांची जरूर काय ? असें त्याला आह्मी ह्मणत असतो. बापाचा व आईचा खून करण्या इतकें आमचें क्रौर्य प्रारब्धाच्या नांवा खालें झांकलें जातें. आह्माला कोणी नांव विचारल्यास त्यावेळीं आह्मीं मुक्त होऊन या देहाला गुलाबराव ह्मणतात इत्यादि सांगत असतो. जसा कांहीं आमचा देह ब्रह्म नाहीं अशा ठिकाणीं पडला आहे. एऱ्हवीं खातांपितांना देहाला आमच्या वांचून पृथक्सत्ता कोठें असणार ? हर हर !! या लबाडीच्या कचाट्यांतून कोण कसा सुटत असेल ह्याचें मला मोठें गूढ पडलें आहे.

( १ ) निराश असल्यास शरीराचे कष्ट सहन करून वनांत जावें. ( २ ) आशा असून शरीर बळकट असल्यास दळण कांडण करून पोट भरावें किंवा ( ३ ) लोकापुढें नाच करून हावभाव दाखवून देखील भरावें. नाहींतर ( ४ ) गायावाया करून त्यांच्यापुढें पदर

पसरून कसें तरी आपलें संरक्षण करून घ्यावें. मग लोक न देतील तर मात्र त्यांची दुर्जनता खरी. पण माझ्या सारख्या साधुवर्गापेक्षां लोकवर्गच जास्त कृपाळु आहे. तो आह्माला उपाशीं कधींच मरूं देत नाहीं. या चार मार्गांवांचून लबाडीच्या कचाट्यांतून सुटण्याचा पांचवा कोणता मार्ग असेल असें मला तिन्ही काळीं माहित नाहीं. आमच्या लबाडीला उद्देशूनच "द्रव्याचेनि अभिलाखें । असाधु नेणों काय बके । ह्मणोनि तयाचेनि मुखें । श्रवण न करावें गा ॥" इत्यादि उद्गार सर्वभूत समान मानणाऱ्या वरिष्ठांच्या देखील तोंडून बाहेर पडले. तेव्हां केवढे आह्मी शूर ! काय हा आमचा पराक्रम !! आमच्या भुजदंडाशीं दंड लावण्याकरितां परमेश्वरावतारावांचून कोण आतां समर्थ होणार ? तोच प्रभु आमच्याकडे कृपादृष्टीनें पाहील तर आमची ठाकुरकी आहे व जगाचीही आहे. ह्मणून त्याचीच प्रार्थना करून हा लेख श्रीज्ञानेश्वरतात चरणीं समर्पण करितों.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | |
|---|---|
| माधान,<br>१०।६।१९१३. | आपला,<br>गुलाबराव. |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर ३३.

रा. रा. मुळे मास्तर यांस सा. न. वि. वि. पत्र लिहिण्यास कारण कीं नागपूराहून परत येतांना मला एक दोघे माझ्या जातीची माणसें भेटली. त्यावरून मला जे विचार सुचलें तें लिहित आहे. हे प्रसिद्ध करण्यांत कोणत्याही प्रकारची भीडभाड धरूं नये. "मनुष्याणां सहस्रेषुकश्चियतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मांवेत्ति तत्वत: " हजारो मनुष्यांत एकादाच मला जाणण्याचा यत्न करितो

* अशा प्रकारें यत्न करणाऱ्या हजारो मनुष्या मध्यें एकादाच माझ्या खऱ्या स्वरूपाला जाणतो या भगवंताच्या उक्तीला झुगारून देऊन आम्हा लोकांचा वर्ग आर्यावर्तात शाळांमधून बाहेर पडूं लागल्यापासून आर्यावर्ताचा चूर होत आहे. आमच्या वर्गांत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळ सर्व कोणी येतात. जी गोष्ट नेहमींच थोडी असावयाची ती मोठ्या प्रमाणावर दिसूं लागली कीं तींत कांहीं लबाडी असते हा सृष्टि नियम आहे. भगवंताचें म्हणण्या प्रमाणें उष्ट्या पात्रावरील एक शीत खालें असतांना स्वर्गांत सारखा घंटानाद व्हावयाचा. इतकी योग्यता ! त्या आमचा एक वर्ग तयार होऊन देखील देवळांतही आपो-आप घांट वाजत नाहीं हे मोठें आश्चर्य आहे. आमची ही टोळ धाड ज्या ठिकाणीं जाऊन पडेल त्याच्या शेतीची, घरदाराची व नीतीची राखरांगोळी झालीच म्हणून समजा. सर्वच ब्रह्म आहे अशा समजुती-मुळें त्याग वृत्तिपेक्षां आमच्या लोकांच्या भोग वृत्तीलाच फार जोम आलेला असतो. अनेक प्रकारची नीच कामे करणारे जगांत जे आहेत. ते सर्व आमच्या वर्गाच्या खालीं आहेत असें माझें मत आहे. शिवाय आमचा वर्ग कोठूनही तयार होतो. दुष्काळांत ख्रिश्चियन करण्यां करतां तरी मिशनरी लोकांनां खटपट पडते पण आमचा वर्ग तयार करण्याला खटपट मुळींच पडत नाहीं. लोकांवर कोणत्या रीतीचे वजन आपल्याला ठेवतां येईल या विवेचनांत आह्मी अगदीं गढलेले असतो. मुक्ति मिळवून घेतल्यावर आतां संसाराचीच व्यवस्था आह्माला करावयाची असते. वेश्या वर्गाला व आम्हाला ताजव्यांत बसविले असतां आमचेच पारडे खालीं बसेल असे मला पक्के वाटते. वेश्या कितीही लुबाडणारी असली तरी कामी लोकांनां तिची जरूर असल्यामुळें त्यांचें मनोरंजन करण्याचे साधन तिच्या जवळ कसें तरी आहे. ती साधनाची हवी तितकी किंमत घेवो, ज्याला जरूर असेल तो तितकी देतोही. शिवाय वेश्यांचे छक्के पंजे त्या ज्ञाताऱ्या झाल्यावर चालत नाहीं. वेश्यानीं मुलगी घेऊं नये ह्मणून सरकारनीं कडक कायदा केला आहे पण आमच्या वर्गाची गोष्ट याहून निराळी आहे. आमच्या जवळ लोकांना मनोरंजन करण्याचे तादृश साधन कांहींच नसते. उलट त्यांचा

प्रत्येक ठिकाणीं मनोभंग करीत असतो. आमचा धंदा म्हातारे झाल्या वर देखील बंद पडत नाहीं. तीर्थातून व सत्कर्मांतून वेश्या वर्गांनां पुष्कळ वेळीं घालून दिल्या जाते पण आम्ही कितीही नीचपणा केला तरी आमच्या वाचून तीर्थाला व सत्कार्याला शोभाच येत नाहीं. आमच्या लोकाच्या तयार न होऊं देण्याविषयीं विश्वसरकार जो परमात्मा त्यानें एक कायदा करून ठेवला आहे परंतु त्याला भीक न घालून आम्ही लोक तयार होण्याची टांक साळ सारखी सुरू आहे. वेश्यांच्या जाळ्यांत फसूं नये ह्मणून पूर्वीचे राजे आपल्या पुत्रांना कुट्टीणी मताची व तिच्या फसविण्याची माहिती करून देत असत, पण आम्हा लोकांचा कावा कोणीच उत्तम रीतीनें बाहेर काढला नाहीं, त्यामुळें आर्यावर्ताचा आमच्या वर्गा खालीं चुराडा झाला आहे. आमच्या वर्गांत वासुदेवानंदा प्रमाणें एकादा हिरा नसेल असें माझें म्हणणें नाहीं परंतु तशाचे आमचे अगदीं आंतुन भांडण जुंपले असते. असा एखादा हिरा निपजूं लागला ह्मणजे त्याचा नायनाट करण्याचा आम्ही यत्न करीत असतो. वेश्येचे नटणें गणीतानें कसलेलें असून आमचे नटणें अगणित आहे. चोळी तंग घालणें, पदर सांवरून घेणें, नीटनेटकें दागिणें घालणें, नाचून हावभाव दाखविणें, गळ्यांतून चार ताणा काढणें, एका डोळ्याची उघड झाक करणें, या पेक्षां वेश्येला अधिक नटावें लागत नाहीं. याहून आह्मला किति तरी जास्त प्रकार करावें लागतात. या प्रमाणें वेश्या वर्गाचे व आमचे साम्य कसें हें दाखविलें. दुसरा आमच्याशीं समान वर्ग असा कुत्र्याचा आहे. पण त्यांत त्यांहून देखील आह्मी उडून जातो. कुत्र्याला कोठेंही पडलेली विष्टा चालते पण ताजें करून दिलेलें जवारीचें अन्न आम्हाला चालत नाहीं. लाडु अनरसें पाहिजेत. कुत्रा आपल्या मालकाचा इमानीपणा व प्रेम कधीं सोडत नाहीं पण आह्मी त्या दोहोंनाही जाळून खाक केलें आहे. कुत्रा कांहीं दिवस तरी एका मालकाच्या घरीं राहत असतो; पण आह्माला रोज रोज नवा मालक शोधावा लागतो. तिसरा आमच्याशीं समान वर्ग गाढवांचा होय. परंतु धुळींत लोळणें व गादीवर निजणें इतका त्यांत व आमच्यांत फरक आहे. चवथा आमच्याशीं समान वर्ग

कावळ्याचा असून मृताचे पिंड भक्षण करणें व आमचा जीवंताचा पिंड भक्षण करणें इतका त्यांत व आमच्यांत विशेष आहे. आमचा वर्ग तयार होऊं लागला म्हणजे नव्या कोवळ्या जगावर टोळधाड येणें सुरु झालें असें समजावें. आह्मी जों पर्यंत एकएकटे असतो तों पर्यंत आमच्या सारखें उच्च जगांत कांहीं नाहीं हें खरें; तरी पण आमचा वर्ग तयार होऊं लागला ह्मणजे मात्र वर लिहिल्याप्रमाणें स्थिति झाल्या शिवाय राहत नाहीं. आह्मा लोकांना किति प्रकारें नटावें लागतें याचे थोडेसें दिग्दर्शन मी करितों. आमच्या लोकांत २ दोन वर्ग आहेत. मूर्ख व शहाणा. मूर्ख लोकांच्या उपजीविकेंचें साधन वेडेपणा मिश्रित भजन असून शहाण्या लोकांच्या उपजीविकीचे साधन वेदान्त आहे. यांतील पहिल्या वर्गाची थोडीशीं स्थिति लिहितों. जितक्या आशा पाहिजेत तितक्या कायम असून विदेहीपणा दाखविणें हें आमच्यांतील पहिल्या पोट वर्गाचे लक्षण आहे. हे सामान्य लक्षण कळण्याकरितां एक दान उदाहरणें देतों. प्रथम आम्हीं परस्परास भेटलो म्हणजे दोघांच्याही तळव्याची आग मस्तकास जात असते परंतु आम्हाला एकमेकांच्या पायावर लवून नमस्कार व साष्टांग लोटांगणें वगैरे घालावी लागतात. कोणी आलें असतां हरि हरि आमच्या तोंडाला बांधले असावयाचेंच. एवढ्यानें आमचा उद्धार होत नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं पण ही गोष्ट लोकाजवळ ही सारखीच आहे असें समजून आह्मी आपले वर्चस्व लोकावर बसविण्याची खटपट निर्लज्ज पणें करीत असतों. साधरण लोकांना मान देण्या ऐवजीं आह्माला थोडासा उद्धटपणा करावा लागतों व थोडीशी शद्बांत कळकळ आणावी लागतें. एकादा दर्शनास आल्यास "या" ह्मणण्याच्या ऐवजीं ये बापा देवा कई आलास लई दिवसान दर्सन झाल बापा तुह, तुह्मा पायाची खाक हों मी" असें आह्माला ह्मणावें लागतें. कित्येक वेळीं गांव विचारले असतां "गांव, गांव सांगावेच लागेल, विचारलच आहे तेव्हां सांगितलेंच पाहिजे. ह: ह: गांव, गांव बरें विचारले. गांव आमचे अमुक पूर हरि हरि जगत्पावन करण्याच्या उद्देशानें निघालों. हेंही घर पावन करावें ह्मणून इकडे येणें झालें आहे. हरि हरि, तेथें

एक संस्थान आहे, ( मध्येंच थांबून ) हे देव असतात," इत्यादि हावभाव सारखेच असल्यामुळें गरीब लोकांनां आमचा कावा ओळखण्यास कठीण पडतें. एकादा आपल्या पेक्षां उच्च मनुष्य भेटला ह्मणजे त्याला आमच्या वर्गांतील लोक विचारतात. "तुमच्या मंडळींत कोणी गाभन राहिलें कीं नाहीं बोवा" ? असें विचारणाऱ्याचा आंतून तळतळाट होत असतो. आह्माला खरें शास्त्र येत नसल्यामुळें रूपकाचे कांहीं तरी बोलावें लागतें; मग त्याचा अर्थ मंडळीला कसा तरी करून घ्यावा लागतो. आह्माला ज्याच्यावर अनुग्रह करावासा वाटतो त्याच्यांत आह्मीं दोन सद्गुण घालून देत असतों. मनुष्यास आई बापाच्या विरुद्ध वागणें व बायकोस नवऱ्याचे विरुद्ध वागणें व जेथें नवरा आमच्या ह्मणण्या प्रमाणें वागत नाहीं तेथें आह्मी त्याच्या बायकोला पति सेवा सांगत असतो व ज्या घरांत बायकोचे वर्चस्वअसतें त्या घरांत तर आह्मींच नवरे होत असतो. आतां दुसरा आमच्यातील वर्ग शहाण्याचा होय. हा वर्ग आमच्या पूर्वीच्या वर्गापेक्षांही विलक्षण असतो. पूर्वीच्या वर्गाजवळ तर हरिनाम तरी उद्धार करून घेण्याचें साधन असते पण आमच्या जवळ तर तेही नसते. पूर्वीचा आमच्यातील पोट वर्ग हरिनाम घेऊन पापकरण्यास शिकवीत असतो व आह्मी नामावांचून ते करण्यास शिकवीत असतों. यद्यपि दान हें श्रेष्ठ सांगितलें आहे; तथापि ते सरळपणानें मागितल्यास व सरळपणानें दिल्यासच फल दायक आहे. सरकारची वर्गणी १०।५ वर्षांतून एकादे वेळेस लोकांवर बसत असेल तर आमची वर्गणी वर्षांतून ३६० वेळे होत असते. वेश्येचे घरीं एकादा धनिक न गेल्यास ती त्याची निंदा करण्यास समर्थ होत नाहीं व लोकाजवळ करीतही नाहीं कारण लोक तिला बिचारीला पहिले पासूनच गर्ह्य समजतात. पण आह्माला आमच्या मताप्रमाणें पैसे न दिल्यास लोकाजवळ त्याच्या कृत्याचा डांगोरा पिटत असतो. अशा आमच्या तडाक्यांतून वैदिक धर्माला वाचविण्या करितां परमेश्वराला अवतार घेण्याची खरोखरच अवश्यकता आहे. आमच्या धर्माची ग्लानि परकीय लोक मुळींच करीत नाहींत तर आह्मी स्वतःच ती करीत असतो आणि ते

लोकांच्याही नजरेस येत नाही. तेव्हां आमचा उद्धार करण्या करितां तो परमेश्वर लवकर अवतार धरो अशी त्या प्रभुस अनेक वार प्रार्थना करून श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणीं हा लेख समर्पण करितो.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

| | |
|---|---|
| माधान,<br>तारीख १५।६।१९१३. | आपला,<br>गुलाबराव. |

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# पत्र नंबर ३४.

रा. रा. कृष्णराव यांस सा. न. वि. वि. साधारण लोकांची प्रवृत्ति अशी आहे कीं अतिशय सोपी व अतिशय कठीण अशा दोन्ही गोष्टी विषयीं ती कुंठीत होते. आत्मज्ञान अत्यंत सोपे असेल तर ते हातच्या कंकणा प्रमाणें प्राप्त करून घेण्यांत कांहीं विशेष नाहीं आणि ते जर कठीण असेल तर अनंत जन्म जरी आपण त्यासाठीं श्रम केले तरी प्राप्त होते किंवा नाहीं ह्याची वानवाच ह्मणूनच वेदान्तानें त्याला दोहींच्या मधले ठरविले आहे. प्रथम अतिशय कडक वैराग्य धरून गंगेच्या तटाकीं बसल्या नंतर एक दिवस अकस्मात आत्म साक्षात्कार झाला व मग घरीं येऊन शाळेंत शिक्षकाची नोकरी पतकेली इत्यादि अलिकडील महात्म्यांची चरित्रें सध्यां चमकूं लागली आहेत. बरें या महात्म्यांची दया तरी इतकी अवघड असते कीं कठीण अशी जी वेदान्ताची तत्वें ती पोरा बाळाच्या सोप्या भाषेंत कशी सांगतां येतील याची त्यांना फार काळजी. कारण हे भेल्यावर जगांत तारावयाला याच्यां मागें कोण राहणार ? पण अध्यात्म प्राप्ति तितकी सोपी आहे असें वेदान्त मुळींच ह्मणत नाहीं. किंवा अनंत जन्म गेले तरी तिच्या विषयीची निराशा होणार असे ही तो सांगत नाहीं. त्याचे ह्मणणें एव-

देंच कीं तुह्माला आह्मी अध्यात्म ज्ञानाला योग्य आहो असे वाटवून देणारा हा एक मनुष्य जन्मच आहे. तेव्हां उठल्या पासून निजे पर्यंत व जन्मल्या पासून मरे पर्यंत हा खर्ची पडेल इतकी तुह्माला आत्म प्राप्ती करितां मेहनत हवी आहे. त्यांत कोणीकडेच वृत्ति गुंतलेली नसल्यास अगदीं फार थोड्याश्रमानें काम होईल व जितकी वृत्ति जितक्या ठिकाणीं गुंतली असेल तितक्या ठिकाणाहून ती सोडविण्याला तितक्या पटीनें श्रम अधिक पडतील. साधारणत: वेदान्तांत तीन प्रकारच्या मानसिक क्रिया शिकाव्या लागतात. प्रथम एकादी वस्तु सोडणें मग तिला मिथ्या समजणें व आपली सत्य वस्तु त्याठिकाणीं ओळखणें. कल्पना करा कीं एखाद्या मनुष्याची एका दे वस्तुच्या ठिकाणीं वृत्ति गुंतलेली आहे तर प्रथम त्या वस्तूपासून मन काढल्यावर त्याला ह्या तीनही समजुती जितक्या लवकर करून घेतां येतील तितकी दहा वस्तूंचे ठिकाणीं ज्याची वृत्ति गुंतली, आहे त्याला करून घेतां येणार नाहीं. बायकोचे ठिकाणीं अत्यंत ज्याची वृत्ति गुंतलेली आहे त्याची हळु हळु ती सोडवून बायकोला स्वप्नाप्रमाणें मिथ्या समजून तिज पासून मिळालेला सुखानंद आपलाच आहे किंवा लोली लिंब्याच्या गोष्टीप्रमाणें वेश्येलाच श्रीकृष्णावगैरेंचे अलंकार घालून नंतर श्रीकृष्णाच्या मूर्तीवर दृष्टि फिरवून बायकोचे ठिकाणीं वैराग्य उत्पन्न केल्यावर ब्रह्मबोध होणें जसा एकाद्याला सुलभ आहे तसा एका पेक्षां अधिक प्रवृत्ति धारण करणाऱ्याला सुलभ नाहीं याचे एकादे उदाहरण घेऊं. समजा, एका मनुष्याचे वेश्येवर प्रेम आहे, घरच्या गाईवर प्रेम आहे आणि लोकांनां सुख देण्या करितां रस्त्यावर विहीरी बांधण्यावर व झाडे लावण्यावर प्रेम आहे त्याच प्रमाणें वर्तमानपत्रें वाचण्यावरही प्रेम आहे. असें चारही प्रकारचें एकत्र झालेलं प्रेम मनुष्यांत असल्यास ते चार वृत्ति मुळें राहुं शकेल. वेश्ये वरील प्रेम कामामुळें, गाईवरील प्रेम धर्मामुळें विहीरी तडागादिकावरील प्रेम दयेमुळें व वर्तमान पत्रावरील प्रेम देशभक्ति मुळें, तेव्हां अशा मनुष्याला वेदान्त शिकण्याचा प्रसंग आल्यास तो आपल्या गुरुजीस चार तऱ्हेनें अडवील. गुरुजीनें [illegible] गुरुजींचे

निरूपण चालल्यास शिष्यजी असे ह्मणूं शकतील, समाधि तर कठीण आहे आणि ब्रह्म तर वाक्यानें समजतें. अज्ञानी सुद्धां ब्रम्हांत लीन होतो. वाक्यानें एकदा ब्रम्हज्ञान झालें ह्मणजे अज्ञान शेष उरत नाहीं तेव्हां अज्ञानरहित वाक्यज्ञान ज्याला आहे असा जीव स्वयंच झोपेंत ब्रह्मांत लीन होत असला पाहिजे. तेव्हां समाधि वांचून रोज विदेह मुक्तीचा आनंद मिळवून देणाऱ्या झोपेला सोडून व्यर्थ निरूपणांत वेळ कां घालवावा ! प्रारब्धाचे भोग व्यासासारख्यांनां सुटले नाहींत मग ते आह्माला कसे सुटणार ? तेव्हां जीवन्मुक्तीच्या मागें लागण्या पेक्षां रोज विदेह मुक्तीचाच आनंद भोगणें उत्तम. वाक्य ज्ञान आह्माला झालेंच आहे. पुनर्विवाह काय व प्रथम विवाह काय सारखाच. अशा वेळीं गुरुजीनें कितीही सुषुप्तीचे निराकरणपर भाषण केले तर ते प्रथम रुचणार नाहीं, आणि गुरुजीच्या रसाळ वाणीनें कदाचित् मोह पाडलाच तर सकाळीं गाय सोडावयाचे वेळीं हा काय वेदान्त ? इतके निरूपण धड लक्ष्यांतही राहत नाहीं व थोडासा धर्म हातून घडावा तोही घडत नाहीं. सर्व शास्त्रांत चित्त शुद्धि वांचून ज्ञान होत नाहीं असे ह्मणतात तेव्हां आतां जर निरूपणापुढें गाय सोडावयाची राहील तर चित्त शुद्धीला अडथळा येणार नाहीं काय ? असे शिष्याच्या मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. बरें दुपारी निरूपण सुरू केले तर शिष्याचा वेदान्त तळ्यांत किंवा झाडांत अटकून राहणार ? कारण सर्वांभूती जर परमात्मा आहे तर प्राण्यांना पाणी पाजणें, त्यांना छाया देणें, भूतांवर दया करणें याचेंच नांव वेदान्त असे शिष्यजी ह्मणतील. अरे बाबा ! परमेश्वर सर्वांभूतीं आहे परंतु तो भूतधर्मवान् नसल्यामुळें त्याच्यावर तुझी दया कशी उपकारक होणार ? परमेश्वरावर तूं दया करणारा होशील तर त्याचे परमेश्वरत्व कसे राहील. भूतीं परमेश्वर आहे ह्मणून भूतावर दया करावयाची नसते तर विशेष अदृष्ट उत्पन्न करून घ्यावयाचे असते ह्मणून. हें गुरूजीनें मस्तक फोडून सांगितलें तरी शिष्यजी कशाला ऐकतात. इतक्यांत झाला तिसरा प्रहर, तेव्हां शिष्यजी पश्चिमेकडे तोंड फिरवून हा निवृत्ति पर वेदान्त काय कामाचा. अशा वेदान्तानेंच आमचें घर अगदीं

नाहींसे झाले आहे. या वेदान्ती संन्याशाला भिक्षा मिळावयाला वास्तविक आमचीं घरें, पण त्यांच्या एकवेळ मळ्या होवून बसल्या ह्मणजे ते आणि आह्मी सर्व निघणार भिक्षा मागावयाला. मग मागणारे फार झाल्यामुळें एकादा कुली एजंट पकडणार, आणि आसमांत नेणार. तेव्हां ज्याच्या योगानें आमच्या शरीरांत, मनांत, प्राणांत, कांहीं तरी जोम येईल असा वेदान्त सांगणारा कोणी तरी आह्मांला पाहिजे आहे. तात्पर्य सांसारिक चतुर्भुज विष्णुला किंवा वासने मुळें चतुर्मुख झालेल्या ब्रह्मदेवाला बिचारा एक मुखी गुरु काय उपदेश करणार ? चंचल मन जितके जास्त, तितक्या युक्ति जास्त आणि तितकी बुद्धि मठ्ठ !! एकेवेळीं एका शाळेंत शिक्षकाकडे कांहीं शिष्य विद्याभ्यास करीत होते. तेव्हां अकस्मात् बैल कसा असतो असा प्रश्न शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना विचारला. तेव्हां ठाऊक नसल्यामुळें प्रथम मुलानी उत्तर दिले नाहीं. तेव्हां शिक्षकानीं मुलाला बैल असा असतो इत्यादि समजून दिले त्यांत एक मुलगा माझ्या प्रमाणें मठ्ठ होता त्याला शिक्षक ह्मणाला कारे ! तुला समजले काय ? बैल चार पायाचा असतो ह्मणून ? तो मुलगा ह्मणाला नाहीं, गुरुजी. तेव्हां त्यानीं खडूनीं फळीवर एक बैलाचे चित्र काढून हा पाहिलास बैल, असें ह्मटले पण त्या धड्यांत कांहीं बैलाची कामगीरी होती. तेव्हां मुलगा ह्मणाला हे चित्र या धड्यांतील गोष्टी कसें करूं शकले ? तेव्हां शिक्षक ह्मणाले, बेटा, तूं आपले हात पाय टेंकून उभा रहा. चित्रांतील बैल हा तुझ्याच प्रमाणें जीवंत होता. तरी पण मुलगा कांहीं बोलत नाहीं असें पाहून शिक्षकानें त्याच्या पाठीवर एक वेताचा तडाखा दिला तेव्हां तो हातपाय टेकलेला तसाच चित्ता उडाला. तेव्हां शिक्षक ह्मणाला याप्रमाणेंच या धड्यांतील बैल होता बरें. एक सिद्धान्त पटण्या करितां ज्याला अनेक दृष्टान्ताची अपेक्षा लागते त्याची बुद्धि मठ्ठ आहे असें कोण ह्मणणार नाहीं. पण साधारणतः अशा लोकांना आपल्या बुद्धीचा अभिमानही असतो असें बहुशः माझ्या पाहण्यांत आहे. आधुनिक ऐतिहासिक गोष्टींचा सध्यांपुरता सारग्राही पणानें अवलंब केल्यास वेदांत पंचावयव तर्काचीं वाक्यें कमी सांपडतात. अमुक करावे अमुक करूं नये

इत्यादि आज्ञावाक्य आणि अमुक वस्तु अशी आहे इत्यादि सिद्धान्त वाक्यच वेदांत फार आहेत. पुढें न्यायादि शास्त्रांत हेतु उदाहरणादि पंचावयवाचा सुळसुळाट दिसतो. तेव्हां वैदिक कालिन ऋषीला पंचावयवी अनुमानाची कांहींच आवश्यकता लागत नव्हती असें अनुमान काढणें कांहीं चुकीचे ह्मणतां येणार नाहीं. बरें अनुमानाला हेतूची अपेक्षा. हेतुला साध्य सहचाराची अपेक्षा, आणि सहचाराला दृष्टान्ताची अपेक्षा आहे. पण दृष्टान्त प्रसंग विशेषी विरुद्ध अर्थांचे निरूपण करीत असतो आणि विरुद्ध विरुद्ध अर्थांचे ठिकाणीं लोक त्याचा उपयोगही करीत असतात. उदाहरणार्थ दुर्जन कसा असतो सर्व लोकांना अग्निप्रामाणें ताप देणारा, यमाचा नरक कसा आहे सर्व पाप्यांनां अग्नि प्रमाणें जाळून टाकणारा आणि भगवंताचे नांव कसें आहे, पापांचे अग्नि प्रमाणें भस्म करणारें. एकच दृष्टान्त आप आपल्या परिस्थीती प्रमाणें विरोधी सिद्धान्ताचे मंडण करितो तेव्हां एका वस्तुचा विरोधी सिद्धान्ताशीं सहचार आहे काय ? तात्पर्य जशी ज्याची दृढश्रद्धा असेल व ती जर कोणत्या एकाद्या विकारा मुळें बसलेली नसेल तर अनिवार्य आहे असे समजून ती उडविण्याचा यत्न ही करू नये आपण ही आपल्या जवळ निर्विकारी श्रद्धा शिलक असल्यास तिच्या हातीं देऊं नये. निर्विकारी शिवभक्तानें सर्व काम पुरविणाऱ्या कार्तवीर्याच्या मागें लागणें गौण आहे तसेच निर्विकारी कृष्ण भक्तानें जार कर्मी कृष्णाला सोडून एक पत्नी रामाच्या किंवा ब्रम्हचारी दत्तात्रयाच्या पाठीस लागणें व्यर्थ आहे. स्वामी चोर असल्यासच सेवकांनां आपले अपराध पोटांत घालील असा भरवंसा असतो. जार कृष्णाला सोडून एकपत्नि रामाच्या पाठीमागें लागावे कीं नाहीं हा विचार गुण संक्रमण विनिर्मुक्त सेवकांनींच करावा. जैन मतांत ईश्वरावाचून आपल्या बलानेंच जीव तरू शकतो असा कर्मवाद घेतला आहे. म्लेच्छ मतांत कर्मा वांचून सर्व कांहीं पापें परमेश्वर क्षमा करून देतो असा कर्मवाद घेतला आहे पण वैदिक मतांत भगवान् प्रार्थनेनें भक्तांच्या अपराधाची क्षमा करून त्याला त्याच्या सत्कर्मांनेंच शुद्धि देतो असें म्हटलें आहे. यद्यपि स्वामीला पाप क्षमा करण्याला सेवकाचे

गुण अंगांत असलेच पाहिजेत असा आग्रह निर्बंध करतां येत नाहीं तथापि तसे गुण कृष्णादि स्वामींच्या अंगीं आहेत असे वैदिक धर्म सांगत आहे. पुनः जैन धर्माप्रमाणें कर्मांच्या अतिशयानेंच जर सर्व अनीतीचे पल्लव वेगळे करून नीतीची बनलेली व्यक्ति जर ईश्वर असेल तर या अनीतिमान् जगाचे निमित्त उपादान होण्यास तो मुळींच पात्र होत नाहीं पण सर्व आस्तिक जगत् कारण परमेश्वराला मानतात तेव्हां उपास्याच्या ठिकाणीं तसे कांहीं गुण असल्यास सहनशीलता धारण करणें हा एक गुण उपासकाचे अंगांत असणें अगदीं आवश्यक आहे. या मानानें आमची श्रीकृष्णोपासना रामोपासनेपेक्षां कमी किंमतीची आहे असे ह्मणणें अतत्त्ववित्पणाचे होईल, तुझा पति जार आहे ह्मणून त्याला सोडून माझ्या पतीला तूं वर असें ह्मणणारी स्त्री पतिव्रता असली तरी दुसऱ्याला जारिणी करणारी खास आहे असें ह्मणतां येणार नाहीं काय ? आतां भ्रष्ट झालेला पतीही टाकून द्यावा असे शास्त्रांत सांगितले आहे. असे कोणी ह्मणेल तर त्यानें दृष्टान्तावर शंका करण्याचा प्रमाद केला असें मी ह्मणतो शिवाय पतीपेक्षां अतिशय जसा धर्मांत उपदिष्ट आहे तसा उपास्यापेक्षां अतिशय उपासनेंत उपदिष्ट नाहीं अर्धी सोडून सगळीवर धांवणारा मी नव्हे म्हणून मंगळसूत्र सोडून माळ घालवून देण्याची माझ्या विषयीं गुप्त आशा करणें व्यर्थ आहे. मंगळसूत्र असून मला कोणी माळकरी म्हटल्यास विरोध नाहीं.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | | |
|---|---|---|
| माघान, | } | आपला, |
| ३।७।१९१३. | } | गुलाबराव. |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

## रा. रा. नारायण केकरे यांस पाठविलेले पत्र.

# पत्र नंबर ३५.

राजमान्य राजेश्री नारायण केकरे यांस सा. न. वि. वि. आपली वेदान्त शिकण्याची व माझी वेदान्त शिकविण्याची मागील भेटींत ठरलेली इच्छा सफल होण्याचा जितका संभव आहे तितका ती पहिल्या प्रमाणें असण्याचा कमी आहे. वेदान्त शिकतांना अनेक खबरदाऱ्या मनुष्याला घ्याव्या लागतात त्या तुम्हालाही घ्याव्या लागतील. पायांत बुट घालून वेदान्त वाचल्यानें कधीं वेदान्त आलेला इतिहासांत कोणी दृष्ट नाहीं परंतु त्या विचाऱ्याला सध्यां कोणी माय बाप नसल्यामुळें कोणी कसेही बकावें व वेदान्ताच्या नांवाखालीं खपावें अशी स्थीति आली आहे. आज शंभर वेदान्ती घेतले तर खरा वेदान्ती एक सुद्धां मिळेल किंवा नाहीं याची मारामार असें मला वाटतें. प्रथम वेदान्त शिकतानां गुरुची अवश्यकता नाहीं असें घेऊन चालल्यावर मन मानेल तसा सूत्रांचा व भाष्यांचा अर्थ लावण्यास मोकळीक होते. पून: अलीकडे अशी एक मजा झाली आहे कीं आपले विकार सर्वोत्मक करणें याचेंच नांव परब्रह्म प्राप्ति अशी परिभाषा होऊं पहात आहे. अलिकडे वेदान्ती ह्मणविणाऱ्या एका पोपट पंचीचे उद्गार मी असे वाचले आहेत कीं सर्व " भरतखंड मी असें तुह्माला वाटूं द्या. तुह्मी आपल्यांत व त्याच्यांत अत्यंत तादात्म्य करून सोडा. त्याचे दु:ख ते तुमचे दु:ख असें तुह्माला कळूं द्या. त्याच्या सुखासाठीं तुह्मी नाम शेष व्हा. ह्मणजे तुमच्या ज्या इच्छा त्याच भरतखंडाच्या इच्छा होऊन राहतील. व तुमचा मोक्ष लवकरच तुमच्या जवळ येईल. तुह्माला भाकरीची पंचाईत कधींही पडणार नाहीं. " अहाहा ! काय हा वेदान्त ! किती उदात्त विचार ! मोक्ष ह्मणजे काय तर भाकरीची पंचाइत पडणार नाहीं. बिचारा हा मनुष्य इदंता शेष असल्या वांचून

सर्वात्मक अहंतेचे ठिकाणीं इच्छा संभवत नाहीं हातें ईर्ष्याळ सत्व जाणत नाहीं. वेदान्ताचे साधें तत्व असें आहे कीं जी वस्तु मी आहे असें वाटत असते, तिच्या विषयीं इच्छा शेष नसते. इहलोकच्या महत्वाकांक्षेनें दडपून गेलेल्या लोकांनीं हा नवीन वेदान्त उभारण्याचे चाळे मनांत आणले आहेत. भरतखंड मी झाल्यावर भरतखंडाच्या दुःखामध्यें नाम शेष ते कसें व्हावयाचे ? लघवीचे खात सुद्धां दुसऱ्याला दान देण्याविषयीं ज्यांचा जीव तुटतो. त्या लोकांनीं वेदान्ताची चर्चा सुरु केल्यावर कोमल पडूज्याचे स्वरूप त्याला आल्यास कांहीं आश्चर्य नाहीं.

दुसरा एक वेदान्ती ह्मणतो अनंत जन्मानें प्राप्त होणारा हा वेदान्त शूद्राला कधींही मिळणें शक्य नाहीं. वर्ण तेवढेंच यथार्थ आहेत अशा समजुतीनें हपापणाऱ्याचे हे उद्गार आहेत. पण या लोकांना मी स्पष्ट सांगतो कीं अत्यंत पुण्यानेंच जर वेदान्त तत्व बाणत असेल आणि हींच जर गोष्ट सत्य असेल तर त्या विषयीं वैदिक वर्णाश्रमाची कल्पना अगदीं अपुरी आहे. या वेदान्ती ह्मणविणाऱ्याला जैन मतांतच शिरले पाहिजे. प्रथम तर अति पुण्यानें कोणते मनुष्य शरीर बनते असे वैदिक धर्माचे मत नाहीं. देव शरीर देखील अति पुण्यानें बनत नाहीं असे वैदिक धर्म सांगतो. पण जैनांचे मत असे आहे कीं जैनांचे शरीर अत्यंत पुण्यानें बनत असून त्याचे शरीर कांहीं योजने असते तरी हवेंतील प्राण्यावर पाय दिला असतां देखील ते प्राणि मरत नाहींत. तो जेव्हां उपदेश करतो तेव्हां सर्व जीव आप आपल्या भाषेंत समजून घेतात त्यांच्या दर्शनानें सर्वच लोक काम रहित होतात. तो सर्वथा राग द्वेष विमुक्त असतो. त्याची भाषा अतिशय मोहक असते. राग रागिणीस मुक्त असते. दुसऱ्याचा अपराध करण्याचे त्याचे मनांतही येत नसते. आर्त ध्यान, रौद्र ध्यान, इत्यादि ध्यानें व चार घाती कर्मे त्याचीं नाश पावलेलीं असतात. जेवण्या खावण्याची त्याला प्रवृत्तिच उत्पन्न होत नाहीं. त्याला कांहीं आश्चर्य राहत नाहीं ह्मणून तो कधीं हासतही नाहीं. कधीं शोक करीत नाहीं. त्याच्या हातापायाचा स्पर्श होतांनां अडथळा होत नाहीं. अशा प्रकारचा भगवान् अरिहंत

सर्व नीतीनें परिपूर्ण असतो. माझ्या मतानें सर्व नीतीनें परिपूर्ण प्राणि उत्पन्न होणें अशक्य आहे. जैनांचे तीर्थकरही सर्व नीतीनें परिपूर्ण असतात कीं नाहीं याविषयींचा विचार मी संप्रदाय सुरतरूंत करीन. परंतु अतिशय नीतीच्या प्रारब्धानें बनलेला वेदान्ती जर पाहिजे असेल तर त्याला वर्णाश्रमाची कल्पना व देव लोकाची कल्पना देखील अपुरी आहे. कारण तेथेंही रागद्वेष पुराणेतिहासानें सिद्ध होत आहेत. असें मी ह्मणतो. ह्मणून जैन तीर्थ कराचाच आश्रय केला पाहिजे. सर्वथा नीतिमान व रागद्वेष विवर्जित अशा मनाची कल्पना व्युत्थानकाळीं वैदिक धर्मात केलेली नाहीं. जैन धर्मात केलेली आहे. अनंतबळ, अनंत शक्ति, अनंत वीर्य, अमोघ वाणी. अमोघ करुणा, अमोघ उपदेश असा भगवान अरि-हंत कांहीं योजन हें शरीर धरणारा जैन धर्मात आहे आणि सांग पूर्व ग्रंथांचा तो उपदेश करितो. त्यांत एका पृथ्वीच्या परमाणूचे प्रथम हातानें हजारो वर्षे तुकडे करून नंतर तितकेच वर्षे मनानें तुकडे करीत करीत जो संख्यातकाळ होतो त्याकाळाच्या असंख्यांत काळ जो ग्रंथ वाचण्यास लागतो त्याला पूर्व ह्मणतात असे १४ पूर्व ज्याला अवधिज्ञान उत्पन्न होते तो झलूं शकतो तेव्हां ते लिहील्या-जाणें वैदिक ब्रह्मदेवाच्या बापालाही शक्य नाहीं परंतु समंत भद्र मात्र १० पूर्वधारी होते यावरून त्यांत नीतीचा पुतळा ह्मणजे जैनांचा तीर्थकर, पार्शियांचा आहुर्मज्या, किंवा सैतानाच्या पलिकडे असणारा आकाशांतील बाप या तिनीहून कोणी तरी एक वेदान्ती ह्मणता येईल पण पूर्वीचे ऋषि या सिद्धान्तास विसरले होते. "योयो देवानां प्रत्यबुधत् सएव तदभवत् तथर्षीणां तथा मनुष्याणां" ही श्रुति असून देवा मध्यें मनुष्यामध्यें ऋषी मध्यें जो याला जाणेल तोच याला पावेल असे तिचे भाष्य आचार्यांनीं केले आहे परंतु पुण्यावर व नीतीवरच ज्ञान अवलंबून आहे असे ज्यांचे ठाम मत असेल त्यांच्या मतांत मनुष्याला ज्ञान होणें संभवनीयच नाहीं असें मी ह्मणतो; कारण मनुष्य शरीरा-पेक्षां पिशाच शरीरांत देखील अतिशय दिसून येतो. पुण्य परिपाक मूळकज्ञानवाद्यांना सर्वातिशयातिक्रान्त ज्ञानी शरीर मानल्यावाचून गत्यंतरच नाहीं. आतां असे कोणी ह्मणेल कीं ज्ञानियाचें शरीर अति-

शयातिक्रान्त असो किंवा नसो पण मन तसे असलेच पाहिजे तर हा वाद शरीर अतिशयातिक्रान्त वादापेक्षां अतिशय हास्यास्पद आहे कारण शरीराचा व मनाचा जो पर्यंत संबंध वादी अंगिकार करील तो पर्यंत सर्वातिशयातिक्रान्त मन होणें संभवनीय नाहीं आणि तो संबंधाचा अभाव अंगिकार करील तर जगांत कोणी ज्ञानीच संभवनीय नसल्यामुळें वादीचे उपहास करणें व्यर्थ होईल. तात्पर्य पुण्य परिपाकजन्य सर्वातिशयाति् क्रान्त शरीर ज्ञानियाचे असते ही कल्पना वैदिक धर्मात आजपर्यंत निघालीच नाहीं. तिचा जैन धर्मातच सुळसुळाट आहे. तथापि वस्तु स्थीति कोणाच्याही ज्ञानाला अडविल्या वांचून राहत नाहीं. सम्यक् दर्शन ज्ञान चारित्र या तिहींचा समुच्चय जो उमास्वामीनें मोक्ष मार्ग ह्मणून उपदेशिला आहे तसाच तीर्थ करानें कुंदकुंदाचार्याने क्षीण चारित्र पुरुषाचाही आपल्या समय सारांत मुक्तिमध्यें समावेश केला आहे. संगृह सर्वातिशयातिक्रान्त अवतार शरीर असतें. ही जरी नवीन कल्पना माझ्या मतांत आहे तरी त्या ठिकाणीं पुण्य परिपाक हेतु नाहीं हा मंतव्यप्राग्विशेष असल्यामुळें प्रगट लीले वांचून सर्वलीला नीतिमयच व्हाव्या असा आग्रह आमच्या मतांत उत्पन्न होत नाहीं. शिवाय अमुक चांगलें करण्याचे किंवा वाईट करण्याचे कोणताही अनुमानानें सिद्ध नसून आगम परंपरेनें त्या शिरलेल्या आहेत. त्या दृष्टीनें पाहिल्यास आगमिक देशाच्या ठिकाणीं आग्रह व आगमान्य देशाचा परित्याग करण्याचे चाळे ज्याला सुचतात त्याचे दुर्दैवच ह्मटले पाहिजेदुसरें कांहीं नाहीं.

तिसरा वेदान्ती ह्मणतो विकारांच्या भाव काळीं व अभाव काळीं मी सामान्य असल्यामुळें माझे अस्तित्व ठराविक आहे. ह्मणून मी मुक्त आहे. जैन व सांख्य दोघेही ईश्वरास न मानणारे या वेदान्ता. स मान देतात. पण या दोघाही वेदांत्यांनां आह्मी असें विचारतो कीं तुमचा हा स्वतंत्र वेदान्त असो व त्याचा तुह्मी प्रसारही करावा पण पण खऱ्या वेदान्ताचें तत्व असे आहे कीं मृत्युकाळीं सर्व वृत्ति आत्म्यांत लीन होतात तशा त्या निरोधानेंदेखील होत नाहींत पण सर्व विकारांच्या भाव काळीं व अभाव काळीं मी सामान्य आहे

एवढ्यानें वृत्तिला आत्म शेषता कशी येते ? उलटा विवेक काळीं इदंता भासच दृढ होतो.

चवथा वेदान्ती आपण अबाधित आहे ह्मणून सर्व कांहीं आपणा करितांच आहे आपण आहों तर सर्व कांहीं आहे आपण कांहीं मरत नाहीं आपल्या वासना कधींना कधीं तरी सफल होणारच ह्मणून तुम्हीं आपल्या वासना दृढ करा. इच्छेचा प्रवाह सदा चालूं द्या याला आमच्याकडे मर्कटी वेदान्त म्हणतात. तुह्मीं मरत नाहीं ह्मणून वासना वाढवा हा उपदेश करणाऱ्याच्या तोंडावर थुंकण्या करितांच मुळीं वेदान्त निर्माण झाला आहे. सर्व कांहीं भावनेनें तयार होते म्हणून ज्याला आपल्या मेलेल्या बायकोची वासना असेल त्यानीं ती वासना जन्मभर सोडूं नये; अशा उपदेशानें तर गुरु मायेवर गेलेली आपली इच्छा देखील मेल्यावर शिष्याला पूर्ण करून घेतां येईल.

पांचव्या वेदान्ती लोकांचें ह्मणणें तर मुळें मास्तरला जी मी पत्रें लिहिलीं आहेत त्यांत आलेंच आहे तेव्हां यातील कोणत्याच प्रकारचा वेदान्त आज मला शिकवितां येणें शक्य नाहीं. अलिकडे व्याख्यान देण्याचा धंदा उत्पन्न झाल्यामुळें लोकांच्या मनोवृत्त्यनुसार बकणेंच वक्तृत्वाचे लक्षण ठरले आहे. " द्रव्याचे नि अभिलाखे। असाधु नेणो काय बके। ह्मणोनि तयाचेनि मुखे। श्रवण न करावे गा। या प्राचीन महात्म्यांच्या ह्मणण्याकडे लक्ष कोण देतो. देईन गुरु सेवा। इया बुद्धि पांडवा। शत जन्माचा सांडोवा। करिती जे। इत्यादि ओव्या वाचून कांहीं पिढ्याच्या लोकांना हसूं सुद्धां येईल; पण मजा ही आहे कीं सर्व भरतखंड मी आहे अशी दृढ समज धरा ह्मणजे तुमच्या इच्छा त्या त्यांच्या इच्छा होतील असा कळकळीचा उपदेश करणारे देखील काळाचे स्वाधीन होऊन नुकतेंच मेले आहेत. मी काल आहे असे समजून यानें आपली इच्छा व कालाची इच्छा कां एक केली नाहीं कोण जाणें. जेव्हां मी या पत्रांत लिहिलेल्या खब-

रदारी घेऊन जर आपणास शिकावयाचे असेल तर मी शिकविण्यास तयार आहे नाहीं पेक्षां आपणास अनेक मार्ग खुले आहेत.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

माधान, १३।७।१९१३. | आपला, गुलाबराव.

॥ श्रीमत्सद्गुगुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर ३६.

राजमान्ये राजेश्री मामासाहेब यांस सा. न. वि. वि. आपण भौतिक शास्त्रांत शिक्षकाची पदवी मिळविली हे आह्मा कोही मंडळीस भूषणावहच झाले. परंतु केवळ पोटा करितांच तिचा उपयोग न करितां एकादी महत्वाकांक्षा धरून लोकांच्या उपयोगी पडेल असा एकादा शोध त्या शास्त्रांतून काढल्यास बरे होईल. हे शास्त्र नवीन नसून आर्या वर्तांत पूर्वी त्याची स्थीति होती. अवघे न्याय शास्त्र ह्याच गोष्टी सिद्ध करीत आहे. न्याय शास्त्राचा मोक्ष मिळविण्या करितां चार्वाक मत खंडणा पेक्षां अधिक उपयोग नाहीं असे आमच्या कडील प्राय: महात्म्यांचे मत आहे. त्यांचा आशय, परमाणु वादादिकांचा उपयोग भौतिक उन्नतिकडेच लोकांनीं करावा असा ध्वनिरूप आहे आणि ह्मणूनच अश्रौत असा हा परमाणु वाद काल संख्येची गणना करताना श्रौत अशा भागवतांत ही प्रमाण घेतला आहे पण मोक्षा करितां घेतलेला नाहीं. शिवाय अलिकडील भौतिक शास्त्रांनीं नास्तिक वाद वाढण्याची जी भीति असते तीही चार्वाक खंडणाचा यत्न त्या शास्त्रांत असल्यामुळें आमच्या पूर्वीच्या न्याय संज्ञक भौतिक शास्त्रापासून उत्पन्न होत नाहीं. आर्यांचे हवा विषयक शोध म्हणून केसरींत लेख

आला होता. त्यांत वेदांतील कांहीं वायूच्या स्तुतींतील मंत्र देऊन भौतिक हवेचे महत्व आर्यांना कळले होते असे अनुमान काढले होते पण अशा प्रकारची अनुमानें काढून भौतिक शास्त्र आपल्याकडे होते हे ह्मणणें अभिमान द्योतक असले तरी हास्यास्पद आहे कारण त्रसत्र्याची स्तुति ही वेद मंत्रांत आहे तेव्हां त्या विषयीं काय विशेष शोध आर्यांना होता म्हणून अनुमान काढावे ? कारण वायूची असो किंवा त्रसत्र्याची असो वेदानें जी स्तुति केली आहे ती देवता समजून किंवा तदुपहित चैतन्य समजून केली आहे परंतु ज्यांचा धर्मावर विश्वास नाहीं त्यांच्या हातून अशा तरी रीतीनें वेद पुस्तकाचें रक्षण होणें कांहीं सिव्वळच वाईट नाहीं तथापि भाषांतराच्या मुळाप्रमाणें आपल्याकडे भौतिक शास्त्र आहे असें सिद्ध करण्यास न्याय शास्त्राचाच आश्रय पुरे आहे. त्या शास्त्रांतील अनुमान खंडाला जसे इतर पंडितांकडून चालन मिळाले आहे तसे पदार्थ खंडास मिळाले असते तर बरें झाले असते. आतांही मिळणें ते फार जरूरीचे आहे. वर दिलेल्या सिद्धान्ता करितां त्या शास्त्रांतील एक उदाहरण जुळवून दाखवितो. भौतिक शास्त्रांत वायू हा Oxygen आणि Hydrogen असे अनेक पदार्थ मिळून झाला असे ह्मटले आहे. न्याय शास्त्रांत त्याला शुद्ध ह्मटले आहे पण त्याच्या प्रत्यक्षाप्रत्यक्षा विषयीं नवीन नैय्यायिकांत व प्राचीन नैय्यायिकांत वाद आहे. नवीन नैय्यायिक त्याला प्रत्यक्ष मानीत असून प्राचीन त्याला अनुमेय मानतात. कणाद सूत्रांत तर त्याला आगमिक सुद्धां ह्मटले आहे. अलिकडील भौतिक शास्त्राची कसोटी लावून पाहिल्यास मला नवीन नैय्यायिका पेक्षां प्राचीन नैय्यायिकांचे मतच सयुक्तिक दिसते. ते कसे हे प्रथम मी आपल्या युक्तीनें सांगतो. वायु प्रत्यक्ष मानल्यास तो त्वाच प्रत्यक्षच होईल. पण त्वाच प्रत्यक्ष नसतांही आपल्याला फुलाचा गंध एकाद्या खोलीत येतो. तेव्हां गंध हा गुण पृथ्वीचा असून अति सूक्ष्म असे वायूशीं मिसळून जाण्यासारखे पार्थिव परमाणु वायूच्या आश्रयानें नाका जवळ आले ह्मणजे आपल्याला पुष्पादिकांचा गंध येतो असे सर्व नैय्यायिकांचे मत आहे. नवीन नैय्यायिका प्रमाणें त्वाच प्रत्यक्ष रूप वायूचे लक्षण केल्यास

खोली मध्यें कस्तुरीचा किंवा पुष्पाचा गंधच येणार नाहीं. शिवाय पाषाणाला भाजले ह्मणजे त्याचा गंध आपणास येतो असे नैय्यायिकांचे मत आहे आणि गंध तर वायूच्या आश्रयावाचून येत नाहीं असे भगवंतानें श्रीमद्भगवद्गीतेंत १५ व्या अध्यायांत सांगितले आहे. तेव्हां उष्णतेच्या योगानें वायू हलका होतो ही ही उपपत्ति न्यायांत सांपडते. आतां भौतिक शास्त्राची कसोटी देखील प्राचीन न्यायाच्यां दृष्टीनें थोडीशी कमी योग्यतेची आहे असे मला वाटते. कारण वायूशीं मिसळण्या सारख्या जरी गंध असतो. तरी त्याला वायूरूप प्राचीन नैय्यायिक ह्मणत नाहींत. तसेंच स्पर्श होण्यासारिखे जड द्रव्य जरी वायूंत मिसळत असले तरी त्याला वायू ह्मणण्यास ते तयार नाहींत. Hydrogen व oxygen इत्यादि वायूशीं मिसळणारे पदार्थ असेत पण ते वायू खास नव्हेत. पिक नेमादि शब्द आर्य भाषेतील नाहींत असे पूर्व मीमांसेंत जसे सिद्ध केले आहे तसे oxygen व Hydrogen वगैरे आमच्या भाषेतील नसोत परंतु त्याच्या अर्थाच्या माहितीवरून गंधा प्रमाणें ते वायूशीं मिसळणारे पदार्थ आहेत एवढेंच काय ते. व ह्मणूनच त्या पदार्थांना पार्थिवरूप देता येते ह्मणजे त्यांच्या वड्या वगैरे करतां येतात. तर मग भौतिक शास्त्राशीं व प्राचीन नैय्यायिकांच्या वायूशीं सांगड कशी घालावी हा एक प्रश्न राहतो. परंतु माझ्या अल्प परिशीलनानें ठरविलेले उत्तर असे आहे. इथर ह्मणून भौतिक शास्त्रांत मानले आहे व तेही अनुमेय मानले आहे. तसेच ते सर्वत्र मानले असून त्याच्यात कंपन होते असे मानले आहे तेव्हां त्यांत बारीक Electron सारखे परमाणु असलेच पाहिजेत असे सिद्ध होते; कारण कंपन ह्मणजे एका परमाणूनें दुसऱ्या परमाणूस धक्का देणेंच होय; पण तसे होण्यास मध्ये देश असलाच पाहिजे आतां प्राचीन नैय्यायिकांचा वायूही असाच आहे. कारण तो सर्वगत आहे असे भगवंताने श्रीमद्भगवद्गीतेच्या ९ व्या अध्यायांत दृष्टान्ताकरिता सांगितलेले आहे. आणि त्याला महान्ही ह्मटलें आहे (वायुःसर्वगतो महान्) आपल्या स्थानांतून तो गंधाला नेत असतो. या १५ व्या अध्यायांतील वाक्याची ९ व्या अध्यायांतील वाक्याशीं

जुळणी केली ह्मणजे वायूचे कंपन रूपत्व व सर्व गतत्व आर्यांना मान्य होते असे सिद्ध होते तेव्हां नैय्यायिकांचा वायू व भौतिक शास्त्रांतील इथर एक आहेत असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां इथर जसे प्रकाशकारण आहे तसा ज्योतिष शास्त्रांतील सप्त वायूपैकीं एकादा वायू दाखविणे शक्य आहे चरकावरील जल्पकल्प तरु संज्ञक टीकाकारानें आग्लं भाषेंतील इथर भेटण्या करितां जे आकाशाचे स्थूल व सूक्ष्म असे दोन भाग केले आहेत ते भाषांतराच्या मूळा प्रमाणें नाहीं. इथरचे भाषांतर कोणी आकाश करितात, पण ते अगदींच बरोबर नाहीं. कारण आकाश देशरूप ह्मणजे Space रूप आहे. योगवार्तिक कारादिक आकाशाला परमाणू मानतात खरे पण ते कंपनरूप मानीत नाहींत. भौतिक शास्त्रांतही दोन प्रकारचे इथर मानले आहे एक चल Moving व दुसरे अचल Immoving त्यांत दुसऱ्या प्रकारच्या इथरशीं योग वार्तिककारादिकाच्या आकाशाशीं जुळणी झाल्यास आमची कांहीं हानि नाहीं. उलटी इष्टापत्तीच आहे सांख्यानें देश नित्य मानला आहे व आकाशाची उत्पत्ति मानली आहे ह्मणून त्यांतून हे आपल्यास Immoving इथर भाषांतराच्या मूळाप्रमाणें काढतां येईल. ज्याला माझे ह्मणणें भाषांतराच्या मूळाप्रमाणें सिद्ध करणारे वाटत नसेल तर त्यानें ते आपले खरें करून दाखवावें असें मी आव्हान करितो. शिवाय आर्यांचा व अनार्यांचा मतभेद धर्मांत असो पण ऐहिक विद्येंत असण्याची कांहीं अवश्यकता नाहीं. मनुस्मृतीच्या कुल्लूकभट्टादिकृत टीकेंत प्रत्यक्ष फलदेणाऱ्या ऐहिक विद्या आर्येतरा पासून ही घ्याव्यात असा आशय दाखविला आहे. महा भारतांतील कचदेव यान्याख्यान हेंच शिकविते. पूर्व मीमांसेंतील म्लेच्छ शब्द प्रामाण्य विचार या विषयीं नाहीं तर काय धर्माकरितां प्रमाण ह्मणावा ? सारांश एकाद्या संस्कृत पंडिताशीं मिळून ह्मणा किंवा स्वतंत्र ह्मणा थोडक्या खर्चातें आपल्याला उपयोगी पडतील असे भौतिक शास्त्राचे शोध करणें आपले कर्तव्य ठरवाल अशी आशा जाणून हा अल्प लेख

भेटी दाखल नजर केला आहे तो श्रीज्ञानेश्वर चरणीं समर्पण असो. कळावें.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

माधान, तारीख १५।७।१९१३. } आपला, गुलाबराव.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

## पत्र नंबर ३७.

रा. रा. देवरस मामा यांस सा. प्रणिपात वि. वि. मागच्या पत्रांवरून माझे ह्मणणें आपणांस कळलेच असेल. हे माझें लिहणें सध्याच्या भौतिक शास्त्रीय लोकांच्या टीकेस पात्र होईल हें मी जाणून आहे परंतु माझ्या एकट्याच्याच हातून हा प्रयत्न सिद्धीस जाईल असें माझें ह्मणणें नाहीं. सर्व नैय्यायिक पंडितानीं इकडे आतां मोर्चा फिरविला पाहिजे असा माझा आशय आहे. पूर्वी आपल्याकडे भौतिक शास्त्र अतिशय उज्वल व सुधारलेले होते. ठिकाठिकाणीं विमानांच्या वगैरे कल्पना आपल्या ग्रंथांतून चमकणें हेंच माझ्या ह्मणण्याच्या सत्यतेचे उदाहरण आहे. बृहत्कथें सारख्या महा काव्यांतून तर भौतिक यंत्राच्या देखील कल्पना चमकतात. कवि कल्पनेंतील अद्भुत रसाचा तो एक मासला असेल असे जरी ह्मटले तरी त्यांत बिलकुल तथ्य नाहीं असे ह्मणता येणार नाहीं. अद्भुत रस कवीना दोन प्रकारांनीं काल्पिता येतो. द्रव्य संवलित व शक्ति संवलित. कुंभकर्ण समुद्रांत उभा राहिला तेव्हां त्याला बेंबी इतके पाणी झाले इत्यादि कल्पना प्रथम असून विमानांत बसून गेला इत्यादि कल्पना द्वितीय आहेत. प्रथम कल्पनेला विशिष्ट प्रकारचे देह व द्वितीय कल्पनेला थोडी तरीं अमानुष शक्ति आधारा दाखल घ्यावी लागते. आकाशाच्या फुलाच्या माळा घालून कोणी राजा विलास करीत होता असा अद्भुत रस

कवींना कल्पितां येत नाहीं. तेव्हां बृहत्कथे सारख्या महा काव्यांतील कवि कल्पना सर्वथा निरालंबन आहेत असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. बृहत्कथेंत वासवदत्तेला विमानांत बसण्याचे डोहळे झाले असतां यौगंधरायणानें यंत्राचें विमान करून ते पूर्ण केले अशी एक कथा असून शंभर शंभर योजने जाणारे यंत्राचें विमान दोघे सुतार तयार करीत होते अशी एक कथा आहे. कलिंग सेनेला मय कन्येनें जे विमान दाखविले होते त्यांत वायु प्रधान, अग्नि प्रधान, जल प्रधान इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या कारवाया आहेत. लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट ही कीं यांत्रिक विमानें व देव विमानें या दोन विमानांत पूर्वी लोक समता मानीत नसत. यंत्राचे विमान करणाऱ्या सुतारानें जेव्हां नरवाहन दत्ताला तसें विमान करून दिले त्या पेक्षां जेव्हां तो विद्याधर झाला तेव्हांचे दैवी विमान निराळेच वर्णिले आहे. दैवी विमानाची शक्ति निराळी व यांत्रिक विमानाची शक्ति निराळी असा स्पष्ट देश बृहत् कथेंत दाखविला आहे. तेव्हां दैवी विमाना सारख्या- ना चार्वाकादिकांना कवि कल्पनेंतील अद्भुत रस ह्मटले तरी मनुष्याला शोभेल अशा यांत्रिक विमानाची कल्पना करण्या पुरता गौण अद्भुत रस कवींना कल्पण्याचे कांहीं कारण नव्हते. वरें दैवी विमानाच्या अति असंभाव्य कल्पना खोट्या वाटतील म्हणून त्या वेळच्या मनुष्य समाजाला शोभतील अशा प्रकारच्या यांत्रिक विमानें करण्याच्या कल्पना करण्याची धाटी कवींनें पाडली असे म्हटले तरीं वरच्या सिद्धान्तालाच अधिक पुष्टि येते. मनुष्याचे जितके ज्ञान तितक्याच ज्ञानाला पटेल असाच अद्भुत रस पाहिजे असतो. तेव्हां दैवी विमान कल्पने पेक्षां यांत्रिक विमान कल्पनाच तेव्हांच्या लोकांना अधिक पटत होत्या असें अनुमान काढणें चुकीचे होत नाहीं. असा प्रकारचा दुर्जन तोषन्याय घेऊन देखील अतिशय सुधारलेले भौतिक शास्त्र आपणाकडे होते असें स्पष्ट ह्मणता येते. सध्याच्या विमानाची कल्पना पंखाची असून हंस वगैरे पक्षी जोडलेल्या दैवी विमानांची कल्पना महा भारतात आहे. मुसलमान धर्मांत दैवीपऱ्यांनां पंख असल्याची कल्पना मुसल मानी वाङ्मयांत रूढ असून आर्येतर धर्मात देवदूताची कल्पना

अशीच रूढ आहे. तेव्हां इतके तरी सध्याच्या विमानाच्या व पूर्वीच्या विमानाच्या कल्पनेंत साम्य आहे. पंख लावून हवेंत उडता येते हे तत्व सर्वांनां समानच मान्य आहे. आतां दैवी विमानांत मांत्रिक किंवा ऐच्छिक शक्तीचा विशेष वर्णिला आहे. कुबेरावर स्वारीकरण्या करितां जाणाऱ्या रघुराजाच्या रथाची कल्पना कालिदासानें अशा शक्तीचीच केली आहे. पण या कालिदासाच्या कल्पनेला देखील त्या वेळच्या लोकांचा विश्वास असलेल्या मांत्रिक शक्तीचा आधार आहेच. भौतिक दृष्टीनें पंखाचे साम्य महाभारतांतील व बृहत्कथेंतील आर्य विमानांत मुसलमानी ऐतिहासिक विमानांत व पऱ्यांच्या गोष्टींत आर्येतर धर्मांतील देवदूतांच्या गोष्टींत वसध्याच्या Airship वगैरे मध्यें एक सारखेच आहे. या प्रमाणे पूर्वी आपल्याकडे भौतिक शास्त्र अतिशय सुधारलेलें असून आहे सध्यां त्याची परंपरा अगदीं नष्ट झाली आहे. वराह मिहीराच्या संस्कृत ग्रंथांतून व सिंवाली भाषेत असलेल्या माया मतय नामक बौद्ध ग्रंथातून तसेच अग्निपुराणासारख्या महापुराणांतून रुद्रयामला सारख्या तंत्रांतून गोविंदपदाचार्यासारख्या रस ग्रंथकाराच्या मुखांतून सध्यां ते थोडे थोडे विखुरलेले दिसत आहे त्याला कोणात्र शास्त्राची जोड लावली म्हणजे आपल्याकडे मोठे एक भौतिक शास्त्र तयार होण्यासारखे आहे. परंतु सध्यां माझे हे लेख बाल्य दशेंतले असल्यामुळें त्यावर टीका करणें शहाण्याला शोभण्यासारखे होणार नाहीं; कारण बाल्य दशेंत कोणत्याही गोष्टीला उत्तेजनच दिले पाहिजे. Bacon च्या निबंधाला देखील बाल्य दशेंत सर्वांनीं उत्तेजनच दिले. वेदांतील अग्नीचे शृंग व तीन पायाची श्रुति निरुक्त व व्याकरण कारानीं निरनिराळ्या तऱ्हेनीं योजली आहे. तशा सामान्य श्रुति धरून भौतिक शास्त्राचे शोध आपणाकडे होते अशा आशयाचे लेख केसरी वगैरे वर्तमान पत्रांतून व मासिक पुस्तकांतून बरेंच आले आहेत. परंतु त्यांत भाषांतराच्या मुळाप्रमाणें अजून यत्न झाला नाहीं तथापि त्या लेखांत भौतिक शास्त्रवाल्यांनी हीं वेदा विषयीं पूज्यबुद्धि ठेवली पाहिजे असा जो यत्न झाला आहे तो प्रशंसनीय आहे. तरी पण व्याकरणकारानीं व निरुक्त कारानीं

सामान्य श्रुति आपल्या कडच्या करून घेऊन विशेष व्यवस्था आप आपल्या सूत्राप्रमाणें त्यानीं केली. पूर्व मीमांसा व वेदान्त हीं दोनच दर्शनें वेदावर सर्वथा अवलंबून राहिली आहेत व त्याचें कारणहि धर्म ब्रह्म शीलता असणें हे योग्यच आहे. इतर दर्शन कारानीं एकादी सामान्य श्रुति आपल्या ह्मणण्याच्या पुष्ट्यर्थ देऊन आपल्या बुद्धीनें विशेष केलेले शोध नमुद केले आहेत हीच गोष्ट भौतिक शास्त्रा विषयीं लागू केल्यास आर्य भौतिक शास्त्राचा अभ्युदय केव्हां तरी खास होईल. Bose साहेबानीं आपल्या संवेदना ग्रंथांत ऋग्वेदांतील " एकं साद्विप्रा बहुधा वदंति " ही श्रुति दिली आहे. Physics, Phisiology Psycology हे तीन शास्त्र निराळे आहेत असे जे युरोपमध्यें मानल्या जात आहे त्याचा भेद सध्यां बोस साहेबानीं नाहींसा करून तिन्ही एकाच शक्तीचे विवक्षित रीतीनें निरूपण करितात असे दाखविले आहे आमच्याकडे या तिन्ही शास्त्राचे केव्हां पासून एकत्र निरूपण चालत आले आहे. चार्वाकाच्या भूत चतुष्टयवादांत Physics, Phisiologyचा थोडासा रासायनीक दृष्टीनें विचार झाला आहे आणि न्याय शास्त्रांत Physics, Phisiology Psycology या तिन्ही शास्त्रांचा एकदम समावेश झाला आहे. दीधितिकारानें तर मनाला भौतिक सुद्धां मानले आहे. तेव्हां संस्कृत पंडितानीं अशा प्रयत्नाच्या दिशेनें एकादा समाज काढून आपल्या सूक्ष्म बुद्धीचा इकडे उपयोग केल्यास लोप झालेले आर्य लोकांचे भौतिक शास्त्र पुनः उदयास आल्या वांचून राहणार नाहीं. नैय्यायिकांच्या विशेष कल्पनेचा तादृश धर्मास कांहीं उपयोग नाहीं. असो ही प्रस्तावना. मागच्या पत्रांत मी वायू विषयीं लिहिले होते. वायूची व इथरची तुलना केली होती. तिच्यावर अशी एक कोटी येण्याचा संभव आहे कीं रूपरहित स्पर्शवत्त्व हे वायूचे लक्षण सर्वांनीं केले असून इथरचे ठिकाणीं ते घटत नाहीं. तर यावर माझें असें उत्तर आहे कीं रूपवान पदार्थ देखील जितक्या जोरानें आंगावर बसतात त्या पेक्षां तितक्या अंशाना रूपरहित वायूचा स्पर्श अधिक वेगाचा होतो. वायूमध्यें नाना पदार्थ मिसळूं शकतात. याची कल्पना मी पूर्व पत्रांत लिहिली आहे. ते

पदार्थ वेगळे केले तर वायूचा स्पर्श अति सूक्ष्म राहील. वेदान्तांत पंचीकृत वायू मानला असल्यामुळें वायूंत मिसळणारे कांहीं पृथ्वी सारख्या पदार्थांचे देखील कांहीं कण होते हे सिद्ध होत आहे. धुळीचे कण जे वायूंत मिसळतात त्याला वेदान्ती पंचीकृत वायूंतील पृथ्वी म्हणत नाहींत. तेव्हां वायूशीं एक जीव होणारे जे पृथ्वी आदिक भूतांचे भाग तेच वेदान्ताच्या पंचीकृत कल्पनेंत येतात. पंचीकरण कल्पने प्रमाणें वायूमध्यें सूक्ष्म अग्नीचे सूक्ष्म रूपत्वादि धर्म पंचीकृत अग्नीमध्यें वायूचे सूक्ष्म कंपनादि धर्म स्वीकारावे लागतात. तेव्हां प्रकाशच सूक्ष्म वायूरूपी इथरचे कंपन म्हटल्यास माझ्या कल्पनेशीं विरोध येत नाहीं. शिवाय या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची मला सवड नाहीं. कारण माझा आवडता विषय भक्ति व वेदान्त हा आहे. तेव्हां माझ्या सूचने प्रमाणें होवो किंवा अन्य सूचने प्रमाणें होवो नैय्यायिक वगैरे पंडितांनीं हे काम करून भाषांतराच्या मूळा प्रमाणें त्याला शोभा आणावी हेच त्यांचे कर्तव्य आहे असें मी समजतों. द्विवेदी वगैरेंनी पाश्चात्य गणित शास्त्र संस्कृतांत आणले आहे पण ते देखील भाषांतराच्या मूळा प्रमाणें व्हावयाचे आहे. इकडील सर्व कुशल आहे एवढें सांगून हा लेख श्री ज्ञानेश्वर महाराजांचे चरणीं समर्पण करितों.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

| | | |
|---|---|---|
| माधान, | } | आपला, |
| १६।७।१९१३. | | गुलाबराव. |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर माउली ॥

# पत्र नंबर ३८.

रा. रा. बाबूराव यांस सा. प्रणिपात वि. वि. आपला अंदाज खरा ठरला हे दाखविण्या करितांच मी हें पत्र लिहीत आहे. एकाद्या कावळ्याला छिद्रें पाहण्याची अगदीं संवय पडली असली व तो त्याचा दुष्ट स्वभाव असला तरी त्याच्या स्वभावानुसार छिद्रें दिसतच जाणें हे कोणाचें दुर्दैव व कावळ्याचें सुदैव असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. धर्माचा अभ्यास केवळ धर्माकरितां करावयाचा असून कोणतेही आमिष दाखवून त्याचा अभ्यास करविणें अगदीं निंद्य मानले गेले आहे. जगांत लालची लोक फार आहेत हे जाणूनच धर्म करणाऱ्याकरितां स्वर्गाचें आमिष शास्त्रानें दाखविले आहे. आतां इह लोकाचेही आमिष शास्त्रानें दाखविले आहे खरें, परंतु ते देखील अदृष्टद्वारा दाखविले आहे. इच्छेस वाटेल तशी पुत्र कामेष्टी करून इह लोकाची देखील पुत्र प्राप्ति शास्त्र सांगत नाहीं. परंतु इह लोकाच्या सुखा करितां हपापलेले कांहीं लोक आतां धर्माच्या चिंधड्या करीत आहेत खास. एकादा सुधारक पुढें आला कीं मला दोन प्रकारची भीति वाटत असते. एक तर तो आपला वैदिक धर्मा पासून निराळा पंथ काढील ही व दुसरी धर्माचा अदृष्ट संबध तोडून टाकून ऐहिक सुखाकडे झुकवील ही. पूर्वी Theosophy संबंधांत जे कांहीं वाटत होते तें मुळे व शास्त्रीबोवा जवळ प्रथमारंभीच मी भविष्य वालून वाद घालीत असे; व त्याभविष्या प्रमाणेंच हल्लीं Theosophy ची स्थीति झाली आहे याविषयीं मुळे वगैरेनांच विचारून घ्यावे हा माझा वाद एकवेळ किंवा दोन वेळ झाला नाहीं तर सारखा वर्षभर झाला. अशीच स्वामी विवेकानंदा विषयींहि मला स्वप्नें पडूं लागली होती. तथापि स्वामी विवेकानंदाच्या समाजांत अनीतीचे कांहीं आहे असें

माझे ह्मणणें नाहीं; पण नुकत्याच ॲनिबिझेंट च्या पत्राला उत्तर देण्याकरितां बाबू अरविंद घोषचें एकपत्र केसरींत प्रसिद्ध झाले आहे. त्यांत त्यानें मी सनातन धर्माचा अनुयायी नाहीं तर उदार धर्मी अशा विवेकानंदाचा अनुयायी आहे हे कबूल केले आहे. तेव्हां उदार धर्म निघाल्या विषयींचे माझे एक तर स्वप्न खरे झाले. यद्यपि कबीर नानक वगैरे नवीन पंथ असूनहि मी त्यांनां मान देत असतो तथापि त्यांत अदृष्ट जनक सामुग्रीचा संबंध असल्यामुळें कांहीं अधिकाऱ्या करितां असे नवीन धर्म निघणें जरूरीचे असते. वेदाहून नवा एक दक्षाला धर्म दिल्याची कथा महाभारतांत आहे ह्मणून प्रतिदिनी असे ५०० धर्म जरी निघाले तरी त्याला अनुमोदन देणेंच मला बरे वाटते. पण इह लोका करितांच होईल त्यारीतीनें धर्माच्या सामुग्रींत फेरफार केल्यास त्याची अगदीं खेदप्रद स्थीति होते. केवळ आपली संपत्ति कायम राखावी एवढ्या करितां धर्मांत फेरफार करण्याची मुळींच जरूर लागत नाहीं. खुल्या व्यापाराच्या तत्वान्वयें देखील कोणाच्या संपत्तीवर कोणी एकदम धाड घालूं शकत नाहीं. कारण ज्या देशांत खुला व्यापार चालतात तो जितदेश एकाद्या दुसऱ्या देशाचा माल विकत घेण्या इतका ऐपतवान नसेल तर तितका माल घेऊं देण्याची ऐपत त्यादेशांत असली पाहिजे असा त्या व्यापाऱ्यांचा साधारणत: प्रयत्न असणें शक्य आहे. तेव्हां एकाचे उपास मार दुसऱ्यानें पाहणें दया सोडून दिली तरी इह लोकाच्या दृष्टीनेंही कोणाला संमत होईल असे वाटत नाहीं. ह्मणून संपत्ति राखण्याकरितां धर्ममध्यें फेरफार करणे चांगले नव्हे. सामान्य नीतीला अनुसरून. सर्व गोष्टी ह्रास असतात हे गृहीत धरूनच जुन्या धर्मांवर अनेक सुधारकानीं टीका केली आहे. दुसऱ्या कांहीं लोकानीं अर्धे हिंदु धर्मा-चा अंगिकार करून अर्धे हिंदुधर्मांवर टीका केली आहे. तसाच थोडा-सा प्रकार स्वामींच्या हातूनहि झाला आहे. स्वामींनां हिंदुधर्मांतील सगुण निर्गुण दोन्ही उपासना मान्य असून हिंदुधर्मांवर त्यांची प्रीति होती. मूर्तीपूजेवर सुद्धां त्यानीं व्याख्यान दिले आहे. ब्रह्मसमाज व आर्य समाजानीं सामान्य नीतीचा आधार घेऊनच हिंदुधर्मावर टीका

केली आहे. मला असें वाटतें कीं निःपक्षपातानें कोणत्याही धर्माचा विचार केला तरी त्यांत सामान्य नीतीला विलक्षण असे कांहीं प्रकार असतातच. त्यांतल्या त्यांत अवताराला नीतीच्या गवसणींत करून बांधण्याचे आपल्या धर्माच्या इतिहासांत उदाहरणच नाहीं. रामानें तरी वालीला पाठीमागून मारले पण भरतानें असें कोणतेही काम केले नसतांही रामायणांत त्याला अग्रपणाचा मान मिळाला नाहीं. नीतिमान अशा मैथिल ब्राह्मणाला भागवतांत विशेष मान काय आहे ? उलटा सर्व नास्तिक लोक ज्याच्यावर अनीतीचा आरोप करितात अशा एकालाच मान दिला आहे. महाभारताचा विचार तर याहूनाहि विलक्षण आहे. महाभारतांत अत्यंत नीतीमान कोण हे ५० वेळ भारत वाचणाऱ्याच्याही लक्षांत येणें कठीण आहे कारण तशा ज्या व्यक्ति आहेत त्यांची फार प्रशंसाच केली नाहीं. अशा महाभारतांत दोन व्यक्ति आहेत विकर्ण व भूरिश्रवा. द्रौपदीला सभेंत नग्न करीत असतां भीष्मादिक देखील कांहीं बोलले नाहींत पण विकर्णानीच त्याचा निषेध केला. तथापि त्याला महाभारतांत अग्रस्थान मिळालेच नाहीं. तात्पर्य साधकावांचून महापुरुषांनां नीति दृष्टीनें पाहणें हिंदुधर्मास विशेषसें संमत नाहीं. अशी जरी स्थीति आहे तथापि त्यांत राग द्वेषाचा कीति भाग आहे. व राग द्वेष असले तरी त्यांत हितकर्तृत्वाचा कीति भाग आहे हें कसून पाहण्याची आज्ञा हिन्दुधर्मानें सरसकट देऊन ठेवली आहे. राग द्वेष असोत कीं अनीति असो आहार्य नसल्यास त्यापासून होणारे अनर्थ टळत नाहींत असे हिंदुधर्माचें स्पष्ट मत आहे. आहार्य अनीतिवंतांनां आहार्य फळ भोगण्याचेही कांहीं विशेष वाटत नाहीं ह्मणूनच नरोवा कुंजरोवा " या बद्दल आंगठा गळून पडणें युधिष्ठिरानें सहन केले पण कोणतीही गोष्ट चिरसंस्कार पारतंत्र्यानें दिसून येत असली ह्मणजे तिच्या मध्यें निःपक्षपाती पणा व आहार्य पणा हे दोन्ही निःसंशय नसतात. ब्राह्मणाचा व इतर लोकांचा कलिकाल चिरसंस्कारानें व्यर्थ बरवर लढा दिसत आहे. तो लढा खरा करून दाखविण्याचा स्वामीनीं देखील बराच प्रयत्न केला आहे. "जन्मजातिवाद शंकराचार्यां पासूनच निघाला असून शंकराचार्यांनीं काय काय गोष्टी केल्या हे तुह्माला

सांगितल्या असतां राग येईल". असें एका लेखांत स्वामींनीं ह्मटले आहे दुसऱ्या एका लेखांत क्षत्रियाच्या हातीं जेव्हां जेव्हां ज्ञान मिळाले तेव्हां तेव्हां लोकांस त्याचा फायदा दिला व ब्राह्मणांना जेव्हां जेव्हां ज्ञान मिळाले तेव्हां तेव्हां लोकांस त्यांचा फायदा न देतां दाबून ठेवलें असें स्पष्ट ह्मटलें आहे. तिसऱ्या एका पत्रांत "मांसाच्या तुकड्यानें जर परमेश्वराची दया संपून जात असेल तर असा परमेश्वर काय कामाचा" असें ह्मटलें असून चवथ्या एका पत्रांत ब्राह्मणांनीं इतर लोकांना गुलाम केले आहे असा स्पष्ट ध्वनि दाखविला आहे. बौद्धधर्माचे व हिंदुधर्माचे ऐक्य कसें होईल याची सदैव चिंता करणाऱ्या महात्म्यानें ब्राह्मणांत व आपणांत फूट पाडण्याची खटपट करणें द्वेष मूलक ह्मणावें कीं तत्व ज्ञान मूलक ह्मणावें कांहीं समजत नाहीं. आणि या विचारांत जसें जसें खोल जावें तशी तशी श्रद्धा रहित वेदाधिकाराची हांव याच्या मुळाशीं दिसते. धर्माविषयीं ही गोष्ट झाली. वेदान्ता विषयीं विचार करितां स्वामी आपल्या माया नामक व्याख्यानांत ह्मणतात "प्रथम एकाद्या भ्रमालाच लोक माया ह्मणत असत. पुढें शंकराचार्यांच्या वेळेला मात्र माया कशाला ह्मणतात याचा अर्थ बरोबर होऊं लागला" या विधानान्वयें तर मायेचे अनादित्व व शंकराच्या पूर्वीचे माये विषयीं न्यूनत्व आणि उत्क्रान्तिमतानुसारें वेदान्ताचें सध्यांही कांहीं बाबतींत अपूर्णत्व कबूल करणें भाग पडतें तेव्हां या बाबतींत माझें दुसरें ही स्वप्न खरें झालें ह्मणावयाचें. एकाद्या चमत्कार दाखविणाऱ्यावर विश्वास ठेवला तरी धर्माचें स्वरूप ठीक राहत नाहीं कारण नुसत्या थोडक्या चमत्कारामुळेंच शालिग्रामाचे ठिकाणीं विवामायेसारखे देव येऊन बसून धर्मांत धर्मांतराचे गुप्त घोटाळे झाले आहेत; व नुसत्या बुद्धिमुळें एकाद्या महात्म्यावर विश्वासठेवल्यास माझ्यासारखी स्वप्नें खरी होण्याची पाळी येते. दोन्ही मिळून एकाद्या व्यक्तीवर ठेवण्याची खटपट केल्यास उभय पक्षीं दोष येतो. तेव्हां अधिकारान्वयें तिन्ही कांडाला अनुसरून उपदेश करणाऱ्या वरच विश्वास ठेवावा हा मार्गच कसा तरी शेष राहतो. देशकालानुसार आगम व्यवस्था आहे ह्मणून कसा तरी शब्द योजिला आहे पण त्या व्यवस्थेंत देखील आग-

मार्गेच प्राधान्य आहे बुद्धीचें किंवा थोड्याशा चमत्कारावर उभारले-ल्या हठाचें नसतें. माझ्यावर या बाबतींत टीका व्हावी असें सुचवून हा लेख श्रीज्ञानेश्वर चरणीं समर्पण केला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

माधान,
तारीख २८।७।१९१३.

आपला,
गुलाबराव.

समाप्त.